## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

नेहरू सामाजिक शास्त्र विद्यास्थान

(राज्यशास्त्र विभाग)


**एम.फिल. (विद्यानिष्णात) पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोधनिबंध**

# "लातूर जिल्हयातील रेड्डी समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास : लातूर आणि रेणापूर या तालुक्याच्या विशेष संदर्भासह"


**☆ संशोधक ☆**

***प्रा.पाटील अभिजित सुशीलकुमार***

**☆ मार्गदर्शक ☆**

***डॉ.महादेव गव्हाणे,***

राज्यशास्त्र विभाग,

श्री राजर्षि शाहू महाविद्यालय, लातूर


**मार्च - २०१०**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रातंर्गत राज्यशास्त्र या विषयाच्या एम.फिल. (विद्यानिष्णांत) पदवीसाठी पाटील अभिजित सुशीलकुमार यांनी ***'लातूर जिल्हयातील रेड्डी समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास : लातूर आणि रेणापूर तालुक्याच्या विशेष संदर्भासह'*** या विषयांवरील शोधनिबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

सदर शोधनिबंधामध्ये नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधान ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत.

मार्गदर्शक

***डॉ.महादेव गव्हाणे,***

राज्यशास्त्र विभाग

श्री राजर्षि शाहू महाविद्यालय, लातूर

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातंर्गत नेहरू सामाजिक शास्त्र विद्यास्थानाच्या एम.फिल. निवड समितीने सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षामध्ये या पदवीसाठी प्रवेश दिला त्याबद्दल त्यांचा अत्यंत मनापासून ऋणी आहे.

गुरूवर्य, आदर्श स्वरूपी, आदरणीय माझे मार्गदर्शक डॉ.महादेव गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा संशोधन अभ्यास करण्यास मिळाला हे मी भाग्य समजतो. सरांचे आभार शब्दातुन व्यक्त करता येण्यासारखे नाहीत. सरांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे संशोधन अभ्यास पुर्ण करता आला. त्यापाठीमागे सरांचे फार मोठे श्रेय आहे. शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.डी.पुराणे (पाटील) सर यांनी ही बहुमोल सहकार्य केले त्याबद्दल मी दोन्ही प्राध्यापकांचा आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ अधिष्ठाता कारेकर सर व राज्यशास्त्र प्राध्यापक श्री.माणिक सोनवणे सर तसेच आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील डॉ.शरद घोडके यांचेही अनमोल मार्गदर्शन लाभले. व टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे सिनियर क्लार्क हिले सर, ग्रंथपाल व सुजाता मॅडम, सविता मॅडम तसेच सर्व कर्मचारी या सर्वांनी वेळोवेळी या संशोधनासाठी सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

संशोधन विषयासाठी रेड्डी समाजातील सर्व संघटना पदाधिकारी, आजी-माजी सर्व नेतेमंडळी, पक्षीय कार्यकर्ते तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणारे दोन्ही तालुक्यातील रेड्डी समाजातील व्यक्तींनी केलेल्या सहकार्यामुळे हा संशोधन अभ्यास पूर्ण करता आला त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

शिवछत्रपती महाविद्यालयाचे ग्रंथपाल थोरात सर तसेच प्रा.फिरोज शेख, प्रा.विलास नाबदे, प्रा.महेश घोडके, प्रा.लक्ष्मण साके यासर्वांनी संशोधन अहवाल पुर्ण करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

पुणे विद्यापीठातील ग्रंथपाल पाटीलसर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.यशवंत सुमन, तेथील संशोधन सहाय्यक विवेक घोटाळे, प्रा.प्रदीप पाटील, लातूर यांनीही संशोधन कामी सहकार्य केले त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

माझे मित्र अविनाश नांगरे पाटील, प्रा.बाबासाहेब माने, प्रा. तुषार कांबळे, प्रा. आर.डी.पंडीत सुभाष आगळे इ. अनेक हितचिंतक, स्नेहींनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बहुमोल सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

सदर शोधनिबंधाचे संगणकीय लेखन सोहेल तांबोळी यांनी अतिशय सुबक, रेखीव करण्यासाठी कष्ट घेतले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

शेवटी महत्वाचे म्हणजे माझे आई-वडीलांसह सर्व कुटुंबियांनी केलेले सहकार्य हे कायमस्वरूपी ऋण आहे त्याबद्दल मी त्यांचा सदोदीत ऋणी आहे.

**पाटील अभिजित सुशीलकुमार**

# संशोधकाचे प्रतिज्ञापत्र

मी संशोधन कर्ता श्री. अभिजित सुशिलकुमार पाटील प्रतिज्ञापूर्वक असे निवेदन करतो की, **"लातूर जिल्हयातील रेड्डी समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास : लातुर आणि रेणापूर या तालुक्याच्या विशेष संदर्भासह"**, हा लघू शोध प्रबंध मी स्वतः लिहिलेला असून, तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठात एम.फील (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर केला आहे. हा शोधप्रबंध कोणत्याही विद्यापीठात कोणीही सादर केलेला नाही.

श्री. अभिजित सुशिलकुमार पाटील

# *अनुक्रमणिका*


| अ. नं. | प्रकरण | पान नं. |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र | ii |
| | ऋणनिर्देश | iii |
| | प्रमाणपत्र | iv |
| | अनुक्रमणिका | v |
| | आकृती, तक्तासूची | vi |
| १. | *प्रकरण-१*<br>**प्रास्तविक व संशोधन पद्धती** | १ ते १ |
| २. | *प्रकरण-२*<br>**लातूर जिल्हयाची ओळख** | १२ ते ६२ |
| ३. | *प्रकरण-३*<br>**राजकीय सहभागाची संकल्पना** | ६३ ते ७९ |
| ४. | *प्रकरण-४*<br>**रेड्डी समाजाचा इतिहास** | ८० ते १०९ |
| ५. | *प्रकरण-५*<br>**रेड्डी समाजाच्या राजकीय सहभाग व राजकीय सामाजिकरणाचे विश्लेषण** | ११० ते १४६ |
| ६. | *प्रकरण-६*<br>**निष्कर्ष**<br>परिशिष्ट- १ : प्रश्नावली<br>परिशिष्ट- २ : लातूर जिल्हा नकाशा<br>अ.लातूर तालुका नकाशा<br>ब.रेणापूर तालुका नकाशा<br>संदर्भ सूची | १४७ ते १६३ |

# आकृती, तक्ते सूची


| आकृती | | | |
|---|---|---|---|
| **अ. नं.** | **आकृति क्रं.** | **आकृती सूची** | **पान नं.** |
| १. | -- | रूश आणि अल्थॉफ यांनी दाखविलेला आकृतीबंध | ७७ |
| २. | -- | मिलग्राथ यांनी दाखविलेला आकृतीबंध | ७८ |
| **नकाशा सूची** | | | |
| ३. | -- | लातूर जिल्हा नकाशा | १५७ |
| ४. | -- | रेणापूर तालुका नकाशा | १५८ |
| ५. | -- | लातूर तालुका नकाशा | १५९ |
| **आलेख सूची** | | | |
| ६. | -- | रेड्डी समाज आणि वार्षिक राजकीय आवड | १२१ |

| तक्ते सूची | | | |
|---|---|---|---|
| **अ. नं.** | **आकृति क्रं.** | **आकृती सूची** | **पान नं.** |
| १. | ५.१ | रेड्डी समाज : वयानुसार वर्गीकरण | ११२ |
| २. | ५.२ | रेड्डी समाज : स्त्री पुरूष | ११२ |
| ३. | ५.३ | रेड्डी समाज : शिक्षणानुसार वर्गीकरण | ११३ |
| ४. | ५.४ | रेड्डी समाज : व्यवसाय वर्गीकरण | ११४ |
| ५. | ५.५ | रेड्डी समाज : नातेवाईकांचे सक्रिय राजकारण | ११६ |
| ६. | ५.६ | रेड्डी समाज : नातेवाईकाचे राजकीय कार्य | ११७ |
| ७. | ५.७ | रेड्डी समाज : आर्थिक स्थिती | ११९ |
| ८. | ५.८ | रेड्डी समाज : व्यवसाय व नोकरी | ११९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | ५.९ | रेड्डी समाज : राजकारणाची आवड | १२० |
| १०. | ५.१० | रेड्डी समाज : पक्षीय वर्गीकरण | १२२ |
| ११. | ५.११ | रेड्डी समाज : निवडणुका | १२३ |
| १२. | ५.१२ | रेड्डी समाज : राजकीय पार्श्वभूमी | १२४ |
| १३. | ५.१३ | रेड्डी समाज : पक्ष बदलाची भूमिका | १२६ |
| १४. | ५.१४ | रेड्डी समाज : महिला राजकारण | १२७ |
| १५. | ५.१५ | रेड्डी समाज : राजकीय सहभागाची पातळी | १२८ |
| १६. | ५.१६ | रेड्डी समाज : प्रभावशील नेते | १३० |
| १७. | ५.१७ | रेड्डी समाज : मतदान अधिकार | १३१ |
| १८. | ५.१८ | रेड्डी समाज : पक्षीय कार्य | १३२ |
| १९. | ५.१९ | रेड्डी समाज : राजकारण | १३४ |
| २०. | ५.२० | रेड्डी समाज : मतदान | १३५ |
| २१. | ५.२१ | रेड्डी समाज : राजकीय सहभाग | १३७ |
| २२. | ५.२२ | रेड्डी समाज : महिला विषयक धोरण | १३८ |
| २३. | ५.२३ | रेड्डी समाज : निवडणुक | १३९ |
| २४. | ५.२४ | रेड्डी समाज : जातीय घटक | १४१ |
| २५. | ५.२५ | रेड्डी समाज : विकास | १४२ |
| २६. | ५.२६ | रेड्डी समाज : महत्वकांक्षा | १४४ |
| २७. | ५.२७ | रेड्डी समाज : राजकीय पक्षातील पदे | १४५ |

*प्रकरण-१*

# प्रास्ताविक व संशोधन पद्धती


| | | पान नंबर |
|---|---|---|
| | प्रास्ताविक | ०२ |
| १.१ | अभ्यासाचे महत्त्व | ०४ |
| १.२ | संशोधनाचे कार्यक्षेत्र | ०६ |
| १.३ | अभ्यास व संशोधन पद्धती | ०७ |
| १.४ | गृहितके | ०७ |
| १.५ | नमुना निवड | ०७ |
| १.६ | संशोधनाचे प्राथमिक साधने | ०८ |
| १.७ | संशोधनाचे दुय्यम साधने | ०८ |
| १.८ | तथ्य वर्गीकरण व विश्लेषण | ०९ |
| १.९ | अभ्यासात आलेल्या अडचणी | ०९ |
| १.१० | संदर्भ सूची | ११ |

## प्रकरण-१

# प्रास्ताविक व संशोधन पद्धती

### प्रस्तावना -

कोणत्याही सामाजिक संशोधनाचा अभ्यास केला तर असे दिसते की, 'संशोधन' नुसते सिद्धांत मांडण्याची कृती नसुन तो सिद्धांत समाजात अंमलबजावणीची आवश्यकता असते. हा कोणत्याही सामाजिक संशोधनाचा मागचा महत्वपूर्ण उद्देश असतो.[१] कारण संशोधन करून तयार केलेला सिद्धांत समाज सुधारण्याच्या चौकटीत कसा बसवता येईल. याला सामाजिक संशोधनात महत्वपूर्ण स्थान आहे. तरच केलेले संशोधन यशस्वी आहे असे म्हणता येईल.

सदरील संशोधन करण्यामागे संशोधनातील उद्दिष्टे व ग़हितकेनुसार हा संशोधन अहवाल तयार केला आहे. कोणत्याही जात घटकावर ज्यावेळेस संशोधन केले जाते त्यावेळेस राजकीय व्यवस्थेमध्ये त्याचा परिपूर्ण सहभाग कसा आहे. तसेच गट-तट, राजकीय स्थित्यंतरे यांचाही येथील राजकारणार कसा परिणाम होता. याचे महत्वपूर्ण संशोधन केले जाते.[२]

हा संशोधन अहवाल तयार करण्यापूर्वी महाराष्ट्रभर विशिष्ट जाती धर्माच्या राजकीय सहभागाचा अभ्यास झालेला आहे. उदा. आदिवासी, मराठा, मुस्लिम, पद्मसाठी, रेड्डी त्यात नाविन्य काही नाही. परंतू तरीही 'विशिष्ट समुदायातील जात' जेव्हा राजकारणात वर्चस्वशाली होण्यास सुरूवात होते.[३] जेव्हा 'जात' या घटकाला राजकारणात महत्वाचे स्थान प्राप्त होते. आणि येथूनच आधुनिकतेच्या राजकारणामध्ये जात आणि राजकारण यांचा संबंध दृढ होताना दिसतो. या संशोधन अहवालात ७३ व्या घटना दुरूस्तीने, विविध राजकीय संधीमुळे रेड्डी समाजालाही राजकारणाची संधी मिळाली. त्यामुळे पिढया न पिढया वर्चस्व असलेले मराठा वर्चस्वाला धक्का बसला. याही राजकीय संघर्षाचा अभ्यासात्मक आढावा या संशोधन अहवालात घेतला आहे.

प्रस्तु संशोधन अहवालामध्ये निष्कर्षासह सहा प्रकरणांचा समावेश करण्यात आला आहे. त्या भागामध्ये प्रास्ताविक व संशोधन पद्धती असे प्रकरण असुन त्यामध्ये अभ्यासाचे

महत्त्व, या विषयावर आतापर्यंत झालेला अभ्यास, कार्यक्षेत्र, अभ्यास व संशोधन पद्धती, उद्दिष्टये, गृहितके, संशोधनाचे साधने, वर्गीकरण व विश्लेषण, अभ्यासात आलेल्या अडचणी याबद्दल माहिती दिली आहे.

तसेच दुसऱ्या भागामध्ये 'लातुर जिल्हयाची ओळख' अशा प्रकारचे दुसरे प्रकरण असुन त्यामध्ये जिल्हयाचे भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय माहिती संदर्भासह दिलेली आहे.

तिसऱ्या भागामध्ये 'राजकीय सहभाग संकल्पना' असे प्रकरण असून त्यामध्ये राजकीय सहभागाचे महत्व, भारतीय लोकशाहीचा उगम, राजकीय सहभागाच्या पातळया, ही माहिती देऊन वरील संकल्पना स्पष्ट केलेली आहे.

अहवालाच्या चौथ्या भागामध्ये 'रेड्डी समाजाचा इतिहास' असे प्रकरण असून त्यामध्ये रेड्डी समाजाच्या इतिहासासह त्यांच्या धार्मिक, सामाजिक रचनेचीही माहिती दिली आहे. रेड्डी समाजाच्या आर्थिक परिस्थितीच्या विश्लेषणांसह लातुर जिल्हयातील रेड्डी समाजाच्या सद्य स्थितीचाही मोठया प्रमाणावर आढावा घेतलेला आहे.

याशिवाय संशोधन अहवालाच्या पाचव्या भागाता 'रेड्डी समाजा राजकीय सहभाग व राजकीय सामाजीकरणाचे विश्लेषण' असे प्रकरण असून त्यामध्ये उद्देश व गृहितके नुसार प्रश्नावली तयार करून ती प्रश्नावली लातुर व रेणापुर तालुक्यात नमुना १०० व्यक्तीकडून भरून घेतल्या.  त्यात आजी-माही रेड्डी समाजातील नेत्यांसह, कार्यकर्ते आहे.  इतरही आणखी माहितीसाठी २५ नेत्यांच्या व कार्यकर्त्यांच्या प्रातिनिधिक स्वरूपात मुलाखती घेऊन माहिती मिळविली.  व त्याचे व्यवस्थितरित्या वर्गीकरण करून तक्त्यासह सविस्तर विश्लेषण या प्रकरणामध्ये मांडले आहे.  आणि शेवटी सहाव्या भागात 'निष्कर्ष' हे प्रकरण असुन त्यामध्ये विश्लेषण प्रकरणानुसार पुढे आलेल्या माहितीची प्रामाणिकपणे उद्देश व गृहितकानुसार निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

लातुर जिल्हयाचे राजकारण हे ९० च्या पूर्वीपेक्षा अगदी वेगळया दिशेने जात आहे. गुंतागुंतीच्या टप्प्यावर रेड्डी समाजाच्या राजकीय सहभागाचा विशेष संदर्भासह एक नवीन अभ्यास यानिमित्ताने प्रामाणिकपणे सादर केला आहे.  तसेच रेड्डी समाजाच्या राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाची एक नवी दिशा या निमित्तने हा अभ्यास सुचित करतो.  त्या नव्या

दिशेने अभ्यास करून जिल्हयाच्या राजकीय स्थित्यंतराचे अधिक तपशिलवार आणि प्रकल्भ असे आकलनही विकासाला कारणीभूत ठरेल असे वाटते.

## १.१ अभ्यासाचे महत्व -

पंचायत राजव्यवस्थेमध्ये इतर मागासवर्गीय समाजासाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या त्यामुळे रेड्डी समाजाला इतर मागास वर्गाचे राजकारणात नेतृत्व करण्याची फार मोठी संधी निर्माण झाली. त्यातून त्यांचा राजकीय सहभाग उत्तरोत्तर वाढत गेला.

ग्रामीण भागातील स्त्रियांना राजकारणात संधी देण्यासाठी व त्यांना राजकीय प्रवाहात सामावून घ्यावे म्हणून शासनाने ७३ वी घटनादुरुस्ती केली. या दुरुस्ती नुसार ग्रामपंचायत पंचायत समिती, जिल्हा परिषदेत अनुसुचित जाती, जमाती व इतर मागास वर्गासाठी लोक संख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेवण्यात आल्या. त्यामुळे १९९३ नंतर स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये राजकारणात कर्तृत्व सिध्द करण्याची संधी मिळाली. सर्वात तळात असणाऱ्या या वर्गाला प्रथमच सत्तेच्या वर्तुळात सहभाग मिळाला. मात्र या मिळालेल्या संधीचा फायदा ग्रामीण भागातील रेड्डी जातीतील स्त्री-पुरुषांना कितपत मिळाला. हा सदरील संशोधन अभ्यासाचा विषय आहे.

तसेच लातुर जिल्हयातील रेड्डी समाजाच्या राजकीय सहभागाबाबत आतापर्यंत संशोधन झालेले नाही. त्यामुळे प्रस्तुत संशोधन अभ्यासात राजकीय जागृती, राजकीय सहभाग अभ्यासता येईल तसेच रेड्डी समाजातील निर्माण झालेल्या नेतृत्वाची आखणी गतीमान करता येईल का? रेड्डी जातीतील स्त्रीयांचा सहभाग आणखी वाढविता येईल का? याचा विचार मोठया प्रमाणात या अभ्यासात केला जाईल. राजकीय सहभागामुळे रेड्डी जातीतील स्त्री पुरुषांना अनेक प्रकारची पदे मिळाली. परंतु प्रत्यक्षात कारभारात त्यांचा सहभाग किती असतो? समाजात त्यांना मानाचे स्थान आहे काय? अशा अनेक प्रश्नांच्या अभ्यासासाठी या विषयाला महत्व प्राप्त झालेले आहे. तसेच लातुर जिल्हयातील लातुर व रेणापुर तालुक्यामध्ये रेड्डी समाज व मराठा समाज यांचा राजकीय संघर्ष जिल्हाभर प्रसिध्द आहे. याठिकाणच्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद सह मार्केट कमिटी, तालुका खरेदी विक्री संघ, सहकारी बँक, विविध कार्यकारी सहकारी सोसायटया, सहकारी साखर कारखाना निवडणूक, शिक्षण संस्था याशिवाय अल्प व दिर्घ कर्ज पुरवठा करणा-या

सहकारी तत्वावरील संस्था इत्यादी मध्ये सत्ता मिळविण्यासाठी मराठा आणि रेड्डी समाज यांच्यात नेहमीच संघर्ष झालेला आहे.

इतर मागासवर्गीयांचे नेतृत्व सदरील रेड्डी समाजातील नेते करतात. म्हणून इतर मागासवर्गीयांचे राजकारण रेड्डी समाज नियंत्रित झाल्यामुळे मराठा वर्चस्वाला काही प्रमाणात राजकीय धक्के बसले आहेत. म्हणून येथील राजकारणाचे स्वरूप मराठा विरूध्द रेड्डी असे झालेले आहे. म्हणुन या संशोधन अभ्यासाचे निमित्ताने या विषयाला एक वेगळे महत्व प्राप्त झालेले आहे.

तसेच या विषयावर आतापर्यंत 'महाराष्ट्राचे राजकारण प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ' या पुस्तकामध्ये डॉ. बाळ कांबळे व गिरीश कुलकर्णी यांनी अहमदनगर जिल्हा स्थानिक निवडणूकीच्या जात व आरक्षणासह विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे. याशिवाय सकाळ, लोकसत्ता दैनिकवृत यामध्ये विशेष लेख जाने.-फेब्रु. २००४-०५ मध्ये प्रसिद्ध झालेले आहे. इनामदार एन.आर. यांनी १९६० ते १९७० च्या दशकामध्ये स्थानिक शासन यंत्रणेचा अभ्यास हा प्रामुख्याने लोकप्रशासनाचा एक भाग म्हणूनच केला गेला होता. त्या अभ्यासात विकास प्रशासनावर भर आणि विकास कार्यक्रमाची स्थानिक शासन यंत्रणेवरती असलेली जबाबदारी, या दोन मुद्यांचा त्यांनी अभ्यास केला. या अभ्यासात जिल्हा परिषद निवडणूकांची माहिती असली तरी अीयासाचा मुख्य भर समुदाय विकास योजना हाच होता. त्यामुळे या अभ्यासात स्थानिक शासनाच्या निवडणूक प्रक्रियेचा अभ्यास झाला नाही. या शिवाय स्थानिक नेतृत्व व राज्यपातळीवरील नेतृत्व यांचा संबंध अभ्यासला गेला नाही.

१९७९ च्या जिल्हा परिषदांचा शिंदे यांनी अभ्यास (१९८८) केला. या अभ्यासापासून राजकीय प्रक्रियेच्या चौकटीत अभ्यासाला सुरूवात झाली त्यांनी जिल्हा परिषद निवडणूकांचा अभ्यास केला. यानंतर कॉंग्रेस वर्चस्वाला तडे जाऊ लागल्यानंतर खऱ्या अर्थाने राज्यपातळीवर स्थानिक प्रक्रिया यांच्या परस्पर संबंधाचा मुद्या पुढे आला. महाराष्ट्रात कॉंग्रेस टिकून का? या प्रश्नांचे उत्तर देण्याचा जो प्रयत्न सुहास कुलकर्णी यांनी युनिक फिचर्सच्या मार्फत केला (१९९३) त्यात प्रथमच राज्य पातळीवरील राजकारणाचे स्थानिक धागेदोरे शोधण्याचा प्रयत्न केला गेला. त्यांनीच अनुभव मासिकांच्या माध्यमातून १९९५-९६ निवडणूकांचे मतदार संघनिहाय विश्लेषण संकलित केले. (अनुभव १९९५ व १९९६)

यावरूनही राजकारणाचे स्थानिक स्वरूप ठळकपणे पुढे आले. १९९७ च्या स्थानिक शासन संस्थांच्या निवडणुकांचे विश्लेषण सुहास कुलकर्णी यांनी दोन लेखांद्वारे केले. त्यामुळे जिल्हा परिषदांचे किंवा नगरपालिकांचे राजकारण हा एकूण राजकीय प्रक्रियेचा भाग असतो हे अधोरेखित झाले. थोडक्यात नव्वदीच्या दशकापर्यंत स्थानिक राजकारणाचा अभ्यास महाराष्ट्राच्या राजकारणाच्या अभ्यासात दुर्लक्षितच राहिला होता. २००१-२००२ च्या स्थानिक निवडणूकांचा पळशीकर यांनी आढावा घेतला. त्यांनीही त्रुटी भूर काढली (२००२) सुहास पळशीकर व नितिन बिरमल यांनी महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकात महाराष्ट्रातील स्थानिक शासन संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेचा अभ्यास केला आहे. याशिवाय जास्त अभ्यास अहमदनगर जिल्हयात व महाराष्ट्रात उपलब्ध नसल्याने त्या दृष्टिने या संशोधन अभ्यासाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

## १.२ संशोधनाचे कार्यक्षेत्र -

महराष्ट्राच्या राजकारणात लातूर जिल्हयाला विशेष महत्व आहे. या जिल्हयात विलासराव देशमुख, दिलीपराव देशमुख, शिवाजी पाटील कवेकर, बबनराव काळे, एस.आर.देशमुख, मधूकरराव कोकाटे, आबासाहेब पाटील, शिवाजीराव निलंगेकर, शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सारखे राज्यस्तरीय व राष्ट्रीय नेतृत्व उदयास आले.

१९९० च्या दशकात महाराष्ट्रात ओबीसीचे राजकारण सुरु झाले. त्यामुळे आर्थिक सामाजिक राजकीय क्षेत्रात रेड्डी समाजाला नेतृत्व करण्यास विविध ठिकाणी संधी मिळाली. लातुर जिल्हयामध्ये लातुर व रेणापुर तालुका हा राजकीय दृष्टया जागृत समजला जातो. या दोन्ही तालुक्याची रेड्डी समाजाची लोकसंख्या ४४,८९० आहे[४]. म्हणून या तालुक्यातील रेड्डी समाजाचा सामाजिक सहभाग कितपत जागृत आहे. हे जाणून घेण्यासाठी लातुर जिल्हयातील लातुर व रेणापुर हे दोन तालुके संशोधनासाठी निवडण्यात आली.

अभ्यासक स्वतः लातुर तालुक्यातील रहिवासी असून त्याच तालुक्यातील ग्रामीण भाग, सहकारी संस्था, ग्रामपंचायती, पंचायत समिती त्यांना माहिती आहे. त्यांचा या संस्थाशी व त्यांच्या पदाधिकाऱ्याशी संपर्क आहे. यामुळे वस्तुनिष्ठ माहिती मिळविणे सोपे गेले. तसेच हे दोन तालुके सहकार व राजकीय क्षेत्राशी निगडीत आहेत. त्यामुळे तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सहकार क्षेत्रातील माहिती मिळविणे व मिळालेली

माहिती योग्य आहे किंवा नाही, हे तपासणे सोपे गेले. हा दृष्टीकोन समोर ठेवून लातुर व रेणापुर हे कार्यक्षेत्र निवडले.

## १.३ अभ्यास व संशोधन पध्दती -

### अभ्यासाची उद्दिष्टये -

संशोधनासाठी पुढील उद्दिष्टये ठरवण्यात आली.

१. रेड्डी समाजाचा राजकीय व्यवस्था व त्यातील राजकीय सहभाग प्रक्रियेबद्दल त्यांना किती माहिती आहे याचा अभ्यास करणे.

२. रेड्डी समाजाचा राजकीय सहभाग कोणत्या पातळीपर्यंत आहे ते अभ्यासणे.

३. रेड्डी समाजातील नेते व लोकप्रतिनिधी यांचा निर्णय प्रक्रीयेतील सहभाग अभ्यासणे.

४. रेड्डी समाजातील स्त्रीयांच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.

## १.४ गृहितके -

१. रेड्डी समाजाचे राजकीय सहभागाचे प्रमाण चांगले आहे.

२. रेड्डी समाजातील स्त्रीयांपेक्षा पुरुषांचा राजकीय सहभाग जास्त आहे.

३. पंचायत राज्याच्या निवडणूकीत इतर मागासवर्ग म्हणून रेड्डी जातीला महत्व आले आहे.

## १.५ नमुना निवड -

संशोधन अभ्यास विषयासाठी लातुर जिल्हयातील लातुर व रेणापुर हे दोन तालुके अनुक्रमे निवडण्यात आले. त्यामध्ये १०० व्यक्तींकडून प्रश्नावली भरून घेतल्या. त्यामध्ये पंचायत राज्यातील आजी-माजी पदाधिकारी, पक्षीय कार्यकर्ते, अध्यक्ष, आजी सभापती, माजी सभापती, सहकारी साखर कारखान्याचे संचालक, मार्केट कमेटीचे संचालक, महिला पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य व उपाध्यक्ष, विधानसभेचे आमदार यांचा समावेश आहे. तसेच अधिक माहिती मिळविण्यासाठी या दोन तालुक्यातील नेत्यांच्या व कार्यकर्त्यांच्या प्रातिनिधिक स्वरूपात २५ जणांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

## १.६ संशोधनाची प्राथमिक साधने -

लातुर जिल्हयातील रेड्डी समाजाचा अभ्यास करताना प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत यांचा वापर केला. त्यामध्ये रेड्डी समाजाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय जीवनाचे निरीक्षण करून १०० नमुना लोकांकडून प्रश्नावल्या भरून घेतल्या. तसेच अधिक माहितीसाठी एकुण २५ राजकीय नेते व कार्यकर्ते यांच्या प्रातिनिधिक स्वरूपात मुलाखती घेण्यात आल्या.

## १.७ संशोधनाची दुय्यम साधने -

सामाजिक संशोधनाच्या नियमानुसार संशोधनाच्या दुय्यम साधनाद्वारे माहिती गोळा करण्यासाठी पुढील दुय्यम साधनांचा उपयोग झाला. तो पुढील प्रमाणे : -

१. ग्रंथालय, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, १९८० ते २००५, 'संशोधन अहवाल'
२. जयकार ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६० ते २००५, 'संशोधन अहवाल'
३. ग्रंथालय, अहमदनगर, संदर्भ ग्रंथ कोश, १९८९ ते २००४.
४. ग्रंथालय श्री. बसवेश्वर महाविद्यालय, लातूर, 'लातूर राजकीय माहिती'
५. लातुर तहसिल कार्यालय, निवडणूक विभाग, आरक्षण यादी.
६. रेणापुर पंचायत समिती, रेकॉर्ड रुम, निवडणूक विश्लेषण २००५ यादी.
७. लातुर पंचायत समिती कार्यालय, ग्रामपंचायत विभाग, निवडणूक व आरक्षण विश्लेषण यादी २००५.
८. रेणापुर तहसील कार्यालय, निवडणूक विभाग, 'निवडणूक विश्लेषण २००४-०५'
९. ग्रंथालय, ॲड.मुंकूदराव पाटील, अहमदनगर, 'रेड्डी समाज इतिहास', दुर्मिळ कागदपत्रे.
१०. ग्रंथालय, डॉ.आंबेडकर, कॅम्प, पुणे, समाज विज्ञान कोष, १९८० ते २००४.
११. जिल्हा सहकारी दुय्यम निबंधक कार्यालय, लातूर, 'सहकार संस्था तपशील' २००६-०७ पान- १ ते ४२.

१२. सांख्यिकी शासकीय कार्यालय, लातूर, 'आर्थिक व सामाजिक समालोचन' २००० ते २००२ पान नं. - ५, ६.

## १.८ तथ्य वर्गीकरण आणि विश्लेषण -

सदरील संशोधनामध्ये प्राथमिक आणि द्वितीय संकलनानुसार गोळा केलेली माहितीचे तक्त्यानुसार वर्गीकरण करून सामाजिक संशोधनाच्या नियमानुसार घेतलेल्या १०० प्रश्नावलीचे सुत्रबध्दरित्या विश्लेषण केले आहे.

**यावहारिक किंवा क्रियाभिमुख संशोधन (Practical of Applied Research) :-**

रॉबर्ट् लिडने या पध्दतीचा पुरस्कार केला. मिळविलेल्या ज्ञानाचा मानवी जीवनाच्या कल्याणाच्या हेतूने त्या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करावा हे या पध्दतीचे उद्दिष्टे आहे. हया पध्दतीनुसार समस्यांचा शोध घेणे, समस्या निर्मितीला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करणे आणि त्या निर्माण झाल्यास त्यावर उपाययोजना सुचविणे यावर भर असतो. क्रियाभिमुख पध्दतीचा उपयोग फक्त सामाजिक समस्याच्या बाबतीतच होतो असे नाही तर सामाजिक नियोजन, राजकिया नियोजन, सामाजिक अधिनियम, सामाजिक स्वास्थ्य, धर्म शिक्षण, न्याय, मनोरंजन या बाबतीतही होतो. ज्ञान हे व्यवहार उपयोगी असावे असा या पध्दतीचा कटाक्ष आहे. आधुनिक काळात समाज नियोजनाच्या किंवा समाज विकासाच्या ज्या योजना आखल्या जातात त्यासाठी मार्गदर्शक तत्वे सुचविण्याचे कार्य या पध्दतीमुळे होते. व्यावहारिक संशोधनामुळे संशोधनाच्या तंत्रात व पध्दतीत अधिकाधिक सुधारणा होते. व तो अधिक मानवी जीवन सुखी समृधी करण्यास ज्या ज्या अडचणी येतात त्याच्या निराकरणासह उपयुक्त ठरते.

**सोयीस्कर किंवा सुविधाजनक पध्दत (Convenience Sampling):-**

या पध्दतीच्या नावात सुचित केल्याप्रमाणे संशोधक आपल्या सोयीनुसार नमुना निवड करतो. ही निवड वेळ,पैसा,एकएकांशी संपर्क साधनसूचीची उपलब्धता इ.घटकावर अवलंबून असते. अर्थात ही पध्दत वैज्ञानिक आहे. कारण त्यात पक्षपात किंवा पूर्वग्रह उमटतात तरीही मर्यादित किंवा विशाल क्षेत्राचे संशोधन करताना हया पध्दतीचा उपयोग करतात.

वरील सामाजिक संशोधनानुसार सदरील संशोधन संशोधन अहवालात वरील पध्दतींचा वापर करण्यात आलेला आहे.सामाजिक शास्त्राच्या नियमानुसार कोणत्याही एका

समुहाचे किंवा त्या समूहाच्या राजकीय प्रक्रियेचे संशोधन करताना त्या-त्या समाज घटकाशी संबंध येणे गरजेचे असते. म्हणून वरील पध्दतीतून सदरील संशोधनात नमुना निवड करुन व महत्वाच्या व्यक्तीशी वैयक्तिक संपर्क साधून सदरील संशोधन केलेले आहे.

क्रियाभिमुख संशोधनानुसार या संशोधनास व्यावहारिक स्परुप प्राप्त झालेले आहे. संशोधन हे समाजातील प्रत्येक घटनेकडे किती प्रमाणात वास्तविक स्वरुपाने बघते. यावर त्याचे व्यावहारिक स्वरुप अवलंबून असते. म्हणून रेड्डी समाजाच्या राजकीय समाजाचे संशोधन करताना क्रियाभिमुख संशोधनाच्या प्रक्रियेला प्रामुख्याने महत्व दिले.

संशोधनाचे क्षेत्र मर्यादित असल्याने वरील पध्दतींचा या संशोधनात मोठया प्रमाणात उपयोग झाला. संशोधन कामी ज्या काही समस्या निर्माण झाल्या त्या या पध्दतीनुसारच सोडविण्यात उपयोग झाला.

या संशोधन अहवालातील क्षेत्र लातूर व रेणापूर तालुका हे असून व्यावहारिक दृष्टया येथील राजकिय संस्कृतीकरण घडून यावे म्हणून हे क्षेत्र संशोधन कामी निवडले. तसेच क्षेत्र जरी मर्यादित असले तरी नमुना निवड करताना येथील समाजघटकाला वस्तुनिष्ठ किंवा व्यावहारिक स्वरुपात या संशोधनाचा उपयोग होईल म्हणून वरील पध्दतींचा वापर केला आहे.

## १.९ अभ्यासात आलेल्या अडचणी -

१. प्राथमिक तथ्यसंकलन दरम्यान घेतलेल्या मुलाखतीमध्ये चार ते पाच व्यक्तींनी सत्य माहिती देण्यास सहकार्य केले नाही.

२. स्त्रीयांच्या मुलाखती दरम्यान ३०% प्रश्नांची उत्तरे पुरूषांनी दिल्यामुळे, रेड्डी समाजातील स्त्रीयांच्या राजकीय सहभागाचा अभ्यासपूर्ण संशोधन करण्यास अडथळे निर्माण झाले.

३. प्रश्नावलीमधील राजकीय पार्श्वभुमी या प्रश्नाबाबत अनेक व्यक्तींनी वेगवेगळी मतांतरे मांडली. त्यामध्ये लोकशाही मार्गाने मिळालेली राजकीय पार्श्वभूमी दिसली नाही.

४. संशोधक हे स्वत: मराठा असल्याने अनेक ठिकाणी मुलाखती दरम्यान प्रथम जात या घटकाला महत्व देऊन रेड्डी समाजातील व्यक्तींनी नंतर मुलाखती देण्यास सुरूवात केली.

५. विश्लेषण या प्रकरणामध्ये रेड्डी समाजाला मिळालेल्या आजी माजी पदाचे वर्गीकरण करण्यात अडचणी निर्माण झाल्या.

६. संशोधनाचे कार्यक्षेत्र ग्रामीण आणि शहरी असल्याने त्यांच्या जीवनाचे निरीक्षण केल्यानंतर रेड्डी समाजातील सामाजिक रचना यामध्ये विविध टप्पे दिसुन आले.

७. शासकीय कार्यालयात जातीय आधारीत लोकसंख्या माहिती, काही विश्लेषणात्मक माहिती गोळा करण्यास अडचणी आल्या.

८. रेड्डी समाज हा मुळ व्यवसाय शेती असल्याने मुलाखत घेण्यास अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण झाल्या. कारण त्यांनी उदरनिर्वाह व्यवसायाला प्राथमिक स्थान दिले.

९. मुलाखत घेतलेल्या व्यक्तींपैकी काही व्यक्ती निरक्षर असल्यामुळे प्रश्नावलीतील प्रश्नाची उत्तरे नीटपणे देऊ शकले नाही.

१०. मुलाखत घेतलेल्या अनेक व्यक्तींवर एक व्यक्ती प्रभाव असल्याने दुस-या राजकीय पक्ष, नेतृत्व, विचार याबद्दल नकारार्थी उत्तरे मिळाली.

## १.१० ***संदर्भ*** : -


**१.** चाफेकर विलास - प्रवासी, स्वातंत्र्य विशेषांक, ऑक्टो.-नोव्हे.-डिसें. १९९७ पान नं.२४.

**२.** वाबळे दत्तात्रय चंद्रकांत, 'शोध निबंध'- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, पान नं. ६, ७.

**३.** पळशीकर सुहास, 'मंडल', नंतरच्या कालखंडातील जात व राजकारण, वर्ष- फेब्रु.२००७, सुगावा प्रकाशन, पान नं. ३, २ रा परिच्छेद.

**४.** अखिल भारतीय समता परिषद लातुर जिल्हा वार्षिक अहवाल १९९१ पान-१११.

**५.** पळशीकर सुहास, जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण, सुगावा प्रकाशन वर्ष २००३, पान-१०.

**६.** Mehtta Sushil - social couflicts in a village community, Publiceh by- S. Chand, Year 1971, Page No.47. Second Para.

**७.** Kothari T. R., 'Research Methodology', Method & Techinques, Publish by- New age International, Year 2004, Page No.58.

**८.** Burton David - 'Research Trainning for Social Scientist', Sage Publication, Year 2000. Page No.105, Second Para.

*प्रकरण- २*

# लातूर जिल्हयाची ओळख

**पान नंबर**


| | | |
|---|---|---|
| | प्रास्ताविक | १३ |
| २.१ | लातूर जिल्हा भौगोलिक | २६ |
| २.२ | लातूर जिल्हा सामाजिक | ३२ |
| २.३ | लातूर जिल्हा आर्थिक | ४३ |
| २.४ | लातूर जिल्हा राजकीय | ५० |
| २.५ | संदर्भ | ६२ |

<u>*प्रकरण- २*</u>

# लातूर जिल्हयाची ओळख

## प्रस्तावना : -

लातूर जिल्हा निर्मितीचाही मोठा इतिहास आहे. सन १९०५ पर्यंत औसा तालुक्यातील एक गाव आणि मोठी बाजारपेठ असेलेले हे शहर विकासाच्या दृष्टीने वाटचाल करत असताना दिनांक १६ ऑगस्ट १९८२ रोजी जिल्हा मुख्यालय झाले. १९९९ पर्यंत याचा विस्तार होत दहा तहसिल केंद्राचा अंतर्भाव असलेला हा जिल्हा झाला. लातूरला उज्ज्वल अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. मराठवाडयातील हा जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेय दिशेस आहे. साधारणतः जिल्हयाची आग्नेय सीमा कर्नाटाकातील बिदर जिल्हयाशी संलग्न आहे. जिल्हयाचा बहुतेक भाग हा बालाघाट पठारी प्रदेशाचा आहे. मांजरा आणि तिची उपनदी तावरजा, तेरणा तसेच मन्याड, तिरू, घरणी या नद्यांनी हा भाग सुजलाम केला आहे[१].

मांजरा नदीच्या काठावर अश्मयुगीन काळातील मानवी अस्तित्त्वाच्या खूणा व सुमारे पन्नास हजार वर्षापूर्वीचे हत्ती, गेंडा, रानम्हैस यांचे जीवाश्म सापडले आहेत. स्वाभाविकपणे या प्राण्यांच्या अस्तित्त्वासाठीचे योग्य पर्यावरण त्या वेळी येथे होते. किल्लारी भूकंपामुळे एकूणच महाराष्ट्राच्या भौगोलिक जडणघडणीचा नव्याने विचार सुरू झाला. आर्कियन खडकामध्ये असलेल्या प्राचीन भ्रंशावर नव्याने हालचाली झाल्यामुळे हा भूकंप झाला असे मत व्यक्त केले गेले. वास्तवात आर्कियन खडकात साठवलेली ऊर्जा केव्हाच मुक्त झाली आहे. या मृत भूस्तर अशांचे पुनर्जीवन होऊन नव्याने हालचाली होत आहेत. नव्यान भूस्तर हालचालीमुळे उत्क्रम भूभ्रंश (Rerersedault) झाले. महाराष्ट्र हा भूप्रदेश भूकंपदृष्टया स्थिर आहे ही धारणा नव्याने तपासण्यासाठी ही धटना कारणीभूत ठरते. शिवाय याविषयीची सज्जता हा एक न संपणारा विषय ठरतो. स्थलांतर हा याचा पर्याय ठरू शकत नाही हे देखील स्पष्ट झाले. या सर्व दृष्टीने लातूर जिल्हयाचे योगदान निश्चित नोंद घेण्यासारखे आहे. भूकंपग्रस्ताचे इतक्या मोठया प्रमाणात नियोजनबद्ध रीतीने झालेले पुनर्वसन हे संपूर्ण देशात आदर्शवत मानले जाईल. सर्व मानवी प्रवृत्तीचे दर्शन होऊनसुद्धा निर्मितीक्षम कार्याची

क्षमता लातूर जिल्हयाने स्पष्ट केली हे विशेष.

प्राचीन भारतातील सोळा महाजन पदांपैकी अश्मक या जनपदाचा लातूरचा समावेश होता. कालांतराने अश्मकाच्या दक्षिण भागाला कुंतल हे नामभिधान प्राप्त झाले. स्वाभाविकपणे लातूरचा समावेश कुंतल जनपदाला झाला. मौर्य काळात इ.स.पू.चौथ्या शतकात या भागाचा अंतर्भाव कर्नाटकातील सन्नती (सुवर्णगिरी) या प्रशासकीय विभागात होई. लातूरजवळील तेर (तगर) हे सन्नती यांना जोडणारा राजमार्ग या जिल्हयातून जात होता. शिवाय बलिपट्टण या स्थानाशी सुद्धा सातवाहन काळात या प्रदेशाचा संपर्क होता. लातूरचया सांस्कृतिक इतिहासाचा तेव्हापासून प्रारंभ होतो असे मानता येते. विशेषतः तगर येथे आढळलेल्या जनपदाच्या स्वतंत्र नाण्यावरून असेही मानता येईल की, 'तगर-लत्तलूर' हे एक स्वतंत्र जनपद असावे. सातवाहन काळात लातूर जिल्हयाचा भूभाग या जनपदाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असावा. वाकाटक काळामध्ये वत्सगुल्म शाखेचा देवसेन याच्या प्रभुसत्तेखाली लातूर परिसर होता. 'नांगरकट-उत्तरामार्ग' या प्रशासकीय विभागात हा भाग येई. इ.स.६८२ मध्ये सातव्या शतकाच्या उत्तरार्धात लातूर हे राष्ट्रकुटांचे मूळ स्थान असल्याचे श्री.अ.स.अळतेकर यांच्यासारख्या ज्येष्ठ संशोधकाने स्पष्ट केले आहे. बदामीच्या चालूक्य काळात 'उच्छिव चत्पारिशत'[२] औसा हा चाळीस स्थानांचा अंतर्भाव असणारा एक स्वतंत्र प्रशासकीय विभाग होता. बोरगाव ताम्रपटात याविषयी नोंद आहे. हा विभाग 'नलवाडी' (नळदूर्ग) या मुख्य विषयविभागाचा उपविभाग असावा. एकूण आजच्याच प्रमाणे विविध प्रशासकीय निर्मिती व त्यांच्या कमीअधिक होणाऱ्या सीमारेषा विविध राजवटीच्या काळातही आढळतात.

राष्ट्रकुट राजवंशाच्या काळात लातूर राजकीय हालचालीचे केंद्र होते. मानूरच्या राष्ट्रकूटांनी लातूर येथे येऊन वास्तव्य केले. त्यांनी येथे गढीवाडयांची उभारणी केली. यावेळी लातूर सथलमहात्म्यातील नोंदीप्रामणे 'रट्टगिरी' या नावाने ओळखले जाई. रट्टनौर-लत्तनौर-लातूर या क्रमाने या स्थानाच्या नावात झालेले परिवर्तन स्पष्ट होते. या वंशातील बलाढय असलेल्या दंतीदूर्ग या राष्ट्रकूट राजाची मूळ शाखा लातूर येथीलच होती. दंतीदूर्गाने वेरूळ येथील लेण्यांची निर्मिती केली. कर्नाटकातील मयुरखंडी (मोरखंडी) येथील गोविंदुपत्र अमोघवर्ष हा 'लत्तलुरपूरवराधीश्वर' आणि 'लत्तलूरपूरपरमेश्वर' अशी बीरूदे धारण करीत असे. या राजांच्या दानलेखनातून स्पष्ट होते की यांचा लातूर क्षेत्राशी निकट संबंध होता.

सन ८०० च्या नंतर लातूर क्षेत्रात राष्ट्रकुटांचे सत्ताकेंद्र आणि त्याचबरोबर शैक्षणिक कार्यासाठी त्यांनी दिलेले अग्रहार विकसित झाल्याचे दिसतात. अहमदपूर तालुक्यातील झरीका (नवकुंडझरी), उमरगा तालुक्यातील लोहारा बुद्रुक तसेच अगदी सातारा जिल्हयातील कऱ्हाड आणि एरंडोली या स्थानांची नोंद यादृष्टीने उल्लेखनीय आहे. राष्ट्रकूटांची मूळ शाखा जवळपास अर्धशतकापेक्षा जास्त काळा लातूर येथे नांदली. पुढे ८५० मध्ये त्यांनी मान्यखेट येथे स्थलांतर केले. प्रसंगोत्पात त्यांनी मोरखिंडी तसेच मालखेड (जि.बिदर, कर्नाटक), कंधार (जि.नांदेड), बोधन (जि.निजामाबाद, आंध्रप्रदेश) याठिकाणी सत्ताकेंद्र विकसित केले. सुगंधावती (जि.बेळगाव) येथील सौदंतीच्या रट्ट घराण्यातील कान्हरदेव हा स्वतःला 'लत्तलूरपूरविनिर्गत' म्हणवतो. याच शाखेचा मूळ पुरूष कृष्ण हा 'कंधारपूरवराधिश्वर' असे बिरूद धारण करतो. हे मूळ लातूरचे होते. राष्ट्रकूट राजकन्या कल्याणीच्या चालूक्यांना दिली होती. तर लातूरच्या रट्टांनी आंध्रातील कुल्पक आणि ओरिसातील संभलपूर येथे राज्य संपादन केले. याविषयीची नोंद त्यांच्या अभिलेखातून उपलब्ध आहे. विशेष म्हणजे कल्याणीच्या चालूक्यांचा महासामंत राणक धाडिदेव हा लातूरचा होता. त्यचा दंडनायक हाही लातूरचाच होता. या बाबी या स्थानावरील विजिगुषु व महत्वकांक्षी राजपुरूषांची नोंद करतात. कल्याणीच्य चालुक्याच्या अकराव्या शतकातील पाप विनाशक मंदिरातील लेखात या स्थानाची नोंद 'लत्तलौर' अशी करून हे नगर दिव्य, पूरश्रेष्ठ व वेदविद्येचे केंद्र असल्याचे नोंदवले आहे.

या जिल्हयात मिळालेल्या एकूण शिलालेखांपैकी अनेक लेख कल्याणीच्या चालूक्य राजवटीशी संबंधित असून कन्नड लिपित आहेत. चालूक्य राजा सहावा विक्रमादित्य याचा सेनापती भीम आणि त्याचा दण्डनायक पुत्र कालिदास याने हिप्पळगाव व गणेशवाडी येथे अनेक मंदिरे उभारली. तसेच पाठशाळा व जलाशयाची निर्मिती केली. महाराष्ट्राच्या जलव्यवस्थापनात आवर्जून नोंद घ्यावी असा 'भीमसागर' हा जलाशय गणेशवाडी येथे सन ३० नोव्हेंबर १०९९ मध्ये निर्माण करण्यात आला. याविषयीचे पुरातत्वीय अवशेष व शिलालेख या स्थानावर उपलब्ध उपलब्ध आहेत. येथे पाशुपत शैवपंथीयांचे तसेच पर्वतावली आम्नायाच्या शिवलिंगी संतान शाखेचे वास्तव्य होते. पुढे बसवेश्वराने वीरशैव पंथाचे पुनर्संघटन केले. त्याविषयीची पार्श्वभूमी शिवलिंगी संतान व सरस्वती मंडपाद्वारे गणेशवाडी येथन तयार होत होती असे म्हणता येईल. पाचवा भिल्लम या यादव राजाने कल्याणीच्या

चालूक्य राजावर आपले प्रभूत्व निर्माण केले. याचवेळी वरंगळ येथे काकतीय राजवंशाची स्थापना झाली. स्वाभाविकपणे या परिसरात यादव व काकतीयांच्या परस्पर प्रभुसत्तेसाठीचा संघर्ष झाल्याचे जाणवते. यादवांचा सेनापती खोलेश्वर याच्या नियंत्रणाखाली 'औसदेश' आणि 'उदगीरदेश' हे विभाग होते. याविषयीची नांद अंबाजोगाई लेखात उपलब्ध आहे. काकतीयाच्या गणपती यान काही काळ नांदेड जिल्हयातील भोकर व लातूर जिल्हयातील उदगीर येथे ताबा मिळविला. पुन्हा हा प्रदेश कान्हरदेव यादवांनी सन १२५८ मध्ये हस्तगत केला[३].

जिल्हयाशी संबंधित अभिलेखाचा जरी विचार केला तरी वाकाटकराजा देवसेन, बदामी चालुक्याचा पहिला विक्रमादित्य, विनयादित्य, राष्ट्रकुट वंशातील ध्रुव, तिसरा गोविंद, पहिला अमोघवर्ष, दुसरा विजयसिंह, सोमेश्वर पहिला, विक्रमादित्य सहावा, सोमेश्वर तिसरा, यादव राजवंशातील सिंघनयादव, कान्हरदेव आणि सौदंतीचे रट्ट या विविध राजवंशातील राजांचा प्रत्यक्ष या भागांशी संपर्क होता हे स्पष्ट होते.

प्राचीनकाळात तगर प्रमाणेच धाराशिव व अन्न क्षेत्राचा विकास होत हाता. लातूर परिसरातील या स्थानांबरोबरच खरोसा लेण्याची निर्मिती बदामीच्य चालूक्य काळात झाली. या लेण्या बौद्ध, जैन व हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करतात. राष्ट्रकूट व उत्तरकाळात जैन आणि पुढे लिंगायतांचा प्रभाव जाणवतो. औसा येथ प्रमुख जैनपीठ होते. करकण्डचरियु या ग्रंथांचा कर्ता कनकामर याचे वास्तव्य चालूक्य काळात औसा येथे होते. जैन धर्मीयांसंबंधीची सविस्तर नोंद रामलिंग मुद्गड येथील शिलालेखात आली आहे. येथे मुनी दामनंदी सिद्धांतदेव याच्या आधी दिवाकरनंदी घनकिर्ती आणि अभयनंदी या जैन आचार्यांची नोंद उपलब्ध आहे. श्वेतांबर व दिंगबर पंथीयांचा समन्वय साधणाऱ्या 'यापनीय' संघाच्या अनुयायांचे वास्तव्य लातूर परिसरात आढळते.

या क्षेत्रात लातूर येथील सिद्धेश्वर मंदिर, केशवराज मंदिर, भूतेश्वर मंदिर तसेच निलंगा येथील नीलकंठेश्वर मंदिर, पानगाव येथील विठ्ठल मंदिर, औसा तालुक्यातील बोरगाव, तसेच बोरी, बल्लाळ चिंचोली, मुरूड आणि गंगापूर याशिवाय अहमदपूर तालुक्यातील झरी बुजुर्ग आणि शिरूर अनंतपाळ, रामलिंग मुदगड, निठूर, भूतमुंगळी येथील विविध मंदिरे या क्षेत्रांच्या दहाव्या ते तेराव्या शतकांपर्यंत होत जाणाऱ्या विकासाची साक्ष देतात. विविध धर्माच्या बरोबर शैक्षणिक केंद्र पाठशाळा व त्यासाठी म्हणून दिलेले अग्रहार हे

या क्षेत्रातील शैक्षणिक परंपरा अधोरेखित करतात[४].

मध्ययुगात इस्लामिक सत्तेचा प्रभाव या क्षेत्राचा होता. खिलजी नंतर बहमनीची सत्ता येथे नांदली. पंधराव्या शतकात गुलबर्गा व बिदर येथे बहमनीच्या विघटनातून नवीन सत्ताकेंद्रे अस्तित्वात आली. औसा येथील सुभेदार कासिम बरीद याने बरीदशहाची स्थापना केली. या कालखंडात औसा व उदगीर किल्ल्याने विविध संघर्ष अनुभवले यातूनच येथील किल्ल्यांचा विकास झाला. लष्करी व महसूल केंद्राबरोबर मध्ययुगीन नगरचनेचे उत्तम उदाहरण म्हणून या स्थानांची नोंद करता येते. सतराव्या शतकाव्या प्रारंभी मलिक अंबर याने औसा ताब्यात घेतले. इ.स.१६३६ मध्ये निजामशाहीची अखेर होऊन लातूर जिल्हयाचा समावेश मोगल साम्राज्यात झाला. उत्तर काळात हैद्राबादचा निजाम आणि पेशवे यांच्यातील संघर्ष उदगीर तांदुळजा परिसरात झाला. याच काळात जिल्हयात विविध गढी-वाडयांची निर्मिती झाली. उत्तर मध्ययुगीन संस्कृतिचे एक वैशिष्टय म्हणून याची नांद प्रथमच या दर्शनिकेत घेण्यात आली आहे. यानंतर झालेल्या स्वातंत्र्याच्या लढयातसुद्धा या गढीवाडयांचे स्वत:चे असे वेगळेपण जाणवते.

निजामी सत्तेविरूद्धचा सर्वंकश संघर्ष हे एक रोमहर्षक पर्व होते. साधारणत: सन १९३८ पूर्वीचा इतिहास हा उद्योगपर्व या सदरात येईल. १९३८ ते १९४६ हे आंदोलनाचे पर्व होते. १९४६ ते ४७ प्रक्षोभक पर्व मानावे लागते तर १९४७ ते ४८ हे प्रत्यक्ष मुक्ती पर्व होय. हैद्राबाद संस्थानाला आणि पर्यायाने आजच्या लातूर जिल्हयाला १७ सप्टेंबर १९४८ रोजी जे स्वातंत्र्य मिळाले त्याचे श्रेय आर्य समाज, महाराष्ट्र परिषद व स्टेट काँग्रेस यांना द्यावे लागते. समाजातील सर्व घटक या आंदोलनात सहभागी होते. अनेकांनी यासाठी आत्माहुती दिली या आंदोलनाला विविध पैलू असल्याचे दिसतात. गेल्या काही दशकात या संदर्भात विद्यापीठ पातळीवर होणाऱ्या बहुविध संशोधनामुळे अनेक बाबी नव्याने स्पष्ट होत आहेत. निजाम शासनाच्या धोरणाविरूद्ध जनतेचा सर्वंकष उठाव वैशिष्टयपूर्ण होता.

साधारणत: १८५१ नंतर वहावी ही एक प्रभावी चळवळ होती. तिचा हेतू इंग्रज व निजामांची सत्ता उलटून टाकणे हा होता. लातूर जिल्हयातील मुबारीज उद्दौला व त्याच्या सहकाऱ्यांनी उठाव केला. शेख अब्दुल्ला हे या चळवळीचे नेतृत्व करीत. उदगीर येथील अब्बास अली खान यांनी केलेल्या कामगिरीचा परिणाम म्हणून त्यांची जहागीर काढून घेण्यात आली. १८५७ च्या आंदोलनाचे पडसाद हैद्राबादप्रमाणे लातूर जिल्हयामधील उदगीर

व निलंगा येथे उमटल्याचे दिसते. १८५७ ते १८६४ पर्यंत सशस्त्र उठावाची एक मालिका सुरू होती. यात रामराव उर्फ जंग बहाददुर हे नेतृत्व करत. लातूरचा नेकराम टेलर, बाजीराव पाटील, विठोजी खंडोजी यासारखी मंडळी यात सहभागी होती. परिणामी ब्रिटिशांनी कोर्टमार्शल करून अहमदाबाद येथे बहात्तर लोकांना फाशी दिली.

याच काळात आर्य समाजाची चळवळ सामाजिक प्रबोधनाचे कार्य करीत होती. उदगीर येथील पं.बन्सीलाल आणि पं.श्यामलाल या बंधूचे काम विशेष उल्लेखनीय होते. शासकीय दडपशाहीविरूद्ध समाजप्रबोधनाचे काम करतानाच नागरी स्वातंत्र्य व समाजप्रबोधनासाठीही लढा दिला होता. सन १९३८-३९ मध्ये आर्य समाजाने केलेल्या सत्याग्रह आंदोलनात जवळपास १२००० लोकांचा सहभाग होता. निलंग्याचे शेषराव वाघमारे, लातूरचे दिगंबरराव शिवणगिकर, अहमदपूरचे निवृत्ती रेड्डी, दिगंबरराव लाटकर नेतृत्व करीत होते. याच काळात लातूर येथे लोकमान्य टिळकांनी भेट दिली होती. १९९५ मध्ये हैद्राबाद येथे सोशल सर्व्हिस लीगची स्थापना झाली[५]. १९१९ मध्ये लातूर येथे पाचवी शिक्षण परिषद झाली. यातून शैक्षणिक सामाजिक व आर्थिक सुधारणांची मागणी होत होती. यात हिंदूबरोबर मुसलमानांचाही मोठया प्रमाणात सहभाग होता. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आंदालनाचा विस्तार होत होता तसतसे या भागातील केशवराव कोरटकर, वामनराव नाईक, देवीसिंह चौहान अशा अनेकांचा सहभाग घडून आला. १९३७-३८ या दोन वर्षात विविध घडामोडींना वेग आल्याचे दिसते. महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन १ व २ जून १९३८ रोजी लातूरला झाले. बॅ.श्रीनिवासराव शर्मा हे अध्यक्ष होते. याच वेळी लातूरला महिला परिषदही झाली. राजकीय जागृतीच्या प्रयत्नांबरोबरच निजामी सत्तेविरूद्धचा जो संघर्ष सर्वच थरांत झाला त्यात आर्य समाजाबरोबर हिंदू महासभेचाही सहभाग होता. याच वेळी सुरू असलेले 'वंदे मातरमचे' आंदोलन व विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी नागपूर विद्यापीठाने घेतलेली भूमिका याची नोंद घ्यावी लागेल. या सर्व बाबींची नोंद 'ईस्टर्न टाईम्स', 'डेक्कन टाईम्स' सारख्या वृत्तापत्रांमधून होत होती. 'इतेहद-उल-मुसलमीन' ही संघटना स्वातंत्र्य आंदोलनात अत्यंत उपद्रवकारक ठरली. कासिम रझवी हा लातूर येथीलच होता. परिणामी तीव्र दडपशाही होत होती. उलट याचा प्रतिकार जनतेतून उत्स्फूर्तपणे होत होता. आर्य वीर दल, किसान वीर दल यासारखे तरूणाचे गट अन्यायाविरूद्ध प्रतिकार करीत. हाडोळीचे मोहनराव पाटील यांचा लढा उल्लेखनीय ठरतो. ७ ऑगस्ट १९४७ ला मुक्तीसंग्रामाचे शेवटचे

पर्व सुरू झाले. स्वामी रामानंदतीर्थ यांनी 'हिंदी संघराज्य समावेश दिन' म्हणून ७ ऑगस्ट घोषीत केला. परिणामी आंदोलन तीव्र झाले. २ सप्टेंबर १९४७ राष्ट्रीय ध्वज दिन पाळण्याचे ठरविण्यात आले. लातूर येथील गोलाईतील टॉवरवर तिरंगा झेंडा लावण्याचे श्रेय रघुवीर शिंदे, श्यामराव किल्लारीकर, करणसप्पा हांडे यांच्याकडे जाते. १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्यदिन साजरा करणे, जंगल सत्याग्रह, साराबंदी आंदोलन, शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, खेऊी स्वतंत्र करणे, लेव्ही भरण्यास नाकरणे यासारख्या अनेक बाबींतून संघर्ष तीव्र होत गेला. दिगंबरराव बिंदू यांनी दिल्ली येथे महात्मा गांधीबरोबर चर्चा करून सरहद्दीबाहेर सशस्त्र कॅम्प उभारण्याचा मनोदय स्पष्ट केला होता. निजामी राज्याच्या सीमेवर उभारलेले कॅम्प प्रत्यक्ष कृती करणारे होते. चिंचोली, गोडेगाव, वाघोली यांसारखे कॅम्प कार्यरत होते. १५ ऑगस्ट १९४८ च्या स्वातंत्र्यदिनाचा पहिला वाढदिवस साजरा करण्यासाठी फुलचंद गांधी यांच्या नेतृत्वाखाली पासष्ट गावांच्या समूहाचे मूक्तीपूर स्वराज्य स्थापन करण्यात आले. यासारख्या अनेक बाबींचा परिणाम म्हणून १७ सप्टेंबर १९४८ ला लष्करी कार्यवाही होऊन मराठवाडा स्वतंत्र झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत मराठवाडयाचे कुठल्याही अटीशिवाय असलेला सहभाग व त्यातून पुढे झालेली वाटचाल महत्वपूर्ण ठरते. आज महाराष्ट्राचे नेतृत्व करणारा व देशपातळीवर नेतृत्व पुरविणारा लातूर जिल्हा सर्व क्षेत्रात अग्रेसर आहे.

लातूर जिल्हयाला अभिमानास्पद असा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. 'रत्नपूर महात्म्य' या स्थल महात्म्यात मयूरध्वज व त्याचा पूत्र ताम्रध्वज या पौराणिक राजवंशाचा संबंध रत्नपूर स्थानाशी दाखविला आहे. ऐतिहासिकदृष्टया राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष पहिला हा लत्तलूर या नगरीचा अधिपती होता. राष्ट्रकूट, चालूक्य व यादव काळात हे एक संपन्न नगर होते. जिल्हयामध्ये जैन, महानुभाव, वारकरी, लिंगायत, रामदासी, गानपत्य, दत्त या संप्रदायाबरोबरच नागेश संप्रदायाचे अस्तित्व किल्लारी येथे होते. विनयादित्याच्या (इ.स. ५९९) कासारशिरसी ताम्रपटाची नोंद दर्शविते की, चालुक्य काळात येथे विद्वानांना वेदाभ्यासासाठी दान दिले होते. विक्रमादित्य सहावा याच्या काळातील गणेशवाडी येथे सन १०९९ चा शिलालेख आहे. या लेखात शिवलिंगी-संतान परंपरा तसेच लाकुलेश्वरमत व पर्वतावली संप्रदाय या शैव परंपरा येथे अध्ययन व अध्यापन करीत होत्या[६]. यासाठी गणेशमंदिर व पाठशाला उभारण्यात आल्या. तसेच विशेष अनुदान उपलब्ध करून देण्यात

आले होते. या जिल्हयात विद्येची आराधना आजही सुरू आहे.

संत परंपरेचा विचार करता नागेश संप्रदायातील संत कवी, तसेच सारसा येथील शिवकालीन गणेशनाथ महाराज यांचा 'गोरक्षबोध' हो ओवीबद्ध ग्रंथ, उदगीर येथील वीरशैव संप्रदायातील हवगीस्वामी यांचा मठ, निलंगा येथील वीरनाथ महाराज ज्यांनी वीर शैव आणि वारकरी संप्रदायाचा समन्वय घडवून आणला व लिंगायत वारकरी संप्रदायाची स्थापना केली. मल्लनाथ महाराजांनी ही परंपरा पुढे चालविली. याच मालिकेत रंगनाथ कृष्ण दीक्षित उर्फ सेलूकर महाराज यांची नोंद करावी लागते. यांनी सोमयागी यज्ञ परंपरा चालवली. किशन महाराज साखरे हे पानचिंचोली ता.निलंगा येथील होते. त्यांनी ज्ञानेश्वरीची ताम्रपटावर मुद्रित प्रत तयार केली. अशा कितीतरी संताची भूमी म्हणून याचा उल्लेख करावा लागतो.

एकूणच जिल्हयाची भौगोलिक वैशिष्टये, इतिहास आणि सांस्कृतिक परंपरा, लोकजीवन, कृषी व जलसिंचन यातील नवीन प्रयोग, नैसर्गिक आपत्तीसाठी स्वतंत्रपणे घेतलेला सर्वंकश आएावा आणि उद्योगधंद, सहकारी साखर उद्योगांचे यश, फळबाग उत्पादनाची होणारी परदेशी निर्यात, बँक व्यवसाय व्यापार व वाणिज्य वाहतूक व दळणवळण या क्षेत्रातील उपलब्धी आणि आर्थिक विकासाचा वेग, प्रशासन, सामाजिक सेवा क्षेत्रातील कार्य आणि संपूर्ण जिल्हयाचा सांस्कृतिक वारसा ज्यात कला, नाटय, क्रीडा साहित्य परंपरेचा सर्वकष वेध घेण्याचा प्रयत्न झाला आहे. जिल्हयातील पर्यटन स्थळे, ज्यात ऐतिहासिक व धार्मिक महत्वाची स्थाने यांचा परिचय झाला आहे.

लातूर जिल्हा हा मराठवाडा विभागातील एक असून तो १७° ५२' ते १८° ५०' उत्तर अक्षांश आणि ७६° १८' ते ७९° १२' पूर्व रेखांशात पसरलेला आहे. सन १९९१ च्या जनगणना अहवालानुसार जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ७.१५७ चौ.कि.मी. असून २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाचा २६ वा आणि २०,८०,२८५ होती. १९९१ च्या जनगणनेनुसार राज्यात क्षेत्रफळानुसार जिल्हयाचा २६ वा आणि लोकसंख्येनुसार २४ वा क्रमांक लागतो. राज्याच्या क्षेत्रफळापैकी ११.३४ टक्के क्षेत्र लातूर जिल्हयाचे आहे.

**जिल्हा निर्मितीचा इतिहास :** निजामाच्या कारकीर्दीत १८६० ते १९०४ पर्यंत नळदुर्ग हे जिल्हयाचे ठिकाण होते. त्यानंतर सन १९०४ मध्ये उस्मानाबद जिल्हा अस्तित्वात आला. सन १९०५ मध्ये नळदुर्ग आणि वाशी या दोन तालुक्यांच्या मुख्यालयात बदल करून वाशी

ऐवजी कळंब व नळदुर्गऐवजी तुळजापूर हे तालुके झाले. लातूर त्यावेळी औस तालुक्यातील एक गाव हाते. औसा व तालुक्याच्या ठिकाणाचे मुख्यालय लातूरला आणले व लातूर या तालुक्यची निर्मिती झाली[७].

हैद्राबादच्या निजामी राज्यात उस्मानाबाद हा सर्वात मोठा जिल्हा होता. दिनांक १७ सप्टेंबर १९४९ मध्ये हा प्रदेश भारतात विलीन झाला. सन १९५० मध्ये सर्व तालुक्यातील पुनर्रचना करण्यात आली. त्यावेळी औसा व उमरगा हे दोन तालुके निर्माण केले. पूर्वी बिदर जिल्हयातील अहमदपूर, निलंगा व उदगीर हे तीन तालुके उस्मानाबाद जिल्हयास जोडले होते. सन १९५६ मध्ये उस्मानाबाद जिल्हा तत्कालीन मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ ऑक्टोबर १९८१ रोजी लातूर जिल्हा निर्मितीची घोषणा केली. त्यानंतर या कामासाठी दिनांक १७ एप्रिल १९८२ रोजी उच्चाधिकारी समिती नेमली. जिल्हयाच्या सीमा निश्चित करणे व इतर कायदेशीर तरतुदी पूर्ण करण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयाचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महसूल व वनविभागाचे सहायक सचिव यांच्या उपसमितीने ठिकठिकाणी भेटी देऊन तेथील विविध संघटना, समित्या, स्थानिक जनता यांच्या सूचना ऐकून घेऊन अभ्यास केला आणि लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने जिल्हा, तालुके व गावे यांच्या सीमा निश्चित करून उस्मानाबाद, बीड आणि सोलापूर या तीन जिल्हयातील काही भागाचे विभाजन करून दिनांक १६ ऑगस्ट १९८२ पासून लातूर जिल्हा निर्माण करण्यात आला. सध्या लातूर जिल्हयात असलेल्या तालुक्यातील स्थित्यंतरे ही उस्मानाबाद जिल्हयांशी संबंधित आहेत.

जिल्हा निर्मितीच्या वेळी या जिल्हयात लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा आणि औसा या पाच तालुक्यांचा तसेच बीड जिल्हयातील अंबेजोगाई तालुक्यातील रेणापूर महसूल मंडळ ४३ गावे आणि ११ वाडयांचा समावेश करण्यात आला. दि.१५ ऑगस्ट १९९२ ला अहमदपूर, लातूर आणि उदगीर तालुक्यांची पुनर्रचना करून चाकूर आणि रेणापूर हे दोन तालुके निर्माण करण्यात आले.

पुढे लातूर जिल्हयातील उदगीर आणि अहमदपूर या तालुक्यांची पुनर्रचना करून जळकोट तालुका तसेच उदगीर तालुक्याची पुनर्रचना करून देवणी तालुका आणि निलंगा तालुक्याची पुनर्रचना करून शिरूर अनंतपाळ या तीन नवीन तालुक्यांची निर्मिती करण्यात

आली. त्यामुळे जिल्हयात सध्या लातूर, चाकूर, रेणापूर, औसा, अहमदपूर, उदगीर, निलंगा, देवणी, जळकोट आणि शिरूर-अनंतपाळ हे दहा तालुके आहेत. तसेच लातूर आणि उदगीर हे दोन उपविभाग आहेत. जिल्हयात महसूल प्रशासनाच्या सोयीसाठी १९ महसूल विभाग, १६८ तलाठी सजे आणि १,४३,९१९ खातेदार आहेत.

लातूर जिल्हयात एकूण ९८६ गावे आहेत. त्यापैकी ७८६ ठिकाणी ग्रामपंचायती आहेत. २३ गावे आसाड आहेत. शहरांची एकूण संख्या ५ आहे.

इ.स. १३१८ पर्यंत सध्याचा लातूर जिल्हा देवगिरीकर यादवांच्या राज्याचा एक भाग होता. त्यानंतर अल्लाउद्दीन खिलजीचे दक्षिणेवर आक्रमण झाल्यापासून हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळेपर्यंत लातूर जिल्हा हा सतत परकीय अंमलाखाली असल्याने तेथील लोकांना राजकीय हक्क व मुक्त नागरी जीवनाचा पुरेपूर उपभोग कधीच घेता आला नाही. मात्र हा प्रदेश हैद्राबादच्या निजामाच्या अधिपत्याखाली असताना इ.स.१८५४ मध्ये निजामाचा मुख्य प्रधान सर सालारजंग याने राज्याचा कारभार सुधारण्याच्या दृष्टीने न्याय, शिक्षण, पोलीस वगैरे खात्यांना संघटित स्वरूप प्राप्त करून दिले. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेचा (१८८५) परिणाम देशाच्या इतर भागाप्रमाणे हैद्राबादामध्येही झाला व वेगवेगळया सामाजिक संस्था, सभा व वाचनालयांची स्थापना झाली. इ.स.१९१४ मध्ये निजामाने राज्यकारभाराची सर्व सुत्रे आपल्या हातात घेतली व १९१८ मध्ये उस्मानिया विद्यापीठाची स्थापना केली.

केशवराव कोरटकर, वामनराव नाईक यांच्या प्रयत्नाने सामाजिक परिषदांना चालना मिळाली. तद्‌नुसार प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व स्त्री शिक्षणाकडे सरकारला लक्ष पुरविणे भाग पडले. परिणामतः राज्यात अनेक शाळा, वाचनालये व वसतिगृहे स्थापन करण्यात आली.

सर सालारजंग यांच्या सुधारणा, आर्य समाजाची विचारसरणी, राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना, सामाजिक परिषदा या माध्यमांद्वारे हैद्राबाद संस्थान व अनुषंगाने लातूरमध्ये नवीन विचार प्रवाह रूजू लागले. परिणामतः प्रजाजन आपले नागरी हक्क प्राप्त करून घेण्यासाठी सतत प्रयत्नशील बनू लागले.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण, शिक्षण प्रशासन व शिक्षण संस्थांचा विकास (१८५३-१९४८) :**

इ.स. १८५४ पर्यंत निजामी राजवटीत शैक्षणिक विकास अत्यल्प झालेला होता. शिक्षण संस्था फारच थोडया होत्या. शासनही त्याबाबत फारसे प्रयत्नशील नव्हते. राज्यात

हिंदुस्थानी पद्धतीच्या शाळा होत्या. त्यामधून उर्दू माध्यमातून लेखन, वाचन आणि प्राथमिक गणित शिकविले जात. सर्वसाधारणपणे गावाचे महत्व व लोकसंख्या लक्षात घेऊन शिक्षकांना वेतन न देता वस्तूंच्या स्वरूपात मोबदला दिला जात असे. इ.स.१८५९ मध्ये प्रत्येक जिल्हयाच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी प्रत्येकी एक पर्शियन व एक उर्दू शाळा काढण्याचे आदेश मुख्य प्रधान सर सालारजंग यांनी दिले. १८७८ पासून संस्थानातील शाळांमध्ये शुल्क आकरण्याची सक्ती करण्यात आली. १८८३ हे वर्ष शिक्षणाच्या इतिहासात महत्वाचे ठरले. त्या वर्षी सार्वजनिक शिक्षणाला (Public Instruction) इतर मोठया खात्यामध्ये वरचा दर्जा प्राप्त होऊन वार्षिक अडीच लाख रूपयांची तरतूद अंदाज पत्रकात करण्यात आली. प्रत्येक सुभ्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी उच्च माध्यमिक शाळा उघडण्यात येऊन जिल्हयात वेगवेगळया ठिकाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा स्थापन करण्यात आल्या. इ.स.१८९१ पासून माध्यमिक शाळेच्या परीक्षा सुरू करण्यात आल्या. पुढे १८९४ ला पाठयपुस्तक समिती व शिक्षण मंडळाची स्थापना झाली. हैद्राबाद राज्यात १८९९ मध्ये शिक्षकांना प्रशिक्षण देणारी पहिली शाळा सुरू करण्यात आली आणि १९०१ च्या सुमारास शिक्षकांना वेतनश्रेणी देण्याची पद्धत अस्तित्वात आली. त्याच प्रमाणे अर्हता नसलेल्या प्राथमिक शिक्षकांना कमी करण्यात आले. वेतनाचा दर पूर्व प्राथमिक शाळेत १० ते १५ रूपये होता, तर उच्च माध्यमिक शाळेत १५ ते २५ रूपये होता. माध्यमिक शाळेत इंग्रजी ही प्रथम भाषा समजली जात होती. माध्यमिक शाळा मॅट्रिक पर्यंत शिक्षण देत असत. हैद्राबाद राज्यात परीक्षा घेण्यास्तव सक्षम संघटना नसल्यामुळे या शाळा मद्रास विद्यापीठाशी परीक्षेसाठी संलग्न केलेल्या होत्या[८]. शासन नियुक्त सल्लागारांची प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या विस्तारासाठी केलेल्या सुचनेप्रमाणे बऱ्याच सुधारणा झाल्या. इ.स.१९११ पासून शाळांच्या संख्येत व विद्यार्थ्यांच्या संख्येत झपाटयाने वाढ झाली व शिक्षणावरील खर्च अर्ध्या शतकातच ३१ लाखावरून ९७ लाखापर्यंत वाढला. १९२२ पासून मोफत शिक्षणाची सोय केली गेली.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात लातूर जिल्हयातच नव्हे तर हैद्राबाद संस्थानातील इतर कुठल्याही जिल्हयाच्या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध नव्हती. हैद्राबाद शहरामध्ये तीन कला महाविद्यालये होती. त्यापैकी निजाम महाविद्यालय व औरंगाबाद महाविद्यालय ही मद्रास विद्यापीठाशी संलग्न केलेली होती. दार-ऊल-ऊलम

किंवा ओरिएंटल महाविद्यालयाचे विद्यार्थी पंजाब ओरिएन्टल टायटल परीक्षेसाठी पाठविले जात होते. ही तिन्ही महाविद्यालये शासन चलित संस्था (State Institutions) होत्या. संस्थानातील या महाविद्यालयांपैकी निजाम महाविद्यालय हे सर्वात मोठे व चांगले होते. हे महाविद्यालय १८७५ मध्ये स्थापन झाले होते. अघोरनाथ चट्टोपाध्याय हे काही वर्ष या महाविद्यालयाचे प्राचार्य होते. संस्थानातील विविध जिल्हयातील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी हैद्राबादला येत असत. तेथे त्यांच्यासाठी वसतिगृहाची सोय उपलब्ध होती.

**स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण, शिक्षण प्रशासन व शिक्षण संस्थाचा विकास :** १९४८ पूर्वी लातूर जिल्हा तेव्हाच्या उस्मानाबाद जिल्हयाचा व पर्यायाने हैद्राबाद राज्याचा भाग होता. त्या राज्याची कार्यालयीन व शैक्षणिक भाषा उर्दू हीच होती. पर्शियन आणि अरेबिक या परकीय भाषांना उत्तेजन देण्यात आले होते. इंग्रजी ही दुय्यम भाषा म्हणून शिकविण्यात येत असे. या राज्यात कुठल्याही सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची कोणतीही तरतूद करण्यात आली नव्हती. या राज्यातील सर्व माध्यमिक व प्राथमिक शाळा सरकार मार्फत चालविण्यात येत असत. खाजगी संस्थांना नाउमैद केले जात असे एवढेच नव्हे तर उर्दू माध्यमातूनच सर्वांना शिक्षण मिळावे या उद्देशानेच उस्मानिया विद्यापीठाची स्थापना करण्यात आली होती[१].

१९४८ नंतर हैद्राबाद राज्य भारतीय संघराज्यामध्ये विलीन झाल्यानंतर या राज्यात उर्दू भाषेच्या माध्यमा ऐवजी, शिक्षणासाठी मुलांच्या मातृभाषेचे माध्यम स्वीकारण्यात आले. यावेळी स्वयंसेवी शाळा सुरू करण्यास उत्तेजन मिळत होते. हैद्राबाद राज्यातील बहुसंख्य मुले मराठी मातृभाषिक असल्याने बहुतेक शाळांमध्ये मराठी हेच शिक्षणाचे माध्यम स्वीकारण्यात आले. मात्र यावेळी मराठी भाषेऐवजी प्राथमिक स्तरावर इतर भाषा इतर माध्यम म्हणून स्वीकारण्याचे तत्वही अमलात आणण्याचे प्रयत्न सुरू होते. हे काम नंतर नवीन शाळा स्थापन करून त्यात इंग्रजी व उर्दू भाषेचे माध्यम स्वीकारून साध्य करण्यात आले. तद्संबंधी स्थिती दर्शविणारी आकडेवारी खालील विवरणपत्रात दिली आहे.

सन १९५१-१९५६ मधील शैक्षणिक विकास दर्शक विवरणपत्र.

| तालुका | शाळा | १९५१ | १९५६ |
|---|---|---|---|
| अहमदपूर | प्राथमिक शाळा | उ. ना. | ८६ |
| | माध्यमिक शाळा | ४ | ९ |
| लातूर | प्राथमिक शाळा | उ. ना. | ७९ |
| | माध्यमिक शाळा | ४ | ५ |
| उदगीर | प्राथमिक शाळा | उ. ना. | ७६ |
| | माध्यमिक शाळा | ४ | ५ |
| औसा | प्राथमिक शाळा | उ. ना. | ३१ |
| | माध्यमिक शाळा | १ | १ |
| निलंगा | प्राथमिक शाळा | उ. ना. | ७४ |
| | माध्यमिक शाळा | ३ | ५ |

**साक्षरता आणि शैक्षणिक स्थिती :-** सर्व सामान्यपणे मराठवाडा आणि आजचा लातूर जिल्हा हा महाराष्ट्राचा अप्रगत भाग होता. निरक्षरतेचे प्रमाण अतिशय मोठे होते. बऱ्याच काळपर्यंत मराठवाडा विभाग दुर्लक्षित राहिल्याने या विभागाचा विकास झाला नव्हता. परंतु अलिकडे राबविलेल्या विविध योजनांमुळे व शासनाने दिलेल्या अग्रक्रमामुळे येथील परिस्थिती बदलण्यास मदत झाली. साक्षरतेच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. सन १९५१ ला जिल्हयाची साक्षरता ८७.०२२ होती, ती १९३१ ला २,५२.०१४ पर्यंत वाढली[१]. (सदर आकडेवारी तत्कालीन संपूर्ण उस्मानाबाद जिल्हयाची आहे). ही वाढ घडवून आणण्यासाठी राज्य सरकार व काही स्वयंसेवी संस्थांनी साक्षरता प्रचार आणि प्रसार करण्यासाठी मोलाचे प्रयत्न केलेले आहेत. १९५१ ला साक्षरतेचे एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात जी टक्केवारी होती (१०.०६) ती १९६१ ला १७.०५ एवढी झाली.

## २.१ भौगोलिक माहिती : -

या जिल्याचे अगदी पूर्वेकडील स्थान व अगदी पश्चिमेकडील स्थान यातील अंतर १०६ कि.मी., तर अति उत्तरेकडील व अति दक्षिणेकडील स्थान या दरम्यानचे अंतर १०९ कि.मी. आहे.

लातूर जिल्हयाच्या उत्तरेस परभणी जिल्हा, ईशान्येस नांदेड जिल्हा, पूर्व व आग्नेयेस कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा, दक्षिणेस व पश्चिमेस उस्मानाबाद जिल्हा, तर वायव्येस बीड जिल्हा आहे. उत्तरेकडील परभणी जिल्हाची लातूर जिल्हयास जोडलेली

सीमा सुमारे ३० कि.मी. आहे. तर ईशान्येस नांदेड जिल्हाची सीमा ९६ कि.मी. आहे. पूर्वेकडे सुमारे २०६ कि.मी. लांबीची कर्नाटक राज्याची सीमा लातूर जिल्हयास जोडलेली आहे. दक्षिणेस व पश्चिमेस सुमारे ११२ कि.मी. लांबीची उस्मानाबाद जिल्हयाची सीमा आहे तर, वायव्येस बीड जिल्हयाचा ७६ कि.मी. चा भाग सीमेवर आहे[१०].

लातूर जिल्हयाच्या पश्चिम सीमेवर उस्मानाबाद जिल्हयातील कळंब व उस्मानाबाद तालुक्यांचा भाग येतो. या भागात कोणतीही नैसर्गिक सीमा नाही. औसा तालुक्याच्या पश्चिम भागात उस्मानाबाद तालुक्याच्या पूर्व सीमेवर तसेच औसा तालुक्याच्या दक्षिण सीमेवर व उस्मानाबाद जिल्हयातील उमरगा तालुक्याच्या उत्तर सीमेवर तेरणा नदी वाहते. या नदीमुळे उस्मानाबाद व लातूर जिल्हा या दरम्यानची ३६ कि.मी. सीमा निश्चित झाली आहे. लातूर जिल्हयाच्या वायव्य किंवा लातूर तालुक्याच्या उत्तर सीमेवर आणि बीड जिल्हयाच्या दक्षिण सीमेवर मांजरा नदी वाहते. लातूर जिल्हा व बीड जिल्हा या दरम्यानची २२ कि.मी. लांबीची सीमा व कर्नाटक राज्याची सीमा या दरम्यान मांजरा नदीचा ४३ कि.मी. चा प्रवाह आहे.

### प्राकृतिक रचना-

जिल्हयाचा बहुतांश भाग हा बालाघाट पठाराचा असून भूभागाची समुद्रसपाटीपासूनची उंची ४५० ते ७३० कि.मी. च्या दरम्यान आहे. बालाघाट पठाराचा हा प्रदेश गोदावरी व भिमा नद्यांच्या खोऱ्यांच्या दरम्यान असून या जलनिस्सार प्रारूपांचा बालाघाट पठार जलविभाजक आहे. बालाघाट पठार उस्मानाबाद व बीड जिल्हयांतून पूर्वेस लातूर जिल्हयात पसरले आहे. जिल्हयातील या पठाराचा भाग म्हणजे त्याची उत्तरेकडील कडा आहे. त्याची दक्षिणकडा ही उस्मानाबाद जिल्हयात आहे. या पठाराचा सर्वसाधारण

उतार पूर्वेस व ईशान्येस आहे. या पठाराचा एक भाग दक्षिणेस व नंतर पूर्वेस विस्तारलेला आढळत असून पठाराचा उठाव प्रदेश दक्षिणेस चाकूर तालुक्याच्या पूर्व विभागात आहे व तेथून पुढे उदगीर तालुक्यातून आग्नेय दिशेत जिल्हयाबाहेर कर्नाटक राज्यात गेलेला आहे. तसेच पठाराचा काही भाग नांदेड जिल्हयात कंधार, मुखेड भागात गेला आहे.

जिल्हयाचा आग्नेय व दक्षिण भाग तेरणा व तावरजा या नदी खोऱ्यांचा आहे. तेरणा व मांजरा नद्यांच्या खोऱ्यांचा बालाघाट पठार हा जलविभाजक आहे. तसेच मांजरा व मन्याड नदी निस्सार प्रारूप दरम्यान बालाघाट डोंगर रांगा आहेत. उदगीर तालुक्यातून एक

जलविभाजक जातो. परळी-उदगीर मार्गे कर्नाटक राज्यातील बिदरला जाणारा लोहमार्ग व रस्ता या जलविभाजकाच्या कटकावरून गेलेला आहे. या जलविभाजकाची वायव्य भागात उंची जास्त असून आग्नेयेकडे ती कमी होत गेली आहे. हा प्रदेश साधारणतः ६२५ मीटर उंचीचा असून लातूर रोड रेल्वे स्थानकाजवळ याची उंची ६४५ मीटर आहे. येथून पूर्वेस उतार प्रवणात कमी आहे. कमी उंचीच्या पठाराची एक भुजा चाकूरजवळून ईशान्यकडे गेलेली आहे. ती शिरूर ताजबंदपासून २ कि.मी. पर्यंत असून ती पुढे पूर्वेस व नंतर ईशान्येस वांजरवाडा जवळून जिल्हयाच्या बाहेर जाते. या भागात त्याची उंची ५६० मीटर आहे. या कटकावर लातूर-नांदेड रस्ता आहे. हा कटक मन्याड व तिरू नदीचा जलविभाजक आहे.

परळी-उदगीर लोहमार्गाच्या उत्तरेस पश्चिम-पूर्व विस्ताराचा एक भू-उठाव आहे. या भू-उठावावरून अनेक लहान-लहान जलप्रवाह उत्तर दिशेस वाहतात[११]. जिल्हयाचा उत्तर व ईशान्य भाग मन्याड नदी खोऱ्याचा असून या प्रदेशाची उंची समुद्रसपाटी पासून ५०० मीटर पर्यंत आहे. गुगदळ व हगदळ येथे ४८० मीटर उंचीचा भाग आहे. एकंदरीत, बालाघाट पठाराचा भाग सपाट माथ्याचा, मंद उताराचा असून त्यावरून वाहणाऱ्या अनेक लहान-लहान जल-प्रवाहांमुळे त्याचे अपक्षरण झालेले आहे. त्यामुळे या प्रदेशात कमी उंचीचे काही डोंगर किंवा कडयासारखी भूरूपे दिसून येतात.

## प्राकृतिक विभाग-

प्राकृतिक रचनेच्या दृष्टीने लातूर जिल्हयाचे चार विभाग पडतात.

१. **मन्याड नदीचे खोरे :** हा प्रदेश समुद्रसपाटीपासून ४५० ते ६०० मीटर उंचीचा आहे. अहमदपूर जवळच्या लहान-लहान टेकडया वगळता संपूर्ण प्रदेश साधारणपणे सपाट मैदानाचा असून पूर्वेस व उत्तरेस या मैदानाचा उतार मंद आहे. या विभागात रेणापूर तालुक्याचा ईशान्यभाग, अहमदपूर तालुका, उदगीर तालुक्याचा उत्तर व पूर्व भाग आणि चाकूर तालुक्याचा उत्तर व ईशान्य भाग येतो.

२. **मांजरा नदीचे खोरे :** जिल्हाचा साधारणपणे मध्यवर्ती सखल भाग मांजरा खोऱ्याचा आहे. बार्लाघाट पठाराच्या उत्तर व दक्षिण कटकांच्या दरम्यान हा मैदानी प्रदेश आहे. या प्रदेशाची उंची वायव्येकडून आग्नेयकडे कमी होत गेली आहे. या खोऱ्यात लातूर तालुक्याचा उत्तर, पूर्व व दक्षिण भाग येतो. तसेच रेणापूर तालुक्याचा पश्चिम व दक्षिण भाग येतो. निलंगा तालुक्याचा उत्तर, पूर्व भाग मांजरा नदी खोऱ्यात येतो.

३. **तेरणा नदीचे खोरे :** या नदीच्या उत्तर व दक्षिण भाग बार्लाघाट पठाराच्या कटकांचा आहे. पश्चिमेकडून पूर्वेकडे या भूभागाचा उतार मंद होत जातो. या प्रदेशात औसा तालुक्याचा दक्षिणेकडील काही भाग व निलंगा तालुक्याचा बराचसा भाग समाविष्ट होतो.

४. **बालाघाट पठाराचा प्रदेश :** लातूर जिल्हयाचा साधारणपणे पश्चिमेकडील प्रदेश बालाघाट पठाराचा आहे. रेणापूर तालुक्याचा वायव्य व ईशान्य भाग, चाकूर तालुक्याचा बहुतांश भाग, लातूर व औसा तालुक्याचा पश्चिम भाग, निलंगा तालुक्याचा मध्य व दक्षिण भाग तसेच उदगीर तालुक्याचा मध्य व दक्षिण भाग याचा समावेश होतो. सपाट माथ्याचा व सामान्यपणे पूर्ण भागात मंद उताराचा हा प्रदेश आहे[१२].

## नद्या-

हा जिल्हा मांजरा व तिच्या उपनद्या यामुळे जलनिस्सारित झालेला आहे. मांजरा जलनिस्सार प्रारूप हा गोदावरी या प्रमुख जलनिस्सार प्रारूपाचा मुख्य उपविभाग आहे. मांजरा व तिच्या उपनद्या, तेरणा, तावरजा व घरणी या लातूर जिल्हयात बालाघाट

पठारावरून दक्षिण व मध्यभागात वाहतात. तर मन्याड, तिरू, लेंडी या व इतर लहान नद्या बालाघाट पठाराच्या उत्तर भागात वाहतात व पुढे उत्तरेस किंवा पूर्वेस वाहत जातात.

**मन्याड :** ही नदी बीड जिल्हयात बालाघाट पठाराच्या ईशान्य उतारावर धर्मापुरीजवळ उगम पावते व सुकणी गावाजवळ लातूर जिल्हयात प्रवेश करते. ही नदी अहमदपूर शहराच्या पश्चिम भागात वाहते. या नदीची वाहण्याची दिशा पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. नंतर तिची दिशा सर्वसाधारणपणे ईशान्येस आहे. या नदीचा जिल्हयातील प्रवाह ४० कि.मी. लांबीचा आहे. ही नदी अहमदपूर तालुक्यातून पुढे नांदेड जिल्हयात कंधारपर्यंत वाहते. पुढे पूर्व व नंतर आग्नेय दिशेने वाहत जाऊन ही नदी मांजरा नदीस मिळते.

**तिरू :** चाकूरजवळील बालाघाट पठाराच्या कटकाच्या उतारावर या नदीचा लातूर जिल्हयातील प्रवाह ५६ कि.मी. लांबीचा आहे. तिरू नदी चाकूर व उदगीर तालुक्यांत वाहते. ही नदी पूर्वेस नांदेड जिल्हयात खैरका येथे लेंडी नदीस मिळते. उदगीर तालुक्यात वाढवणा

येथे तिरू नदीवर धरण बांधले असून येथील जलाशयाचा उपयोग २,३४८ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी होतो.

**मांजरा :** बालाघाट पठाराच्या उत्तर काठावर बीड जिल्हयात पाटोदा तालुक्यातील गौरवाडी गावाजवळ मांजरा नदी उगम पावते व आग्नेय दिशेस वाहते आणि कानडी बोरगावजवळ लातूर जिल्हयात प्रवेश करते. मांजरा नदी लातूर तालुक्याचा उत्तर सीमेवर वाहते. बीड जिल्हा व लातूर यांच्या सीमेरेषेचा काही भाग मांजरा नदीच्या प्रवाहामुळे निश्चित प्रवाहामुळे निश्चित झाला आहे. या भागात मांजरा नदीची दिशा पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे व नंतर ही नदी लातूरच्या ईशान्य भागात आठ-दहा कि.मी. अंतरावर असलेल्या चिखलठाणा व भातखेडा येथे दक्षिणेस वळते. लातूरच्या आग्नेय भागात शिवणी खुर्द व सेलु बुद्रुकजवळ या नदीस तारवजा नदी येऊन मिळते.

**रेणा :** बीड जिल्हयातील आंबेजोगाई तालुक्यातील डोंगराच्या पश्चिम भागात सावरगावाजवळ या नदीचा उगम होतो. लातूर जिल्हयात या नदीचा प्रवाह उत्तर-दक्षिण असा आहे. या नदीकाळावर रेणापूर तालुक्याचे मुख्य ठिकाण वसले आहे. रेणा नदी मांजरा नदीस निलंगा तालुक्यातील भातांगळी येथे मिळते.

**घरणी :** या नदीचा उगम अहमदपूर तालुक्यात नैर्ऋत्य भागात २५ कि.मी. अंतरावरील वडगळ राजुरा पासून उत्तरेस ३ कि.मी. अंतरावर होतो. तेथून ही नदी दक्षिणेकडे वाहते व

निलंगा तालुक्यात प्रवेश करते. घरणी ही मांजरा नदीची डाव्या काठावर मिळणारी उपनदी आहे. या नदीचा प्रवाह जिल्हयात सुमारे ४० कि.मी. आहे. घरणी नदी घुगी, सांगवी या गावाजवळ निलंगा तालुक्यात मांजरा नदीस मिळते. घरणी नदीवर निलंगा तालुक्यात जोगीयाळ येथे धरण बांधले आहे.

**देवण :** मांजरा नदीची डाव्या काठावर मिळणारी देवण ही उपनदी आहे. या नदीचा प्रवाह जिल्हयात २० कि.मी. इतका आहे. उदगीर तालुक्यात रोहिणा गावाजवळ या नदीचा उगम होतो. प्रथम ही नदी दक्षिणेकडे व नंतर आग्नेयेकडे वाहते या नदीच्या उजव्या काठावर म्हणजे नदीच्या दक्षिणेस देवणी गाव आहे. देवण नदी उदगीर तालुक्यात वाहत जाऊन पुढे सेवनी गावाजवळ कर्नाटक राज्यात प्रवेश करते. या नदीची लांबी जिल्हयात १०५ कि.मी. आहे.

**तावरजा :** या नदीचा उगम लातूर तालुक्यात मुरूड गावाजवळ होतो. लातूर जिल्हयात तावरजा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. लातूर तालुक्याच्या दक्षिण व औसा तालुक्याच्या उत्तर सीमेवरून ही नदी वाहते. लातूर जिल्हयात या नदीचा प्रवाह ५० कि.मी. आहे. ढाकणी, एकुरगा, कव्हा, पेठ इत्यादी गावे तावरजा नदीच्या डाव्या काठावर वसली आहेत. तावरजा नदीच्या उजव्या काठावर तूलनेत मोठया प्रमाणात गावे वसली आहेत. तावरजा नदीच्या एका उपनदीच्या काठावर औसा शहर वसले आहे. तावरजा नदीवर लातूर तालुक्यात शिऊर येथे धरण असून ३,६०३ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येते.

**तेरणा :** ही मांजरा नदीची उपनदी असून तिचा उगम उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यात तेरखेड येथे होतो. तेरणा नदी उस्मानाबाद जिल्हयातून आग्नेय दिशेने वाहते व औसा तालुक्यात उजणी गावाजवळ लातूर जिल्हयात प्रवेश करते. औसा तालुक्याच्या दक्षिण व तसेच लातूर जिल्हयाच्या दक्षिण सीमेवर ही नदी वाहते. या भागात तेरणा नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहते. नंतर निलंगा तालुक्यातून औराद शहाजनीजवळ पूर्वेस मांजरा नदीस मिळते. निलंगा तालुक्यात या नदीचा प्रवाह ६५ कि.मी. लांबीचा आहे. उस्मानाबाद जिल्हयातील उमरगा तालुक्यातील माकणी येथे मोठे धरण असून त्याचा उपयोग लातूर जिल्हयाला विशेषतः औसा तालुक्याला होतो.

## हवामान-

लातूर जिल्हयातील हवामानाची विशेषता म्हणजे पावसाळा ऋतु वगळता वर्षभर हवामान कोरडे असते. वर्षाची चार ऋतूत विभागणी केली जाते. हिवाळा डिसेंबर ते मध्य फेब्रुवारी, उन्हाळा मार्च ते मे अखेर, पावसाळा जून ते सप्टेंबर आणि मान्सूनोत्तर काळ ऑक्टोबर ते नोव्हेंबरपर्यंत.

**पर्जन्यमान :** जिल्हयातील अहमदपूर, औसा, निलंगा व उदगीर या चार पर्जन्यमापक केंद्राची १० ते ३७ वर्षांची पर्जन्यविषयक आकडेवारी उपलब्ध आहे. या चार पर्जन्यमापक केंद्रांची व संपूर्ण जिल्हयाची पर्जन्यविषयक आकडेवारी तक्ता क्रमांक-१ आणि २ मध्ये दिली आहे. जिल्हयाचे सरासरी वार्षिक पर्जन्य ८६१.७ मिमी. आहे.

**तापमान :** जिल्हयात वेधशाळा नसल्यामुळे जिल्हयातील हवामानाविषयक माहिती जवळच्या जिल्हयात असलेल्या वेधशाळेच्या नोंदीवर आधारित आहे. जिल्हयात नोव्हेंबरच्या शेवटी

तापमानात जलदगतीने घट होण्यास प्रारंभ होतो. डिसेंबर हा सर्वाधिक थंडीचा महिना असून त्यावेळी सरासरी दैनिक कमाल तापमान २९° सेल्सिअस तर सरासरी दैनिक किमान १३.५° सेल्सिअस असते. हिवाळयात काहीवेळा तापमान ४.° सेल्सिअसपर्यंत खाली येते. मध्य फेब्रुवारी ते मे महिन्यापर्यंत तापमानात सातत्याने वाढ होत असते. मे हा सर्वाधिक उष्ण महिना असून सरारी दैनिक कमाल तापमान ४०° सेल्सिअस तर सरारी दैनिक किमान तापमान २५° सेल्सिअस असते.

**आर्द्रता :** पावसाळयात हवा फार आर्द्र असते. विशेषता सकाळच्या वेळी सापेक्ष आर्द्रता ७५ ते ८० टक्के असते. पावसाळयाव्यतिरिक्त संपूर्ण वर्षात हवा कोरडी असते. उन्हाळा ऋतू म्हणजे कोरडया हवेचा काळ असून त्यावेळी सापेक्ष आर्द्रता ३० टक्क्याच्या वर असते.

**मेघाच्छान :** पावसाळयात आकाश मोठया प्रमाणावर मेघाच्छादित असते. मात्र पावसाळयानंतर उर्वरित वर्षभरात आकाश निरभ्र असते किंवा काहीवेळा हलके मेघाच्छादन आढळते. उन्हाळयात दुपारनंतर मेघाच्छादनात वाढ होत असते.

**वारे :** जिल्हयात साधारणपणे मध्यम गतीचे वारे वाहतात. परंतु मध्य उन्हाळयात आणि पावसाळयात वाऱ्याच्या गतीत वाढ होत असते. पावसाळयात साधारणपणे नैऋत्य आणि वायव्य दिशांमधून वारे वाहतात. पावसाळयानंतर आणि हिवाळयात वारे कमी वेगाने आग्नेय

आणि ईशान्य दिशांमधून वाहतात. उन्हाळयाच्या सुरवातीस जिल्हयात पश्चिमेकडून वारे वाहतात आणि पुढे पुढे पश्चिम आणि वायव्यकडील वाऱ्यांचे वर्चस्व वाढत जाते.

**विशेष हवामान घटना :** झंझावात उन्हाळयात व पावसाळयात उद्भवत असले तरी पावसाळयात त्यांचे प्रमाण अधिक असते. हिवाळयात क्वचितप्रसंगी धुके आढळून येते तर उन्हाळयात कधी कधी धुळीची वादळे उद्भवतात[१३].

## वनसंपदा-

जिल्हयात वनक्षेत्राचे अत्यल्प प्रमाण आढळते. सन २००२-२००३ मध्ये ३ चौ.कि.मी. राखीव व ३७ चौ.कि.मी. अवर्गीकृत वनक्षेत्र होते. परंतु झाडे मात्र विखुरलेली आहेत. बाभूळ, खैर, बेल, आपटा, बोर, हिवर ही झाडे आणि घायपात आढळतात. पठारी भागात व डोंगरावर गवत आढळते. अहमदपूर तालुक्यातील वडवळ गावाजवळ बेट नावाच्या डोंगरावर अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती सापडतात.

## २.२ लातूर जिल्हा सामाजिक -

## आधुनिक काळ (इ.स.१८१८ ते १९४८)-

**लातुर जिल्हयाची निर्मिती व व्याप्ती :** महाराष्ट्र शासनाने उस्मानाबाद जिल्हयाचे विभाजन करून दि.१६ ऑगस्ट १९८२ रोजी लातूर जिल्हयाची निर्मिती केली. या जिल्हाचा इतिहास समजण्यासाठी लातूर जिल्हयाच्या सीमा कशा बदलत गेल्या हे लक्षात घेणे आवश्यक आहे. निजामी राजवटीतही सत्तेतील स्थित्यंतराप्रमाणे प्रादेशिक बदल होत गेलेले आहेत. निजामी राजवटीत सध्याचा लातूर जिल्हा तत्कालीन उस्मानाबाद जिल्हयात समाविष्ट होता. इ.स.१८५३ च्या तहानुसार निजामाने ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्जापोटी वऱ्हाड, नळदुर्ग व रायपूर हे जिल्हे ब्रिटिशांना दिले होते. ते इ.स.१८६० मध्ये ब्रिटिशांनी पुन्हा निजामास सुपूर्द केले. त्यातील नळदुर्ग जिल्हयात सध्याच्या लातूर जिल्हयाचा बराचसा भाग अंतर्भूत होता व या जिल्हयाचे मुख्यालयही नळदुर्ग येथेच होते. इ.स.१८७० मध्ये निजामाचा पंतप्रधान सर सालारजंग (प्रथम) याने राज्यातील जिल्हयांची पुनर्रचना केली. त्यानंतर इ.स.१९०४ मध्ये या जिल्हयाचे नामकरण उस्मानाबाद असे करण्यात आले व मुख्यालयही उस्मानाबाद येथे नेण्यात आले. त्यात वाशी, औसा, कळंब, तुळजापूर, नळदुर्ग

व उस्मानाबाद हे तालुके समाविष्ट होते. त्यापैकी औसा तालुक्यात लातूरचा समावेश होता. इ.स.१९०५ मध्ये औसा तालुक्याचे मुख्यालय लातूरला नेऊन लातूर हा नवीन तालुका निर्मिण्यात आला. इ.स.१९४८ मध्ये निजामाची सत्ता संपुष्टात आल्यानंतर इ.स.१९५० मध्ये उस्मानाबाद जिल्हयातील तालुक्यांच्या हद्दी पुन्हा नव्याने निश्चित करण्यात आला. यावेळी अहमदपूर, निलंगा आणि उदगीर हे बिदरमधील तालुके उस्मानाबाद जिल्हयात हस्तांतरित करण्यत आले. त्यानंतर दि.१६ ऑगस्ट १९८२ रोजी या जिल्हयातील लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा व औसा या पाच तालुक्यांचा समूह वेगळा करण्यात येऊन सध्याचा लातूर जिल्हा निर्माण करण्यत आला. पुढे इ.स.१९९२ मध्ये अहमदपूर तालुक्याचा दर्जा देऊन हे दोन्ही तालुके लातूर जिल्हयात समाविष्ट करण्यात आले. त्यानंतर पुन्हा १९९९ मध्ये निलंगा, उदगीर व अहमदपूर या तालुक्यांची पुनर्रचना करून शिरूर-अनंतपाळ, देवणी व जळकोट हे तालुके निर्माण करून ते लातूर जिल्हयात वर्ग करण्यात आले[१४].

## लोकसंख्या-

२००१ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्हयाची एकूण लोकसंख्या २,०८०,२८५ होती. एकूण लाकसंख्येपैकी १,५९,०२४ लोक ग्रामीण भागातील तर ४९०,२६१ लोक नागरी भागातील होते. या जनगणनेनुसार लातूर जिल्हयातील तालुकानिहाय लोकसंख्या तक्ता क्रमांक १ मध्ये दिली आहे.

**लातूर जिल्हयातील लोकसंख्या, २००१**

| तालुका (१) | एकुण ग्रामीण नागरी (२) | लोकसंख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण व्यक्ती (३) | पुरूष (४) | स्त्रिया (५) |
| लातूर | एकूण | ५४२,४१४ | २८२,३२९ | २६०,०८५ |
| | ग्रामीण | २४२,४२९ | १२५,७८२ | ११६,६४७ |
| | नागरी | २९९,९८५ | १५६,५४७ | १४३,४३८ |
| रेणापूर | एकूण | १२२,१९२ | ६३,००० | ५९,१९२ |
| | ग्रामीण | १२२,१९२ | ६३,००० | ५९,१९२ |
| | नागरी | ० | ० | ० |

## राहणीमान-

**घरे :** गेल्या शंभर वर्षांत घरांची रचना व बांधणी यात पुष्कळच फरक पडला आहे. सामाजिक चालिरिती, सांपत्तिक परिस्थिती, सुरक्षिततेच्या व आरोग्यविषयक कल्पना तसेच गृहरचनेसाठी उपलब्ध होणारी सुधारलेली सामग्री इत्यादी गोष्टीमुळे हे फरक आले आहेत.

ग्रामीण भागातील घरे व्यवस्थित योजनाबद्ध नसतात. जुन्या पद्धतीचे वाडे मुख्यत्वे दिसून येतात. वाडयात ओटी, पडवी, माजघर, स्वयंपाकघर, देवघर, स्नानगृह, शौचालय, झोपण्याच्या खोल्या इत्यादी बाबी दिसून येतात. गुरांचा गोठा मागील बाजूस, तसेच परसात फुलझाडे, घरासमोर तुळसी वृंदावन आढळतात. घरास मोठया आकाराचे दरवाजे व खिडक्या असतात. बहुतेक घरे ही चिखल व दगडविटांपासून बांधलेली आहेत. आर्थिक परिस्थितीनुसार बांधलेली घरे ही विटा, चुना, फरशी, लोखंड इत्यादींचा वापर करून बांधलेली आहेत. धाब्यांच्या घरांचे प्रमाण बरेच आढळते. या घरांची छपरे मजबूत तुळयांवर

मातीचा पेंडा घालून लिपून तयार करतात. सामान्य शेतकऱ्याचे घर असेच पण लहान असते. अगदी गरीब लोक झोपडयातच राहतात. अलीकडे श्रीमंत लोकांचे बंगलेही आहेत. बांधकामात भाजलेल्या विटा वापरलेल्या असतात. शहरातून सिमेंटची अनेक मजल्यांची दोन अथवा चारपाच खोल्या असलेली घरे प्रचारात येत आहेत. मध्ययुगीन काळापासून प्रामुख्याने एक मोठी गढी, गावाला तटबंदी वेस अशी मोठया गावाची रचना आढळते. गढी ते प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. आज आधुनिक पद्धतीचे मोठाले आर.सी.सी. बंगलेपण गेल्या काही दशकात बांधले गेले आहेत.

**अन्न :** लातूर जिल्हयात सर्व लोकांचा मुख्य आहार म्हणजे ज्वारीची भाकरी, गहू व तांदूळ सुद्धा त्यांच्या आहारात असतो पण त्यांचे स्थान दुय्यम आहे. कडधान्यात तूर, हरभरा, मूग, मटकी, उडीद आणि वाल वापरात आहेत. करडई, भूईमूग आणि जवस यांचे तेल वापरतात. हिरव्या पालेभाज्यांमध्ये अळू, अंबाडी, चाकवत, कुका आणि मेथी तर फळभाज्यांमध्ये देवडांगर, भुईकोला, वाळूक आणि दुधीभोपळा इत्यादी वापरतात. मिरची, मिरी, कोथंबीर व लसूण वापरतात. ब्राह्मण, जैन, लिंगायत व काही मराठे परंपरेने शाकाहारी असतात. इतर सर्व मुख्यतः शाकाहारीच पण कधीमधी मांसाहार करतात.

आर्थिक परिस्थितीनुसार अन्नाचा दर्जा ठरत असतो. लातूर जिल्हयात दुधदुभत्याचे प्रमाण बरेच आढळते. जातीपरत्वे, ऐपतीप्रमाणे व सामाजिक प्रतिष्ठेप्रमाणे मेजवाण्यासारख्या प्रसंगी खास पक्वाने पाहुण्यांचे अतिथ्य करण्यासाठी करतात.

हिंदू दिवसातून दोन वेळा जेवण करतात. सकाळी आणि संध्याकाळी शहरातील लोक सकाळी चहा नास्ता व दुपारी जेवण करतात. सकाळच्या जेवणात ज्वारीची भाकरी असते. भाकरीबरोबर चटणी, लोणी, तुप असते. एकंदरित आहारात भाकरी, पोळी, वरण, भात, एक दोन भाज्या दुध लोणी इत्यादी पदार्थ असतात. शेतकरी, कारागीर या श्रमिक वर्गाच्या आहारात 'चटणी' बहुतेक असते. लसून मिरची आणि मीठ एकत्र वाटून तयार करतात. हे दिवसातून तीन वेळा जेवण करतात. सकाळी न्याहारी करतात. त्यावेळेस भाकरीबरोबर चटणी खातात. दुपारी भाकरीबरोबर एखादी भाजी तर संध्याकाळी भाकरी, भात, भाजी, दुध, दही इत्यादी आहार असतो. कधी-कधी अंडे, मटण, कोंबडीचे मटण आणि मासे यांचा आहार असतो.

मुस्लिमांना दररोज मांसाहार चालतो. परंतु दररोज मांसाहार त्यांना परवडत नाही. श्रीमंत मुस्लीम दिवसातून तीन वेळा जेवण करतात. सकाळी नास्ताबरोबर चहा, कॉफी व इतर पदार्थ घेतात. दुपारी, पाव, चपाती, खिमा, भात, भाजी, चहा, सरबत इत्यादी आहार असतो. संध्याकाळी ज्वारीची भाकरी, भात खिचडी, मटण पुलाव आणि मटन कढी इत्यादींचा समावेश असतो. मध्यमवर्गीय मुसलमान सकाळी नास्ताबरोबर चहा बिस्किट तर दुपारी ज्वारीची भाकरी, पोळी, मटण, भाजी, मलई इत्यादी. संध्याकाळच्या जेवणात ज्वारीची भाकरी, मटण, भाजी कढी, डाळ, भात, डाळ कढी व पुलाव इत्यादी आहार असतो. मुस्लिमात गरीब व श्रीमंत लोकजेवण म्हणून 'बिर्याणी', 'जर्दा', 'पुलाव', 'बिस्मिल्ला' आणि 'अकिका' चा आहार असतो.

**पोषाख :** जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागात पेहरावाच्या बाबतीत फारसा फरक आढळत नाही. परंतु आर्थिक परिस्थितीनुसार शहरी भागात नवनवीन भूषाप्रकार दिसून येतात.

**लहान मुलांचा पोषाख :** लहान अर्भकांसाठी लंगोट, टोपरे, कुंची, आंगडे (झबले) हे पारंपारिक कपडे वापरतात. दोन किंवा तीन वर्षाच्या मुलींसाठी बंडी, पेटी, सदरा शर्ट वापरतात. त्याच्याहून मोठयास चड्डी, तुमन, कोलना घालतात. सात वर्षाच्या वरील मुलीस

परकर, चड्डी, पोलका, फ्रॉक आणि जांग इत्यादी प्रकारचे कपडे तर चौदा वर्षाच्या मुलींना साडी आणि चोळी व मुलांना मुख्यत्वे शर्ट, पॅट, धोतर, पायजमा इत्यादी प्रकारचे पोषाख वापरतात.

**पुरूषांचे पोषाख :** ग्रामीण भागातील पुरूष (प्रौढ) अजुनही धोतर वापरतात. उच्चभ्रू वर्गातील ब्राह्मण व मराठी बोलणारे लोक धोतर दुमडून निटनेटकेपणाने नेसतात. हिंदूमध्ये वरच्या वर्गात धोतराबरोबर सदरा (पैरण) घालतात. मराठा जातीत तुमन (लेहंगा) किंवा सफैद पैरण वापरतात. याशिवाय कोट, सदरा, डोक्यावर टोपी किंवा रूमाल बांधतात. समारंभाच्या वेळी नेहरू शर्ट, झब्बा व गांधी टोपी इत्यादी कपडेही वापरतात. अलिकडील काळात शहरी भागात पोषाखात बराच बदल झालेला आढळतो. त्या बदलात कोट, नेक टॉय, बुट आणि पायमोजे इत्यादी बदल दिसून येतो.

**स्त्रियांचा पोषाख :** जिल्हयातील बहुतेक स्त्रियांचा पोषाख पारंपारिक पद्धतीचा दिसून येतो. त्या आठवारी व नऊवारी साडया नेसतात. ग्रामीण भागातील स्त्रिया जाडीभरडी लुगडी नेसतात. लुगडयाच्या पदराला भरतकाम केलेले असते तो पदर डोक्यावरून घेतात. शहरी

भागावरील मुली हया परकर, झंपर, पोलका, व अंगात घट्ट चोळी घालतात. याशिवाय लहान बाहयांचा झंपर व नवीन पद्धतीचे गोल गळयांचे ब्लाऊज वापरतात. शहरातील सुशिक्षित मुली पंजाबी ड्रेस, जीन्स पॅन्ट व सलवार कमीज असेही वेष परिधान करतात. पेहरावात विशेषतः तरूण वर्गाच्या नवनवीन फॅशनचा प्रभाव जाणवतो.

दागदागिने (अलंकार) : जिल्हयात बहुतेक सर्व समाजात अलंकार वापरण्याची प्रथा आढळून येते. प्रत्येक समाजातील अलंकरणाच्या पद्धती वेगवेगळया आहेत. त्यातही महिला, पुरूष व मुले यांचे अलंकार भिन्न भिन्न प्रकारचे आढळतात, हे अलंकार डोके, कान, नाक, गळा, बाहू, मनगट, अंगुली, कमर, पाय आणि पायाचे बोटे इत्यादी शरीराच्या विविध भागांवर घातले जातात. समारंभाच्या वेळी विविध प्रकारचे अलंकार वापरतात. परंतु असे दिसून येईल की प्राचीन समाजात ज्या प्रकारचे दागिने (अलंकार) वारत होते त्यात आणि आज बराचसा बदल झालेला आहे. पुर्वी संपत्तीवरून त्यांचा सामाजिक व आर्थिक दर्जा ठरत होता. एक फॅशन म्हणून दागिने (अलंकार) वापरत नाही तर एक वैभवाचा भाग म्हणून वापरतात. पुरूष गळयात कांथी (गोप), हातात सोन्याची चांदीची, तांबे, पितळे यांच्या अंगठया वापरतात. श्रीमंत कुटुंबातील मुलांसाठी गळयात साखळी किंवा सारपोली वापरतात.

स्त्रिया आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार सोन्याचे व चांदीचे दागिने वापरतात. पायात वाळे, साखळी, पैजण, गळयात बोरमाळ, पुतळयांची माळ, मोहेरांची माळ, सरी आणि गळेसार, नाकात नथ, कानात कर्णफूल (कुडया) व बोटात अंगठी घालतात. जुने झालेले दागिने सोनाराकडे नेऊन त्याचा आकार बदलवून नवीन दागिने बनवून घेतात. त्यात केसांमध्ये लावावयाचे अलंकार, रत्नखचित साडीपीन, फुलेन, मूद अग्रफूल, बिंदी, बिजोर, नागगोडे इत्यादी, स्त्रियांचा महत्वाचा दागिना (अलंकार) म्हणजे मंगळसूत्र होय, मंगळसुत्राबरोबर काळे मनीही वापरतात. स्त्रियांच्या गळयातील दागिन्यात प्रामुख्याने सोन्याची चैन, चंद्रहार, एकदानी, कोल्हापूरी साज, मोहनमाळ, चपलाहार, बकुळीहार, पोहेहार इत्यादी. या अलंकाराव्यतिरिक्त स्त्रिया अलंकार वापरतात त्यात गोठ, पाटल्या, बांगडया, Vankya बाजुबंद इत्यादी दागदागिने वापरतात. आता नवीन बंगाली कलाकुसराची दागिणेपण लोकप्रिय होत आहेत[१५].

## धार्मिक प्रथा-

वैज्ञानिक प्रगती, पाश्चिमात्य शिक्षण आणि आधुनिक दृष्टिकोनामुळे पूर्वीच्या रूढी व धार्मिक प्रथांमध्ये परिवर्तन झालेले आहे. तथापि धार्मिक संस्कार सर्वस्वी नाहिसे होणे शक्य नाही. हिंदू धर्मशास्त्रानुसार १६ नित्य व २४ नैमित्त्कि संस्कार विहित केलेले आहेत. नैमित्तिक संस्कार बहुतांशी नामशेष होण्याच्या मार्गावर असले तरी नित्य संस्कारापैकी नामकरण, कर्णवेध, उपनयन उर्फ मुंज, विवाह आणि अंत्यविधी हेच संस्कार प्रचलित आहेत. जन्म मृत्यू आणि स्त्रियांच्या बाबतीत गरोदरपणाचे काही विधी तेवढे अजून करण्यात येतात.

**उपनयन (मुंज) :** उपनयन, व्रतबंध व मौजीबंधन अशी तीन नावे सामान्य व्यवहारात या संस्काराला मुंज असे म्हणतात. अशा प्रकारच्या पवित्र संस्कार ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनाच फक्त हा संस्कार विहित समजला जात असे. धर्मशास्त्रानुसार बालक आठ, दहा अथवा बारा वर्षाचे झाल्यावर त्याला गुरूगृही विद्याध्ययनासाठी पाठविण्याचा हा दीक्षा समारंभ आहे. विद्यमान काळात तो फक्त इष्टमित्रांना बोलावून मेजवाणी देण्याचा हौसेचा प्रकार म्हणून ठरला आहे. आता पाच वर्षांची मुले प्राथमिक शाळेत जातात व त्यापूर्वी बालवाडी वर्गात शिकू लागतात. तरीही नाममात्र संस्कार ब्राह्मणादी पांढरपेशा जातीत तो अजून रूढ आहे.

मुंजीच्या वेळी विवाहासाठी घालतात तसा मंडप घालतात. इष्टमित्रांना निमंत्रणे जातात. आप्तेष्ट मुलाला व त्याच्या मातापितरांना गडगनेर अथवा केळवण कतात. मुलांची पत्रिका पाहून मुहूर्त ठरतो. अक्षता देण्यात येते. घाणी, पुण्यहवाचन, नांदीश्राद्धघटिकापात्र घंगाळत घालून ठेवणे हे सर्व विधी होतात. मुलाला व त्याच्या आईला अभ्यंगस्नान घालतात. मुलाचे केस समारंभपूर्वक कापतात. मातृभोजनाचा सोहळा मोठा हौसेचा प्रकार समजला जातो. मुहूर्त जवळ आला म्हणजे सर्व निमंत्रित मंडपात जगतात. मुलगा व बाप यांच्यामध्ये अंतरपाट धरला जातो. ब्राह्मण मंगलाष्टक म्हणतात. निमंत्रित मंगलाक्षता टाकतात. मुहूर्ताच्या बरोबर अंतरपाट काढल्यावर मुलगा बापाच्या पायावर डोके ठेवतो आणि तो त्याला उचलून आपल्या मांडीवर बसवतो. मंगल वाद्यांचा गजर सुरू असतो. निमंत्रितांना पान-सुपारी, अत्तर, गुलाब देतात. अलिकडे या प्रसंगी मुलाला काही भेटवस्तू निमंत्रितांना द्यावी अशी प्रथा सुरू झाली आहे.

यानंतर उपनयनाच्या खऱ्या धार्मिक विधीस प्रारंभ होतो. मुलगा बापाच्या डाव्या बाजूस बसतो. बापासमोर स्थंडिल तयार करून त्यावर दर्भ पसरून होमाची तयारी होते. पुरोहित तेल हळदीत बुडविलेल्या एका दोरीत मृगजीनाचा एक तुकडा गोवून त्याच्या गळयात अडकवितो.  तूप, तिळ व सात प्रकारच्या समिधा होमामध्ये टाकण्यात येतात. मुलाला होम व आपला बाप याच्यामधून जायला सांगून त्रिवार आचमन करायला लावून तो मुलगा बापाच्या उजव्या बाजुला पायावर असतो. मग उभा राहून आचार्यांना वंदन करून ब्रह्मचर्याश्रमाची दिक्षा देण्याला विनवितो. आचार्य यांची विनंती त्याला यज्ञोपविस व पलाशवृक्षाची काठी देऊन मान्य करतात. त्याला सूर्यदर्शन करवून गायत्रीमंत्र शिकविण्यात येतो व विद्यार्जन कसे करायचे याबद्दल सूचना देण्यात येतात. अग्नि, सूर्य व इंद्र यांची प्रार्थना करून विद्यातेज व बल यांची मागणी बटू करतो. मेधाजतन म्हणजे बौद्धिक व मानसिक सामर्थ्य बटूच्या ठायी उत्पन्न व्हावा म्हणून करण्याचा शेवटचा धार्मिक विधी या संस्कारात करतात. गुरूगृही बारा वर्षे राहून विद्याभ्यास संपवून गृहस्थाश्रमाची दीक्षा घेण्यासाठी करण्याचा जो विधी असे त्याला समावर्तन असे म्हणतात. पण हल्ली तो उपनयनानंतर एक-दोन दिवसातच उरकून घेतात. सामान्य परिभाषेत त्याला 'सोडगुंज' असे म्हणतात. ती झाल्यावर त्याला नवा पोषाख, छत्री व जोडा देण्यात येतो व काशीयात्रेला निघाल्याचा तो बहाणा करतो. पण पुरोहित अथवा त्याचा मामा त्याला आपली मुलगी

देण्याचे आश्वासन देऊन काशियात्रेला जाण्यापासून परावृत्त करण्याचे नाटक करतात. मग तो घरीच राहतो.

**विवाह :** हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे विवाह हा अत्यंत महत्वाचा पवित्र व मानव वंशवृद्धीसाठी आवश्यक असा संस्कार आहे. या शास्त्राप्रमाणे विवाहाचा विच्छेद होऊ शकत नाही. त्यामुळे असे म्हणता येईल की विवाह हा स्त्री-पुरूष यांच्यात घालून दिलेले अपरिहार्य व पवित्र बंधन आहे. विवाहामध्ये गोत्रप्रवर अथवा कुळी देवकाचा विचार महत्वाचा मानला जात असे. पूर्वी आंतरजातीय विवाह होत नव्हते. तथापि आता जातिभेदाची तीव्रता कमी झाल्यामुळे आंतरजातीय विवाह होऊ लागले आहेत. पूर्वी विवाह समारंभ मोठया थाटात आणि चार ते आठ दिवस चालत असे. आता मात्र आटोपशीर व आल्पकालीन झाला असून त्यात फक्त आवश्यक धार्मिक संस्कारच करतात. नोंदणी पद्धतीने विवाह करणे अजुन फारसे रूढ झाले नाही. जिल्हयात आजही डागडौलात लग्नविधी करण्याची प्रवृत्ती आढळते.

पूर्वी बरेच दिवस रेंगाळणारे विवाहविधी आता बहुधा एका दिवसात संक्षिप्तपणे संपविण्यात येतात. सोळा संस्कारापैकी विवाह हाच आता ठळकपणे पाळण्यात येतो. बाकी सर्वांचा, उपनयनाचा देखील संक्षेप झाला आहे. त्यांचे महत्व फारसे कोणी मानीत नाही.

**अत्यंसंस्कार :** हिंदूमध्ये प्रेत दहन करण्याचीच मुख्यतः वहिवाट आहे. परंतु आठ वर्षाखालील मृतांचे मात्र दफन होते. मरणोन्मुख झालेला, माणुस जर शुद्धीवर असेल तर तो रामनाम घेत राहतो अथवा त्या-त्या दुसऱ्या कोणत्या उपास्य दैवतेचे स्मरण करतो. तो शुद्धीवर नसेल तर त्याच्यासाठी इतर लोक असे करतात. मरणकाल अगदी समीप आल्यावर त्याचे शिर त्याचा वडील मुलगा अथवा त्याची पत्नी आपल्या मांडीवर घेते. गंगाजल व तुलसीजल मुखात घालण्यात येते[१६]. सुवर्ण व मौक्तिकही मुखात घालण्याचा प्रघात आहे. प्रेताला स्नान घालून ते तिरडीला घट्ट बांधतात व पांढरा कपडा सर्व अंग झाकेल असा टाकतात. फक्त तोंड उघडे ठेवतात. मृताचा मुलगा अथवा जवळचा आप्त प्रेतयात्रेच्या अग्रभागी हातात विस्तवाचे मडके धरून चालतो. स्मशान पोहचल्यावर चिता रचण्यात येऊन त्यावर प्रेत ठेवण्यात येते. (त्यासाठी लाकूउ, चंदनाचे तुकडे, तुळशीची पाने व गोवऱ्या आदि साहित्य वापरतात.) त्यानंतर प्रेतास अग्नी देण्यात येतो. चितेभोवती तीन प्रदक्षिणा घालून मुलगा चितेच्या उत्तर टोकासी उभा राहतो. सर्वजन प्रेताची कवटी फुटून तसा आवाज होईपर्यंत बसून राहतात.

## सण व उत्सव-

हिंदूमध्ये सण व उत्सव आणि उपवास हे प्रतिवर्षी येणारे असून त्यात कुठल्याही प्रकारचा बदल होत नाही.

**गुढी पाडवा :** नववर्षाच्या सुरूवातीस शालिवाहन शक पाळणाऱ्या हिंदूच्या दृष्टीने गुढीपाडवा हीच वर्षे प्रतिपदा होय. चैत्र महिन्याच्य शुक्ल पक्षातील हा पहिला दिवस, प्रत्येक घरी 'गुढी' म्हणजे सजवलेली एक बांबुची काठी उभारली जाते आणि तिची पुजा करून तिला बहुधा पुरूणपोळीचा अथवा इतर पक्वानांचा नैवेद्य दाखविला जातो. काठीच्या टोकाला एखादे रेशमी अथवा जरीचे वस्त्र बांधून त्यावर भांडे ठेवतात. यास गुढी उभारणे असे म्हणतात. चैत्र शुद्ध प्रतिपदा या शानिवाहन शकाच्या नववर्षे दिनी रामाने चौदा वर्षे वनवास आणि लंका-विजयानंतर याच दिवशी अयोध्येत प्रवेश केला अशी कथा रूढ आहे. याच दिवशी

ब्रह्मदेवाने जग निर्मिती केली अशीही समजूत आहे. या शुभ दिवशी नवीन कामाचा आरंभ करतात. वर्षातील साडेतीन मुहूर्तापैकी हा एक शुभमुहूर्त मानला जातो.

**रामनवमी :** चैत्र शुद्ध नवमीला दुपारी १२ वाजता राममंदिरात रामजन्मोत्सव साजरा करतात. या दिवशी कित्येक लोक उपवास करतात. त्यावेळी रामाला पाळण्यात घालून कीर्तनकार आईची भूमिका बजावून त्याला झोके देतो. सर्व भक्तांना सुंठवडा व तीर्थप्रसाद देण्यात येतो. रात्रंदिवस भजन-कीर्तन चालते. प्रतिपदेपासून ते सुरू झालेल असते.

**हनुमान जयंती :** चैत्र शुद्ध पौर्णिमेला सुर्योदयाबरोबर हनुमान जयंती साजरी करतात.

**बसव जयंती :** वैशाख शुद्ध द्वितीयेस लिंगायत लोक बसव जयंती साजरी करतात.

**अक्षयतृतीया :** अक्षयतृतीया ही वैशाख शुद्ध तृतीयेस येत असून साडेतीन शुभ मुहूर्तापैकी यास अर्धा मुहूर्त समजतात. यादिवशी देवपूजन व पितृपूजन करण्यात येते. शेतकरी शेतीच्या कामाचा शुभारंभ या दिवशी करतात.

**वटपौर्णिमा :** जेष्ठ शुद्ध पौर्णिमेस वटपौर्णिमा म्हणतात. हिंदू स्त्रिया या दिवशी उपवास करून वडाची पूजा करतात व पतीला दिर्घायुरारोग्य (दिर्घायुष्य) मिळावे म्हणून प्रार्थना करतात. सावित्रीने हे व्रत करून आपल्या पतीचे (सत्यवानाचे) प्राण यमाकडून परत मिळविले म्हणून तिच्या स्मरणार्थ हे व्रत करण्यात येते.

**आषाढी एकादशी :** आषाढ शुद्ध एकादशीला वारकरी पंथाचे लोक उपवास करतात. या दिवशी चातुर्मासाला प्रारंभ होतो व कार्तिक शुद्ध द्वादशीला तो संपतो. कीर्तनाचे कार्यक्रम होतात. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम इत्यादी संताचे अभंग गातात. वारकरी पंथाचे विठोबाचे उपासक या दिवशी पंढरपुरी प्रस्थान ठेवतात. जिल्हयातून वारकऱ्यांची मोठी पालखी पंढरपुरास जाते.

**नागपंचमी :** श्रावण शुद्ध पंचमीला नागपंचमी येते. या दिवशी नागाची आकृती पाटावर काढून तिची पूजा करतात. खेडेगावात स्त्रिया मुंग्याच्या वारूळाशी जाऊन तीथे नागपुजा करतात. वारूळाशी दूध व साखर नागाला पिण्यासाठी ठेवण्यात येते. नांगरणे, खणणे, खोदणे वगैरे कामे या दिवशी बंद ठेवतात.

**नारीळी पौर्णिमा (राखी पौर्णिमा) :** श्रावण शुद्ध पौर्णिमा ही नारळी पौर्णिमा अथवा राखी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. या दिवशी ब्राह्मण व इतर लोक श्रावणी करतात व नवीन यज्ञेपविते धारण करतात. पुरोहित आपल्या यजमानांच्या मनगटात राखी बांधतात.

**गोकुळाष्टमी :** श्रावण वद्य अष्टमी ही गोकुळाष्टमी अथवा जन्माष्टमी म्हणून ओळखली जाते. या दिवशी श्रीकृष्णाची पूजा विशेष प्रकारे होते. बरेच लोक उपवास करतात. जन्मोत्सव मध्यरात्री होतो. यावेळी कृष्णस्तुतीपर भजने, गौळणी व अभंग म्हणतात. रात्री बारा वाजता लहानशा सजविलेल्या पाळण्यात कुंचीत नारळ घालून पाळणा गीत म्हणतात. दुसऱ्या दिवशी दहीहंडी (दहिकाला) होते.

**पोळा :** श्रावण अमावस्येला पोळा हा सण साजरा करतात. शेतकरी लोकात याचे महत्त्व विशेष आहे. या दिवशी बैलांना पूर्ण विश्रांती मिळते. त्यांच्या शिंगांना रंग लावून त्यावर बंगड आणि रंगीबेरंगी फिती लावून सजवितात. पुरणपोळी खाऊ घालून त्यांची पूजा करतात.

**गणेशचतुर्थी :** भाद्रपद शुद्ध चतुर्थी ही गणेश चतुर्थी म्हणून ओळखली जाते. गणपतीची मातीची मुर्ती प्राणप्रतिष्ठा करून बसविली जाते व तिची पूजा करण्यात येऊन मोदकांचा नैवेद्य दाखविला जातो. कुलाचाराप्रमाणे दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस अथवा दहा दिवस मुर्ती ठेवून तिची सांजसकाळ पूजा होते. अलीकडच्या काळात शहरातील लोक एकत्र येऊन वर्गणी गोळा करून सार्वजनिक ठिकाणी आकर्षक देखावे तयार करून गणपतीची स्थापना करतात व संयुक्तपणे उत्सव साजरा करतात. नंतर विसर्जन करतात.

**दसरा :** नवरात्र म्हणजे दसरा आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षातील पहिले दहा दिवस दुर्गा देवीचा हा उत्सव असतो. पहिले नऊ दिवस नवरात्रचे समजले जातात. पहिल्या दिवशी घटस्थापना करतात व देवीच्या नावे घट बसवितात. त्यानंतर दरदिवशी नित्यनेमाने पूजा करतात. दसऱ्याचा मुहूर्त बघून कोणत्याही शुभ कार्याची सुरूवात या दिवशी करण्याची पद्धत आहे. आपटयाची पाने सोने म्हणून एकमेकांना देऊन भेटतात.

**दिवाळी :** दिवाळी अथवा दिपावली म्हणजेच दिव्यांचा उत्सव. आश्विन वद्य त्रयोदशीला प्रारंभ होऊन भाऊबीज म्हणजे कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत त्याची मुदत असते. विष्णूने नरकासुराचा वध केला म्हणून हा दिपोत्सव प्रथम करण्यात आला. पण चार पाच उत्सवांचा संगम दिवाळीत होतो. धनत्रयोदशीला धनाची पूजा करतात. नरक चतुर्दशीच्या दिवशी सर्व लोक अभ्यंगस्नान करतात. अमावस्येला लक्ष्मीपूजन होते. व्यापारी वर्गात या दिवसाच सर्वात जास्त महत्त्व असते. नवे हिशोब व व्यवहार या दिवशी सुरू होतात. बलिप्रतिपदा म्हणजे विक्रम संवताचा पहिला दिवस, भाऊबीज हा बहिणीने भावास ओवाळण्याचा बंधुभगिनींना एकमेकास शुभचिंतन करण्याचा व बहिणीस सप्रेम भेट देण्याचा दिवस. दिपावलीच्या पाच

दिवसांत घरोघरी आकाश कंदील व मातीच्या पणत्या लावतात. लाडू, करंज्या, चकल्या, चिवडा इत्यादी फराळाचे पदार्थ तयार करतात.

**तुळशीचे लग्न :** कार्तिक शुद्ध एकादशी म्हणजे कार्तिकी एकादशी, या दिवशी चातुर्मास समाप्ती होते. या नंतच्या दिवशी तुलसीविवाह होतो. तुलसीच्या लग्नानंतर लग्नकार्याचा प्रारंभ होतो.

**मकरसंक्रांत :** मकर राशीत सूर्य प्रवेश करतो तो दिवस मकरसंक्रांत म्हणून पाळतात. मिष्टान्न भोजन होते व सायंकाळी स्त्री-पुरूष सणाचा पोषाख करून मित्रांना व नातेवाईकांना भेटतात व तिळगूळ देतात.

**महाशिवरात्री :** माघ वद्य त्रयोदशी अथवा चतुर्दशीला महाशिवरात्री असते. त्या दिवशी उपवास व शिवार्चन करतात.

**होळी :** फाल्गुन पौर्णिमेला होळी साजरी करतात. होळी हा सण मोठया उत्साहात साजरा करतात. पुरणपोळी हे होळीचे विशेष मिष्टान्न मानले जाते. दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण असतो. त्यावेळेस एकमेकांवर रंग उधळून त्याचा आनंद घेतात.

## २.३ लातूर जिल्हा आर्थिक इ

## कृषि व जलसिंचन-

उस्मानाबाद जिल्हयातील काही तालुक एकत्र करून व काही नवीन तालुके निर्माण करून प्रशासकीय सोईसाठी सन १९८२ मध्ये लातूर जिल्हयाची निर्मिती करण्यात आली. सन १९६१ च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्हयाची लोकसंख्या १४,७७,६५६ इतकी होती. त्यापैकी ५५.२३ टक्के कुटंबे शेती करत होती. १९६१ मध्ये उस्मानाबाद जिल्हयात ४६.६६ टक्के पुरुष व स्त्रिया शेतकरी होते तर ३६.८६ लोक शेतमजूर होते. त्याचवेळी महाराष्ट्रामध्ये शेतकरी ४६.११ व २३.८० टक्के लोक शेतमजूरीचे काम करीत होते.

लातूर जिल्हा कृषिप्रधान असून बहुतांश लोक शेतीवर निर्भरित आहेत. १९९१ च्या जनगणनेनुसार लातूर जिल्हयात शेतकरी व शेतमजूर यांची एकूण संख्या ५,१५,१०० इतकी होती. त्यामध्ये शेतकऱ्यांची संख्या २,५८,४२८ होती. त्यामध्ये १,६९,५८० पुरूष व ८८,८४८ महिला होत्या. जिल्हयातील लोकसंख्येमध्ये हे प्रमाण ३९.३८ इतक होते तर त्याच वेळी महाराष्ट्रातील शेतकरी व शेतमजुरांची संख्या १,८४,८५,३३१ इतके असून त्यांचे प्रमाण ३३.८१ व २६.८१ टक्के होते. तसेच जिल्हयामध्ये शेतीवर काम करणाऱ्या शेतमजुरांची

संख्या २,५६,६७२ इतकी होती, व त्यामध्ये अनुक्रमे १,२३,६३६ पुरूष व १,३३,०३६ स्त्रीया होत्या. जिल्हयातील लोकसंख्येनुसार त्याचे एकूण प्रमाण ३९.१ इतके होते. त्यामध्ये पुरूषांचे प्रमाण २९.४१ तर महिलांचे प्रमाण ५६.४० टक्के होते, तर महाराष्ट्रामध्ये शेतकरी १,०१,७२,१०८ आणि शेतमजुरांची संख्या ८३,१३,२२३ इतकी होती व त्यांचे राज्यातील शेकडा प्रमाण शेतकरी ३२.८१ व शेतमजूर २६.८१ इतके होते[१७].

## उद्योगधंदे-

### औद्योगिक इतिहास-

प्राचीन काळापासून शेती क्षेत्र हे या जिल्हयातील अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार राहिला आहे. प्रारंभीक ऐतिहासिक काळापासून खेडयांमध्ये जीवनावश्यक वस्तू व शेतीची अवजारे घडविण्याचा व्यवसाय वंशपरंपरेने चालत असे. कृषि उत्पादनाच्या आधारावर जिल्हयात पूर्वी हातमाग विणकाम आणि तेलघाण्यावर तेल गाळणे हा कुटिरोद्योग अनेक ठिकाणी चालत असे. एकंदर मराठवाडयाच्या औद्योगिक विकासाबाबत हैद्राबाद संस्थानाच्या उदासीनतेच्या धोरणामुळे हा जिल्हा देखील औद्योगिक दृष्टया मागास राहिला. याखेरीज लातूर हे हैद्राबाद संस्थानातील एक अग्रगण्य कापूस खरेदी केंद्र होते. सन १९०१ मध्ये लोकमान्य टिळकांनी लातूर मध्ये जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी सुरू केली. टिळकांच्या उद्योगाबरोबर त्यांचे स्वातंत्र्याचे वारेही या परिसरात वाहू लागले. याची दखल घेऊन हैद्राबाद सरकारला लातूर येथे १९०४ मध्ये मुन्सफी कोर्ट सुरू करावे लागले. त्यानंतर १८९९ मध्ये लातूरहून बार्शीला जाणारा सिमेंटचा रस्ता तयार झाला. आयात निर्यातीला अधिक चालना मिळू लागली. टिळकांच्या जिनिंग फॅक्टरीनंतर लातूर येथे १९०७ मध्ये आणखीन एक जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी सुरू झाली. यापुढील दशकात लातूर ते कुर्डूवाडी नॅरोगेज रेल्वे सुरू झाली. पुढे १९३० नंतर हैद्राबाद सरकारने येथे उद्योग विभाग सुरू केला. सन १९४६ मध्ये लातूर येथे सुधाकर प्रिंटिंग प्रेस सुरू झाली.

सन १९४८ मध्ये हैद्राबाद संस्थानातून हा जिल्हा किंवा एकंदर मराठवाडा मुक्त होऊन मुंबई राज्यात सामील झाल्यानंतर जिल्हयातील औद्योगिकरणाच्या मार्गातील अडथळे दूर होण्यास सुरूवात झाली. सन १९५८ मध्ये लातुरात धुलाईचे साबण तयार करण्याचे दोन कारखाने, १९५९ मध्ये मिठाईचा कारखाना, १९६० मध्ये औसा येथे हाताने बनविण्यात

येणाऱ्या कागदाचा कारखाना हे सुरू झाले. सन १९६३ मध्ये लातूर येथे डालडा तयार करणारी को ऑपरेटीव्ह ऑईल मिल सुरू झाली. याच वर्षी लातूर इंडस्ट्रिअल को ऑपरेटीव्ह वसाहत सुरू झाली. सन १९६४ मध्ये लातूर येथे जवाहर सहकारी कापूस उत्पादक सूत गिरणी सुरू झाली. सन १९६५ मध्ये ढोकी येथे मराठवाडयातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन झाला. त्याच वर्षी मुरूड येथे सिमेंटचे खांब तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. १९६७ पासून लातूरहून चंपावती नावाचे साप्ताहिक आवृत्ती

प्रकाशित होऊ लागली. त्याच वर्षी लातूर येथे मयूर पेन्टस् हा पेन्टचा कारखाना सुरू झाला. लातूर येथे सन १९७० मध्ये मे.एलोरा इंडस्ट्रिज हा बिल्डींग हार्डवेअरचा, १९७२ मध्ये मे.गणेश इंडस्ट्रिज हा लोखंडी सळई तयार करण्याचा, मे.पपरूनिया इंडस्ट्रिज, मे.कांचन ऑईल इंडस्ट्रिज हे खाद्य तेलाचे कारखाने सुरू झाले. सन १९७४ मध्ये हलगरा (ता.निलंगा) येथे हनुमान खांडसरी शुगर मिल्स हा खाजगी कारखाना, लातूर येथे १९७५ मध्ये मे.कपील ऑईल मिल, मे.बस्वेश्वर स्टील इंडस्ट्रिज हा ट्रॅक्टर ट्रॉलीचा कारखाना, सन १९७८ मध्ये उदगीर येथे दूध भुकटीचा शासकीय प्रकल्प हे प्रमुख व अन्य काही उद्योग नव्याने लातूर जिल्हा निर्मिती होईपर्यंत सुरू झाले.

सन १९८२ मध्ये उस्मानाबाद जिल्हयाचे विभाजन होवून लातूर जिल्हयाची निर्मिती झाली. लातूर जिल्हा निर्मितीस सन २००७ मध्ये २५ वर्षे पूर्ण झाली. या कालावधीतील जिल्हयाच्या औद्योगिक विकासाबाबत दृष्टिक्षेप टाकला असता काही महत्वाचे उद्योग धंदे जिल्हयात सुरू झालेले आढळतात.

## धर्मादाय व सेवाभावी संस्था-

शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रिडा विषयक क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने कार्यरत असलेल्या अनेक संस्था जिल्हयात आहेत. त्यामध्ये १८६० च्या सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट खालील नोंदणीकृत संस्थांचा समावेश होतो. स्वातंत्र्योत्तर काळात अशा संस्थांचे नियमन १८६० च्या अधिनियमाखेरीज १९५० च्या बॉम्बे पब्लिक ट्रस्ट अधिनियमाखाली केले जाते. यासाठी लातूर येथे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाचा उपविभाग असून त्यावर सहाय्यक धर्मदाय आयुक्तांची नेमणूक केलेली आहे. माहे मार्च २००५ अखेर जिल्हयातील नोंदणीकृत विविध संस्थांची संख्या खालील विवरणपत्रात देण्यात आलेली आहे.

| **अ.क्र. (१)** | **नोंदणीकृत संस्थेचा प्रकार (२)** | **संख्या (३)** |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक | ८,७४४ |
| २ | क्रिडा विषयक | २,७३५ |
| ३ | वाचनालये | २,३७० |
| | **एकूण** | **१३,८४९** |

**ग्रामीण विकास लोकसंस्था, अहमदपूर :-** "गावाकडे (खेडयांकडे) चला" या महात्मा गांधीच्या संदेशातून प्रेरणा घेऊन, ग्रामीण भागाला कर्मभूमी मानून सर्वांगीण ग्रामीण विकास अर्थात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास साधण्याच्या उद्देशाने आणि ग्रामीण भागातील गरीब, भूमिहीन, बालकामगार आणि वंचित यांचे प्रश्न आणि हक्क समजावून सांगून त्यांची उकल करण्यासाठी संस्थेची स्थापना १५ ऑगस्ट १९८३ रोजी अहमदपूर येथे करण्यात आली.

सध्या संस्था बालमजुरी निर्मूलन व पुनर्वसन, भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन, रोजगारासाठी शेतमजूर संघटन, नैसर्गिक संसाधने विकास कार्यक्रम, शेती व पिण्यासाठी पाणी, महिला मुक्ति प्रबोधन आणि विकास, बहुउद्देशिय प्रशिक्षण केंद्र इत्यादी विषयावर लातूर, परभणी, उस्मानाबाद या जिल्हयातून काम करते.

**साथ -परिवर्तन व ऐक्यासाठी सामाजिक उठाव :**गावोगावी महिला, युवक, शेतमजूर यांना रचनात्मक कार्यासाठी प्रेरीत करणे, संघटन बांधणी व संचालनासाठीच्या तंत्र कौशल्यासह सक्षम बनविणे. या समुहांना साथ देत राहणे, तळागाळातील अंतिम माणूस व विविध योजना, शासकीय, निमशासकीय संस्था यांच्यामध्ये दुवा साधणे, समाजाचा मानसिक, बौद्धिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास साधणे, भारतातील घटनेतील जीवनमूल्ये रूजवून नवसमाज निर्मितीचे प्रयत्न करणे, परिवर्तन व ऐक्यासाठी सामाजिक उठाव करणे या मुख्य उद्दिष्टांची पूर्ती करण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना लातूर येथे करण्यात आली.

स्वयंसहायता समूह (बचत गट) समूह कृती संगम प्रक्रिया, सुवर्ण जयंती, ग्रामस्वयंरोजगार योजना, महिला मंडळे उभारणी, युवक मंडळे उभारणी बाल व मनुष्यबळ विकास, समाज कार्यकर्ते उभारणी, पंचायतीराज, एड्स विरोधी जनजागृती, माता बाल आरोग्य, ग्राहक चळवळ इत्यादी प्रकारची कृती कार्ये संस्थेतर्फे राबविली जातात.

**माता बाल केंद्र, लातूर (१९७६) :-** स्त्रियांचे प्रश्न आणि अनाथ बालके यांच्या समस्यांची उकल करण्याच्या दृष्टीने या केंद्राची स्थापना करण्यात आली. स्त्रियांचे हक्क आणि अन्यायावरील कायदे व शिक्षा कोणत्या इत्यादीची जाणीव होण्याच्या दृष्टीने महिलांसाठी जागृती शिबिरांचे आयोजन करण्यात येते. दुःखी, पीडीत महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांचे संसार जोडण्यासाठी या केंद्रातर्फे "कुटुंब सल्ला केंद्र" ही

चालविण्यात येते. दु:खी, निराधार, परित्यक्ता व समस्याग्रस्त महिलांना थोडा काळ आसरा मिळावा या दृष्टीने "अल्पमुदती निवास गृह" चालविले जाते.

बालकांसाठी बालवाडी सुदृढ मन व चांगले संस्कार घडविण्यासाठी झाशी राणी उद्यान स्थापण्यात आले आहे. संगणक प्रशिक्षण या केंद्रातून देण्यात येते. तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येतात.

**नारी प्रबोधन मंच, लातूर (१९८४) :-** महिला व बालकांच्या संपूर्ण विकासासाठी या मंचाची दिनांक १४ ऑगस्ट १९८४ स्थापना करण्यात आली. महिला मेळावे व महिला जागृती कार्यक्रम, महिला बचत गट, महिला मंडळ सक्षमीकरण, महिला स्वावलंबनासाठी आर्थिक मदत, अंधश्रद्धा निर्मूलन, कौटुंबिक सल्ला केंद्र अशा प्रकारचे कार्यक्रम मंचातर्फे राबविण्यात येतात.

**समता बहुउद्देशीय शिक्षण संस्था :-** सामाजिक विकास आणि मुलभूत सेवांपासून वंचित असणाऱ्या लोकांपर्यंत पोहोचणे आणि त्यांना संघटीत करून सामाजिक विकासाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना झाली. समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत जाऊन त्यांना स्वयंसहायता समूहाच्या माध्यमातून संघटीत करणे. नियमित बचत करून त्यांची सर्वप्रथम स्वत:च्या कुटुंबात त्यानंतर बँकेत व पर्यायाने समाजात पत निर्माण करण्यासाठी संस्था कार्यरत आहे. कौशल्य प्रशिक्षण, महिला संघटन आणि उद्योजकता विकास, महिलांनी बनविलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री, माहिती तंत्रज्ञान कार्यक्रम, जाणीव जागृती कार्यक्रम, कृषी विकास कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविले जातात.

**अफार्म संघटना (१९६९) :-** अफार्म ही मुंबई विश्वस्त निधी कायद्याखाली नोंदविलेली, शेती, भू-जल आणि ग्रामीण विकासाचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील सेवाभावी संस्थांची संघटना आहे. तिचे मुख्य कार्यालय पुणे येथे असून लातूर येथे शाखा कार्यालय कार्यरत आहे. १९६९ साली स्थापन झालेल्या या संस्थेच्या आज महाराष्ट्रातील १०९ स्वयंसेवी संस्था सदस्य आहेत. देशाला भेडसावणाऱ्या समस्यांमध्ये ग्रामीण विकास ही सर्वाधिक महत्वाची समस्या आहे. खेडयातील जीवनाच्या प्रत्येक बाबतीत तातडीने लक्ष पुरविणे आवश्यक आहे. शेती, आरोग्य, पशुसंवर्धन, वनीकरण, ग्रामोद्योग, कुटुंबकल्याण, पर्यावरण अशा अनेक क्षेत्रात लोकांसाठी नव्हे तर लोकांबरोबर काम करणे नितांत गरजेचे आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी

सदस्य संस्थांना सोबत घेऊन ही संघटना कार्य करते. महिला विकास कार्यक्रम, कृषी विकास कार्यक्रम, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, आपती निवारण कार्यक्रम, संशोधन व संकलन कार्यक्रम, आदिवासी व दुर्बल घटक विकास कार्यक्रम इत्यादी समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येतात.

**समाजभारती लातूर (१९८३) :-** शहरी आणि ग्रामीण महिलांचा विकास, शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती देऊन शेती विकास विषयक प्रकल्प राबविणे, उर्जा विकास, शिक्षण, ग्रामोद्योग, पाणलोट क्षेत्रविकास, ग्रामीण विकास कार्य, इत्यादी उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी या संस्थेची स्थापना १९८३ साली करण्यात आली.

महिला, मुले, मुली, भूमिहीन, शेतमजूर, शेतकरी, अपंग इत्यादींना लाभ मिळवून देण्यासाठी संस्थेतर्फे जाणीव जागृती, बचतगट कार्यक्रम, राष्ट्रीय एकात्मता शिबीर, पशु चिकित्सा शिबीर यासारख्या विविध विषयांवर शिबीरांचे आयोजन करून प्रबोधन करण्यात येते.

**बहुजन हिताय विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृह, लातूर (१९९३-९४) :-** या संस्थेची स्थापना १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात झाली. भूकंपग्रस्त विद्यार्थ्यांना व गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, एकंदरीत समाजाच्या कल्याणाकरीता काम करणे हा संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

या संस्थेतर्फे विक्रमनगर येथे मुलींचे तर प्रकाशनगर येथे मुलांचे वसतिगृह चालविण्यात येते. मुलींच्या वसतिगृहात ८० विद्यार्थीनी तर मुलांच्या वसतिगृहात ६७ विद्यार्थी असून त्यांना सर्व सुविधा मोफत पुरविल्या जातात. याशिवाय बालवाडया, शिवणवर्ग इत्यादी चालविण्यात येतात.

**बाल विकास महिला मंडळ, लातूर (१९८६) :-** बालविकास महिला मंडळ लातूर या सेवाभावी संस्थेची स्थापना १९८६ साली झाली.

या संस्थेतर्फे खालील उपक्रम राबविण्यात येतात-

**(१) शिशू सदन :** ० ते ६ वर्षे वयोगटातील अनाथ बालकांसाठी हे सदन काम करते. या बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. सध्या या सदनामध्ये २४ बालके आहेत.

**(२)** निराश्रित बालकांसाठी (६ ते १८ वर्षे) हे गृह चालविले जात असून त्यांच्या अन्न, शिक्षण व पुनर्वसनासाठी संस्था कार्य करते.

**(३) काम करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह :** या वसतिगृहाची स्थापना १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात झाली असून नोकरी व्यवसायानिमित्त लातूर शहरात आलेल्या महिला व मुलींच्या राहण्याची सोय आहे. सध्या १०० महिला व मुली या वसतिगृहाचा लाभ घेत आहेत.

**(४) संगणक परिक्षण :** घटस्फोटीत, हुंडापिडीत, परित्यक्ता, विधवा, निराधार, कुमारी माता इत्यादी अडचणीत असलेल्या महिला व मुलींना भोजन, निवारा व व्यवसाय प्रशिक्षणाची मोफत सोय. त्यांना संगणक, टंकलेखन, शॉर्टहँड, बुक बायडींग, शिवण व कर्तन, खडू, मेणबत्ती, अगरबत्ती, ब्युटी पार्लर व फळ प्रक्रिया इत्यादी प्रशिक्षण देण्यात येतात. या कालावधीत महिला व मुली यांचेसाठी अल्पमुदती वसतिगृहाची सोय आहे.

**(५) व्यसनमुक्ती व उपचार केंद्र :** व्यसनाधिन व्यक्तींना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी हे केंद्र चालविले जाते. येथे त्यांना वैद्यकिय तसेच मानसिक दृष्टीने मार्गदर्शन केले जाते.

**(६) समुपदेशन व मदत केंद्र :** महिलांना त्यांच्या कौटुंबिक, सामाजिक समस्या सोडविण्यासाठी कायदेविषयक मदत व मार्गदर्शन दिले जाते.

या शिवाय मूल दत्तक योजना, महिला बहुउद्देशिय केंद्र असे समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येतात.

**गणेश शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर :** गेल्या १६ वर्षापासून हे मंडळ मानवी जीवनात येणाऱ्या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. मंडळातर्फे खालील उपक्रम राबविण्यात येतात.

**१. शिशुगृह :** सदर संस्था व केंद्र शासनाच्या मान्यतेने ० ते ६ वयोगटातील, निराधार, अनाथ, बेवारस, मुलांना प्रवेश देऊन त्यांचे संगोपन करते. गरजू व सक्षम पालकांना मुले दत्तकही दिली जातात.

**२. व्यसनमुक्ती केंद्र :** व्यसनी बांधवांना व्यसनमुक्ततेसाठी सल्ला व उपचार देता यावेत यासाठी व्यसनमुक्ती केंद्र चालविले जाते. व्यसनाधिन व्यक्तीवर येथे ३५ दिवस उपचार केला जातो. तो वैद्यकिय, मानसिक सल्ला व उपचार पद्धतीने, हमखास बरा होतो.

**३. अल्प मुदती निवास केंद्र :** या केंद्रात, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत, निराधार, कुमारी माता अशा संकटग्रस्त महिला व मुलींसाठी, टंकलेखन, उत्पादन प्रशिक्षण, शिवण व कर्तन, छपाई, पुस्तक बांधणी, खडू, अगरबत्ती, मेणबत्ती तयार करण्याचे प्रशिक्षण विनामूल्य देण्यात येते. तसेच भोजन व निवासाची मोफत सोय आणि पुर्नवसनासाठी मदत केली जाते.

**४. वृद्धाश्रम :** ज्या वृद्धांना कुठलाही आधार नाही अशा वृद्धांची पूर्णपणे काळजी घेतली जाते. त्यांना दोन वेळचे जेवण, औषधोपचार, कपडे, राहण्याची व करमणुकीची पूर्ण व्यवस्था केली जाते.

**५. काम करणाऱ्या महिलांचे वसतिगृह :** नोकरी करणाऱ्या महिला व व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण घेणाऱ्या मुली व महाविद्यालयीन विद्यार्थीनींसाठी अल्पदरात राहण्याची सोय तसेच पाळणागृहाची सुविधा उपलब्ध आहे.

याशिवाय समुपदेशन व मदत केंद्र, एड्स विषयी जाणीव जागृती शिबिरांचे आयोजन, महिला बचतगट, महिला बहुउद्देशिय केंद्र, बालकाश्रम असे विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविले जातात.

**लातूर जिल्हा आरोग्य विषयक एड्स हस्तक्षेप कार्यक्रम (१९९६) :** या शिक्षण मंडळाची स्थापना ३१ मे १९९६ रोजी झाली आहे.

समाजातील विधि सामाजिक समस्यांची सोडवणूक, अन्याय, अत्याचार, गुंडागर्दीचा नायनाट, समाजातील दुर्बल घटकांचा सन्मान, शिक्षण, आरोग्य, हक्कांची जाणीव, माणूसकीची जपणूक अशा विविध समस्यांची सोडवणूक करून समाजाला एक चांगली दिशा देण्याच्या उद्देशाने या संस्थेची स्थापना करण्यात आली.

## ऐतिहासिक परंपरा आणि सांस्कृतिक वारसा-

लातूर जिल्हयाला तसा फार मोठा प्राचीन वारसा आहे. 'रत्नापूर महात्म्य' या अपूर्ण स्वरूपात सापडलेल्या हस्तलिखितात तसेच जैमिनी अश्वमेध आणि स्कंद पुराण यात गौरवाने उल्लेखिलेल्या मयुरध्वज आणि त्याचा पुत्र ताम्रध्वज या प्रतापी राजांची वैभवशाली राजधानी म्हणजे आजचे लातूर. त्या काळी या शहराचे नाव 'रत्नापूर' असल्याचा उल्लेख

सापडतो. मात्र इतिहास संशोधकांच्या मते या शहराचे प्राचीन नाव 'लत्तलूर' होते. लातूर या ग्रामनामाचा संदर्भ सातव्या-आठव्या शतकापासून मिळतो. प्रामुख्याने मराठी, कानडी आणि संस्कृत भाषेतील शिलालेखात ताम्रपटात तो आलेला असून मराठी भाषेत एक वेळा, संस्कृतमध्ये तीन वेळा, तर कानडीमध्ये सहा वेळा हा उल्लेख सापडतो. यात लत्तनूर-लत्तलूर-लतनौर-रट्टनोर असा उल्लेख आहे.

श्रीमंत प्रौढ प्रताप चक्रवर्ती श्री.कान्हेराव हा राज्य करीत असतांना त्याचा "पादपदनोपजीची राठोड वंशोद्भव सोमवंश कुलात नव केशवजी देवीच्या वराने लाभलेला लत्तलौरपुराचा प्रसाद" असा उल्लेख उदगीर तालुक्यातील कानेगाव (कान्हेगाव) येथील शिलालेखात आढळतो. हा ३५ ओळींचा शिलालेख मराठी भाषेत असून त्याचा काळ सन १२५८ आहे. तसेच राजा कृष्णदेवाने होमहवनासाठी दान दिलेल्या गावांच्या नोंदी या शिलालेखात आहेत.

लातूर शहरात भूतनाथाचे एक प्राचीन मंदिर असून शेजारी पापविनाश हे भव्य तीर्थ आहे. मंदिरात अस्पष्ट असा शिलालेख असून त्याचे वाचन[१] प्रसिद्ध इतिहास संशोधक श्री.ग.ह.खरे यांनी केले आहे.

हा महत्वपूर्ण शिलालेख असून त्याची तिथी १० फेब्रुवारी ११२८ ही येते. या शहराचे प्राचीन नाव 'लत्तलौर' होते हे सिद्ध होते. तसेच या नगरीत पाचशे विद्वानांचे वास्तव्य होते हेही लक्षात येते. कल्याणीचा चालुक्य राजा आहवमल्ल, त्याचा मुलगा परमर्दि व त्याचा मुलगा भूलोकमल्ल अशा तीन पिढयांचा यात उल्लेख आहे. प्रत्यक्षात आहवमल्ल, परमर्दि व भूलोकमल्ल ही नावे असून पहिला सोमेश्वर, त्याचा पुत्र सहावा विक्रमादित्य व त्याचा पुत्र तिसरा सामेश्वर या राजाची ही बिरूदे आहेत. या संदर्भात आणखी एक महत्वपूर्ण नोंद सापडते ती म्हणजे हिरे मुदनूरच्या शिलालेखात उल्लेखिलेला महामंडळेश्वर जोगमरस, माडगीहाळ शिलालेखात उल्लेखिलेला कुंतल देशी जोगम बिज्जल आणि तालिकाड जोग मनूप हे तीन वेगवेगळे राजे नसून जोगमरसाचा उल्लेख तीन वेगवेगळया नावाने आलेला आहे. तर तेथील त्रिविक्रम मंदिरातील शिलालेखातही जोगमरसाचा उल्लेख आहे. जोगमरसाच्या पत्नीचे नाव तारादेवी असे असून तिच्या कन्येच्या-सावळादेवी हिचा विवाह चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याच्याशी झाला होता. शके १००० ची ही घटना आहे. याच विक्रमादित्याचा उल्लेख लातूरच्या भूतनाथ मंदिराच्या शिलालेखात आहे.

'सिद्धेश्वर' हे या नगरीचे ग्रामदैवत असून तेथे सिद्धेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात बाराव्या शतकातील एक शिलालेख आहे. तो पुढीलप्रमाणे वाचला गेला आहे.

"स्त्री सिद्धेश्वर देवस्य वसते हार ने य अकाधारो अरी एं ग्रोम हलं निवर्त नानि ३६ प्रतिपालनयिम्। ब्राह्मण तपो धना नामधिकारो हरेत वसुंधरोषष्ठी वर्ष सहस्राणि विष्ठायां जायाते क्रिमि (मि:) मंगल मह श्री."।

हा शिलालेख दहा ओळींचा असून सिद्धेश्वर देवाला ३६ निवर्तने भूमि दिल्याचा उल्लेख त्यात आहे. या भूमिवर ब्राह्मण, तपस्वी यांचा कसलाही अधिकार नसल्याचा स्पष्ट उल्लेखही यात करण्यात आला आहे. शिरूर-अनंतपाळ तालुक्यातील गणेशवाडी येथेही एक लेखयुक्त शिळा सापडली आहे. या शिळेवर एकूण तीन लेख कोरलेले असून त्यापैकी दोन लेख चालुक्य नृपति विक्रमादित्य सहावा याचे असून तिसऱ्या लेखात राजवंशाचा उल्लेख नाही. गणेशवाडी हे चालुक्य काळात पाशुपत शैव पंथाचे किंवा शिवलिंगी सन्तानाचे मुख्य पीठ होते. या पंथाच्या गणेशवाडी येथील पाठशाळेच्या संचालनासाठी शैव आचार्यांची नियुक्ती करण्यात आल्याची नोंद या लेखात केलेली आहे[२]. या नोंदीवरून या नगरीचे प्राचीनत्व लक्षात येते.

महापराक्रमी राष्ट्रकूट राजांची लातूर ही वतनभूमी होय. या नगरीचे ते मूळ रहिवासी होते. त्यामुळे लातूरचे मूळगाव 'रट्टल अरू' असे असावे. 'अरू' हा कानडी शब्द असून त्याचा अर्थ 'गाव' असा आहे. म्हणजे रट्टलचे गाव ते 'रट्टल अरू' असे असावयास हकरत नाही. सातवाहन, कलचुरी, राष्ट्रकूट, चालुक्य, होळसळ, यादव या घराण्यातील राजांनी या प्रदेशावर राज्य केले असे उल्लेख प्राचीन कागदपत्रे, शिलालेख आणि ताम्रपटांतून आढळतात. राष्ट्रकूट म्हणजे राष्ट्रनायक, देशाच्या विशाल भागाचा अधिपती होय. या राष्ट्रकुटांच्या मानपूरचे राष्ट्रकूट, विदर्भाचे राष्ट्रकूट, मान्यखेटचे राष्ट्रकूट आणि लातूरचे राष्ट्रकूट अशा शाखा होत्या. म्हणजेच फार मोठा भूप्रदेश राष्ट्रकुटांच्या ताब्यात

होता. लातूरहून गेलेले राष्ट्रकूट राजे स्वतःस लत्तलूरपुरविनिर्गत, लत्तलूरपुरपरमेश्वर, लत्तलूरपुरवरेश्वर, लत्तलुरपुरवराधिश्वर इत्यादी बिरूदे गौरवाने लावीत. राष्ट्रकूट राजे साहित्य, नाटयकलेचे उपासक होते. वेरूळचे पाषाण शिल्प त्यांच्याच काळात खोदले गेले. अशा महापराक्रमी राष्ट्रकूट राजांची लत्तलूर (लातूर) ही वतनभूमी होय. याशिवाय निळगुंद शिरूरच्या शिलालेखात 'लत्तलूर', सौदत्तीच्या शिलालेखात 'लत्तलूर', भोजच्या ताम्रपटात

'लत्तनूर', सितावल्दी (सीताबर्डी) येथील शिलालेखात 'लत्तलौर' असे या शहराचे प्राचीन उल्लेख आढळतात.

राष्ट्रकूट राजा अमोघवष पहिला हा 'लत्तलूर' या नगरीचा पहिला अधिपती होता. त्यानेच हे शहर वसविले अशी नोंद सापडते. राष्ट्रकूट, चालुक्य आणि यादव काळात एक वैभवसंपन्न अशी ही नगरी होती. याशिवाय औस, उदगीर, किल्लारी अशा काही नगरांनाही प्राचीन वैभवसंपन्न इतिहास आहे. राष्ट्रकूट आणि बदामीच्या काळात औसा ही एक प्रगत नगरी होती. जैन साहित्यात या नगरीचा 'असाई' असा उल्लेख आढळतो, तर काही कागदपत्रांत 'उच्छीव' असाही उल्लेख आढळतो. 'उच्छी' हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ श्रेष्ठ किंवा प्रमुख असा होतो. बदामीच्या चालुक्यंच्य काळात गज्जे-४० हे चाळीस गावांच्या समुहाचे मुख्य केंद्र होते. जिनसेन या आठव्या शतकातील लेखकाने औसा नगराचा औच्छ असा उल्लेख केला आहे. जैनमुनी कनकामर रचित 'करकण्डचरियु' या ग्रंथात 'असाई नगरी' असे नाव आढळते. यादवांच्या सैन्याची छावणीही (बिड) तिथे होती. जैन धर्माचे पीठही होते. येथील किल्ल्याचे बांधकाम बहमनी काळात झाले. निजामशाहीच्या पडत्या काळात मलिक अंबर याने हा किल्ला जिंकून त्याची डागडुजी केली होती. 'उच्छी' हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ श्रेष्ठ किंवा प्रमुख असा होतो.

लातूर शहरात जैनांचे वास्तव्य होते. सम्राट अमोघवर्ष (इ.स.८१४ ते ८८०) हा धर्मनिष्ठ जैन राजा होता. जैन धर्माला राजाश्रय मिळाल्यामुळे अनेक मठ-मंदिरे या परिसरात उभारली गेली. श्री.मूलनायक १००८ चिंतामणी पार्श्वनाथाचे मंदिर, जैन गल्लीतील दिगंबर जैन मंदिर, भगवान शांतीनाथाची सात फूट उंचीची मूर्ती याची साक्ष आहे. लातूर येथील दिगंबर जैन मंदिरामध्ये भट्टारक परंपरा जुनी आहे. जनार्दन नावाचे कवी या भट्टारक परंपरेतील असून ते भट्टारक चंद्रकीर्ती यांचे शिष्य होते. त्यांनी श्रेणिक पुराण हा चाळीस अध्यायांचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात जैन व जैनेतर मराठी वाङ्मयाचा लेखकाचा असलेला अभ्यास व्यक्त होतो. चतुर्थांचे भट्टारक जीनसेन हे सेतवाल जैनांचे भट्टारक विशालकीर्ती म्हणून ओळखले जातात. हे भट्टारक पीठ विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात विराम पावले.

लातूर शहरात लिंगायत समाज मोठया प्रमाणात आहे. शिवभक्त असलेला हा समाज 'चौदा घर' व 'पाचशे घर' या दोन मठांना खूप मानतो. या मठांची स्थापना नेमकी

केव्हा झाली हे सांगता येणे अवघड आहे. पण या दोन्ही मठांत भाद्रपद वद्य पक्षात भव्य स्वरूपात सप्ताह साजरे होतात. चौदा घर मठात होणारा उत्सव झंगिन्नप्पा महाराज व सिद्धमलस्वामी यांच्या नावाने साजरा होतो. लातूरमध्ये दुसरा मठ पाचशे घर या नावाने प्रसिद्ध असून येथेही शिवमंदिर आहे. मन्मथ स्वामींच्या मूर्तीची स्थापनाही या मठात केली आहे.

## लातूर जिल्हयातील वाङ्मयीन पंरपरा-

लातूर नगरीची प्राचीनला शिलालेख-ताम्रपटांद्वारा पौराणिक ठरते. ही परंपरा विविध साधनांनी परिपूर्ण आहे. आधार वाङ्मयात हस्तलिखिताचा क्रमांक पहिला ठरतो. या संदर्भात लातूर जिल्हयात साधारणतः संस्कृत आणि मराठी हस्तलिखिते पाच हजारांपर्यंत प्राप्त होतील. या संदर्भात विविध प्रयत्नांचा, संग्रहांचा आढावा घेतला जाणार आहे. हा आढावा सर्व धर्म-संप्रदाय आणि पंथांचा आहे. यात वैदिक संस्कृतिचा प्रभाव दिसून येतो. पण हा आढावा परिपूर्ण आहे असे नाही.

मागील काळात प्रत्येक गावी पोथी-ग्रंथ वाचनाची परंपरा होती. यात एकाने मूळ ओवी वाचावी आणि दुसऱ्याने त्याचा भावार्थ विवरणात्मक पद्धतीने विषद करावा-सांगावा. यात श्रीधर स्वामीकृत हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, महिपतीकृत भक्तीविजय, भक्ती लिलामृत आदी ओवीबद्ध ग्रंथ मिळून ही परंपरा चालू होती. सध्या कालमानानुसार ती लोप पावत आहे.

ज्याला क्षरण किंवा झीज नाही ते अक्षर, ही परंपरा वेदकाळापासून सुरू झाली. प्राचीन भारतीय साहित्यात अक्षरांचा उपयोग सुरू झाला. या काळात लेखनासाठी भूर्जपत्रे आणि ताडपत्रे यांचा उपयोग होत असे. नंतर सुधारणा होऊन स्थिर स्वरूपात असणाऱ्या, चिरकाल टिकणाऱ्या ताम्रपटांचा उपयोग होऊ लागला. नंतरच्या काळात राजा अशोकाचे

प्रस्तरलेख पाषाणावर कोरलेले दिसू लागले. नंतर प्रगती होऊन बऱ्याच कालांतराने कागदाचा शोध लागून त्याचा प्रसार झाल्यावर, बहुतेक सर्व लेखन कागदावर होऊ लागले. नवीन सुधारणा होऊन मुद्रणकलेचा शोध लागताच लेखनकलेचा प्रचंड प्रसार झाला.

## संत परंपरा-

लातूर जिल्हयाला संतपरंपराही उल्लेखनहीय आहे. या परंपरेत लेखन-काव्यादि साहित्य निर्माण करणारे संतही आहेत. निलंगा तालुक्यातील कासार-शिरसी येथे चौदाच्या शतकाच्या अखेरीस असलेल्या नागेश संप्रदायातील अलमखान नावाच्या एका मुसलमान कवीचा उल्लेख आढळतो. त्याची काही पदे आज उपलब्ध आहेत. नागेश लीलामृताच्या ३९ व्या अभ्यासात या संताचा संदर्भ येतो. त्यांची समाधी निलंगा तालुक्यात जाजम मुगळी येथे आहे.

**विठ्ठलशास्त्री :** विठ्ठलशास्त्री चाकूरकर उर्फ चुडामणीसुत या सत्पुरूषाची जन्मभूमी चाकूर तालुक्यातील चाकूर हे गाव असून त्यांचा जन्म शके १७३२ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव चुडामणी. दुर्दैवाने कुमार वयातच विठ्ठलशास्त्री आई-वडिलांच्या सुखाला पारखे झाले. वनवस संस्थाने मूळ पुरूष श्री.गुरू माधवाचार्य यांनी त्यांचे पुत्रवत पालन केले, अनुग्रह दिला. शास्त्रीबुवा पुराण सांगत, प्रवचन करीत, सरस्वतीची त्यांच्यावर पूर्ण कृपा होती. ते कीर्तन-प्रवचनात स्वतःच्याच काव्याचा वापर करीत. संसाराविषयी त्यांनी केलेले चिंतन महत्वपूर्ण आहे.

**गणेशनाथ महाराज :** हे शिवकालीन कवी होते. त्यांच्या काही स्फूट कवितांचे संकलन डॉ.प्रभाकर मांडे यांनी केले. त्यांचा 'गोरक्षबोध' हा १८०० ओव्यांचा अपूर्ण ग्रंथ आज उपलब्ध आहे. त्यात नाथसंप्रदायाचे सोप्या भाषेत विवरण आहे.

शामात्मज रामचंद्र : उद्धव चिद्घनाच्या परंपरेत शामात्मज रामचंद्र हे सत्पुरूष होऊन गेले. यांचा मठ उदगीर तालुक्यातील वाढोणा या गावी आहे. त्यांनी लिहिलेला 'हरिपाठ' सन १९३६ साली प्रकाशित झाला अशी नोंद सापडते. यांची बरीच रचना अप्रकाशित आहे.

आनंदमूर्ती वा आनंदस्वामी : हे रामदासी संप्रदायाचे असून त्यांची समाधी आणि मठ निलंग्यास आहे. सतराव्या शतकातील या संताने बरीच पद्य रचना केली. पण ती अद्याप ग्रंथबद्ध झालेली नाही. स्वप्न मंदोदरी, हनुमंत जन्म आणि काही पदे आजही लोकांच्या ओठावर आहेत. त्यांची कविता रसाळ आहे.

**सेलूकर महाराज :** हजारो वर्षांपासून या देशात प्रचलित असलेली यज्ञपरंपरा रंगनाथ कृष्ण सेलूकर दीक्षित यांनी जनमानसात रूजविली. ते एक श्रेष्ठ सोमयागी यज्ञ पुरूष होते. पाश्चिमात्य राष्ट्रातील अनेक अभ्यासकांनी त्यांच्या यज्ञ सोहळयात उपस्थित राहून यज्ञ संस्थेचा अीयास केला. अशा सत्पुरूषाची औसा तालुक्यातील सेलू ही जन्मभूमी होती. वडील सद्‌गुरू कृष्ण दीक्षित यांच्या बरोबर त्यांनी भारत भ्रमण केले.

**साखरे महाराज :** 'स्वस्तिश्री' या सांस्कृतिक मराठी मासिकाचे संस्थापक व संपादक गुरूवर्य किसन महाराज साखरे यांचा जन्म सन १९४० साली निलंगा तालुक्यातील पानचिंचोली या गावी झाला. संत साहित्याचे गाढे अभ्यासक असलेल्या साखरे महाराजांचे भाषेवर कमालीचे प्रभुत्व आहे. कीर्तन-प्रवचनातून ते गेली चाळीस वर्षे समाजप्रबोधन करीत आहेत.

**शंकरलिंग स्वामी :** उदगीर शहराच्या मध्यभागी यांचा मठ आहे. शंकरलिंग स्वामी वारकरी संप्रदायाचे अनुयायी होते. तेथे देगलूरच्या गुंडा महाराजांची गुरू परंपरा मानली जाते. संत तुकाराम महाराजांकडून शंकरलिंग स्वामींच्या आजोबांना दृष्टांत झाल्याची दंतकथा आहे. सध्या मठाधिपती असलेले श्री.आडय्या स्वामी हे शंकरलिंग स्वामींचे नातू होत. शंकरलिंग स्वामींची यात्रा प्रतिवर्षी मार्गशीर्ष शु.१० रोजी भरते.

**वीरनाथ महाराज :** यांचा जन्म निलंगा येथे शके १६९२ मध्ये एका शैव कुटुंबात झाला. तथापि, त्यांचा ओढा मात्र विठ्ठल भक्तीकडे होता. ते दरवर्षी पंढरपूर यात्रा करीत. पुढे त्यांनी वारकरी पंथाचे अनुयायित्व स्वीकारून वीरशैव व वारकरी संप्रदायाचा समन्वय घडवून आणणाऱ्या लिंगायत-वारकरी संप्रदायाची स्थापना केली.

**विरूपाक्ष शेटे (१८७०-१९४१) :** हे मूळ निलंग्याचे असले तरी त्यांचे वास्तव्य सोलापूर येथेच होते. त्यांना 'शरण साहित्याचा' चा उत्तम परिचय असल्याने त्यांनी महात्मा बसवेश्वर व सिद्धरामेश्वर यांच्यावर बरेच अभंग लिहिले आहेत. त्यातील बरेच कथात्मक आहेत. त्यांची ही अभंग गाथा त्यांनी इ.स. १९२५ मध्ये सोलापूरहून प्रकाशित केली होती.

**भावंडीबाई (१८८८-१९५५) :** या पहिल्या वीरशैव कवयित्री होत. यांचे ४६० अभंग गुरुगाथांसमवेत (भाग-२) प्रसिद्ध झाले आहेत. स्त्री जीवनाचे दाहक चित्रण त्यांच्या अभंगात आढळते.

**काशीनाथ हवा (१८५७-१९४०) :** यांनी 'मल्लेश्वर मुद्रिके' त १,००० अभंग लिहिले आहेत. त्यापैकी ४५० अभंग अद्याप अप्रकाशित आहेत. त्यांनी अष्टक, पाळणे व आरत्याही लिहिल्या. ते हावगी स्वामी मठाचे मानकरी शिष्य होते.

शिवलिंग शिवाचार्य महाराज : यांनी हिमालयातील तपश्चर्येनंतर येथे जाऊन प्रथम शिवपाठ, आगमोक्त शिवार्चन पद्धती ही पुस्तके लिहून धर्मप्रचार सुरू केला. त्यांनी अनेक संतांच्या गाथांचे संपादन व प्रकाशन केले आहे.

**शांतितीर्थ संगय्या स्वामी-चाकूरकर :** यांनी मन्मथ स्वामींची गुरूगीता संपादित करून इ.स.१९७३ मध्ये प्रसिद्ध केली. अलिकडेच त्यांनी श्री.काशीजगद्‌गुरू विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठाच्या 'वीरशैव सिद्धांत प्रवीण' परीक्षेसाठी 'वीरशैवांची स्फूट कविता' या पुस्तकाचे संपादन केले आहे.

**चन्ना वारद (१८६५-१९३७) :** हे मूळचे नळेगावचे होत. व्यापारनिमित्त ते लातूरला आले. लातूर येथे पाचशेघर मठात शिवभजन परंपरा रूढ होती. चन्ना वारद यांना मन्मथ स्वामी परंपरेतील संतांच्या अभंगांचा परिचय होता.

## संगीत-

मराठवाडा विभाग ललित कलांच्या दृष्टीन प्राचीन काळात अतिशय संपन्न होता; किंबहुना साहित्य, संगीत, शिल्प, नाटय आदी ललित कलांचे पीठ म्हणूनही या विभागाचा गत इतिहास उज्जवल स्वरूपाचा आहे. अशा कलांची थोर परंपरा मराठवाडा विभागाला लाभलेली आहे. मानवी जीवन अधिक सुसंस्कृत करण्याच्या दृष्टीने ललित कलांचे माध्यम केवळ उपयुक्तच नव्हे, तर अत्यावश्यक आहे. देवगिरीचा राजा रामदेवराय यादव याचा कालखंड संगीत कलेचया दृष्टीने अतिशय संपन्न होता. त्याची राजधानी असलेल्या देवगिरी शहराचे सांस्कृतिक वैभव मोठे होते, तर पैठण आणि अंबाजोगाई ही नगरे सांस्कृतिक आणि कलात्मक दृष्टीन संपन्न होती. रामदेवराव यादव यांच्या पदरी श्रेष्ठ संगीतकार आणि अभिजात गायक-कलावंत गोपाल नायक आपल्या दीडशे गायक-वादक कलावंतासह आश्रयास होता. राजा रामदेवराव याचे वडील कृष्णदेवराव यांच्या पदरीही संगीत कलाशास्त्रातला आद्य संगीतकार व "संगीत रत्नाकर" या महत्वपूर्ण ग्रंथाचा लेखक संगीतज्ञ शारंगदेव देवगिरीस होता. संगीताला राजाश्रय मिळाल्यामुळे राज्यभर, प्रामुख्याने

मराठवाडाभर संगीताचा प्रचार व प्रसार अधिक गतीने झाला. हिंदुस्थान ख्यालगायकीचा शुभारंभच इथे झाला. संगीताच्या प्रांतात अनेकांनी आपले अस्तित्व सिद्ध केलं. अंबाजोगाईचे सर्वज्ञ दासोपंत यांचा संगीत क्षेत्रात फार मोठा दबदबा होता.

## वृत्तपत्रे व पत्रकारिता-

भारतीय स्वातंत्र्यापूर्वी लातूरसह मराठवाडयातील अन्य जिल्हे निजामी राजवटीखाली हैद्राबाद संस्थानात समाविष्ट असल्याने वृत्तपत्र व्यवसाय व पत्रकारितेच्या इतिहासाचा जिल्हानिहाय स्वतंत्ररित्या वेध घेता येत नाही. असा वेध हैद्राबाद संस्थानाच्या भारतीय संघराज्यातील विलीनीकरणानंतरच घेता येतो. तोपर्यंत मराठवाडा हा भूभाग नजरेसमोर ठेवूनच वृत्तपत्र व्यवसायाच्या इतिहासाचा मागोवा घ्यावा लागतो. त्यामुळे लातूर जिल्हयालाही भारतीय स्वातंत्र्यापर्यंत वृत्तपत्र व पत्रकारितेचा स्वतंत्र इतिहास नाही. त्यानंतरच इतिहास मात्र उज्जवल आहे. आजच्या मराठवाडा विभागातील मराठी वा अन्य भाषिक पत्रव्यवसायाचा इतिहास फार जुना नाही. मराठवाडयातील आजचे जिल्हे जुन्या हैद्राबाद संस्थानात होते. हे मराठी भाषिक जिल्हे हे खुद्द हैद्राबाद शहरातही मराठी भाषिकांची संख्या मोठी आहे; पण लेव्हा उर्दूचा पराकाष्ठेचा वरचष्मा असल्याने, मराठी शिक्षण मिळणेही दुरापास्त असे. यामुळे वृत्तपत्र काढण्यास परवानगी मिळणे दुष्करच होते. हैद्राबाद संस्थानात १८६४ साली इंग्रजी व १८७८ साली उर्दू वर्तमानपत्रे निघाली; पण मराठी वृत्तपत्र निघण्यास आणखी काळ जावा लागला. प्रामुख्याने राज्य पुर्नरचनेनंतर तो प्रदेश इतर मराठी भाषिकांशी निगडित झाला तेव्हाच साधारणतः ही वृत्तपत्रे निघू लागली. 'औरंगाबाद समाचार' नावाचे एक वृत्तपत्र इ.स.१८८३ मध्ये सुरू होते. हे पत्र १८८२ च्या अखेरपासून प्रसिद्ध होऊ लागले असावे. त शिळाप्रेसवर छापले जाई. आजच्या लातूरमध्येही हे पत्र उपलब्ध असे.

**उदगीर** (ता.मुख्यालय, १८° ४५' उ., ७६° ४५' पू.) : मध्ययुगीन कालखंडामध्ये विकसित झालेल्या स्थानांना प्राचीन- ऐतिहासिक वारसा असून अशा स्थानांमध्ये उदगीर व औसा या प्राचीन नगरांचा समावेश होतो. सध्या लातूरनंतर दुसरी बाजारपेठ म्हणून उदगीर हे नगर ख्यात आहे. या शहराची वसाहत कोणत्याही मार्गाने जवळ येईपर्यंत दिसत नाही. उत्तर

दिशेव्यतिरिक्त सर्व दिशांना टेकडया आहेत. त्यामुळे शहराचे संरक्षणाच्या दृष्टीने असलेले भौगोलिक स्थान शहराच्या नैसर्गिक सौंदर्यात महत्वाची भूमिका पार पाडते. उदगीर शहर व परिसराच्या ऐतिहासिकतेचा पुढीलप्रमाणे परामर्श घेता येईल.

**नगर रचना :** नगररचनेच्या दृष्टीने विचार करता उपलब्ध पुरातत्वीय पुरावे. वास्तु अवशेष व अभिलेख यांच्या विस्तृत सर्वेक्षणानंतर उदगीर हे मध्ययुगीन अन्य नगरांसारखेच एक नगर असेल. तरी त्याचे स्वत:चे वेगळे अस्तित्व असल्याचे जाणवते. आज उभ्या असलेल्या काही मध्ययुगीन वास्तुंवरून हे नगर इस्लामिक राज्यकर्त्यांनी विकसित केल्याचे लक्षात येते. मध्ययुगीन शहर रचनेचा नमुना म्हणून याच्याकडे पाहता येईल. प्रामुख्याने बहमनी व त्यांच्या विविध शाह्या व पुढे मुघल कालखंडामध्ये याचा विकास झाला. आज आदर्श शहर रचनेची वैशिष्टये येथे पहावयास मिळतात. येथील नगर रचनेमध्ये प्रकर्षाने लक्षात येणारी गोष्ट म्हणजे नगराच्या सुरक्षिततेसाठी असलेली तटबंदी होय.

**उदगीरचा किल्ल्याचा इतिहास :** उदगरी येथे असलेल्या भुईकोट किल्ल्यामुळे हे शहर प्रसिद्ध आहे. जिल्हा मुख्यालयापासून ६५ कि.मी. अंतरावर असलेला हा किल्ला इ.स.१९९३ च्या भूकंपात क्षतिग्रस्त झालेला आहे.

हा किल्ला कधी व कोणाच्या राजवटीत बांधला गेला याची अद्याप निश्चिती झालेली नाही. इ.स.१४९३ च्या सुमारास बहमनी काळात हा किल्ला बांधला गेला. असा एक विचार प्रवाह आहे. कदाचित यादव राजवटीत उगीर किल्ल्याचा पाया घातला गेला असावा.

**लातूर** (जिल्हा व तालुका मुख्यालय, १८° २०' उ., ७६° ३०' पू.) **:** या ग्रंथात अन्यत्र या जिल्हयाच्या नवनिर्मितीसंबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे.

**इतिहास-**

मांजरा व तावरजा नद्यांच्या खोऱ्यामध्ये हे प्राचीन नगर वसलेले आहे. या नगराच्या पूर्व व उत्तरेस मांजरा नदीचे व दक्षिणेस तावरजा नदीचे सुपीक खोरे आहे.

या नगरीची प्राचीनता स्पष्ट करणारे पुरावे इ.स. च्या ६ व्या शतकापासून १४ व्या शतकापर्यंत उपलबध आहे. ही नगरी सातवाहन काळापासून सर्वश्रृत आहे. लातूर हे ग्रामनाम राष्ट्रकूट काळात राष्ट्रकुटांच्या शिलालेख-ताम्रपटांत रट्टनौर (रट्टांचे पूर) या नावाने उल्लेखित होते. याचे प्राचीन संदर्भ कन्नड, संस्कृत व मराठी शिलालेखांमधूनही प्राप्त होतात. हे शिलालेख कासारशिरसी, गणेशवाडी (ता.निलंगा), लातूर, औसा, रेणापुर, चाकूर, कानेगाव (ता.उदगीर), बोरगाव, आलमला, हिपरसोगा (ता.औसा), सुगाव, शिरूर ताजबंद (ता.अहमदपूर) वगैरे ठिकाणी प्राप्त झालेले आहेत. निळगुंद, शिरूर तसेच इट्टगी, सौदत्ती, मंटूर येथील शिलालेखात लातूरचे प्राचीन नाव 'लत्तलूर' असे नोंदलेले आहे.

**लातूर पेठेची वैशिष्टपूर्ण रचना-**

पन्नास वर्षापूर्वीचे लातूर शहर व सध्याचे विकसनशील लातूर शहर यांच्या तुलनेत फार मोठा फरक आहे. भविष्यात लातूर शहराचा विस्तार वाढणार आहे याची येथील बऱ्याच जाणकारांना कल्पना असावी. म्हणूनच भविष्यातील लातूर शहराचा विकास व विस्तार नजरेसमोर ठेवून निजामी राजवटीतील गुलबर्ग्याचे तत्कालिन सुभेदार (आयुक्त) राजा इंद्रकर्ण यांच्या हस्ते लातूर बाजारपेठेचा समावेश असलेल्या आझमजंग विभागाच्या निर्मितीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. यातील वैशिष्ट्यपूर्ण अशा गुंजगोलाईचा नगर रचनाकार श्री.फैय्याजुद्दीन साहेब यांनी सन १९४६ मध्ये आराखडा तयार केला. या आराखडयात गंजगोलाईची रचना करण्यात आली. त्यामुळे गंजगोलाईची वास्तू व तिच्याभोवती सर्व दिशांनी येऊन मिळणारे बारा रस्ते ही रचना सूर्य व त्यापासून निघणाऱ्या सूर्यकिरणांसारखी भासते. शहराच्या सौंदर्यात अभूतपूर्व अशी भर टाकणारी अशी वैशिष्टयपूर्ण रचना महाराष्ट्रात क्वचितच आढळेल. याच गंजगोलाईच्या परिसरात असणाऱ्या बाजारपेठेचा महाराष्ट्रातील काही अग्रगण्य बाजारपेठांमध्ये समावेश होतो.

**बुद्धविहार :** शहरात बोधेनगर येथे नव्याने एका बुद्धविहाराची निर्मिती करण्यात आलेली आहे. एका प्रशस्त जागी एक कृत्रिम टेकडी तयार करून त्यावर पद्मासनात ध्यानस्थ अवस्थेतील विशाल बुद्धमूर्ती साकारण्यात आलेली आहे. या मूर्तीची शांत व प्रसन्न मुद्रा दर्शकावर निश्चितच परिणाम करते. येथील बुद्धविहारात प्रवेश केल्यावर एका गुहेत गेल्याचा भास होतो. या विहारात पहुडलेल्या अवस्थेत साधारणतः ५.४८ मी. लांबीची विशाल बुद्धमूर्ती आहे.

**मुस्लिम प्रार्थनास्थळे :** लातूर नगरीत मुस्लिम धर्मियांच्या ११ मशीदी, ४ दर्गे व एक इदगाह आहे. ईदगाह या ठिकाणी मुस्लिम बांधव ईदच्या दिवशी सामुहिक नमाज पढतात. मसिजद व ईदगाह या ठिकाणी केवळ मुस्लिमच जात असले तरी दर्ग्यात हिंदूही लोक जातात व

पिरास भजतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे येथील हजरत सुरतशहावलीचा दर्गा होय. या दर्ग्याच्या उरूसात वरील दोन्ही धर्माचे लोक सहभागी होतात. हजरत सुरतशहावलीच्या यात्रेतही सर्वधर्मीय लोक पहावयास मिळतात.

**जैनधर्मीय प्रार्थनास्थळे :** लातूर-उस्मानाबाद जिल्हयात दक्षिण भारताप्रमाणे जैन धर्माचा प्रभाव प्राचीन काळापासून आहे. विशेषतः राष्ट्रकूट काळात वेरूळ, कंधार, धारूर प्रमाणेच लातूर (लत्तलूर) या स्थानांचा विकास झाला. तसेच जैन धर्मालाही प्रोत्साहन मिळाले. परिणामी येथील जैन परंपरा किमान दहाव्या शतकापर्यंत मागे जाते.

**श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिन :** लातूर नगरीतील ऐतिहासिक देवस्थानांमध्ये या मंदिराचा समावेश होतो. यामुळे लातूरमध्ये जैन संस्कृतिही प्राचीन काळापासून असल्याचे सिद्ध होते. हे मंदिर किंवा देवस्थान जैन गल्ली येथे आहे. या मंदिराच्या भुयारातील मूलनायक पार्श्वनाथाची १.२१ मी. उंचीची पद्मासनातील ध्यानमग्न अवस्थेतील मूर्ती रेखीव व कलापूर्ण आहे. ही मूर्ती भव्य आणि अप्रतिम असून तिच्या डोक्यावर सप्तफणी नागफण आहे. ही मूर्ती राष्ट्रकूट उत्तरकालीन असावी. या मूर्तीच्या डाव्या बाजूस २४ तीर्थकरांच्या मूर्ती आहेत, तर उजव्या बाजूस श्री सुपार्श्वनाथ भगवानची काळया पाषाणातील मात्र अलिकडील काळातील मूर्ती आहे. या मंदिरातील हे सर्वात अप्रतिम व प्रमुख शिल्प होय.

**रत्नेश्वर मंदिर :** सिद्धेश्वर मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूस मंदिर आवारातच हे छोटेसे दगडी मंदिर आहे. यास केवळ गर्भगृह असून त्यास पारंपारिक आकारापेक्षा मोठया आकाराचे शिवलिंग आहे. गर्भगृहाच्या द्वारशाखा कोरीव असून द्वारशाखांच्या दोनही बाजूस कोपऱ्यांवर द्विमुखी चार नंदी प्रतिष्ठापित केलेले आहेत.

**पापविनाशक भुतेश्वर मंदिर :** या मंदिरात असलेल्या शके १०४९ (इ.स.११२८) च्या शिलालेखातील उल्लेखावरून हे मंदिर चालुक्यकालीन असावे व हा काळा चालुक्य नृपति सोमेश्वर तिसरा याचा असल्याने बहुधा ते त्यानेच बांधले असावे. रत्नपूर माहात्म्यात या मंदिराचा उल्लेख असून भुलेश्वर स्तुती किंवा माहात्म्यही त्यात सांगितले आहे.

**अष्टविनायक मंदिर :** शहराच्या शिवनगर भागातील हे आधुनिक स्थापत्य-शैलीतील आकर्षक मंदिर आकाराने अष्टकोनी आहे. मंदिर बांधकामात संगमरवराचा कलात्मकरित्या मुक्तहस्ते वापर केलेला आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळच चौरसाकृती मुखमंडप किंवा गणेशमंडप आहे. त्यावर सुंदर व लक्षवेधक लघुशिखर असून त्यात गणेशमूर्ती स्थापित केली आहे.

## २.५ <u>*संदर्भ*</u> : -


१. डॉ. सारडा सुभाषचंद्र, 'महाराष्ट्राचा भुगोल', विद्या प्रकाशन, वर्ष-१९९७ पान नं.१०.
२. लातूर गॅझेटर २००५-०६, भौगोलिक माहिती संदर्भ, पान नं.३५.
३. महाराष्ट्र राज्य इतिहास संशोधन मंडळ व पाठयपुस्तक निर्मिती विभाग, पुणे, वार्षिक अंक २००५-०६, पान नं.२३, दुसरा परिच्छेद.
४. लातूर जिल्हयाचा इतिहास, (इतिहास विभाग, बसवेश्वर महाविद्यालय, लातूर, संशोधन अहवाल- 'लातूर शहराचा इतिहास', पान नं. ११४.
५. बसवेश्वर महाविद्यालय, लातूर, समाज प्रबोधन पत्रिका १९७८, दुर्मिळ ऐतिहासिक पत्रे, पान नं.११४.
६. मुंदडा संजय - 'संशोधक', डिसेंबर २००७, पान नं.३४, दुसरा परिच्छेद. 'परंपरा'.
७. Mathur P. C., 'Social base of Indian politics', Aalekh Publisher, year- 1998, P.P.67, Paragraph- Middleclass.
८. पळशीकर सुहास व बिरमल नितीन, 'महाराष्ट्राचे राजकारण प्रक्रियेचे राजकीय स्थानिक संदर्भ -२००४:२२८
९. गडाख यशवंतराव 'अर्धविराम' जिल्हा राजकीय माहिती, वर्ष- २००३, दुसरा खंड, पान नं.११४.
१०. विखे पद्‌मश्री 'लढत' वर्ष-२००१, दुसरा खंड, पान नं.१४.
११. लिमये मधु, 'समकालिन राजनीति', आरक्षण और सामाजिकता, पान नं.११४ व ११५.
१२. काळे शंकरराव, विशेषांक सकाळ, ऑक्टो. २००५.
१३. समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टो.-डिसें. २००७, लेख- लातूर जिल्हयातील 'गटबाजी', एक समुदायलक्षी दृष्टीकोन, पान नं.१४१.
१४. विशेषांक सकाळ, जानेवारी २००७. 'सहकारी राजकारण', पान नं.१४.
१५. गोखले पु. मा., 'कॉंग्रेस पक्ष', कॉंग्रेसचे नेत्तृत्व दुसरा परिच्छेद, लोखंडे प्रकाशन, वर्षे-१९९४, पान नं.६७.
१६. थोरात भाऊसाहेब, अमृतगाथा, दुसरे खंड, वर्ष- १९९९, पान नं.११७.
१७. पै.बॅं.नाथ, 'लोकशाहीची आराधना', साधना प्रकाशन, पुणे-३०, वर्ष-१९७२, पान नं.११६.

***प्रकरण-३***

# *राजकीय सहभागाची संकल्पना*


| | | पान नंबर |
|---|---|---|
| | प्रास्ताविक | ६४ |
| ३.१ | भारतीय लोकशाहीचा उगम | ६७ |
| ३.२ | राजकीय सहभागाचे महत्व | ६८ |
| ३.३ | राजकीय सहभागाचे माध्यमे | ६९ |
| ३.४ | राजकीय सहभागाच्या पातळया | ७४ |
| ३.५ | संदर्भ सूची | ७९ |

## प्रकरण-३

# राजकीय सहभागाची संकल्पना

## प्रस्तावना -

प्रत्येक व्यक्तीला दैनंदीन जीवनातील गरजांच्या पुर्तीसाठी अनेक व्यक्तीवर अवलंबून राहावे लागते. त्यासाठी कधी सहकार्य तर कधी संघर्ष करावा लागतो. यातूनच समाजजीवन अस्तित्वात येते. व्यक्तीचा समाज जीवनातील सर्वच सहभाग हा राजकीय सहभाग नसतो. समाज जीवनाची जी विविध अंगे असतात. त्यापैकी राज्यसंस्था व शासनसंस्था यांच्याशी निगडीत असे जे राजकीय अंग असते. त्यातील सहभाग म्हणजे राजकीय सहभाग असतो. सार्वजनिक जीवनाच्या राजकीय भागांशी संबंधित अशा वर्तणुकीचा राजकीय सहभागात अंर्तभाव करता येतो. उदा. विधिमंडळ, मंत्रीमंडळ, राजकीय पक्ष, निवडणूका, निदर्शने व चळवळी इत्यादी मधील सहभाग हा राजकीय सहभाग म्हणता येईल.

काही वेळा बिगर राजकीय क्षेत्रातील संस्था जेव्हा राजकीय निर्णयावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा त्या संस्थाच्या माध्यमातून व्यक्ती राजकीय सहभाग घेत असते. मात्र असा सहभाग हा अपवादात्मक असतो. म्हणून राजकीय सहभागाचा अर्थ पाहतांना सार्वजनिक जीवनाच्या राजकीय भागाशी व्यक्तीचा जो संबंध येतो. त्याचा विचार आवश्यक ठरतो. कूटुंबात किंवा मंत्री मंडळात व्यक्ती जेव्हा एखाद्या शासकीय निर्णयावर चर्चा करते. तेव्हा, ती व्यक्ती राजकीय भागांवर चर्चा करत असते. म्हणून ती चर्चा राजकीय चर्चा असते व राजकीय सहभागाचाच तो एक प्रकार असतो.

ग्रीक नगर राज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती त्यावेळी सर्व पात्र नागरीक राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभागी होत असत. राज्य कारभारातील व्यक्तींचा सहभाग हे एक तिचे कर्तव्य जानले जाई. राजकीय पात्रता असणे हि एक विशेष पात्रता मानली जाई. कारण स्त्रिया, गुलाम आणि परकीय व्यक्ती यांना अधिकार नसे[१]. ग्रीक लोकांचे नागरिकत्वा बाबतचे विचार भिन्न होते ॲरिस्टॉटल यांच्या मते ` राज्यात विशिष्ट अधिकार आणि कर्तव्य असलेली व्यक्तीच नागरीक होवू शकेल. त्याच्या मता प्रमाणे गुलाम, शारीरिक कष्ट करणारे नोकर, लहान मुले व परदेशी लोक यांना नागरीक म्हणता येणार नाही. तर राज्यकारभारात जो भाग घेतो तोच नागरीक होय[२].

१९ व २० व्या शतकामध्ये लोकांचा राजकीय सहभाग वाढल्याचे दिसून येते लोकशाही व्यवस्थेमध्ये लोक आपल्या प्रतिनिधी मार्फत राज्यकारभारात भाग घेतात. प्रतिनिधीक लोकशाही आता अनेक देशात स्थिरावली आहे. लोकशाहीच्या विकासा बरोबर राजकीय सहभागाच्या विविध संधी व साधने व्यक्तीस उपलब्ध होत गेली. त्यामुळे राजकीय सहभाग संकल्पनेचा आशय वाढत गेला[३].

राजकीय सहभाग या संकल्पनेचा आशय पहात असतांना लोकशाही व्यवस्थेच्या संदर्भात लोकांचा सहभाग या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. लोकशाहीची वाटचाल कशी झाली, याबाबत इंग्लंडमध्ये लोकशाही व्यवस्थेचा विकास कसा झाला याचा विचार करणे महत्वाचे आहे. कारण इंग्लंडमधील लोकशाही व्यवस्थेला लोकशाहीची जननी मानली जाते. जगामध्ये लोकशाहीचा प्रारंभ व विकास टप्याटप्याने इंग्लंड मध्ये झाला. फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रभाव इंग्लंडवर पडला. त्यावेळी इंग्लड मध्ये अनियंत्रीत राजेशाही होती. शासन व्यवस्थे्त उमराव सरदारांचे प्राबल्य होते. वार्षिक उत्पन्न ४० शिलींग असणाऱ्या व्यक्तिला मतदानाचा अधिकार होता. इंग्लंडचे शासन प्रतिनिधीक नव्हते. तर त्यावर वरिष्ट वर्गाचे प्रभूत्व होते इंग्लंडचे सामर्थ्य, सत्ता, वैभव यांची दुसरी बाजू निराशजनक होती. १८३२ च्या सुधारणा कायदयाने लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मतदानाचा हक्क विस्तृत अशी तरतूद करण्यात आली मध्यमवर्गीय धनिकांना मतदानाचा हक्क मिळाला. त्यामुळे पार्लमेंट जनतेचे प्रतिनिधीगृह बनण्याच्या दृष्टीने सुरुवात झाली.

इंग्लंडमध्ये १८३२ मध्ये कामगारांनी हक्कासाठी चळवळ उभी केली. त्यांनी १८३८ मध्ये आपल्या हक्कांचे निवेदन पार्लमेंटला सादर केले. या निवेदनातील मागण्या पुढील प्रमाणे.

१. सर्वांना मतदानाचा हक्क मिळावा व प्रौढ मतदान पध्दतीचा अवलंब करावा.
२. मतदान पध्दती गुप्त असावी, त्यामुळे मतदार निर्भय पणे मतदान करतील.
३. मतदाना करीता व निवडणुकीला उभे राहणाऱ्यांना संपत्तीची अट असू नये. त्यामुळे गरिबातील व कामगारांना निवडणुकीला उभे राहाता येईल.
४. निवडून आलेल्या सभासदांना मानधन असावे त्यामुळे हे गरिबांचे, मजुरांचे हितसंबंध सांभाळण्याकरीता निवडून जाणे शक्य होईल व पाठीमागे आर्थिक विंवेचणा राहणार नाहीत.

५. पार्लमेंटची निवडणूक सात वर्षाऐवजी दरवर्षी असावी, म्हणजे प्रतिनिधी आपल्या मतदारांना विसरणार नाही, विश्वासघात करणार नाहीत[४].

या कामगारांच्या मागण्या अतिशय महत्वाच्या आहेत. या मागण्यामधून लोकशाही व्यवस्था रुजण्यास ती भक्कम पायावर उभी राहण्यास मदत होणार होती.

मात्र या मागण्या पार्लमेंटने फेटाळल्या. इंग्लंडचा इतिहासामध्ये १९ व्या शतकात लोकशाही चळवळीला जे यश आले. त्याला प्रेरणा देण्याचे काम या चर्टिस्टांच्या चळवळीने केले यामुळे या चळवळीला महत्व आले. कारण त्यानंतर १८६७ चा कायदा, १८८४ चा कायदा, १९११ चा कायदा व १९२८ चा समान मतदान पात्रता कायदा, हे कायदे या चळवळीचे फलित मानले जाते. या कायदयांमुळे टप्याटप्याने इंग्लड मधील लोकशाही व्यवस्थेचा विकास झाला.१९२८ च्या कायदयाने स्त्री-पुरुषांना मतदानाचा समान हक्क मिळाला. इंग्लंड मधील विकासामुळे भारत व इतर लोकशाही व्यवस्था असलेल्या देशांमध्ये लोकशाहीची चळवळ वाढीस लागली व त्याच बरोबर लोकांचा राजकीय सहभाग वाढला गेला.

सार्वजनिक जीवनातील व्यक्तीचा सहभाग हा सहेतुक असतो. शासकिय निर्णयावर प्रभाव टाकण्याच्या हेतूने व्यक्ती राजकारणात सहभागी होते. म्हणून राजकीय किंवा शासकीय निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याच्या हेतूने व्यक्ती राजकारणात सहभागी होते. यालाच राजकीय सहभाग असे म्हणतात.

राजकीय सहभागाबद्दल अनेक विचारवंतांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. त्या संबंधी विविध व्याख्या केलेल्या आहेत. मात्र त्यांचा आशय एकच आहे.

१. **प्रा.मॅक्लोसी यांच्या मते-** "शासकाच्या निवड प्रक्रियेत आणि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या सार्वजनिक धोरण निर्मितीत असलेला लोकांचा ऐच्छिक सहभाग म्हणजे राजकीय सहभाग होय"[५].

२. **प्रा. इस्टन यांच्या मते -** "विशिष्ट प्रदेशात राहणारा समुह जो सार्वजनिक स्वरुपाचे निर्णय घेतो. त्यात लोकांनी घेतलेला सहभाग हा राजकीय सहभाग असतो"[६].

३. **प्रा. आल्मंड आणि पॉवेल -** "राजकीय व्यवस्थेतील निर्णय प्रक्रियेत असलेला लोकांचा सहभाग म्हणजे राजकीय सहभाग होय"[७].

४. **रॉबर्ट ढाल यांच्या मते -** "शासकीय निर्णयात मानसिक दृष्टया गुंतलेला असणे म्हणजे राजकीय सहभाग होय"[८].

राजकीय सहभाग हा मतदाना पुरताच किंवा विधिमंडळातील किंवा मंत्री मंडळातील सहभागा पुरताच मर्यादित नाही. ज्या ज्या वर्तणूक प्रकाराने राजकीय निर्णय प्रक्रियेत व्यक्ती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी होते, तो प्रत्येक वर्तणूक प्रकार राजकीय सहभागच असतो म्हणून मतदानास पात्र नसलेली व्यक्ती ही राजकीय सहभाग घेऊ शकते. प्रामुख्याने सार्वजनिक निवडणुकांत राजकीय पक्षाच्या प्रचार मोहिमेत मतदानास पात्र नसलेल्या अनेक विद्यार्थ्यांचा सहभाग असतो. शाळेमध्येही एखाद्या राजकीय घटनेवर वादविवाद होतात. तेंव्हाही विद्यार्थी त्यात सहभागी होतात. त्याला ही राजकीय सहभाग असेच म्हणावे लागेल.

## ३.१ भारतात लोकशाहीचा उगम -

वैदिक काळ भारतीय वाङ्‌मयामध्ये सर्वात प्राचीन समजला जाणारा ग्रंथ म्हणजे 'वेदग्रंथ' या ग्रंथामधून देखील भारतीय इतिहासातील प्राचीन काळातील राजकीय कार्यप्रणालीचा बोध होतो त्या काळात राजकीय सत्ता, लोकनियुक्त सभाकरता नियुक्त होत असे. 'समिती' या शब्दाचा मुळ अर्थ म्हणजे एकत्र येणे होय. ही समिती म्हणजे सर्व लोकांची राष्ट्रीय विचार सभाच होती. या समितीतील सभासद आलटून पालटून राजनची निवड करीत असे आणि राजा कारभार पाहत असे. सभेस उपस्थित राहणे असा दंडक होता[९].

ऋग्वेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद या ग्रंथामध्ये ही भारतात सार्वभौम राज्ये होती असा उल्लेख आढळतो. समान निती समान ध्येय आणि समान विचार या निश्चयाचा उल्लेख आढळतो.

इ.स. पूर्व ६०० ते इ.स.६०० या १२०० वर्षाच्या काळात राज्याचे दोन भाग पडतात करम (राजधानी)  आणि जनपद (ग्रामीण) नागरी भागाचा कारभार पाहणऱ्यांला 'पौर' असे म्हणत असत.

**प्राचीन भारतीय गणराज्ये -**

प्राचीन काळापासून भारतामध्ये गणराज्ये पध्दत इ.स. चौथ्या शतकापर्यंत अस्तित्वात होती. याबाबत उल्लेख बौध्द, जैन पत्रात, महाकाव्य (संस्कृत) आणि राजनितीपर ग्रंथात आढळतो. ग्रीक व लॅटिन साहित्यात तसेच अलेक्झांडरने केलेल्या स्वाऱ्यांतील वर्णनावरुन या गणराज्यांचा उल्लेख आढळतो. वैदिक काळात तर अनेक गणराज्ये होती. महाभारतात त्याचा उल्लेख 'अभेदय' असा केला जायचा. या गणराज्यांमध्ये समानतेचे तत्व कटाक्षाने पाळले जात असे. ६ व्या ते १३ व्या शतकाच्या दरम्यान स्थानिक स्वायत्तता संपूर्णतः शासन पध्दतीत होती. या स्थनिक शासन पध्दतीने आणि ग्रामीण आपले संघटनात्मक स्वरुप कायम ठेवले होते. भारताच्या उत्तर व दक्षिण भागांमध्ये प्राचीन काळापासून लोकशाही उदयास येऊन पुढे ती भरभराटीला आली.

भारताने इंग्लंडच्या लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला. स्वातंत्र्योत्तर काळात घटनात्मक भारतीय संसंद निर्माण करण्यात आली. आणि लोकशाही विकेंद्रीकरणापासून प्रतिनिधिक सहभाग अस्तित्वात आला.

## ३.२ राजकीय सहभागाचे महत्व -

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांमध्ये प्रतिनिधी लोकशाही चांगलीच स्थिरावली. यामुळे व्यक्तींना राजकीय सहभागाची संधी उपलब्ध होण्यास मदत झाली. त्यामुळे लोकांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण वाढू लागले. आणि प्रतिनिधीक लोकशाही बळकट होण्यास मदत झाली. प्रतिनिधीक लोकशाही स्थिरावली. निवडणुक राजकीय पक्ष, विधीमंडळ, संसद, दबावगट, विविध संघटना आणि संसूचन माध्यम इ. मार्फत लोकांचा राजकीय सहभाग दिसून येऊ लागला.

आधुनिक काळात शासन व्यवस्था महत्वाची मानण्यात येते व व्यक्तींच्या जीवनावर नियंत्रण ठेवण्यासाठी या शासन व्यवस्थे मार्फत निर्णय होत असतात. या व्यवस्थेचे कार्यक्षेत्रही व्यापक स्वरुपाचे होय. या संस्था विषयी उदासीन राहणे हानीकारक होय. यामुळे सहभागाचे महत्व वाढण्यास मदत होत. आणि राजकीय सहभागामुळे लोकमान्यता टिकून आहे याची कल्पना येते.

आधुनिक काळात राज्यसंस्थेचे अधिकार इतके वाढले आहेत. व शासन संस्थेचे कार्यक्षेत्र इतके व्यापक बनले आहे की, व्यक्तीच्या जीवनावर प्रभाव टाकणारे अनेक निर्णय या संस्था घेत असतात. त्यामुळे या संस्थाविषयी उदासीन राहणे व्यक्तीच्या दृष्टीने नुकसानकारक ठरु शकते. त्यामुळे राजकीय सहभागाचे महत्व व्यक्तीच्या दृष्टीने पूर्वीपेक्षा अधिक पटीने वाढले आहे. आधुनिक काळातील बहुतेक सर्वच राजकीय व्यवस्थांनी लोकमत महत्वांचे मानले आहे. लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये राजकीय सहभागाला अनन्य साधारण महत्व आहे. शासन संस्था, राजकीय नेते, राजकीय पक्ष, जनता संसूचन माध्यमे, लोकांना विविध प्रकारची माहिती देवून राजकीय व्यवस्थेत लोकांनी विशिष्ट रितीने सहभागी व्हावे म्हणून प्रयत्नशील असतात. त्यामुळे राजकीय सहभागाचे महत्व लक्षात येते. लोकांच्या राजकीय सहभागामुळे व्यवस्थेची लोकमान्यता किती टिकून आहे याची कल्पना येते.

राजकीय विकास आणि राजकीय आधुनिकीकरण या बाबतीतही राजकीय सहभागाला महत्व प्राप्त झाले आहे. सार्वजनिक स्वरुपाचे प्रश्न आणि गरजा कोणत्या आहेत. व या प्रश्नांपैकी अग्रक्रम कोणत्या प्रश्नांना द्यावा, या विषयी लोकांना जाणीव असते. लोकांमध्ये गरजांच्या अग्रक्रमा बाबत एकमत असणे देशाच्या हिताचे असते. समाजातील उपलब्ध साधन सामग्रीचे वितरण आधिक योग्य रित्या व्हावे. व त्याचा फायदा जास्तीत जास्त लोकांना व्हावा अशी अपेक्षा असते. लोकांच्या या अपेक्षांच्या पुर्ती साठी लोकांनी जागृतपणे निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक असते. त्यामुळे अलीकडील काळात राजकीय सहभाग महत्वाचा ठरत आहे.

थोडक्यात राजकीय सहभागाच्या संदर्भात विचार करता, या बाबतीतही अलीकडील काळात राजकीय सहभागाचे महत्व अधिक वाढले आहे. लोकशाही व्यवस्थेत राजकीय सहभागाची प्रक्रिया हा आवश्यक भाग आहे. त्यामुळे राजकीय सहभागाचा आशय समजावून घेण्यास राजकीय सहभागा विषयक अभ्यास व संशोधन उपयुक्त ठरेल.

## ३.३ राजकीय सहभागाची माध्यमे -

लोकशाही व्यवस्थेत विविध प्रकारची स्वातंत्र्ये मिळालेली असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला तिच्या क्षमतेनुसार व आवडीनुसार विविध प्रकारच्या माध्यमातून राजकीय सहभाग घेता येतो. हुकुमशाही व्यवस्थेत लोकांच्या राजकीय स्वातंत्र्यावर मर्यादा व नियंत्रणे असतात.

त्यामुळे त्यांना ठराविक माध्यमेच उपलब्ध असतात. मात्र लोकशाही व्यवस्थेत व्यक्तीला विविध माध्यमे उपलब्ध असतात. त्यामुळे लोकांना राजकीय सहभागाची आधिक प्रमाणात संधी मिळत असते. राजकीय सहभागाची माध्यमे पुढील प्रमाणे.

**निवडणुका व मतदान -**

लोकशाही व्यवस्थेत ठराविक काळानंतर विविध पातळीवर निवडणुका होतात. बहुमत मिळविणाऱ्या पक्षाला सत्ता मिळते म्हणून निवडणूकीत जास्तीत जास्त लोकांनी मतदान करावे अशी अपेक्षा असते. उमेदवार आणि मतदार अशा दोन भूमिकां मधून व्यक्ती निवडणूक प्रक्रियेत भाग घेत असते. ज्यांना मतदानाचा हक्क मिळालेला असतो. त्यांच्या दृष्टीने हे माध्यम अत्यंत महत्वाचे असते. हे माध्यम आज बहुतेक सर्वच देशांनी स्विकारले आहे. या माध्यमाचा वापर करण्यास व्यक्तीला पैसा खर्च करावा लागत नाही. थोडाच वेळ त्यासाठी द्यावा लागतो असे असुनही हे माध्यम अत्यंत प्रभावी ठरते आहे.

निवडणुकीच्या वेळी मतदानांचे जे प्रमाणे असते. त्यावरुन लोकांचा राजकीय सहभाग किती आहे हे समजते. मतदानातुन लोकांच्या इच्छांची दिशा समजू शकते लोक व्यवस्थेबद्दल, सरकारबद्दल संतुष्ट आहेत किंवा नाही हे समजू शकते. मतदान हे राजकीय सहभागाचे व्यक्तीगत माध्यम आहेत. तसेच सामुदायिक पातळीवरील त्याचा परिणाम हा निर्णायक ठरत असतो. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी स्वतःस अनुकूल असे मतदान करावे. म्हणून राजकीय व्यवस्थेत सर्व राजकीय पक्ष प्रयत्न करीत असतात. कुटुंब शिक्षण, आर्थिक परिस्थिती, सामाजिक स्तरीकरण राजकीय नेतृत्व, महत्वाच्या प्रासंगिक घटना, निवडणुकांतील राजकीय पक्षाची प्रचार शैली, संसुचन माध्यमे इत्यादी विविध घटक मतदान प्रवृत्तीवर प्रभाव पाडताना दिसतात. मतदानाच्या प्रमाणांवरुन राजकीय दृष्टया उदासिन असणाऱ्या व्यक्तीचेही प्रमाण समजून येण्यास मदत होते.

भारतांमध्ये आत्तापर्यंत लोकसभेच्या १३ निवडणुका झाल्या. या निवडणुकां मधील लोकांचा मतदानातील सहभाग पाहता १९९८ च्या १२ व्या लोकसभेसाठी सर्वात कमी म्हणजे ५३ टक्के मतदान झाले तर १९८४ च्या निवडणुकीत सर्वात जास्त म्हणजे ६४ टक्के जास्त मतदान झाले[१०]. भारतामध्ये आत्ता पर्यंतच्या निवडणुकांमधील मतदानातील लोकांचा सहभाग हा साधारणपणे ६० टक्क्याच्या जवळपास आहे. म्हणजे लोक निवडणुकांमध्ये उत्फुर्तपणे

सहभाग घेताना दिसतात. प्रतिनिधीक लोकशाहीच्या सुरवातीच्या काळात मतदानाचा हक्क हा गुणवत्तेच्या विशिष्ट अटी पूर्ण करणाऱ्यांना दिला जात असे. त्यामुळे राजकीय सहभागाचे प्रमाण कमी होते. मतदानाच्या अधिकारात वाढ होत गेली तसे राजकीय सहभागाचे प्रमाणही वाढते गेले. भारतात समाजातील विविध गटांना प्रतिनिधित्व हे त्यांच्या संख्येच्या व आकाराच्या प्रमाणात मिळते. अन्यथा बहुसंख्यांकांचा राजकीय सहभागाचे प्रमाणही वाढत गेले. भारतात समाजातील विविध गटांना प्रतिनिधत्व हे त्यांच्या संख्येच्या व आकाराच्या प्रमाणात मिळते. अन्यथा बहुसंख्याकांचा राजकीय सहभाग नेहमी सर्वाधिक राहून अन्य संख्यांक गटांना प्रतिनिधीत्व मिळणार नाही. म्हणून निवडणुक व मतदान हे राजकीय सहभागाचे सर्वात महत्वाचे माध्यम आहे.

**राजकीय पक्ष -**

आधुनिक काळात राजकीय पक्ष हे राजकीय सहभागाचे महत्वाचे माध्यम आहे. राजकीय पक्षांचे महत्व हे दिवसेंदिवस वाढतच चाललेले आहे.व वाढतच राहणार हे निर्विवाद आहे. १९ व्या शतकात युरोप व अमेरिकेत मतदानाचा अधिकार जसजसा विस्तृत होत गेला. तसतसा राजकीय पक्षांना आकार येत गेला. अमेरिकेत जॉर्ज वॉशिंग्टनने पक्ष पध्दतीचा धिक्कार केला तरी काळाच्या ओघात पक्ष पध्दतीही अनिर्वाय म्हणून स्विकारली गेली. लोकशाहीची यंत्रणा चालविण्यासाठी राजकीय पक्ष साधन म्हणून वापरावे लागतात. संसदीय लोकशाही तर पक्ष संघटनेच्या आधारशीलेवर उभी आहे[११].

देशाच्या विकासाची दिशा, उपलब्ध असणारे पर्याय या विषयी महत्व पूर्ण निर्णय राजकीय पक्ष घेत असतात. समान विचारांच्या व्यक्तींना व नेतृत्वाला एकत्र आणून त्यांच्या कडून विधायक व टिकात्मक कार्य करवून घेण्याचे काम राजकीय पक्ष करीत असतात. समाजामध्ये जे विविध वर्ग. उदा. शेतकरी, कामकरी, दारिद्री, मध्यमवर्ग, श्रीमंत यांच्या प्रश्नाचे स्वरुप देखिल वेगवेगळे असते. या विविध वर्गांना आपले हितसंबध सुरक्षित ठेवण्यासाठी राजकीय पक्षांचा आधार जिव्हाळयाचा वाटत असतो.

राजकीय जीवनात राजकीय पक्ष शिस्त निर्माण करतात एखाद्या राजकीय पक्षाचे सदस्यत्व स्विकारल्या नतंर त्या पक्षाची विचारसरणी, नियमावली प्रमाण मानावी लागते. पक्षीय शिस्तीमुळे मात्र अलीकडे होयबांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राजकारणातून

होणाऱ्या काही फायदयांसाठी आपल्या वैयक्तीक स्वतंत्र्याला तिलांजली दिली जाते. तसेच पक्षाच्या बऱ्या वाईट कार्यक्रमांना पाठिंबा देणे पक्षीय इमानदारीचे लक्षण समजले जाऊ लागले आहे.

राजकीय पक्ष सत्ता मिळविण्यासाठी धडपड करीत असतात त्यासाठी काही तत्व प्रणाली स्विकारतात. ती लोकप्रिय करण्याचा प्रयत्न करतात. राजकीय पक्षाची सत्ता प्राप्त करण्याखेरीज काही उद्दिष्टये असतात. जसे समाजवाद आणणे, भांडवलशाही बळकट करणे, राष्ट्रांचा सर्वांगिण विकास करणे. लोकांचे हितसंबंध असतील त्याप्रमाणे ते राजकीय पक्षांचा आश्रय घेतात. यामुळे लोकांचा राजकीय सहभाग वाढत असतो. राजकीय पक्षांचा सभासद भारतीय कार्यक्रम असतो. याद्वारे लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करुन घेतले जाते. लोकांना संघटीत करुन स्वतःचा प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करीत असल्याने साहजिकच राजकीय सहभागासाठी ते लोकांना प्रवृत्त करतात. राजकीय पक्ष आपल्या विचारसरणीने लोकांना आकर्षित करतात. त्यामुळे ही लोकांचा राजकीय सहभाग वाढत असतो. राजकीय पक्षाचे सभासदत्व, राजकीय पक्षाने आयोजित केलेल्या सभा व प्रचार मोहिमा, चर्चा सत्रे, परिषदा इत्यादी मार्फत काही व्यक्ती राजकीय प्रक्रियेत सहभागी होतात.

भारतामध्ये राजकीय पक्षांच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोक राजकीय प्रक्रियेत सहभागी होतात. अपक्ष उमेदवारापेक्षा राजकीय पक्षाच्या उमेदवाराला प्राधान्य व महत्व आहे. लोक पक्षाच्या उमेदवारांनाच मतदान करताना दिसतात. भारतामध्ये सरुवातीच्या काळात एक प्रबळ पक्ष पध्दती होती. मात्र १९८९ नंतर मतांचे ध्रुवीकरण झालेले दिसते. तसेच प्रादेशिक पक्षांनाही महत्व प्राप्त झाले आहे. प्रादेशिक अस्मिता यामुळे प्रादेशिक पक्षांना महत्वांचे स्थान मिळत आहे. त्यामुळे राष्ट्रीय पक्षांच्या मताचे प्रमाण कमी झाले. परिणामी आघाडयांचे राजकारण सरु झाले.

**दबावगट -**

सत्ता मिळविणे हे दबाव गटांचे ध्येय नसते तर राजकीय व्यवस्थेच्या शासकीय निर्णयावर दबाव गट आपला प्रभाव टाकत असतात. स्वतःच्या हितसंबधाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी दबावगट व्यक्तीस उपयोगी पडतात. दबावगटाच्या कार्यक्रमांना व चळवळीला सर्वतोपरी पाठिंबा देऊन त्या माध्यमा मार्फत व्यक्ती राजकीय निर्णय प्रक्रियेतवर

प्रभाव पाडू शकते. दबावगटाच्या माध्यमांमुळे व्यक्तीस अधिक सुरक्षितता मिळते. त्यामुळे व्यक्ती राजकीय सहभाग घेतांना दबाव गटांच्या किंवा संघटनांचा आधार घेते. निश्चित व धोरणात्मक मार्गदर्शनही दबावगटांकडून मिळत असते. त्यामुळे वैयक्तिक पातळीवरील सहभागा पेक्षा काही वेळा दबावगटांच्या माध्यमातून राजकीय सहभाग हा अधिक प्रभावी ठरु शकतो.

एच झिंगलर यांनी "इंटरेस्ट ग्रुप्स इन अमेरिकन सोसायटी" या पुस्तकात दबाव गटाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. "आपले सदस्य शासनास पाठविण्याची इच्छा नसलेल्या परंतू शासनाच्या निर्णयांना प्रभावीत करण्याची इच्छा असणाऱ्या सुसंघटित समुहाला दबावगट असे म्हणतात" [१२].

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक दबाव गटांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्यानंतरही अनेक संघटनांनी प्रत्यक्ष सत्तेत सहभागी न होता राजकीय पक्षांवर प्रभाव टाकला. अनेक कामगार संघटना संप जाहीर करुन कामगार विषयक शासकीय धोरणांवर प्रभाव पाडतात. महाराष्ट्रामध्ये उद्योगपतींची मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, लायन्स क्लब, श्री.बाबा आढाव यांची संघटना या सारख्या संघटना शासनाच्या निर्णयावर प्रभाव पाडून आपला फायदा मिळवताना दिसतात. पाचव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणी साठी अनेक शासकीय कामगांर संघटना, शिक्षक संघटना यांनी संप करुन आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी सरकारवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते.

**राजकीय चळवळी -**

साधारणतः वसाहती राज्यांमध्ये स्वतंत्र्य प्राप्ती साठी राजकीय चळवळ उभी केली जाते. तर स्वतंत्र्य लोकशाही देशामध्ये शासनाच्या चुकीच्या धोरणा विरुध्द चळवळी केल्या जातात. यासाठी सत्याग्रह, मोर्चा, निदर्शने, संप, हरताळ, बंद, घेराव इत्यादी मार्गाचा अवलंब केला जातो. यामध्ये भाग घेऊन व्यक्ती राजकीय प्रक्रियेत सहभागी होतात. व शासनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात व या चळवळीच्या माध्यमातून लोकांचा सहभाग वाढत असतो.

भारतामध्ये स्वातंत्र्य पूर्व काळात अनेक चळवळी झाल्या.राष्ट्रीय नेत्यांच्या मार्गदर्शना खाली तसेच राजकीय व बिगर राजकीय संघटनांच्या मार्फत लोक चळवळीत भाग घेत असत. या चळवळी मध्ये सामान्य जनता, महिला व मुले यांनीही भाग घेतला. भारताच्या

स्वातंत्र्य लढयाची चळवळ हा एक प्रदीर्घ लढा ठरला. १९२० नंतर गांधीजींनी स्वातंत्र्य लढयाचे नेतृत्व स्विकारल्या नंतर आखिल भारतीय पातळीवरील चळवळीला वेग आला. तसेच त्यानंतर विशेतः महिला वर्ग मोठया प्रमाणात या चळवळीत सामील झाला.

भारतात स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भाषावार प्रांत रचना व्हावी म्हणून अनेक राज्यात चळवळी झाल्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमुळे महाराष्ट्रातील अनेक लोक राजकीय प्रक्रियेत सहभागी झाले. तसेच गोवा मुक्ती संग्रामातील महाराष्ट्रातील जनता सहभागी झाली. अशा चळवळी मधील सहभाग हा उत्स्फुर्त व भावनिक स्वरुपाचा असतो व चळवळीचे माध्यम हे लोकांची राजकीय जागृती वाढविण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी माध्यम आहे.

**विधिमंडळे व मंत्री मंडळे**

विधीमंडळाचे सदस्य किंवा मंत्रीमंडळाचे सदस्यत्व मिळवून व्यक्ती राजकीय सहभाग मिळवू शकतात. मात्र हे माध्यम फार थोडया लोकांना उपलब्ध होते. कारण या मार्फत सहभागाचे प्रमाण हे कमी अधिक प्रमाणात निश्चित केलेले असते. या माध्यमातून जे लोक निवडून येऊ शकतात त्यांना लोकमताचा पाठिंबा असतो. ज्यांच्याकडे विशिष्ट राजकीय कौशल्य व गुणवत्ता असते अशांचाच सहभाग होतो. या माध्यमातून धोरण विषयक निर्णय घेणे, त्यांची अंमलबजावणी करणे यांच्याशी प्रत्यक्ष संबध येत असल्याने या माध्यमातील राजकीय सहभाग अत्यंत महत्वाचा व परिणामकारक असतो. भारतात सर्व घटक राज्यात व केंद्र सरकारमध्ये ही माध्यमे उपलब्ध आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून धोरण विषयक निर्णय घेणे, त्याची अंमलबजावणी करणे यांच्याशी प्रत्यक्ष संबध येत असल्याने या माध्यमातील राजकीय सहभाग अत्यंत महत्वाचा व परिणामकारक असतो. भारतात सर्व घटक राज्यात व केंद्र सरकार मध्ये ही माध्यमे उपलब्ध आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून प्राथमिक स्वरुपात सत्ता मिळवून नंतर विधीमंडळे किंवा संसदेमध्ये लोक प्रतिनिधित्व मिळवताना दिसतात. त्यामध्ये अलीकडे स्त्रियांचे प्रमाण वाढतांना दिसत आहे[१३].

## ३.४ राजकीय सहभागाच्या पातळया -

प्रत्यक्ष राजकीय व्यवस्थे्त अनेक पातळयांवर निर्णय घेतले जातात. राज्य कारभाराच्या सोयीसाठी सत्तेचे विभाग व वाटप केले जाते. त्यामुळे राजकीय सहभागाच्या पातळया निर्माण होतात. त्यांची पदसोपान रचना केली जाते. संघराज्य व्यवस्थेत राष्ट्रीय

पातळी, घटक राज्य पातळी व स्थानिक पातळी अशी उतरंडीची व्यवस्था अस्तित्वात येते. या यंत्रणेतील प्रत्येक पातळीवर राजकीय सहभागच निरनिराळा असू शकतो. साम्यवादी व्यवस्थेत सत्तेचे केंद्रीकरण होते त्यामुळे राजकीय सहभाग हा विशेषतः एकाच पातळीवर अधिक प्रमाणात असतो. मात्र सत्तेचे विकेंद्रीकरण केल्यास राजकीय सहभागाच्या अनेक पातळया अस्तित्वात असतात. भारतात घटकराज्यांनी पंचायतराज व्यवस्था स्विकारली आहे. त्यामुळे ग्रामपंचायत पातळी, तालुका पातळी, जिल्हा पातळी या देखिल राजकीय सहभागाच्या पातळया अस्तित्वात आल्या[१४]. भारतामध्ये या विविध पातळया मधून लोकांचा कमी अधिक प्रमाणात राजकीय सहभाग असतो. ग्रामीण भागातील अथवा खालच्या पातळीवर हा सहभाग स्थानिक स्वराज्य संस्थामुळे व लोकशाही विकेंद्रीकरणामुळे आधिक वाढला आहे. उन्ननेत उच्च पातळी वरील सहभाग कमी आहे. यामध्येही राजकीय सहभागाच्या सर्वच पातळयांवर स्त्रियांचा राजकीय सहभाग हा पुरुषाच्या तुलनेत कमी आहे. भारतामधील राजकीय सहभागाची पाहणी करता असे आढळून येते की, स्त्रियांचा राजकीय सहभाग हा उच्च पातळीवर अतिशय कमी आहे. तसेच आता पर्यंतच्या सर्व पातळयावरील ग्रामपंचायतीच्या मतदानातील सहभाग हा सर्वात जास्त असल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ७३ व्या घटना दुरुस्ती नुसार महिलांसाठी ३३% राखून ठेवल्या आहेत. तसेच या संस्थाची १/३ अध्यक्षपदही महिलांसाठी राखून ठेवण्यात आली आहे. त्यामुळे अलिकडील काळात स्थानिक पातळीवरील स्त्रियांचा सहभाग हा वाढताना दिसत आहे.

राजकीय विचारवंतानी व शास्त्रज्ञांनी राजकीय सहभागाच्या विविध पातळया सांगितल्या आहेत. त्यांनी राजकीय सहभागाच्या पातळयाची मांडणी राजकीय सहभागाच्या प्रकारावरुन आकृतिबध्द केलेली आहे. रॉबर्ट ढाल रुश व अल्शॉप, मिल ब्रॅथ या शास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी राजकीय सहभागाच्या प्रकारावरुन आकृतिबध्द केलेली आहे. रॉबर्ट ढाल, रुश व अल्शॉफ, मिल बॅथ या शास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी राजकीय सहभागाच्या विविध पातळया सांगितल्या आहेत.

रॉबर्ट ढाल यांनी राजकीय सहभागाची कल्पना जास्त व्यापकरित्या मांडली आहे. त्यांनी राजकीय सहभागाचे पुढील प्रकार सांगितले आहे.

१. सत्ताधारी वर्ग.
२. सत्तेसाठी प्रयत्न करणारा वर्ग.

३. राजकारणात स्वारस्य असणारा वर्ग.

४. राजकारणात स्वारस्य नसणारा वर्ग.

श्री. ढाल यांनी उदासिन लोकांचा समावेशही सहभाग प्रक्रियेत केला आहे. कारण अशा स्वारस्य नसणाऱ्या लोकांमुळेही राजकीय प्रक्रियेच्या स्वरुपावर किंवा फलितावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्री. रुश व अल्शॉप यांनी रॉबर्ट यांच्या उदासीन वर्गाचा उल्लेख करुन त्या उदासिनतेचे प्रकारे विश्लेषण करुन सांगितले आहे ते पुढील प्रमाणे.

१. **<u>राजकीय अश्रद्पणा</u> -** या व्यक्तींना राजकारणी आवड नसते व या व्यक्तींच्या मते राजकारण घाणेरडे आसते.


२. **<u>राजकीय अलगत्व</u> -** या प्रकारच्या व्यक्ती बहुधा अतिरेकी विचार सरणीच्या असतात त्यामुळे त्या शासन संस्थेला विरोध करतात. अतिरेकी हिंदुत्ववादी, अतिरेकी शिखवादी, अतिरेकी मुस्लीमवादी, नक्षलवादी इत्यादी या प्रकारात येतात. राजकीय व्यवस्थेविषयी अविश्वास असल्याने त्या सनदशीर राजकीय सहभागापासून दूर राहतात व कित्येकदा हिंसक कारवाया करतात.

३. **<u>प्रमाणक-हिनता</u> -** या व्यक्तींना न्यूनगंडाची भावना असते. आपण राजकीय व्यवस्थेवर काहीच प्रभाव पाडू शकत नाही. या भावनेने त्या राजकीय दृष्टया उदासिन बनतात.

रुश व अल्शॉफ यांच्या मते प्रत्येक राजकीय व्यवस्थेत या प्रकारच्या व्यक्ती असतात. व राजकीय दृष्टया क्रियाशील व्यक्तींवर त्याचा कमी अधिक प्रमाणात प्रभाव पडत असतो.

श्री. रुश व अल्शॉफ यांनी राजकीय सहभागाच्या पातळया खालील आकृतीच्या सहाय्याने दर्शविल्या आहेत.

आकृती क्रं. १-१ रुश व अल्थॉफ यांनी दाखविलेला आकृतीबंध -




(श्री. रुश व अल्शॉप , ॲन इनट्रोडक्शन टू पॉलीटिकल सोशॉलॉजी)[१५].

श्री. रुश व अल्शॉप यांनी राजकीय विविध प्रकारांची मांडणी उतरत्या श्रेणीत केली आहे. त्यांच्या मते राजकीय व्यवस्थे बद्‌दल उदासीन असणारा व मतदानात भाग न घेणारा वगैरे हा सर्वात तळाचा घटक आहे. तर प्रशासकीय किंवा राजकीय पद धारण करणारा वर्ग हा सर्वात वरचा घटक आहे.

आकृती क्रं. १.२  श्री. मिल यांनी दाखविलेला राजकीय सहभागचा आकृतीबंध -

सार्वजनिक पद आणि पक्षातील पद धारण करणे.

पदप्राप्ती साठी उमेदवारी करणे.

सार्वजनिक निधीसाठी विनवणी करणे.

सुत्रधार नेत्यांच्या किंवा डावपेच ठरविणाऱ्या सभेस उपस्थित रहाणे.

राजकीय पक्षाचे क्रियाशील सभासद होणे.

राजकीय प्रचार मोहिमेत वेळ खर्च करणे.

---

राजकीय मेळाव्यास उपस्थित राहणे.

राजकीय पक्षास किंवा उमेदवारांस आर्थिक सहाय्य करणे.

सार्वजनिक पदांवरील अधिकारी किंवा नेता यांच्याशी संपर्क साधणे.

---

राजकीय पक्षाचे ओळखदर्शक बटन शर्टावर लावणे किंवा राजकीय पक्षाचे निशान चिकटविणे.

दुसऱ्या व्यक्तीने विशिष्ट रितीने मतदान करावे म्हणून तिच्याशी बोलणे.

राजकीय स्वरुपाची चर्चा करणे.

मतदान करणे

राजकीय स्वरुपाच्या चतेकांच्या प्रभावा खाली येणे.

(डॉ. इनामदार ना. र., डॉ. वकील अलीम आधुनिक राजकीय विश्लेषणं)[१६]

प्रा.मिलब्रॅथ यांनी राजकीय सहभागाचे प्रकार तक्ता क्रं. १.२ मध्ये दाखविल्या प्रमाणे चौदा पातळयावर मांडलले आहेत. जास्तीतजास्त व्यक्ती कनिष्ट पातळीवरील प्रकारात सहभागी होताना दिसतात. व वरिष्ट पातळीवरील पक्षाचे सक्रिय सभासद, पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते सहभागी होतांना दिसतात. त्यांच्या मते ४० ते ७० % लोक फक्त मतदानात भाग घेतात. उलट वरिष्ठ पातळीवर सर्वात कमी लोक भाग घेतात.

## ३.५ संदर्भ : -


१. जोशी लक्ष्मण शास्त्री, मराठी विश्वकोष खंड ५ वा महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पृष्ठ ३५६.

२. गर्गे, स.मा. राज्यशास्त्र विकास, गो.य. राजे प्रकाशन, पुणे, १९९६, पान नं.४९.

३. भोरकांडीकर रा. शा., प्राचीन भारतीय राजनीती महाराष्ट्र राज्य ग्रथनिर्मिती मंडळ, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पान नं. १०१.

४. प्रा. उदगांवकर एन.एन., प्रा. गायकवाड एल.बी., आधुनिक युरोप व जग, १९७५ पान नं. १६४ ते १७३.

५. Maclosky Herbert, Political participation in david I sill (Edi) interuational Ercyclopeadia of the social science, vol. 12, P.P.- 253.

६. Eston David, The political system, Scientific Boo Agency, Calcatta, 1971, P.P. 129.

७. Almond G.A. and powel G.B. Comperative Politics Amerird Publising Co-Op Pvt. Ltd. New Delhi Repriut 1972 P.P. 64.

८. Dahl R. H., Modern political Analysis prentice Hall of India, New Delhi 1978 P.P.188.

९. भारतीय संसद, प्रकाशन विभाग- माहिती व नभोवानी मंत्रालय, नवी दिल्ली, १९८१, पान नं.१ ते ३.

१०. The Weel, Political View, Sage Publication, Delhi, Feb. 1, 1988 P.P. 48-49.

११. देशपांडे भ. द., शासनसंस्था व राज्य पध्दती तौलनिक विचार, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, कोल्हापूर रायटर्स को ऑप. सोसायटी लिमिटेड, कोल्हापूर, १९९५, दुसरी आवृत्ती, पान नं. ३४१.

१२. झिंगलर एच., इंटरेस्ट ग्रुपस् इन अमेरिकन सोसायटी, सेझ पब्लिकेशन, दिल्ली, १९९५, पान नं.२२.

१३. केळकर न. चि., राज्यशास्त्र नवभारत ग्रंथमाला, विद्या प्रकाशन, नागपूर, १९३२, पान नं.१२५.

१४. काकडे सु. रा. लोकशाही राजकीय व्यवस्थेत स्त्रियांचा राजकीय सहभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ एम.फिलसाठी शोध निबंधक नोव्हेंबर १९९० (अप्रकाशित).

१५. Rush M. – Althoff R. 'An Intruduction to Political Sociology', Felthar and Son Ltd., Great Britan Publications, Year 1972, P.P.36.

१६. डॉ. इनामदार, डॉ. वकील, आधुनिक राजकीय विश्लेषण शुभदा सारस्वत पब्लिकेशन, पुणे.

*<u>प्रकरण- ४</u>*

# *रेड्डी समाजाचा इतिहास*


| | | पान नंबर |
|---|---|---|
| | प्रस्तावना | ८१ |
| ४.१ | रेड्डी समाज इतिहास | ८१ |
| ४.२ | रेड्डी समाज आणि धार्मिक बाजू | ९१ |
| ४.३ | रेड्डी समाज आणि सामाजिक रचना | ९२ |
| ४.४ | रेड्डी समाज आणि आर्थिक परिस्थिती | ९६ |
| ४.५ | लातुर जिल्हयातील रेड्डी समाज | ९८ |
| | ४.५.१ रेणापुर | १०२ |
| | ४.५.२ लातुर | १०४ |
| ४.६ | संदर्भ सूची | १०८ |

*प्रकरण-४*

# रेड्डी समाजाचा इतिहास

## प्रस्तावना -

सदरील संशोधनामधील या प्रकरणात रेड्डी समाजाचा इतिहास, परंपरा, धार्मिक परिस्थिती, सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला आहे. त्याच बरोबर लातुर जिल्हयातील रेड्डी समाजाचा इतिहासही मांडला आहे.

## ४.१ रेड्डी समाज इतिहास -

**येल्लम रेड्डी :** एक शेतकऱ्याची जात. राट म्हणजे राजा या शब्दाचा रेड्डी हा अपभ्रंश आहे. लातूर जिल्हयात रेड्डी आंध्रप्रदेशातून आले असावेत. शेती हा रेड्डींचा परंपरागत व्यवसय आहे. यांच्यात जातपंचायत पूर्वीही नव्हती व आताही नाही. यांच्यत गोळावार, मोढायल्लम, चिटबोने, आयतलवाड, राघमोडे, नसुलवाडे, घुमे, कासार, कुंभार, देवणे, ईस्तारे, बोदरवाड, बीबलवाड, भिंगेवाड, लिंगणवाड, गाडे, गल्लेवाड, बरूफुले, पुरे, जंगवाड, यल्लवाड, शिरगे, माडगे, पप्पलवाड, जख्खलवाड, हांडे, धिरूटे, जक्कलवाड, मुम्मईवाड, बंडरेवाड इत्यादी आडनावे आढळतात.

लग्न जमवावयाचे झाल्यास दोन्हीकडील (वधू व वर) मंडळी एकमेकांच्या घरी जातात, व त्यानंतर एकत्र बसून लग्न पक्के करतात. प्रथम साखरपुडा होतो व लग्न पक्के ठरले असे समजतात. लग्न बहुधा मुलीच्या घरी होते. पूर्वी लग्ने पाच दिवस चालत, मात्र आता दोन दिवसात आटोपतात. यांच्यात आतेमुलीशी, मामेमुलीशी लग्न करता येते. मावस बहिणीशी व चुलत बहिणीशी विवाह होत नाही. लग्नात शेवंती, रूखवात व बहुले असते. लग्न ब्राह्मण पुरोहित लावतो. यांच्यात विधवा विवाहास व घटस्फोटास मान्यता आहे. लग्नानंतर संध्याकाळी वराच्या घरी वरात काढतात. वरातीनंतर 'पाळणा' हा विधी वराच्या घरी होतो.

गर्भारपणात सातव्या किंवा नवव्या महिन्यात डोहाळे जेवण करतात. त्यावेळेस मुलीच्या घरची मंडळी मुलांच्या घरी येऊन सर्व खर्च करतात. यांची कुलदैवते, बालाजी,

नृसिंह आणि खंडोबाही असून ते हिंदूंच्या सर्व देवदेवतांची पूजा करतात. हे लोक शेतकरी असल्याने वेळ अमावस्येला पाच चिखलांच्या लक्ष्मी मूर्ती बनवून खीर, भजी, ताकाची आंबील, कडव्याची कोष करून नैवेद्य दाखवून पूजा करतात.

काही मृतांस जाळतात तर काही पुरतात. त्यांच्या अस्थिविसर्जन गंगाखेडसारख्या गोदाकाठच्या गावात करतात. त्यांच्या अस्थिविसर्जन गंगाखेडसारख्या गोदाकाठच्या गावात करतात. यांची बोलीभाषा कन्नडी व मराठी आहे.

पूर्वीपासूनच निद्रीत अवस्थेत असलेला हा समाज अंधकारमय जीवनातून बाहेर काढण्याचे संत परंपरेने मोठया प्रमाणावर केल्याचे दिसून येते. तेव्हा पासून इतर जातीच्या संता बरोबर संत सावता रेड्डी यांचा फार मोठा प्रभाव रेड्डी समाजावर पडलेला आहे[५]. त्यांच्या पुण्यतिथी, जयंती साजरी मोठया उत्साहाने आजही हा समाज करीत असताना दिसून येतो. त्यामुळे अनेक लोक रेड्डी जातीचे पुढे वारकरी संप्रदास वाढविण्यासाठी स्वतःला वाहून घेतल्याचे दाखले मिळतात. कारण संत सावता रेड्डी वारकरी संप्रदायाचे असल्यामुळे तशीच परंपरा पुढे इतर समाजाबरोबरच रेड्डी समाजात ही सुरु झाली. पंढरीचा विठोबा हे आराध्य दैवत समजून हा समाज तेवढयाच भाविक भक्तीने आषाढी-कार्तिका एकादशीला पंढरपुरच्या दिंडी मध्ये तेवढयाच उत्सुकतेने सामिल होतो. समता, सर्वांगिन न्यायाची शिकवण वारकरी समाजाकडून रेड्डी समाजात आलेली दिसते. यावरुन असे लक्षात येते की रेड्डी समाजातील लोकांना भक्तीमय वातावरणाचा फार मोठा इतिहास आहे. रेड्डी समाजाच्या उत्थानाबाबत वेद काळापासून मोठया प्रमाणावर वेगवेगळे इतिहासाचे पुरावे मिळतात. यावरुन धर्म आणि पंथाची परंपरा माळी समाजातील वेगळयाच स्वरुपात दिसून येते. रेड्डी समाजाचा धर्म प्रामुख्याने हिंदू यामधील चाली-रिती, परंपरा यांचाही फार मोठा प्रभाव रेड्डी समाजावर पडलेला आहे.

पुढे १८ व्या शतका मध्ये प्रामुख्याने जनचळवळी मध्ये रेड्डी समाजाचा सहभाग चांगला होता. लातूर येथे स्वातंत्र्यपूर्व कालीन झालेले सावकरी आंदोलन, रामोशी उठाव यामध्ये लातूर आणि रेणापुर मधील रेड्डी समाज होता, असे मत काही जाणकार व्यक्तींनी सांगितले आहे. म्हणजेच त्या वेळच्या महाराष्ट्रातल्या पेशवाई मध्ये सुध्दा रेड्डी समाजाचा दुहेरी प्रकारचे स्थान होते. १८ व्या शतकातील रेड्डी समाजाचे वस्तीस्थान हे जातीय स्वरूपाचे बनलेले आढळते. त्याचा फायदा समाजाला असा झाला की, त्याच्या मध्ये

एकात्मता निर्माण होण्यास मोठया प्रमाणांवर मदत झाली परंतू हाच फायदा १८ व्या शतकामध्ये फारसा टिकून राहीला नाही. कारण जातीयता, अस्पृश्यता यांनी सर्व समाज घेरलेला होता. जातीयतेची चौकटीत संपूर्ण समाज (उच्च वर्गा व्यतीरिक्त) बंदीस्त होता. पुढे ज्येष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच्च, अशा परिस्थितीमधून महात्मा ज्योतीराव फुले यांनी इतर समाजासह रेड्डी समाजालाही विकासाची संधी मिळवून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांची पराकाष्टा म्हणून, आजचा समाज उभारण्यास मदत झाली. इतर अस्पृश्य समाजाबरोबरच रेड्डी समाजाचेही काही ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणावर हाल, अपेष्ठा, अपमान इ. मोठया प्रमाणावर सामोरे जावे लागले. महाराष्ट्रातील अग्रेसर असलेल्या पुणे शहरात या काळात रेड्डी समाजाच्या व्यक्तींना जातीयतेच्या भ्रामक परिस्थितीला सामोरे जावे लागले. अशा परिस्थितीमध्ये महात्मा ज्योतिबा फुलेनी स्वतःच्या पत्नीला म्हणजे क्रांतीज्योत सावित्रीबाई फुले यांना शिकवले. आणि स्पृश्य-अस्पृश्य इतर जाती मध्ये पहिल्यांदा शिक्षणाच्या क्रांतीची ज्योत पेटवली. स्वतः अन्याय, समाजाची नामोदकी, अपमान सहन करुन, येणाऱ्या भविष्यासाठी समाज विकासाचा पाया त्यांनी रचनेचे काम केले. हे कार्य इतर सर्व समाजासह रेड्डी समाजाच्या दृष्टीने फार भूषावह आहे. पुण्यामध्ये अण्णा चिपळूणकरच्या वाडयामध्ये महात्मा फुलेनी सावित्रीबाई फुले सहकार्याने जी शाळा सुरु केली. त्यामध्ये इतर समाजाच्या मुली बरोबर रेड्डी समाजाच्या मुलींनाही शिक्षणाची पहिल्यांदा संधी देण्यात आली. धर्म-अर्थ, काम, मोक्ष या पिढयांच्या परंपरेच्या जोखडातून समाजाला मुक्त करण्याचे काम महात्मा फुले यांनी घडवून आणले.

लातूर शहरामध्ये रेड्डी समाजाचा रेड्डीवाडा म्हणून विभाग प्रसिद्ध आहे. या ठिकाणी महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधनाचे कार्य केलेले आहे याच रेड्डीवाडया मध्ये मोठया प्रमाणांवर रेड्डी समाज आजही वास्तव्य करीत असून इतिहासातील पाउलखुना या ठिकाणीही मोठया प्रमाणावर दिसून येतात. व्या शतका मध्ये सारे समाज विचारवंत, कलावंत घडले गेले. या काही नैसर्गिक घटना नाही की, ज्यामुळे समाजाची वैंकटता निर्माण होईल. हि स्पृश्य-अस्पृश्याच्या हाल-अपेष्ठातून आलेला विचार आहे. कारण त्यांना भविष्यामधील समाज सुधारण्यासाठी कष्टाचे मोल व्यर्थ न दडवता त्यातून प्रत्येक क्षणाला समाज घडविण्याची कृती करावयाची होती. १९ व्या शतकामध्ये रेड्डी पारंपारीक व्यवसायातून हळूहळू बाहेर येवू लागला फुलेचा प्रभाव ज्या प्रमाणावर माळी समाजावर

पडला. त्याच प्रमाणात इतरही क्रांतीकारी विचारवंत व्यक्तीचा रेड्डी समाजावर प्रभाव पडत गेला. पुढे फुले विचारातून शाहू-आंबेडकर घडले गेले. त्यावेळेस राजकीय विकास महत्वाचा नव्हता. सामाजिक विकास प्रथम गरजेचे आहे, ही विचारसरणी हळूहळू समाजामध्ये रुजू लागली. त्यामुळे रेड्डी समाज सामाजिक दृष्टयाही काही प्रमाणात जागृत होवून स्वतंत्र्याच्या लढयात हा सामील झाला. शहरी भागातली जाणीव जागृती वाढली असताना ग्रामीण भागामध्ये त्याचा फारशा प्रभाव पडलेला दिसत नव्हता. अशा परिस्थिती मध्ये फुले-शाहू-आंबेडकर याचे कार्य महत्वाचे ठरले गेले हि वास्तविकता दिसते[६].

१९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाज प्रबोधनाची लाट हळूहळू निर्माण झाली त्यामुळे जातीयता, अस्पृश्यता निर्मूलन होण्यास मदत होवू लागली, कारण घटने मध्ये सर्वासाठी आरक्षण ठेवले गेले. त्याचा फायदा मागासवर्गीयाबरोबरच इतर मागास वर्गींयांनाही होवू लागला. तरी पण ग्रामीण भागामध्ये रेड्डी पंरपरा, रिती, श्रध्दा यामध्ये नेहमीच अडकलेला दिसून येतो. प्रामुख्याने रेड्डी समाजामध्ये जास्त प्रमाणात भूमिधारक स्वरुपाचा काही समाज दिसून येतो. महाराष्ट्राच्या काही भागा बरोबर दक्षिण भारतातही प्रसिध्द देवस्थान मध्ये रेड्डी पुजारी असल्याचेही दिसून आले आहे. त्यामुळे कुठेतरी उपजिवीका करुन आपली पोटाची खळगी भरविण्याचे काम हा समाज १८ व्या १९ व्या शतका मध्ये पर्यंत करीत होता. पुढे गोजमगुंडे, साबदे,येल्लम,रेड्डी यांच्यातून पुरोगामी विचारी व्यक्ती पुढे निर्माण झाल्या. त्यातूनही समाज जागृत करण्याचा प्रयत्न काही प्रमाणात केला गेलेला आहे. असे दिसून येतो. म्हणजेच या माहितीवरुन असे लक्षात येते की, कोणत्याही शतकामध्ये इतर समाजाबरोबर रेड्डी समाजामध्ये कोणत्या तरी मार्गाने प्रबोधन होत राहीले हे दिसते. कारण कोणताही समाज हा एकाकी सुधारत नसून त्यासाठी भुतकाळातील विकसीत घडामोडींचाही आधार लागतो. त्या शिवाय भविष्याची सुधारणा होवू शकत नाही. म्हणून रेड्डी समाजाच्या बाबतीतही इतिहास हा घडला गेला. परंतू त्याचा प्रसिध्दीचा दिवस कधीच उगवला नाही हि मात्र शोकांतिका आहे. स्वातंत्र्यानंतर रेड्डी समाजाचे एकत्रिकरणही काही प्रमाणात झालेले दिसून येते. या समाजातील ऐतिहासिक चर्चे मधून माहिती घेतल्यास असे दिसते की, या मध्ये ठराविक आडनावे असलेला हा समाज आहे असे काही ऐतिहासिक ग्रंथा मधून माहिती मिळते त्यामध्ये : -

| | | | |
|---|---|---|---|
| १. गोमारे | २. गोजक | ३. नरहरे | ४. म्हाडे |
| ५. वंगवाळ | ६. पडीले | ७. गोजमगुंडे | ८. पन्हाळे |
| ९. शेळके | १०. चेवले | १२. गवारे | १३. रेड्डी |
| १४. चिंटे | १५. येल्लम | १६. साबदे | १७. नगिरे |
| १८. कोंबडे | १९. सुडे | २०. कोकळे. | |

इ. आडनावे वंशपरंपरागत रेड्डी समाजांची दिसून येतात.

पुढे महाराष्ट्रात रेड्डी समाजात कामात जसजसे संशोधन सुरु झाले तसे अन्य स्वरुपाची माहिती त्यामधून बाहेर पडली. महाराष्ट्रीय ज्ञानकोशानुसार या जातीची रेड्डीयार, बागवान व मालकार अशी इतर नावे असून यांची हिंदूस्थानातील लोकसंख्या (१९११ च्या जनगणने नुसार २०३५८४३) आहे त्यात १९१६४९१ हिंदू ११७१४२ मुसलमान व बाकीचे इतर धर्माचे आहे. त्यांची जास्त वस्ती (५७२८६४) मध्यप्रांत व वऱ्हाड या भागांत असून त्या खालोखाल राजपूतांना, मुंबई ईलाख, अहार, पंजाब संयुक्त प्रान्त आणि मोगलाई इकडे आहे. मराठी भाषा बोलणारे रेड्डी सुमारे ७ लाख आहेत. आपणांस क्षत्रिय म्हणवितात यांचे घरे मुख्यतः शेतकी बागायती व मजुरी आहेत. अशा प्रकारे रेड्डी समाजाचा इतिहास बघता फार संघर्षातून परिस्थिती मधून पुढे आलला आहे असे दिसून येते. कारण अनेक प्रांतामध्ये हा समाज मोठया प्रमाणांवर दिसून येतो. त्यावर तेथील वातावरण, परंपरा यांचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे.

## प्रमुख जाती व जमाती-

**कुणबी :** एक शेतकरी जात. कुणबिकी म्हणजे शेती करणाऱ्या लोकांना कुणबी म्हणतात. तरी देखील कालांतराने कुणबी ही एक स्वतंत्र जात निर्माण झाली. कुणबी शब्द कुळंबी अथवा कौटुंबिक या शब्दावरून आला आहे. पंडित भगवानलाल इंद्रजी यांच्या मते या शब्दाची व्युत्पत्ती संस्कृत शब्द कुटुंबिन पासून झाली असावी. त्यांच्या मते प्राचीन काळापासून कुटुंबिन हे उपपद शेतकऱ्यांच्या नावामागे लावण्याचा प्रघात आहे. एकाच ठिकाणी घर करून राहून शेतीचा व्यवसाय व पशुपालन करणाऱ्या सामाजिक गटाला उद्देशून हा शब्द वापरला जातो.

कुणबी जातीत मराठा कुणबी, कोकणी कुणबी, खानदेशी कुणबी, तलहेरी (तल्हेरी) कुणबी व काळे कुणबी असे प्रादेशिक गट आहेत. जिल्हयातील मराठा कुणब्यांची आडनावे

पुढीलप्रमाणे आहेत. जाधव, गुंजरगे, सपाटे, कोकाटे, काळे, लोंढे, सुरवशे, पवार, धुमाळ, लखणे, टोणपे, नाईकवाडे, गवारे, गोमणे, मोरे, बिराजदार इत्यादी. यांच्यात एकाच कुळात व देवकवाल्यात सोयरीक होत नाही. शक्यतो नात्यातील स्थळाला अधिक पसंती देतात. मामेबहिणीशी लग्न लावीत नाहीत. यांच्यात पूर्वी बालविवाहाची प्रथा होती परंतु आता बालविवाह केला जात नाही. मराठा कुणब्यांची विवाहपद्धती मराठयांप्रमाणेच आहे.

**कुंभार :** एक इतर मागासवर्गीय जात व गावगाडयातील बलुतेदार, मातीची भांडी घडविणारा ही धंदेवाईक जात. संस्कृत कुंभकार या शब्दावरून कुंभार हा शब्द बनलेला आहे.

**कैकाडी :** जिल्हयात आढळणारी एक विमुक्त जमात असून आपण मूळचे तेलंगणातील असल्याचे ते सांगतात. त्यांची भाषा तेलुगू आणि कन्नड यांचे मिश्रण आहे. यावरून ते खरे असावे. पूर्वी गावोगाव भटकणारे होते. परंतु आता ते स्थायी होऊ लागले आहेत.

**कुलदैवते :** उरअम्मा (गावदेवी किंवा लक्ष्मी), वासुला कुलअम्मा (द्वारदेवी), शेडी-देऊरअम्मा (वृक्षदेवी) फिरस्ती अम्मा (फिरस्ती देवी), आरकुल अम्मा (जलदेवी), म्हशाय ताईअम्मा (स्मशानदेवी), देव्हांरकुल अम्मा (कुलदेवी) इत्यादी त्यांची कुलदैवते आहेत. हे लोक गावदेवी फिरस्तीदेवी आणि कुलदेवीची पूजा करतात. फिरस्तीदेवीचा कौल घेतल्याशिवाय हे लोक आपला मुक्काम हलवित नाहीत, किंवा कोणत्याही कामगिरीला निघत नाहीत. ते अंधश्रद्धाळू असतात.

**कोमटी :** एक व्यापरी जात, कोमटी हे नाव या जातीत कसे पडले याविषयी भिन्न भिन्न मते दिसून येतात. को-मति गो-मति अशा तऱ्हेच्या संज्ञा पुढे आलेल्या आहेत. कोमटयांच्या कन्यकापुराणात शिवाने यांना गाईप्रमाणे वागविले म्हणून मोगति असे नाव दिल्याचे लिहिले आहे.

**कोष्टी :** एक विनकर जात, यांच्यात हळवी, लाड, कोष्टी, गधेवाल, देशवार, देवांग, पटवी, हंडगर, खाते, देवांग, मराण, हाडपुरी आणि निहात इत्यादी अनेक उपजाती आहेत. ते हार, दागिण्यांचे रेशमी दोर करणे, घोडे व पालख्यांसाठीही रेशमी दोर वळणे, याशिवाय रेशमी कापड व साडया विणणे हा व्यवसया करतात.

**गवंडी :** ही एक इतर मागासवर्गात मोडणारी जात होय. यांच्यात मराठा, जिरे, कामाठी, कानडी व कडिया असे पोटभेद असले तरी जिल्हयात बहुतांश मराठी भाषिक गवंडी आढळतात. क्वचित जिरे आणि कामठीही आढळतात गवंडयाचे रीतिरिवाज कुणब्यांप्रमाणेच

आहेत. परंतु गवंडयाचा धंदा करू लागल्याने स्वतंत्र जात निर्माण झाली असावी. जिरे गवंडी मूळचे मराठा होत.

**गोसावी :** एक भटकी जमात होय. गोसावी हा शब्द 'गोस्वामीन' या संस्कृत शब्दापासून आलेला आहे. हा एक हिंदू जातींचा वर्ग असून तो गासाई, गुसाई व गोस्वामी अशाही नावांनी ओळखला जातो. ही नावे गोस्वामीन् या संस्कृत शब्दापासून आली आहेत.

**गोंधळी :** ही एक भटकी जमात असून यांच्यात अनेक जातीच्या लोकांचा समावेश होत असून देवास नवसासाठी वाहिलेल्या मुलांचा भरणा त्यात विशेष आहे. जमदाग्नी ऋषी व रेणुका यांपासून आपली उत्पत्ती झाली असून मूळ स्थान माहूर आणि तुळजापूर येथे आहे असे ते सांगतात. सुमारे चारेश वर्षापूर्वी आपण महाराष्ट्रात आलो असेही ते सांगतात. ते आपणास भवानीदेवीचे पूत्र अथवा भक्त म्हणवितात. गळयात भवानी कडयांची माळ घालतात. हे देवीचे भक्त असल्याचे हिंदुमधील कनिष्ठ जातीतील लोक हयांना मान देतात.

**घिसाडी :** ही एक भटकी जमात होय. जिल्हयात चव्हाण, जाधव, पवार, साळुंखे, सुर्यवंशी, शिंदे, ऊकंडे, देजमोर, हुनाने, सोळंकी इत्यादी आडनावांचे (कुलांचे) घिसाडी आढळतात. मात्रवरील आडनावांमध्ये चव्हाण, साळुंके, पवार, जाधव यांना अधिक मान दिला जातो. पूर्वी त्यांच्यात जापंचायत होती. जातप्रमुखास 'मुखिया' म्हणत.

**चांभार :** कातडयाचे काम करणारी व पादत्राणे बनवणारी एक जात. या लोकांना मोची, चमार, चमगार व समगार अशीही नावे आहेत. चर्मकार या संस्कृत शब्दापासून चमार, चांभार हे शब्द आले आहेत. चांभारात असंख्य पोटजाती असून त्यापैकी जटिया, जैस्वार, धारिया, चौधरिया, बुंदेला, चामर, दोहर, कुरिल, पूर्विया, कोरी किंवा कोली, अहिराबार, छुसिया किंवा धुसिया इत्यादी प्रमुख आहेत. विशेषतः शेती व्यवसायाला उपयुक्त असणारी चामडयांची अवजारे, मोट, बैल्यांच्या गळयातील पट्टे इत्यादी कामे करतात.

**ढोर :** अनुसूचित जातीमधील एक, गुरांची कातडी कमावित असल्यामुळे यांना ढोर (गुरं) हे नाव पडले असावे. यांच्या बुधलेकरी, बुंदेलखंडी, हिंदुस्थानी, केकय्या, कर्नाटकी, खेतरफेडी व मराठा या सात पोटभेदांपैकी जिल्हयात मराठा व कर्नाटकी हे दोनच भेद आढळतात.

**धनगर :** महाराष्ट्रात सर्वत्र आढळणारी जात. धनगर शब्दाची उत्पत्ती धेनु (गाय) या संस्कृत शब्दापासून अथवा धन (संपत्ती) या शब्दापासून झाली असावी. कन्नड भाषेत धनगरांना दनगार म्हणतात. दन म्हणजे गुरेढोरे, त्यावरूनही धनगर शब्द बनला असावा. जमीन

नांगरतांना शेळया व मेंढया वारूळातून बाहेरे येऊन शेतकऱ्यांना पिकांची नासधूस करू लागल्याने यातून सुटका होण्यासाठी त्यांनी महादेवीची प्रार्थना केली असा समज असल्याने ते दिवाळीच्या दिवशी वारूळाची भक्तिभावे पूजा करतात. तसेच शेळया-मेंढया हाकताना हरहर असा उद्‌गार करतात. हरहर हे महादेवाचे नाव आहे.

**ब्राह्मण : देशस्थ-** देशस्थ हे सर्वात जुने रहिवासी मानले जातात. जिल्हयात देशस्थांत ऋग्वेदी व यजुर्वेदी ह गट आहेत. ऋग्वेदी स्मार्त (शिवभक्त) किंवा वैष्णव असतात. यजुर्वेदीमध्ये शुक्ल यजुर्वेदी व कृष्ण यजुर्वेदी या पोटशाखा आहेत. पूर्वी शुक्ल यजुर्वेदी व कृष्ण यजुर्वेदी यांच्यात मिश्रविवाह होत नसत. तथापि अलीकडील काळात पंरपरेची बंधने शिथिल झालेली आहेत.

**कोकणस्थ-** हे ब्राह्मण कोकणातून आलेले आहेत त्यांना कोकणस्थ किंवा चित्पावन ब्राह्मण असे म्हणतात. परंतु काही विद्वानांच्या मते असा लावलेला अर्थ बरोबर नाही. आजतरी चित्पावन म्हणजे कोकणस्थ असे समीकरण रूढ आहे. आणखी एका मतानुसार कोकणस्थांचे (चित्पावनांचे) मूळ वसतिस्थान मराठवाडा भागातील बीड जिल्हयातील अंबेजोगाई हे गाव होय. कोकणस्थांना चित्पावन हे नाव त्यांच्या चिपळूण येथील वसाहतीमुळे प्राप्त झाले असावे.

**मराठा :** मराठयांची काही प्रमुख घराणी पंधराव्या शतकाच्या विजापूरच्या अदिलशाही व अहमदनगरच्या निजामशाहीत सरकार वा अधिकारी पदावर होती. उदाहरणार्थ निंबाळकर, घारपुरे व भोसले आणि बहुतकरून त्यांचे भाऊबंद विविध शाहयांच्या सेवेत होते. शिवाजी महाराजांनी औरंगजेबाशी पुकारलेल्या गनिमी युद्धात प्रामुख्याने ते प्रसिद्धीस आले. मराठे स्वत:स राजपूत क्षत्रिय वंशाचे म्हणवून घेत असून त्यांचे पूर्वज राजपूतांमधील चौहान, पवनार, सोलंकी आणि सुर्यवंशी घराण्यांमधील मानतात.

**मारवाडी :** महाराष्ट्रात सर्वत्र आढळणारी एक जात. व्यापार हा त्यांचा मुख्य व्यवसाय असल्याने सर्व भागात पसरलेले आहेत. त्यामुळे त्यांना 'वाणी' म्हणूनही ओळखले जाते.

**माहेश्वरी :** ही एक मारवाडी बनियांची पोटजात असून आता ही एक वेगळी जात बनली आहे. महेश या शब्दावरून माहेश्वरी हे नाव आलेले आहे. मुळात हे लोक मूळचे राजस्थानातील असले तरी सर्व भागात जाऊन स्थानिक झालेले आहेत. मारवाडी किंवा

राजस्थानी ही त्यांची मुख्य भाषा असून माहेश्वरी लोक पंजाबी, गुजराती, मराठी, तेलगू, बंगाली इत्यादी प्रादेशिक भाषा उत्तमरित्या बोलतात.

जिल्हयात यांच्या सोणी, भुतडा, राठी, सारडा, जाजू, चितलांगे, बजाज, बाहीली, काबरा, मालू, काळू, कलाणी, मंत्री, लड्डा, खटोल, भंडारी, तापडीया, दरगड, भांगडीया, कचोळया, नांवदर, सोमाणी, बिर्ला, बियाणी, परताणी, दागा, इनानी, होलानी इत्यादी आडनावे आढळतात. यांच्यात समान आडनावात बेटी व्यवहार होत नाही. प्रथम मुलीकडील पाहुणे येऊन मुलासाठी मागणी घालतात. मुलामुलीच्या पसंतीनंतर लग्न जमविले जाते. अलीकडे मुलामुलीला बोलावून मुलीस साडी चोळी व मुलास नवीन कपडे देऊन हळद व कुंकवाचा टिळा लावून साखरपुडा विधी करतात.

**माळी :** माळी हा शब्द संस्कृतमधील मालाकार म्हणजे फुलांचा हार कणारा याचे संक्षेप रूप आहे. मराठीत माळ या श्ब्दावरून माळी हे नाव आले.

यांच्यात फुलमाळी, हळदेमाळी, बनकर किंवा कासमाळी, काचामाळी, कडूमाळी, बावनेमाळी, अधप्रभूमाळी, अघशेटीमाळी, जिरेमाळी, पाडेमाळी, उंडेमाळी आणि लिंगायत माळी या अंतर्विवाही पोटजाती आहेत. जिल्हयात फुलमाळी, लिंगायतमाळी आढळतात. त्यांच्यात शीरसागर, डाके, कांबळे, राऊत, वंजे, मेहजे इत्यादी आडनावे आढळतात.

**मुसलमान :** लातूर जिल्हयातील मुसलमानांत त्यंची विभागणी दोन गटात करता येईल. सय्यद, शेख, मुघल व पठाण यांचा एक गट आणि पारंपारिक व्यवसायावरून आडनावे धारण केलेल्यांचा दुसरा गट.

हजरत महमंद पैगंबराची कन्या फातिमा व जावई अली यांच आपण वंशज आहोत असा सय्यद म्हणविणारांचा दावा आहे. हा भेद ते आपल्या नावाच्या आधी सय्यद, मीर अथवा नंतर शाह असे उपपद लावून दाखवितात. स्त्रिया आपल्या नावापूर्वी बेगम ही उपाधी लावतात. काही शियापंथी मुसलमान आहेत. पण बहुसंख्य सुन्नी आहेत.

**<u>मध्यप्रांत</u> -**

तिकडे यांना मरार म्हणतात. हल्लीगड कडे कोसरिया म्हणून यांचा वर्ग आहे. ओढया (ओरिसा) देशात योग्य नवरा न मिळाल्यास मुलाचे लग्न मोहाच्या खूंटी बरोबर लावून रानातील कोणत्यातरी झाडाशी तिला बांधून ठेवतात. नंतर जो कोणी तिला सोडवितो, तो तिचा नवरा होतो. बालघाट व भंडाऱ्याकडे वराने बायकोसाठी सासऱ्या घरी

नोकरी करण्याची (लमझान) चाल आहे. ही चाल द्रविडी असल्यामुळे यांचा व डोंगराळ जातीचा काही संबध असावा असे म्हणतात. बैतुलकडे लग्नात नवरा बायको वरवंटया भोवती प्रदक्षिणा घालतात. इकडिल या लोकांत दयाडिया नावाचा एक विधी आहे.

**<u>रसेल हिरालाल यांच्या मते</u> -**

लग्नात वरपक्षांकडील कामात आधी एका तरुण पुरुषास खोडू व सांड अशी संज्ञा देऊन वधुच्या घरी वरातीच्या वेळी आलेल्या सर्व बायकांसह त्याला एका खोलीत रात्रभर कोंडतात. येथे जी स्त्री त्याच्या हस्तगत होईल तिच्याशी त्याने संग करावा अशी त्याला मोकळीक देण्यात येते. त्यावेळी बाकीच्या बायकांनी त्याला मार दयावा अशी त्यांना परवानगी असते बालघाट, बराड मध्ये त्यांच्यात छोटी शादी व बडी शादी असे लग्नाचे दोन प्रकार आहेत. छोटी शादी वराच्या घरी होते थोडया जमिनीत रेड्डी पुष्कळ पिक काढतो. म्हणून त्याने पुष्कळ बायका कराव्या अशी तिकडे समजूत आहे.

बंगल्यात या जातीच्या लोकांची गणना नावासक जातीत करतात. शेतीचा धंदा आहे इकडील रेड्डी ते देवळातून काम करतात. ते गळयात जानवे घालताता माळयानं स. प्रांतात दैनी मोगालाई तरी रेड्डी, बाहरकडे कररेड्डी, ओरिसाकडे गंध रेड्डी, आसामकडे माली, राजपुत्याकडे काहनी व राऊत ही नावे असून या खेरीज घासी, सगर, आहार, अंथ अंधी, थैना, कहार, खेरा व वाघेलाल वैगरे नावे आहेत. माळव्यात अफुची लागवड बहुधा रेड्डीचे करतात. या समाजात हल्ली शिक्षणाचा प्रसार होत असून यांची पहिली शिक्षण परिषद हि पुण्यात १९१० मध्ये भरली होती. यांच्यातील अरणभेंडीचा रहिवासी रेड्डी हा एक पंढरपूरचा विठाबाचा भक्त होऊन गे[७].

**पंजाबी रेड्डी -**

यांचे फुल, गोट, सैनी, कऱ्हळी, मच्छी घनकट, तांबोळी, कंबोह हे पोट भेद आहेत हे लोक भैरव, हनुमान, शयमजी, देवी गुगा इ. देवतांना पुजतात. यांची जात पंचायत असून तिच्या प्रमुखाला चौधरी असे म्हणतात.

**बंगाली रेड्डी -**

यांना मालाकार असे म्हणतात फुल झाडे लावणे. कंच फुलांची आरास करणे व झोलांची चित्रे बनविणे हे त्यांचे व्यवसाय आहेत, सोला नावाचे एक झाड आहे. त्याचे लाकूड हलके असून गाभा पांढरा असतो त्याचे पातळ तुकडे कापून त्यावर हे लोक चित्र काढतात किंवा ते तुकडे जोडून त्यांची खेळणी किंवा बाहुल्या बनवितात.

प्राचीन बंगाली साहित्यात मालाकारांचा उल्लेख ठाक या नावाने केला आहे. या ठाकांचे अनेक पोट भेद आहेत काही लोक महादेवाची व आपल्या हत्यारांची पुजा करतात, तर काही विश्वकर्माची पुजा करतात.

## ४.२ रेड्डी समाज आणि धार्मिक बाजू -

धार्मिक अंगाने रेड्डी समाजाचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, रेड्डी समाजाला धर्माचा अभिमान आहे. त्या समाजामध्ये धर्मातर कधीही होताना दिसलेले नाही. परमेश्वर भक्तीचे वेड असणारा हा समाज प्रामुख्याने दिसतो. म्हणून सर्वेक्षणाच्या चर्चेतून अशी माहिती पुढे आली की, रेड्डी समाज शुध्द शाकाहरी आहे. त्यामुळे आहार-विहार-आचरणाने हा समाज शुध्द सभ्यता अंगीकारलेला दिसून येतो. त्यातच याच समाजामध्ये संत सावता रेड्डी संत होऊन गेले. आज रेड्डी समाजामध्ये संत सावता रेड्डी पुण्यतिथी जयंती ही साजरी करण्यात येते. या कार्यात संपूर्ण समाज एकोप्याने एकत्रित येऊन धार्मिक कार्य पूर्ण करतात[८].

एकंदरीत धार्मिक बाजूंचा अभ्यास केला असता हे लक्षात येते की, पूर्वी पासून एकोपा असलेला हा समाज एकोपा असलेल्या समाजाचे स्थाने त्यांच्या वाडया-वस्त्या किंवा गाव वसलेली मोठया प्रमाणांवर दिसून येते. कोणत्याही गावात किंवा शहरी भागांत बघितले असता असे दिसते की, रेड्डी समाज हा गावातल्या किंवा शहरातल्या एका बाजूवर वसलेला दिसतो. यालाच ग्रामीण भागात माळेवाडी आणि शहरी भागात रेड्डीवाडा किंवा सावतानगर, सावतावाडी या नावावरून रेड्डी समाजाच्या वस्त्यांची जाणीव होते.

सावता रेड्डी हे रेड्डी समाजाचे आराध्य संत असल्याने वारकारी सांप्रदयाचा फार मोठा प्रभाव रेड्डी समाजावर पडलेला दिसून येतो. आजही रेड्डी समाजाची संख्या वारकरी सांप्रदयात मोठया प्रमाणावर आहे. अनेकांच्या घरात रेड्डी समाजामध्ये संत सावता

यांचा फोटो लावलेला दिसून येता. किर्तन, भजन संत्संग, धार्मिक पुजा, यज्ञ, यात्रा, भैरवी, नाम सप्ताह मध्ये रेड्डी समाजाचा हिरारीने सहभाग असतो[१].

लातूर आणि रेणापूर तालुक्याची परिस्थिती यात संपूर्ण साजेशी अशी आहे. या कार्य क्षेत्रात यल्लेश्वरम् जयंती व पुण्यतिथी दोन्ही तालुक्यात प्रत्येक रेड्डी वस्त्या वाडयात साजरी केली जाते. ज्याप्रमाणे स्वजातीच्या कार्यात हा समाज एकोप्याने कार्य करताना दिसतो. अगदी त्याच प्रमाणे हा समाज इतर सर्व समाज कार्यातही काही प्रमाणात कार्य करताना दिसतो. कोणत्याही प्रकारची जातीयता भेदभाव, उच्चनिच्च असा भेदभाव करणारा समाज नसून अखंड एकात्मता कशी निर्माण करता येईल. हा प्रयत्न करणारा हा समाज आहे. अशा प्रकारे कार्य लातूर व रेणापूर या क्षेत्रात राजू अकनगिरे, काँग्रेस, प्रदिप चेद्रे, काँग्रेस नगरसेवक, शशिकांत अकनगिरे, भारत साबदे, सत्यवान पोकळे, धनंजय कोंबडे, ओमभाऊ सुडे, सतराम चेवले, प्रकाश रेड्डी इ. मंडळी नेहमी समाजाची धार्मिक बाजू भक्कम करण्यासाठी सतत पुढाकार घेत आहे. त्यामुळे धार्मिक अंग रेड्डी समाजाचे बळकट झालेले आहे. हिंदू धार्मिक तत्व रेड्डी समाज नेहमीच आचरणात आणताना दिसत आहे अशी माहिती या संशोधन अभ्यासाच्या निमित्ताने पुढे येते.

## ४.३ रेड्डी समाज आणि सामाजिक रचना -

एकूण रेड्डी समाजाच्या सामाजिक परिस्थितीचा विचाराधीन घेतल्यास असे दिसून येते की, हा समाज एक कमकुवत परिस्थितीमधून आजच्या परिस्थितीत मध्यम वर्गाच्या भुमिकेत स्वतःची भुमिका इतर जातीच्या तुलनेत प्रबळ रित्या बजावताना दिसत आहे. यांचे मूळ सामाजिक स्थानाचा विचार केल्यास असे दिसते की, भारतीय संस्कृतीचा फार मोठा प्रभाव या समाजावर पडलेला दिसतो. आणि त्या संस्कृतीचे जपवणूक करण्याचे काम आजही रेड्डी स्त्री-पुरुष करताना दिसून येतात. सद्यःपरिस्थितीमध्ये मराठा जाती बरोबर अन्य जाती प्रमाणे रेड्डी समाजाचे स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केलेले आहे.

चर्चासत्रे, सभा, संमेलने, पुजा, धार्मिक विधी या मध्ये हा समाज अग्रेसररित्या सहभाग होतो. या लोकांचा स्वभाव प्रेमळ, नियमशीर, वक्तशीर आहे. त्यामुळे इतर जातीच्या लोकांसमवेत या रेड्डी समाजातील लोकांचे लवकर चांगले संबध तयार होवून त्यांच्यात जवळीक निर्माण होते, हे त्यांचे महत्वाचे वैशिष्टये आहे. अगदी मध्ययुगीन कालखंडापासून

या समाजाने भारतीय प्रथा, परंपरेच्या, संस्कृतीच्या जोखदंडात एक सामाजिक आदराचे स्थान निर्माण केल्याचे दिसून येते.

तंटे, वाद, इतर अमानुष्य कृत्य, या पासून हा समाज नेहमी दुर असल्याचे इतर समाजातील लोकांनाही यांच्या बद्दल आपुलकी निर्माण होते. हिंदू धर्मातील सर्व प्रथा परंपरेचे पालन हा समाज करताना दिसून येते. त्यामुळे त्यांचे सामाजिक स्थान सर्वच सदरात (निम-मध्यम-उच्च) यामध्ये दिसते. म्हणून रेड्डी समाज हा व्यक्ती केंद्री झालेला नसून समाज केंद्रीत झालेला दिसतो. त्याची चौकट सिमीत नसून नेहमी विस्तारलेली दिसत असते. या लोकांची वस्ती मुख्यत्वे महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, राजस्थान व बंगाल या प्रदेशात असून बिहार, ओरिसा,पंजाब व उत्तरप्रदेश या प्रदेशातही थोडी आहे मात्र निरनिराळया प्रदेशातील रेड्डी लोकांचा परस्परांशी कसलाही संबंध नाही. रेड्डी हे नाव व्यावसायिक असल्यामुळे इतर जातीच्या लोकांनाही ते लावले जाते.

भारतातील निरनिराळया राज्यात त्या त्या राज्यांच्या नावाप्रमाणे ओळखले जाते उदा. महाराष्ट्र- मराठा रेड्डी त्याच प्रमाणे पुढील माहिती रेड्डी जातीची मिळते.

रेड्डी समाजाचा सामाजिक दृष्टया अभ्यास केला असता असे दिसून येते की, या समाजाची सामाजिक रचना इतर मागास वर्गापेक्षा सुधारीत आणि इतर उच्च वर्गा पेक्षा साधारण स्वरुपाची दिसून येते. पूर्वी हा समाज फारसा सधन नसल्यामुळे छपराच्या घरात राहताना दिसत असे, परंतू आर्थिक विपन्नता, समोर भेडसावणारे प्रश्न हळूहळू दूर झाल्यामुळे रेड्डी समाजाची सामाजिक चौकट आज बदलेली आहे. पुर्वी ग्रामीण भागात रेड्डी समाजाच्या दुर वस्तीस्थाने असायची. स्त्री-पुरुषांचे साधारण राहणीमान असायचे. यामध्ये (टोपी, धोतर, पायजमा, पैठणी साडी) यांचा समावेश होता. सामाजिक रचनेचा निवडलेल्या कार्याचा विचार केल्यास असे दिसते की, आज बऱ्याच मोठया प्रमाणत रेड्डी समाजाची घरे उत्तर-दक्षिण मुखी बांधलेली दिसतात. घरासमोर अंगन मागच्या बाजूला छोटा फुलांचा बगीचा, बैल, गाय, म्हैस इत्यादी पाळीव प्राणी बाळगताना दिसतात. शेतीचे अवजारे, शेतीतील धान्याची खळे समोरच्या आवारात दिसते. यांच्या शेतीचा निरीक्षण केले असता, असे दिसते की, हा समाज मुख्य पिकांबरोबर इतरही फळे भाजीपाला फुलांचा बगीचा इत्यादीचे काम करुन शेतीचे योग्य नियोजन या समाजाकडून केले जाते असे दिसते.

एकमेकांच्या सुख दुखात सहभागी होताना समाज नेहमीच दिसून येतो. रेड्डी समाजाची लग्ने रेड्डी समाजातीत रितीरिवाजा प्रमाणे होतात. त्यांच्यात पण फुलरेड्डी, हळदीरेड्डी असे प्रकार दिसून येतात. कारण फुलरेड्डी हळदी प्रकारच्या रेड्डींना मुलगी देत नाही. स्त्रीयांच्या कपाळी आडवे कुंकू आणि पुरुषही काही प्रमाणे गंध लावताना दिसून येतात. ज्येष्ठ पुरूषांवर वारकरी सांप्रदयाचा फार मोठा प्रभाव असल्याने हे माणसे मोठा गंध लावताना दिसून येतात. समाज कार्यात इतर समाजाच्या सुख दुःखात हा समाज नेहमीच सहभागी होताना दिसून येतो. हिंदू धर्माप्रमाणेच हा समाज रितीरिवाज, परंपरा, पालन करताना दिसून येतो सण, उत्सव मोठया हिरारीने साजरा करताना हा समाज दिसतो. कोणत्याही गैरमार्गाचा वापर करुन हा समाज धन, पैसा सामाजिक दर्जा मिळवताना फारसा आढळत नाही.

१९९० पासून या समाजाची सामाजिक रचना बदलून गेली आहे या समाजामध्ये शैक्षणिक सामाजिक आणि राजकीय संधी निर्माण झाल्यामुळे समाजाचा चेहरा बदलून गेला आहे[१०]. आज सर्वच क्षेत्रात रेड्डी समाजाने चांगल्या प्रकारे स्थान मिळविलेले आहे. हे कार्य क्षेत्राच्या निरिक्षणावरुन दिसते. तसेच समाजाचा सर्वांगिण विकास मोठया प्रमाणात होऊ लागला आहे. विविध क्षेत्रात रेड्डी समाजाच्या व्यक्ती आढळतात. याला महाराष्ट्रात नेवासा व रेणापुर तालुके अपवाद नाही ओ.बी.सी. च्या आरक्षणामुळे १९९३ पासून स्त्रीयांचा सहभाग मोठया प्रमाणावर वाढत असून सर्वच क्षेत्रात त्या चांगल्या प्रकारे स्थान निर्माण करताना दिसत आहे. त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. सामाजिक जनजीवनातून हा समाज आज सुधारलेला दिसत आहे. जागतिकीकरणाच्या काळातील अनेक सेवा सुविधा रेड्डी समाजाला मिळाल्यामुळे या समाजातून नेतृत्वाला साजेशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पिढयान-पिढया फुलांचा व्यवसाय, कमालीचे दारिद्रय उपजिविकेसाठी करावे लागणारे अमाप कष्ट, श्रमहीन जीवन यामधून हा समाज बाहेर पडलेला दिसून येतो.

रेड्डी समाजाची सामाजिक आर्थिक राजकीय उन्नती झालेली दिसून येते. समाज प्रबोधन हे मनोहर गोमारे ते प्रकाश रेड्डी यांनी चांगल्यारित्या केले असल्याचे दिसून येते. सामाजिक प्रश्नांची तीव्रता काळाच्या ओघात मोठया प्रमाणावर बदलत गेली. रेड्डींचे छप्पर म्हणून हिनवलेल्या वस्त्यात आज यल्लमानगर वस्ती म्हणून लोकप्रिय झाले आहे. त्याच

भागात असलेले संत यल्लमेश्वरची मंदिरे हि आज काही समाजासह इतर समाज सुधारनेचे विद्यापीठ निर्माण झालेली दिसतात. समाजाची प्रगती आता मोठया प्रमाणात झाली आहे[११].

आजच्या आधुनिक काळात समस्त मनाचा विकास हळूहळू होत आहे. त्यामुळे अप्रवृत्ती रेड्डी समाजातून बाहेर निघण्यास मदत होत आहे. म्हणून हा रेड्डी समाज, जनमार्गातून नवजीवन सुधारनेकडे वाटचाल करीत असताना दिसत आहे.

## रेड्डी समाजाच्या विकासातील सामाजिक अडथळे

कोणत्याही समाजाचा कितीही मोठया प्रमाणात विकास होत असला तरी समाजामध्ये अनेक प्रश्न असतात की, ज्यांचा पगडा समाजामध्ये पिढयान-पिढया पडलेला असतो. समाज सुधारणा करायची असेल तर नुसता आर्थिक विकास करून, सामाजिक विकास होत नसतो. आणि झाला तरी फार काळ टिकत नाही. म्हणून तो नेहमी टिकविण्यासाठी समाजाची मनोवृत्तीतच सुधारणा करणे हाच एक प्रयोग शिल्लक राहातो.

रेड्डी समाजाचे सामाजिक रचना त्याचे स्थान, आर्थिक चित्र यांचा अभ्यास केला परंतू समाजाला भेडसावणारे अनेक प्रश्न असतात. एक बाजू विकसीत असेल, दुसरी बाजू नेहमीच अविकसीत असते. त्यामुळे सर्वांगीन विकास फार गतीने होत नाही. त्यामध्ये रुढी,परंपरा, रितीरिवाज इत्यादी मोठया प्रमाणावर अडथळा असतो. लातूर आणि रेणापुर तालुक्या मध्ये अनेक प्रकारची सामाजिक आणि आर्थिक अडथळे आजही विकासाच्या मार्गात नेहमीच येतात. ते पुढील प्रमाणे पाहुया.

## सामाजिक अडथळे -

१. रेड्डी समाजामध्ये उच्च-निच प्रकारचा भेदभाव मोठया प्रमाणांवर दिसून येतो. त्यामध्ये उच्च प्रकारचे श्रीमंत घराणे, गरीब घराणे, अनेकदा छोटया वर्गाला शासन, अत्याचार यांना बळी पडावे लागते. शैक्षणिक विकास मोठया प्रमाणावर जरी झाला तरी समाजातील अंगीपडलेल्या रितरिवाज या काही संपूर्णपणे नष्ट होत नाही. त्यामुळे रेड्डी समाजाच्या विकासात अडथळा निर्माण झालेला आहे.

२. रेड्डी समाजात आजही काही प्रमाणात विवाह प्रथा, हूंडा पध्दती, मुलींना मुरळी म्हणून देवाच्या दारात सोडण्याचा प्रकार अंधश्रध्दा या बाबी सुध्दा याच समाजाच्या विकासात अडथळा निर्माण करीत आहे.

३.	विधवा प्रथा परंपरा विवाहामध्ये वधूपक्षाकडून अमाप घेण्याची प्रथा, यामुळेही ग्रामीण भागात सामाजिक काही प्रमाणात विकास होणे बाकी आहे.

४.	धर्म हा समाजाला सुधारण्यासाठी मार्गदर्शन करतो असे म्हटले जाते, परंतू काही प्रमाणात अडथळा ही दिसून आला आहे. धार्मिक परंपरा म्हणून हा समाज फार स्थलांतर करण्यास त्याची मानसिकता नसते, त्यामुळे खऱ्या अर्थाने विकासाच्या मार्गात धर्मातील रिती या प्रामुख्याने अडथळा ठरत आहे.

५.	राजकीय दृष्टया संशोधन अभ्यास करता असे दिसते की, रेड्डी समाजातील सगळीच लोक एका विचाराची नसल्यामुळे चांगल्या स्वरुपाचा विकास कार्यात काही व्यक्तीचा विरोध असतो, त्यामुळे विकास कार्य घडून येत नाही.

६.	रेड्डी समाजाच्या विकासात काही प्रमाणात जातीयता घटक मोठया प्रमाणत अडथळा निर्माण करतो. जरी या समाजात विकास होत असला तरी सामाजिक बांधिलकीची प्रकीया थंडावत चालली आहे हे दिसते. जातीयता या घटका वरुन लक्षात येते.

७.	राजकीय संघर्ष हा सुध्दा रेड्डी समाजाच्या विकासात अडथळा निर्माण करत आहे काही भागामध्ये चर्चा केली असे निष्पन्न होते की, रेड्डी समाज आणि मराठा यांच्यात सत्ता मिळविण्यासाठी मोठया प्रमाणावर राजकीय संघर्ष होते. त्यामध्ये जात घटकाचा मोठया प्रमाणावर वापर होतो. त्यानंतर राजकारण जरी संपले तरी समाजकारणात द्वेष मात्र तसाच राहिलेला दिसून येतो.

यावरून असे लक्षात येते की रेड्डी समाजाच्या विकासामध्ये अनेक प्रकारचे अडथळे असले तरी दुसऱ्या बाजूने या समाजाची सुधारणा मोठया प्रमाणावर होत असताना दिसून येत आहे. त्यामुळे जातीयता, द्वेष अंधश्रध्दा रिती याबद्दल इतर समाजासह रेड्डी समाजात मानसिकता मोठया प्रमाणावर बदलत आहे.

## ४.४ रेड्डी समाज- आर्थिक परिस्थिती -

महाराष्ट्रातील रेड्डी समाजाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन असे दिसते की, हा रेड्डी समाज आर्थिक दृष्टया द्वितीय दर्जामध्ये आलेला आहे. त्यामुळे सामाजिक आणि राजकीय प्रगती बरोबर आर्थिक परिस्थितीमध्येही सुधारणा होत गेली[१२].

अशाच प्रकारे लातूर जिल्हयातील लातूर आणि रेणापूर तालुक्यातील रेड्डी समाजाची परिस्थिती दिसुन येते. परंतु त्यामध्ये आजही काही आर्थिक अडथळे निर्माण होत आहे ते पुढील प्रमाणेः -

**आर्थिक अडथळे -**

रेड्डी समाजाच्या विकासामध्ये आर्थिक पाया चांगला नसल्यामुळे काही प्रमाणात समाजाचा विकास होण्यास आर्थिक प्रकारच्या अडचणी निर्माण होत आहे. रेणापूर व लातुर तालुक्यामध्ये एकंदरीत अभ्यास केला असता असे दिसत आहे की, आजही काही प्रमाणात आर्थिकता रेड्डी समाजाच्या विकासात अडथळा निर्माण करीत आहे. त्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे.

१. रेड्डी समाज हा प्रामुख्याने ग्रामीण भागामध्ये जास्त प्रमाणात राहत असल्यामुळे शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आणि इतर पारंपारीक व्यवसाय साधारतः दिसतात त्यामुळे शेतीमध्ये येणाऱ्या अनेक अडचणी वेळेवर न मिळणारा कर्ज पुरवठा, काही भागामध्ये याची अडचणी (आर्थिक) आहे म्हणून पारंपारीक शेती हा सुध्दा रेड्डी समाजाच्या आर्थिक विकासातील अडथळा आहे.

२. सहकारी संस्थामधून वेळेवर न होणारा पतपूरवठा, यामुळे मोठया प्रमाणांवर विकासात अडथळा निर्माण होत आहे असे दिसते. काही भागातील रेड्डी समाजाच्या शेतकऱ्यास अनेक प्रकारच्या अडचणी दुर कराव्या लागतात. त्यासाठी वेळेवर पतपूरवठा झाला नाहीतर हा समाज आर्थिक कर्जदरीत सापडतो.

३. इतर व्यवसायात शिरण्याचे प्रमाण रेड्डी समाजाचे फार कमी असल्यामुळे किंवा मानसिकता नसल्यामुळे इतर स्वरुपाचे आर्थिक उत्पन्न फार कमी प्रमाणात या समाजाला मिळते.

४. राजकीय संघर्ष हा सुध्दा रेड्डी समाजातील आर्थिक विकासात अडथळा आहे सर्व ठिकाणी रेड्डी समाजाच्या चांगली राजकीय पार्श्वभूमी आहे. असे नाही तर काही भागात अनेक प्रकारच्या राजकीय अडचणींना रेड्डी समाजाला तोंड द्यावे लागते. त्यामुळे आर्थिक विकास होत नाही.

५. रेड्डी समाजामध्ये आर्थिक विकासाच्या बाबतीत प्रबोधन किंवा मार्गदर्शन कमी असल्यामुळे ग्रामीत भागात आर्थिक विकासाचा फारसा विकास झालेला नाही असे दिसून येते.

६. सरकारी, निमसरकारी दरबारी अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. त्यामुळे इतर मागासवर्गीय असूनही काही वेळेस त्यांना शासनाच्या आर्थिक योजनेचा रेड्डी समाजाला फायदा मिळालेला दिसत नाही. आर्थिक उत्पन्न कमी असणाऱ्या लोकांना नेहमी शासनाकडून उपेक्षित राहवे लागते. त्यामुळे आर्थिक विकास फारसा झालेला नाही किंवा तो कमी जास्त प्रमाणात झालेला दिसून येतो.

७. राजकीय द्वेष, एकमेकांची कामे होवू न देणे, गटा-तटाचे राजकारण यामुळे आर्थिक पाया ढासळत चाललेला समाजाचा दिसून येतो.

८. रेड्डी समाजात काही भागामध्ये पुरुष प्रधान संस्कृतीचा प्रभाव असल्याचे जाणवते. त्यामुळे स्त्रीला अजून आर्थिक व्यवहारी ज्ञान नसल्याचे दिसून येते. त्यामूळे कमवते पुरूष फार कमी असल्याचे दिसून येते.

९. खर्च आणि उत्पन्न यांचा मेळ नाही. त्यामुळे आर्थिक अडचणींचा रेड्डी समाजाला नेहमी सामोरे जावे लागते हे दिसून येते[१३].

वरील कारणावरुन असे लक्षात येते की रेड्डी समाजामध्ये अनेक प्रकारच्या आर्थिक अडचणी जरी असल्या तरी रेड्डी समाजामध्ये जिद्द, साहस ही मोठया प्रमाणावर दिसून येते.

## ४.५ लातूर जिल्हयातील रेड्डी समाज-

लातूर हा जिल्हा प्रामुख्याने राजकीय दृष्टया जागृत आहे. सामाजिक, आर्थिक विकासा बरोबरच या ठिकाणी राजकीय विकासही मोठया प्रमाणांवर झालेला आहे. त्यामुळे समाजातील सर्वच घटकांना राजकारणाची आवड निर्माण झाली आहे. स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात असे. साधारणत: कॉंग्रेसी प्रभाव १९७५ पासून या जिल्हयात वाढला. पुढे कॉंग्रेसचा बालेकिल्ला म्हणून हा जिल्हा ओळखला जाऊ लागला. कॉंग्रेसशी विचाराला नेहमी साथ देणारा हा जिल्हा सहकाराचे राजकारण म्हणुन प्रसिद्ध आहे.

पुढे १९९५ नंतर ओबीसीचे राजकारण सुरु झाले अर्थात त्याची पाया भरणी १९९० च्या दशकात सुरु झाली होती. ७३ वी घटना दुरुस्ती, मंडल आयोग, यामुळे ओबीसी राजकारणाला याठिकाणी वेगळे स्वरुपाचे महत्व प्राप्त झाले. रेड्डी समाज नेहमीच काँग्रेसच्या तत्वाला धरुन राजकारण करताना दिसून येतो. पूढे लातूर जिल्हयात ही राजकीय परिवर्तन झाले. काँग्रेसला चांगल्या प्रकारचा जन पाठिंबा निवडणुकीच्या माध्यमातून मिळाला.

सदरील संशोधन अहवालाच्या अभ्यासावरून अशी माहिती पुढे येते की, रेड्डी समाज हा राज्यभर पसरलेला आणि वेगवेगळया क्षेत्रात चमकणारा असल्याने सर्वदूर प्रचलित आहे. तरीही लातूर जिल्हयातील रेड्डी समाजाची वैशिष्टये वेगळया स्वरूपाची भासतात. ती अशी की, येथील समाज अतिशय कष्टाळू, नेटकेपणे आणि नेमकेपणे काम करणारा आहे. काम हे परमेश्वर, ही संकल्पना ते इतक्या नेमकेपणे मांडू शकले. कारण ती त्यांची जीवन पद्धतीच होती. संपुर्ण रेड्डी समाज कुठल्याही कामात अशाच तल्लीनपणे मग्न होतो. वकील, शेतकरी, कारखानदार, बिल्डर, दुकानदार अशा कोणत्याही व्यवसायातील रेड्डी पाहिले तरी ते तेथे चमकताना दिसतात.

जिल्हाभर या समाजाचे वास्तव्य आहे. अशी माहिती या संशोधन अभ्यासाच्या निमित्ताने पुढे येते. तसे सव्वाशे वर्षापूर्वीची दुरदृष्टी दाखविणे विलक्षणच आहे[१४].

लातूर जिल्हयातील रेड्डी समाज तसा प्रत्येक भागामध्ये वाडया, वस्त्या, रेड्डीनगर अशामध्ये विखुरलेला आहे. सापिकापथ या नावानेही त्यांची वस्तीस्थाने प्रसिद्ध आहे. सापिका याचा अर्थ सहा पिके, वर्षात एक पिके घेण्याची कोरडवाहक शेती प्रचलित असताना सहा पिके घेण्याजागी सुपीक आणि ओलिताची जमिन शोधण्यात चातुर्य आहे. कुठल्याही क्षेत्रातील सुपीकता हेरण्यात रेड्डींची बरोबरी करणे कुणालाही कठीणच आहे.

मेहनत, बुद्धिमत्ता, आर्थिक प्रगती, दुरदृष्टी १९९० पासून शैक्षणिक प्रगती करणारा रेड्डी-समाज राजकारणात आधीपासुनच कमी-जास्त प्रमाणात सक्रिय होता. स्थानिक राजकारणासह विधानसभा- परिषदमध्ये जिल्हयातून रेड्डी समाजाला प्रतिनिधित्व मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न चाललेले आहेत. त्यामुळे हा समाज राजकीय सत्तेपासुन वंचित राहिला असे म्हणता येणार नाही. तरीही आपण सत्तेपासुन दुर राहिलो ही भावना रेड्डी समाजात नेहमी दिसते.

मनोहर गोमारे आणि विक्रम गोजमगुंडे यांना जेवढे राजकीय महत्व मिळाले. तेवढे कुणाही रेड्डी समाजाच्या नेतृत्वास मिळाले नाही.

लातूर जिल्हा राजकारण प्रामुख्याने महाराष्ट्रभर नव्हेतर देशभर प्रचलित आहे. समाजाच्या आर्थिक, सामाजिक विकासाबरोबर राजकीय विकास ही चांगल्या प्रकारे झालेला आहे.

स्वातंत्र्यानंतर मुख्यतः स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांनी प्रभावित झालेला जिल्हा आहे. त्यांचे 'बेरजेचे राजकारण' ही विचारसरणी महाराष्ट्रसह लातूर जिल्हयातही रूजली. त्याचा परिणाम म्हणजे समाजातील सर्वच स्तरातील व्यक्तींना राजकारणाची संधीा ज्या-ज्या विभागात प्राप्त झाली. लातूर जिल्हा त्याला अपवाद नव्हता.

लातूर जिल्हयातील रेड्डी समाजाचा अभ्यास केला असता असे दिसते की, जिल्हयाच्या १० तालुक्यामध्ये त्यांची लोकसंख्या ६,८८,०७७ एवढी असतानाही जिल्हयाच्या राजकारणात तितकीशी संधी त्यांना मिळाली नाही[१५]. कारण हा समाज एकजुट नाही. आर्थिक उन्नतीचे स्त्रोत राजकारण करण्यास अडचणी निर्माण झाल्या.

१९९० च्या दशकानंतर महाराष्ट्रातीलनव्हे तर देशातील ओ.बी.सी.च्या राजकारणाचे पडसाद जिल्हयातही उमटलेल दिसते .त्याचा फायदा १९९० नंतर समाजाला झालेला दिसतो. राजू अकनगिरे, ओमप्रकाश गोडभरले यांचे नेतृत्व उभारले गेले. उत्तम अभ्यासक, वक्तृत्व कामे करण्याची पद्धत, पक्षनिष्ठा यामुळे नामदेव पाटील (रेड्डी) हे जिल्हा परिषदच्या अध्यक्षापासून पक्षाच्या अनेक उच्च पदापर्यंत पोहचले. आणि येथूनच रेड्डी समाजाच्या नेतृत्वाची वाटचाल जिल्हयामध्ये सुरू झाली.

हळूहळू जिल्हयाच्या विविध भागांमध्ये ओ.बी.सी. फायद्यामुळे नेतृत्व निर्माण झाल्याचे दिसते. त्या काळातील सत्तेमध्ये त्यांना चांगला सहभाग मिळाला. उदा. लातूर शहरामध्ये सत्यवान पोकळे, व्यंकट पन्हाळे, गोजंमगुंडे, वाल्मीक माडे, प्रकाश रेड्डी इ. तर लातूर तालूक्यात राजू अकनगिरे, शशिकांत अकनगिरे, धनंजय कोंबडे, ओमभाऊ सुडे. रेणापूरमध्ये ओमप्रकाश गोडभरले, शामराव आकनगिरे, गोपाळ अकनगिरे इ. नेतृत्व निर्माण झाले.

एकीकडे सहकारामधील शुगर लॉबी मोठी शक्ती असुनही त्यांच्याकडे अर्थकारण, समाजकारण नियंत्रित असतानाही नेतृत्व रेड्डी व्यक्तीने काही प्रमाणात केल्याचे लातूर जिल्हयात दिसते.

या संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने लातूर जिल्हयातील रेड्डी समाजाचे तीन वैशिष्टये दिसतात. एक म्हणजे रेड्डी समाज हा एकसंघ नाही. दुसरे त्यांच्यामध्ये नेतृत्वाचा अभाव आहे. जे नेतृत्व निर्माण झाले ते सहकारी राजकारणाच्या शक्तीपुढे फार काळ टिकू शकले नाही. आणि तिसरे लातूर जिल्हयामध्ये घराणेशाहीच्या राजकारणामुळे रेड्डी समाजाला फारशी संधी दिली गेली नाही. जी संधी दिली गेली ती आरक्षणातर दिलेली नाही. आणखी एक महत्वाचे वैशिष्टये म्हणजे इतर मागासवर्गीचे नेतृत्व करताना रेड्डी समाज दिसतो.

लातूर जिल्हयातील रेड्डी समाजावर राज्यपातळीवरील मनोहर गोमारे, विक्रम गोजमगुंडे, ओमप्रकाश गोडभरले यांचा प्रभाव पडलेला आहे. कारण त्यांनी केलेले 'नात्यागोत्याचे राजकारण' तसेच समाजवादी जनतादल व शेतकरी संघ या माध्यमातून निर्माण केलेला संपर्क रेड्डी समाज ही संघटना महाराष्ट्रासह जिल्हयाच्या कानाकोपऱ्यात हिच्या शाखा झालेल्या आहेत. या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांबरोबर राजकीय कार्य मोठया प्रमाणावर चालताना दिसते. हिच्या प्रत्येक तालुक्यासह प्रमुख शाखा असुन तिच्याच गावोगाव उपशाखा मोठया प्रमाणावर स्थापन झाल्या आहे. यामार्फत ओ.बी.सी. समाजासह रेड्डी समाजाला ही जागृत करण्याचे काम केले जाते. या संघटनेच्या कार्यामध्ये प्रामुख्याने रेड्डी नेते कमी-जास्त प्रमाणात पुढाकार घेत असल्याचे दिसते. सामाजिक व राजकीय कार्याबरोबर या संघटनेच्या माध्यमातून धार्मिक प्रबोधनाचे कार्यही केले जाते. उदा. विविध जयंती साजरी करणे, किर्तन, प्रवचन इ. धार्मिक कार्यक्रमही घेतले जातात.

अभ्यास दृष्टीने असे दिसते की, जिल्हयाच्या राजकारणात दुय्यमरित्या दिसतो. कारण २००२ च्या जिल्हा परिषद निवडणुकीवर सहच दृष्टीक्षेप असता असे दिसते की, रेड्डी समाजाचा राजकीय सहभाग चांगला आहे. हे खालील तक्त्यावरून लक्षात येईल (जि.प. २००२ विश्लेषण).

| अ. नं. | जि.प. सदस्य जात | आकडेवारी |
|---|---|---|
| १. | मराठा व कुणबी | ३२ |
| २. | रेड्डी | ०७ |
| ३. | वंजारी | ०५ |
| ४. | धनगर | ०३ |
| ५. | इतरमागास | १३ |

| | | |
|---|---|---|
| ६. | मांग | ०२ |
| ७. | चांभार | ०२ |
| ८. | महार | ०२ |
| ९. | नवबौद्ध | ०२ |
| १०. | आदिवासी | ०४ |
| ११. | मागासाचा प्रवेश प्रवर्ग | ०३ |
| | **एकुण -** | **७५** |

(महाराष्ट्रातील राजकारण व राजकिय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ २००२ : पान नं.२३४.)[१६]

२००५-०६ निवडणुक निकाल कमी-जास्त प्रमाणात अशाच प्रकारचा आहे.

जिल्हयाच्या राजकारणामध्ये ओ.बी.सी. च्या प्रश्नांचीा जाण असलेले राज्य-केंद्र पातळीवरील नेते शरद पवार यांच्या भुमिकेशी समरस संपुर्ण रेड्डी समाज दिसतो.

तसेच रेड्डी समाजाच्या अभ्यासावरून अशी माहिती पुढे येते की, आर्थिक, सामाजिक दृष्टया हा समाज सुधारलेला आहे. तसेच राजकीयदृष्टया सुद्धा हा समाज जागृत झालेला आहे. म्हणून जिल्हयाच्या राजकारणात स्वतःच्या अस्तित्वाची जाण ठेवून समरस होताना दिसत आहे. त्यांचा सहभागात उत्तरोत्तर वाढ होताना दिसत आहे.

आधुनिक काळात पुरूषांबरोबर महिलांही राजकारणात उतरल्याचे दिसत आहे. उदा. लातूर- सौ.एन. चिंते, सौ.जटाळ, सौ.एल. रेड्डी, इंदूताई इंगे, कमलताई अकनगिरे इ. यावरून लातूर जिल्हयाच्या सर्वांगिण विकास प्रक्रियेत रेड्डी समाजाला समाधानाचे स्थान प्राप्त झाल्याचे दिसते. जरी लातूर जिल्हयामध्ये मराठा व रेड्डी राजकीय संघर्ष दिसत असला तरी विकास प्रक्रियेत त्यांच्यामध्ये एकजुट दिसते. गटतट, राजनीतिभेद या प्रकारात जरी रेड्डी समाज मागे असला तरीही त्याच्या भुतकाळातील वाटचालीवरून भविष्यकाळातील राजकीय वास्तव्य त्यांना चांगल्या प्रकारचे स्थान मिळवून देईल. यात शंका नाही.

त्यामध्ये रेणापूर तालुक्यातील राजनितीचा अभ्यास प्रथम पाहूया.

## रेणापूर तालुका -

लातूर जिल्हयामध्ये हा तालुका प्रामुख्याने राजकीय दृष्टया नेहमीच प्रगत स्वरुपाचा दिसून येतो. त्यामुळे सामाजिक आणि आर्थिक विकास या ठिकाणी मोठया प्रमाणात झालेला

दिसुन येतो. रेणापूर तालुक्या मध्ये लोकसंख्या १९९१ च्या जनगणने नुसार २,२६,६९८ एवढी आहे. त्यानुसार रेड्डी समाज १८,७३० एवढा दिसून येतो[१७]. या तालुक्यामध्ये रेड्डी समाज राजकीय दृष्टया नेहमीच जागृत स्वरुपाचा आहे. महाराष्ट्राच्या पातळीवर बोट दाखवावे असे नेतृत्व या ठिकाणी निर्माण झाले आहे. त्यामध्ये वैद्यनाथ शिंदे (सध्याचे आमदार,काँग्रेस), यशवंतराव पाटील (रेणा सह. साखर कारखाना अध्यक्ष), सुशीलकुमार पाटील (काँग्रेस), रजनीताई पाटील (लातूर), रमेश पाटील (काँग्रेस) इ. नेते रेणापुर तालुक्यात आहेत.

या सर्वांची रेणापूर तालुक्या मध्ये नेतृत्वाची फळी निर्माण झालेली आहे. रेणापुर तालुक्यामध्ये ८०% अंदाजे देशमुख गट आणि पाटील गट हे प्रामुख्याने दिसून येते. तिसरा गट ओमप्रकाश गोडभरले यांचा असला तरी त्यांचा प्रभाव उत्तरोत्तर कमी होत आहे. त्याचप्रमाणे मागील विधानसभेपासून प्रशांत अकानगिरे (एनसीपी, शहरप्रमुख) यांचा प्रभाव वाढत चाललेला दिसत आहे.

या राजकीय संघर्षामध्ये रेड्डी समाजाचे एकगठ्ठा मतदान नेहमी देशमुख आणि इतर गटात विभागलेले दिसून येते. परंतू जास्त प्रमाणात हा रेड्डी समाज काँग्रेसकडे झुकलेला आहे. कारण देशमुख घराण्याविषयी असणारी आपुलकी, तालुक्यात रेड्डी समाजाचे नेते शामराव अगनगिरे हे काँग्रेस पक्षात आहेत. त्यांचे असणारे नेतृत्वामुळे रेड्डी समाजाचे मतदान काँग्रेसच्या पदरात नेहमीच पडलेले दिसून येते. त्यांचे आणखी एक महत्वपूर्ण काम म्हणजे देशमुखांनी रेड्डी समाजातील अनेक प्रकारच्या अडचणी मोठया प्रमाणावर सोडविल्या आहेत. त्यामुळे हा समाज कॉग्रसकडे आकर्षित होण्यास मदत झाली आहे. रेणापूर तालुक्यात पंचायत राज मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षामध्ये नेहमी सत्तातर होताना दिसुन येते[१८].

रेड्डी समाज हा राज्यातल्या राजकारणाप्रमाणेच ग्रामीण भागातही अनेक प्रकारच्या राजकीय सत्तेमध्ये त्यांनी सहभाग घेतलेला दिसून येतो. त्यामुळे रेणापूर तालुक्यामध्ये आज काही भागामध्ये रेड्डी समाज एकत्र येवून आणि इतर समाजाचा पाठिंबा घेऊन ग्रामीण भागात, अनेक सत्तेची केंद्र ताब्यात घेण्यास यश मिळविले आहे. उदा. जवळगा,आनंदवाडी, पानगांव या परिसरात या राजकीय घडामोडी मोठया प्रमाणावर दिसून येतात. म्हणून इतर

सामाजिक अंगाने रेड्डी समाजाचा अभ्यास केल्यास राजकारणात या समाजाला मराठा जातीशी मोठया प्रमाणावर संघर्ष करावा लागतो असे दिसते.

तरीही रेणापूर तालुक्यात राजकीय सत्तास्थाने ही स्वकतृत्वापेक्षा राजकीय संधीमुळे रेड्डी समाजाला पदे दिली जातात[१९]. ग्रामीण भाग असूनही अनेक सत्ता केंद्रात रेड्डी समाजाने चांगले नेतृत्व भूषविले आहे. पंचायत राज मध्ये ओमप्रकाश गोडभरले, दादाराव आलापुरे, रजनीकांत औसेकर यांनी पद भुषविले आहे. आजही बाजार समिती रेणापूर या ठिकाणी रेड्डी समाजाचे सदस्य आहेत. कॉग्रेस आणि राष्ट्रवादी तालुकास्तरीय पदावर अनेक रेड्डी समाजाचे कार्यकर्ते आहेत.

अशा या परिस्थितीमध्ये मराठा आणि रेड्डी राजकीय संघर्षामध्ये रेड्डी समाजाचे नेतृत्व करताना, स्थानिक रेड्डी नेत्यांना अनेक प्रकारच्या अडचणी येतात. त्यामुळे जातीय राजकारण, बहुसंख्य समाज हा लोकसंख्येच्या मानाने कमी राजकीय पदे असणारा आहे. त्यामुळे रेड्डी समाजाची खरी परिस्थिती समोर आणणे. आणि बहुसंख्य समाजाला न्याय मिळवून देणे. रेड्डी समाजाच्या नेतृत्वाच्या अडचणी समजून, त्यांचे नेतृत्व गतिमान करण्यासाठी हा अभ्यास निवडलेला आहे.

**लातूर तालुका -**

लातूर जिल्हयातील हा तालुका रेणापूर तालुक्या प्रमाणेच सर्वच क्षेत्रात राजकीयदृष्टया अग्रेसर आहे. या तालुक्याची साधारणतः लोकसंख्या २,१०,०३२ एवढी आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या लोकसंख्या पाठोपाठ रेड्डी समाजाची लोकसंख्या ३०,८३० एवढी आहे[२०]. पूर्वी हा कॉंग्रेस वर्चस्व असलेला तालुका होता. आजही कॉंग्रेसचा प्रभाव याठिकाणी आहे. विधानसभा सदस्य आणि सध्याचे अवजड उद्योग मंत्री विलासराव देशमुख यांचे चिरंजीव अमित देशमुख हे आहेत. या तालुक्यात सत्तांतर नेहमी कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीमध्ये होताना दिसते. प्रामुख्याने या तालुक्यामध्ये विलासराव देशमुख आणि दिलीपराव देशमुख यांचे नेतृत्व दिसते. या दोन्ही नेतृत्वाचा फार मोठा प्रभाव लातूर तालुक्यामध्ये दिसतो.

त्याचप्रमाणे मनोहर गोमारे यांचा नातेसंबध असलेला हा तालुका असल्याने त्याच्या नेतृत्वाचा प्रभाव मोठया प्रमाणावर येथील रेड्डी समाजावर पडलेली दिसून येतो. त्यामुळे या ठिकाणी एकगठ्ठा स्वरुपाचे मतदान कॉंग्रेसला पडलेले दिसून येतो. म्हणून कॉंग्रेसची ताकद

दिवसेंदिवस वाढत असताना दिसून येते. तालुक्याच्या राजकारणात रेड्डी समाज नेहमीच निवडणूकीत उभा राहीलेला दिसून येतो. त्यामुळे राजकारणाची बाजू रेड्डी समाजाची वृध्दीगत होत असताना दिसून येते. आजही या ठिकाणी तालुका पंचायती मध्ये रेड्डी समाजाच्या त्यामध्ये स्वर्गीय नामदेव पाटील (रेड्डी) (माजी जिल्हा परिषद अध्यक्ष), विक्रम गोजमगुंडे (माजी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती), प्रकाश रेड्डी (धरती बचाव आंदोलन), वाल्मीक माडे (माजी पंचायत समिती सभापती, लातूर), इ. तसेच अनेक राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही काही पदावर काम पाहत आहे[२१].

आज या तालुक्यामध्ये मराठा आणि रेड्डी यांच्या मध्ये जोरदार संघर्ष होताना दिसत आहे. प्रामुख्याने या ठिकाणी सुध्दा सत्तास्थाने ही आरक्षणामुळेच मिळाल्याचे दिसुन येते. या तालुक्यामध्ये राजू अकनगिरे, शशिकांत अकनगिरे, धनंजय कोबडे यांचाही मोठया प्रमाणावर प्रभाव असल्याचे दिसून येतो.

सामाजिक, धार्मिक, ऐतिहासिक बाबतीत प्रसिध्द असलेला हा तालुका राजकीय दृष्टया सुध्दा तेवढाच लोकप्रिय आहे. आणि आता लातूर पॅटर्न मूळे संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक झालेला आहे. म्हणून मुळातच चांगल्या व्यक्तीची छाप असलेला हा तालुका, पुढे तरूण नेतृत्वाच्या राजकारणांनी तालुक्याचे नाव लौकीक झाले. या तालुक्या मध्ये रेड्डी समाज आणि मराठा जातीचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे रेड्डी व मराठा असा राजकीय संघर्ष या ठिकाणी मोठया प्रमाणात दिसून येतो. येथील राजकारणात रेड्डी जातीला वेगळयाच स्वरुपाचे महत्व आले आहे[२२]. येथील प्रत्येक निवडणूकीत समाज कधी रेड्डी समाजाकडे वळतो. तर कधी मराठी समाजाकडे वळतो कारण या दोन्ही समाजाकडे सामाजिक, धार्मिक या बाबतीत नेहमीच अग्रेसर, राहीलेला हा तालुका बहुजन राजकारण म्हणूनही पुढे आला आहे. येथील राजकारण नुसते सामाजिकतेचे नसून ते राजकीय आणि सर्वांगिण स्वरुपाचे दिसून येते[२३]. त्यामुळे या ठिकाणी समाजाच्या सर्वांगीन स्वरूपाचा प्रभाव येथील राजकारण आपणांस दिसून येतो. विलासराव देशमुख आणि शिवाजीराव पाटील कव्हेकर यांचे नेतृत्व लाभलेला हा तालुका राजकीय दृष्टया या दोन्ही गटामध्ये विभागलेला आहे. त्याच प्रमाणात शिवसेना, भाजप यांचा काही प्रमाणात येथील राजकारणांवर प्रभाव आहे. शिवसनेचे जिल्हा प्रमुख व्यंकट पन्हाळे यांचाही येथील इतर मागासवर्गावर काही प्रमाणामध्ये प्रभाव असल्याचे दिसून येते. या तालुक्यामध्ये विधान सभा, लोकसभा

निवडणुकीत फारशी जातीयता दिसून येत नसली तरी येथील स्थानिक राजकारणामध्ये जातीयता मात्र मोठया प्रमाणांवर दिसून आल्याचे स्पष्ट होते.

## लातूर व रेणापूर तालुक्यातील मराठा व रेड्डी राजकीय संघर्ष -

लातूर जिल्हा हा राजकीय दृष्टया संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. स्वातंत्र्यकालीन कालखंडापासून येथील राजकारणाला चांगल्या प्रकारची दिशा देण्याचे काम स्व.यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, भाऊसाहेब हिरे, ल. मा. कोळसे, बाळासाहेब खेर, बाळासाहेब निंबाळकर, विठ्ठलराव विखे इ. अनेक राजकीय सुधारकांनी याठिकाणच्या राजकारणात चांगली दिशा देण्याचे काम केलेले होते. परंतु तरीही कमी जास्त प्रमाणात येथील राजकारणात जातीय घटकाचे प्राबल्य सतत आहे. सदरील संशोधनामध्ये लातूर आणि रेणापूर तालुक्यातील रेड्डी आणि मराठा राजकीय संघर्ष १९९० पासून सातत्याने होत आलेला आहे. या तालुक्यामध्ये रेड्डी आणि मराठा या समाजाचा राजकीय सत्तेसाठी १९९० की पासून नेहमीच संघर्ष झालेला आहे. रेड्डी समाजाबरोबर इतर मागासवर्गीयांचे नेतृत्व म्हणून नामदेव पाटील (रेड्डी) हे जिल्हा परिषद अध्यक्ष झाले. आणि येथुन पुढे जास्त प्रमाणात रेड्डी व मराठा राजकीय संघर्षाला सुरूवात झाली.

ग्रामपंचायतीपासुन ते जिल्हा परिषद पर्यंत, रेणापुर सहकारी साखर कारखाना निवडणूक, लातूर सहकारी बँक निवडणुका, तालुक्यातील विविध कार्यकारी सोसायटी, रेणापुर तालुका बाजार समिती, तालुका खरेदी विक्री संघ, या सत्तेच्या प्रत्येक वर्तुळामध्ये मराठा आणि रेड्डी यामध्ये संघर्ष आहे.

प्रामुख्याने ओमप्रकाश गोडभरले, हनुमंतराव अकनगिरे, गोपाळ अकनगिरे, विक्रम गोजममुंडे, व्यंकट पन्हाळे इ. रेड्डी समाजाचे नेत्यांना तालुक्यात मानतात. याठिकाणी पंचायत समितीचे १० गट व जिल्हा परिषदचे ५ गट आहे.

या व्यतिरिक्त मराठा समाजाचे विलासराव देशमुख, दिलीपराव देशमुख, मधूकरराव कोकाटे, कै.बब्रुवान काळे, सर्जेराव मोरे, आबासाहेब चव्हाण, दिंगबर शिंदे, रमेश पाटील इ. वरील सर्व मराठा व रेड्डी नेत्यामध्ये अगदी पक्षीय उमेदवारी पासुन ते तालुका स्थानिक सत्तेच्या सर्व ठिकाणी यांचा राजकीय संघर्ष आहे. सध्या तालुक्यामध्ये काँग्रेस आणि भाजप हे दोन प्रभावी पक्ष आहे. काँग्रेसचे नेतृत्व विलासराव देशमुख करतात

तर भाजपचे नेतृत्व ओमप्रकाश गोडभरले करतात.

रेणापूर तालुक्यामध्ये ही कमी जास्त प्रमाणात असाच स्वरूपाचा संघर्ष आहे. याठिकाणी रेड्डी समाजामध्ये जर्नादन वंगवाड, ओमप्रकाश पडीले, विक्रम गोजममुंडे, भारत साबदे, धनंजय कोंबडे, राजू अकनगिरे इ. व्यक्ती रेड्डी समाजातील नेते आहेत. येथील राजकारणात यांचा सक्रिय सहभाग आहे. सत्तेच्या प्रत्येक वर्तुळामध्ये रेड्डी विरूद्ध मराठा असा राजकारण संघर्ष याही तालुक्यात आहे. पंचायतराजच्या सर्व निवडणुकासह इतरही सहकारी, बाजार समिती, खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत अगदी पक्षीय उमेदवारी मिळणेपासुन ते मतदान प्रक्रियेपर्यंत राजकीय संघर्ष त्याठिकाणी आहे. मराठा समाजामध्ये एस.आर.देशमुख, बब्रुवान काळे, नवनाथ भोसले, कुमार पाटील, आप्पासाहेब देशमुख इ. आहेत[२४].

या तालुक्यात राजकीय सत्तेच्या घडामोडीमध्ये मराठा आणि रेड्डी समाजाचा संघर्ष नेहमीच झालेला आहे. सत्ता मिळविण्यासाठी दोन्ही समाजाने आटोकाट प्रयत्न करताना दिसतात. वरील दोन्हीही तालुक्यामध्ये एकंदरीत वास्तविक परिस्थितीचा अभ्यास केले असता असे दिसून येते की, मराठा आणि रेड्डी यांचा राजकीय संघर्ष ‘जात’ या घटकांवर अप्रत्यक्षरित्या आधारलेला आहे. कारण दोन्ही ठिकाणच्या नेत्यांचा प्रभावसारखा आहे. त्यामुळे कोणत्याही निवडणुकीत उमेदवारी मिळणेपासुन रेड्डी व मराठी व्यक्तीत रस्सीखेच चालु होते. जर कुणबी या नात्याने मराठयांना उमेदवारी मिळाली तर त्याठिकाणी रेड्डी समाज मराठी उमेदवाराचा मतदान करीत नाही. आणि रेड्डी व्यक्तीला उमेदवारी मिळाली तर मराठा त्याला मतदान करीत नाही. अशा प्रकारचा संघर्ष दोन्ही तालुक्यामध्ये प्रत्येक निवडणुकीत बघावयास मिळतो.

एकंदरीत याठिकाणी जात या घटकामुळे येथील राजकारणाला वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे. आणखी एक महत्वपूर्ण संघर्ष रेड्डी समाजाच्या व्यक्तींना या ठिकाणी बघावयास मिळतो. तो म्हणजे रेड्डी व्यक्ती सत्तेत सहभागी झाल्यानंतर त्यांची सुत्रे मात्र अप्रत्यक्ष मराठी माणसे हलविताना दिसतात. एकीकडे त्याला कायद्याने राजकीय सत्तेत सहभाग मिळाला. पंरतु सत्तेचा वापर मात्र त्यांना व्यवस्थितरित्या घेता येत नाही. कारण यावर मराठयांचे नियंत्रण दिसून येते. रेड्डी समाजाच्या सामाजिक, राजकीय प्रतिष्ठा या मराठी

वर्चस्वाला धक्का देणा-या असल्यामुळे या दोन्ही तालुक्यामध्ये मराठा व रेड्डी असा राजकीय संघर्ष मोठया प्रमाणावर दिसतो.

मुळातः मराठा ही जात पारंपारिक वर्चस्वशाली जात आहे. १९९० पर्यंत त्यांनी स्वनियंत्रित राजकारण केले आहे. परंतु ७३ व्या घटना दुरूस्तीनंतर येथील राजकारणाला धक्के बसले. अशी ही जात राजकारणातील प्रत्यक्ष सहभागी न राहता किंग मेकर बनली आहे.

या संशोधनाच्या निमित्ताने यातुन अनेक महत्वपूर्ण घडामोडी पुढे येण्यास मदत झाली आहे. म्हणून या विषयाचे महत्व एक वेगळया स्वरूपाचे आहे असे दिसते.

## *संदर्भ* -


१. मराठी शब्द कोश, व्याख्या रेड्डी समाज, वर्ष १९९७, पान नं.९५५.
२. भारतीय विश्वकोश, पंडीत महादेवजी शास्त्री जोधी कार्यवाह, भारतीय संस्कृती कोश मंडळ, शनिवार पेठ पूणे-१० पान ४३०.
३. मनुस्मृती ग्रंथ, 'अर्धली', अहमदनगर कॉलेज ग्रंथालय, पान नं.१३५.
४. कोतकर एस. व्ही., महाराष्ट्रीयन ज्ञानकोष, रेड्डी समाजाचा इतिहास, वर्ष १९९६, पान १४५.
५. अहमदनगर जिल्हा गॅझेटर, अहमदनगर जिल्हा, इतिहास, वर्ष २००५-०६, पान नं.४०.
६. समाज विज्ञानकोष, रेड्डी समाज, वर्ष १९९५, पान नं.१३०,
७. रसेल आणि हिरालाल, महाराष्ट्रीय ज्ञानकोष, रेड्डी फुलारी, मालाकार, वर्ष १९९१, पान नं.१५६.
८. देशमुख भुषण, ओ.बी.सी. राजकारण, मुलाखत दि.१४ ऑक्टो.२००७.
९. मेहेत्रे एम.आर., शासकीय अधिकारी, रेणापुर, समाज इतिहास पार्श्वभूमी, मु. १७ ऑक्टो. ०७.
१०. व्यंकट पन्हाळे (समाज इतिहास मार्गदर्शन), मु. १५ ऑक्टो. ०७.
११. डॉ.डी.एन.चिंटे, रेड्डी समाज सामाजिक रचना, मु. १८ ऑक्टो. ०७.
१२. लातूर जिल्हयाचा इतिहास, म.राज्य इतिहास संशोधन मंडळ व पाठयपुस्तक निर्मिती विभाग, पुणे, वर्ष २००१, पान नं.१४.
१३. प्रा.लिमिटे, स्टडी सर्कल व विमकेशन, सदाशिव पेठ, टिळक रोड पुणे-३०, वर्ष ०६, पान नं.४४९ (७३ वी घटना दुरुस्ती).
१४. लोकसत्ता लेख प्रसिद्ध, महाराष्ट्राच्या राजकारणातील जात, २ डिसेंबर २००७, पान नं.०२.
१५. अखिल भारतीय समता परिषद, शाखा अहमदनगर, दप्तरी नोंद १९९१ ते २००४, पान नं.१२.
१६. पळशीकर सुहास व निर्मल नितीन, महाराष्ट्रातील राजकारण व राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, २००२, पान नं.२३४.
१७. अखिल भारतीय समता परिषद, शाखा लातूर, दप्तरी नोंद १९९१ ते २०००, पान नं.०३.

१८. मनोहर गोमारे, रेड्डी समाज इतिहास, लातूर, मु. ३० सप्टेंबर २००७.
१९. ओमप्रकाश गोडभरले, शेतकरी संघ, समाज राजकीय पार्श्वभुमी, रेणापूर, मु. ३ ऑक्टो. ०७.
२०. अखिल भारतीय समता परिषद, शाखा लातूर, दप्तरी नोंद १९९१ ते २०००, पा नं.०४.
२१. टी. एन. शेळके, सदस्य, काँग्रेस, समाज आर्थिक विवेचन, मु.१३ ऑक्टो. ०७.
२२. प्रकाश रेड्डी, समाज राजकीय पार्श्वभूमी, लातूर, मु. ३ ऑक्टो. ०७.
२३. इंदूताई इंगे, संचालक, रेणा सहकारी साखर कारखाना, रेणापूर, इतिहास, राजकीय पार्श्वभूमी, मु.१३ ऑक्टो.०७.
२४. उमलताई अकलगिरे, माजी सरपंच, रेणापूर, समाज राजकीय पार्श्वभुमी, मु. ११ ऑक्टो. ०७.

<u>*प्रकरण-५*</u>

# *रेड्डी समाजाचा राजकीय सहभाग व राजकीय सामाजीकरणाचे विश्लेषण*

**पान नंबर**


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | ११२ |
| ५.१ | रेड्डी समाज : वयानुसार वर्गीकरण | ११२ |
| ५.२ | रेड्डी समाज : स्त्री-पुरूष वर्गीकरण | ११२ |
| ५.३ | रेड्डी समाज : शिक्षण वर्गीकरण | ११३ |
| ५.४ | रेड्डी समाज : व्यवसाय वर्गीकरण | ११४ |
| ५.५ | रेड्डी समाज : नातेवाईक सक्रीय राजकारण | ११६ |
| ५.६ | रेड्डी समाज : नातेवाईकांना मिळालेली पदे | ११७ |
| ५.७ | रेड्डी समाज : आर्थिक स्थिती | ११९ |
| ५.८ | रेड्डी समाज : व्यवसाय व नोकरी | ११९ |
| ५.९ | रेड्डी समाज : राजकारणाची आवड | १२० |
| ५.१० | रेड्डी समाज : पक्षीय वर्गीकरण | १२२ |
| ५.११ | रेड्डी समाज : निवडणूका | १२३ |
| ५.१२ | रेड्डी समाज : राजकीय पार्श्वभुमी | १२४ |
| ५.१३ | रेड्डी समाज : पक्ष बदलाची भुमिका | १२६ |
| ५.१४ | रेड्डी समाज : महिला राजकारण | १२७ |

| | | |
|---|---|---|
| ५.१५ | रेड्डी समाज : राजकीय सहभागाची पातळी | १२८ |
| ५.१६ | रेड्डी समाज : प्रभावशील नेते | १३० |
| ५.१७ | रेड्डी समाज : मतदान अधिकार | १३१ |
| ५.१८ | रेड्डी समाज : पक्षीय कार्य | १३२ |
| ५.१९ | रेड्डी समाज : राजकारण | १३४ |
| ५.२० | रेड्डी समाज : मतदान | १३५ |
| ५.२१ | रेड्डी समाज : राजकीय सहभाग | १३७ |
| ५.२२ | रेड्डी समाज : महिला विषयक धोरण | १३८ |
| ५.२३ | रेड्डी समाज : निवडणूक अनुभव | १३९ |
| ५.२४ | रेड्डी समाज : जातीय घटक | १४१ |
| ५.२५ | रेड्डी समाज : विकास | १४२ |
| ५.२६ | रेड्डी समाज : महत्वकांक्षा | १४४ |
| ५.२७ | रेड्डी समाज : राजकीय पक्षातील पदे | १४५ |

## प्रकरण-५

# रेड्डी समाजाचा राजकीय सहभाग व राजकीय सामाजीकरणाचे विश्लेषण

### प्रस्तावना -

कोणत्याही प्रकारचे सामाजिक संशोधन हे तथ्याच्या विश्लेषणावरून सिध्द होत असते. हा सामाजिक संशोधनाचा एक नियम आहे. म्हणून सदर संशोधन अहवालामध्ये दिलेले विश्लेषण हे लातूर जिल्हयातील लातूर आणि रेणापूर तालुक्यातील रेड्डी समाजाचा राजकीय सहभाग किती आहे? आणि तो कोणत्या पातळीवर आहे? त्यामध्ये महिलांचा राजकीय सहभाग कसा आहे? तो कोणत्या पातळीवर आहे? रेड्डी समाजाला राजकारणामध्ये कशा प्रकारे स्थान प्राप्त झाले आहे. याबाबत या प्रकरणात विश्लेषण केले आहे.

प्राथमिक तथ्याच्या नियमानुसार प्रश्नावली तयार केली. त्यामध्ये २७ प्रश्न विचारले होते. पुढे १०० व्यक्तींची नमुना निवड करून लातूर आणि रेणापुर तालुक्यामध्ये अनुक्रमे सदरील प्रश्नावली भरून घेतल्या. त्यानुसार प्रश्नावलीतील प्रत्येक प्रश्नाचे वर्गीकरण करून सविस्तर आणि निरीक्षणपूर्वक पाहणी करून विश्लेषण तक्ते तयार केले आहेत. त्याचबरोबर काही नेते, कार्यकर्ते यांचेही प्रातिनिधिक स्वरूपात अधिक माहितीसाठी मुलाखती घेतल्या आहेत.

### ५.१ रेड्डी समाज : वयानुसार वर्गीकरण

**५.१**

| क्र | १८ ते ४० | ४१ ते ६० | ६१ पेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ५० | ४३ | ०७ | १००% |
| | | | **एकूण** | **१००%** |

**५.२**

| क्र | स्त्री | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|
| १ | २१ | ७९ | १००% |
| | | **एकूण** | **१००%** |

१. रेड्डी समाजामध्ये वयाच्या नुसार विचार केल्यास असे दिसते की, १८ ते ४० वयोगटातील वरील टेबल वरुन ५०% व्यक्ती राजकारणात दिसतात तसेच ४१ ते६०

वयोगटातील ४३% लोक राजकारणात आढळतात तर ६१ वयापेक्षा जास्त फक्त ०७ व्यक्तींना राजकारणाची आवड आहे.

तक्ता क्रं. ५.२ वरुन असे स्पष्ट होते की स्त्रीयांचा यामध्ये समावेश होते.

वयाचा जो तक्ता क्रं. ५.२ आहे त्यानुसार एकूण १०० व्यक्तीच्या विश्लेषणापैकी २१% स्त्रीयांचा राजकीय सहभाग आढळला आहे तर ७९% पुरूषांचा सर्वसाधारण राजकीय सहभाग दिसुन आला. येथे रेड्डी समाजातील महिलांपेक्षा पुरूषांचा राजकीय सहभाग जादा आहे ते दिसून आले.

यावरून रेड्डी समाजाच्या युवक वर्गामध्ये राजकीय जनजागृतीचे ज्ञान मोठया प्रमाणावर वाढलेले आहे हे वरील तक्त्यावरून लक्षात येते.

## ५.३ रेड्डी समाज : शिक्षणनुसार वर्गीकरण -

| अ.क्र | शिक्षण | व्यक्ती % |
|---|---|---|
| १. | प्राथमिक | १९ |
| २. | माध्यमिक | ४९ |
| ३. | पदवीधर | १४ |
| ४. | व्यावसायिक | ०८ |
| ५. | अशिक्षित | १० |
| | **एकूण** | **१००%** |

वरील तक्ता क्रं. ५.३ मधील पहिल्या भागामध्ये असे दिसते की, प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या १९% व्यक्ती वरील तक्त्यावरुन दिसते. दुसऱ्या भागामध्ये ४९ व्यक्ती या माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आहेत. त्यामध्ये १८ ते ४० वयोगटातील व्यक्तीचा समावेश जास्त प्रमाणात झाले आहे. तिसऱ्या भागामध्ये पदवीधर व्यक्ती एकुण १००% पैकी १४% स्पष्ट होतो. रेड्डी समाजामध्ये फक्त प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षित लोक नसून पदवीधरांचे प्रमाण या समाजामध्ये प्रमाण चांगले आहे.

चौथ्या भागामध्ये व्यवसाय, उद्योगधंदे यामध्ये प्रमाण फक्त ८% दिसून आले आहे. कारण या समाजाला व्यवसायात स्वारस्य नाही. म्हणून या प्रकारचे शिक्षण हा समाज फार थोडया प्रमाणात घेताना दिसतात.

वरील तक्त्यामध्ये १०% प्रमाण अशिक्षीतांचे प्रमाण दिसत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे ग्रामीण भाग, सेवा सुविधा, दुरूउपयोग शैक्षणिक विकास कमी रुढी, पंरपर यांचा पगडा काही प्रमाणांवर रेड्डी समाजावर आहे, म्हणून हे अशिक्षीत प्रमाण आहे.

लातूर जिल्हयातील रेणापूर आणि लातूरमध्ये रेड्डी समाजाची फार मोठया प्रमाणात शैक्षणिक प्रगती झाली आहे. कारण सर्वांगिन विकासाच्या सेवा सुविधा मोठया प्रमाणावर उपलब्ध झाल्यामुळे सामाजिक आणि राजकीय विकासा बरोबरच शैक्षणिक संधी मोठया प्रमाणावर निर्माण झाल्या आहे. लातूरमध्ये श्री बसवेश्वर महाविद्यालय, कला वाणिज्य महाविद्यालय, लातूर, दिलीपराव देशमुख औद्योगिक प्रशिक्षण संस्था, लातूर, रजनीताई पाटील माध्य. उच्च माध्य. महाविद्यालय, लातूर तसेच रेणापूरमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय आहेत. इतर व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्था या ठिकाणी निर्माण झाल्या आहेत. शैक्षणिक विकासाच्या अनेक संधीचा फायदा रेड्डी समाजाला झाला आहे. रेड्डी समाजातील शिक्षणाच्या जागृतीमुळे त्यांचा जास्त प्रमाणात विकास झालेला आहे.

त्यामुळे हा समाज शेती व नोकरी जास्त प्रमाणावर करताना दिसून येतो. वरील तक्त्यावरून हेच सिध्द होते की, रेड्डी समाज हा सुशिक्षित असून त्यामध्ये शिक्षणाचा विकास मोठया प्रमाणांवर झालेला आढळतो. आजही डॉक्टर, इंजिनिअर, सरकारी नोकर, प्राध्यापक, निमसरकारी नोकर, कर्मचारी दोन्ही तालुक्यामध्ये रेड्डी समाजाचा मोठया प्रमाणावर विकास झालेला आहे.

## ५.४ रेड्डी समाज : व्यवसायानुसार वर्गीकरण -

| अ.क्रं | व्यवसाय | % बदल किती |
|---|---|---|
| १. | नोकरी | १८ % |
| २. | शेती | ८२ % |
| | **एकूण** | **१०० %** |

वरील तक्ता क्रं.५.४ मध्ये रेड्डी समाजाचे व्यवसायाचे वर्गीकरण केलेले आहे. त्यामध्ये तक्त्याच्या पहिल्या भागामध्ये १८% लोक नोकरी करणारे आहेत. व द्वितीय भागात ८२% लोक शेती व्यवसाय करीत आहेत.

लातूर जिल्यातील रेणापुर आणि लातूर तालुक्यातील रेड्डी समाजाचा व्यवसायाचा अभ्यास करीत असताना असे आढळते की, हा समाज पुर्वीपासून शेतीचा व्यवसाय करीत आलेला आहे. इतर व्यवसाय करण्याचे या समाजाचे प्रमाण फार कमी आढळते. म्हणून आर्थिक दृष्टीकोनातून रेड्डी समाजाचा विचार केल्यास असे दिसून येते की रेड्डी समाजाने शेती आणि व्यवसाय आणि काही प्रमाणात नोकरी करणे हे मुख्य कार्य निवडले आहे. सामाजिक, धार्मिक राजकीय आर्थिक बाबत नोकरी आणि शेती व्यवसायाकडे मोठया रेड्डी समाजाचा विकास झालेला आहे.

वरील तक्ता क्रं.५.४ वरून स्पष्ट होते की, तक्त्याच्या प्रथम भागामध्ये १८% व्यक्ती नोकरी करताना दिसून येत आहे. तर ८२% व्यक्ती शेती हा व्यवसाय करताना दिसून येत आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी बाबतीत हा समाज नेहमीच जागृत असताना शेती करण्यास या दोन्ही तालुक्यामध्ये अनुकूल अशी परीस्थिती आहे. लातुर तालुक्यात हंगामी शेताच्या पाण्याची सोय आहे. कुंपन नलिका, विहिरी, पाटपाणी, नद्यावरील उपसा जलसिंचनाची सोय मोठया प्रमाणावर उपलब्ध आहेत. तसेच रेणापूर तालुक्यामध्येही रेड्डी समाज शेतीमध्ये मोठया प्रमाणावर गुंतलेला आहे. लातूर तालुक्यातही शेतीला पाणी पुरवण्याची सोय मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. त्यामुळे शेतीला हंगामी पाटपाण्याची सोय मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. उदा. रेणा व मांजरा नदीचा फार मोठा फायदा सर्व समाजाला झालेला असून त्यामुळे इतर समाजासह रेड्डी समाजाचाही मोठया प्रमाणावर विकास झालेला आहे. ही सर्व पार्श्वभूमी दोन्ही तालुक्यात आहे. सर्वाधिक रेड्डी समाजाचे शेतीतील स्थान वाढलेले आहे. त्याचबरोबर शेती करण्याची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. असे वरील तक्त्यावरुन दिसून येते.

तसेच १९९३ मध्ये मिळालेल्या आरक्षणाचा फायदा उच्च शिक्षणाच्या मिळालेल्या संधी, यामुळे नोकरीमध्ये १८% रेड्डी समाज दिसून येतो. म्हणून वरील तक्त्यानुसार रेड्डी समाज मोठया प्रमाणांवर शेती करतो असे लक्षात येते. वरील तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की, रेड्डी समाजाचा शेती हा मुख्य घटक होता. आजही रेड्डी समाज आर्थिक उलाढाली मोठया प्रमाणावर शेती मधून करीत आहे. सहकारी पतपेढया, विविध बँका, सहकारी कारखाने, पतसंस्था यामुळे शेतीला अल्पदरात कर्ज पूरवठा होतो. त्यामुळे इतर

समाजाप्रमाणे शेती करणे या समाजाला आजही फायदेशीर वाटते. म्हणून शेती करणारांची लोकसंख्या जास्त प्रमाणात आहे.

## ५.५ रेड्डी समाज : नातेवाईकांचे सक्रीय राजकारण -

| अ.क्र. | नातेवाईक सक्रीय राजकारण सहभाग | व्यक्ती % |
|---|---|---|
| १. | सक्रीय राजकारणात भाग घेतले आहे | ७१% |
| २. | सक्रीय राजकारणात भाग घेतले नाही | २९% |
| | **एकूण** | **१०० %** |

वरील तक्ता क्रं.५.५ वरून स्पष्ट होते की, प्रथम भागामध्ये ७१% व्यक्तीच्या मता नुसार त्यांचे नातेवाईक सक्रीय राजकरणात सहभागी झालेले आहेत. तसेच २९% व्यक्तीनी असे मत मांडले की सक्रीय राजकारणात त्यांचे कोणीही नातेवाईक नाही. लातूर आणि रेणापूर तालुक्यामध्ये साधरणतः हा नाते संबंध अनुक्रमे विक्रम गोजममुंडे आणि शाम अगनगिरे, मनोहर गोमारे, ॲड.सतराम चेवले (शे.का.पा.), उदय गवारे, श्रीराम जटाळ यांच्यामध्ये दिसून येते. रेणापुर मध्ये ओमप्रकाश गोडभरले, वसंत कनामे, वसंत करमूडे, सचिन मोटेगावकर, प्रशांत अकानगिरे, किसन भंडारे, सुनिल गुड्डे, श्रीकांत बस्तापूरे, व्यंकटराव पाटील, नामदेव बोंबडे इत्यादी व्यक्तींशी ७१% व्यक्तींनी नाते संबंध प्रामुख्याने सांगितली. कारण या सर्व व्यक्ती आतापर्यंत सक्रीय राजकारणात वेगवेगळया पक्षाचे म्हणून काम करीत आल्या आहे त्यापैकी बहुतेक व्यक्तीनी पक्षाच्या निर्णय प्रकीये पर्यंत आपला सहभाग नोंदवला आहे.

वरील तक्त्यामधील २ च्या भागामध्ये २९% व्यक्तीनी असे नोंदवले की, त्यांचे सक्रीय राजकारणात सहभागी झालेले कोणीही नातेवाईक नाही. हे सदरील तक्त्यावरुन स्पष्ट होते. कारण लातूर आणि रेणापूर तालुक्यातील या व्यक्तीना राजकीय दिशा खुप उशीरा मिळाली. त्यातच ग्रामीण भागात अनेक सेवा सुविधांचा अभाव यामुळे राजकीय जागृती असलेल्या जवळच्या लोकांचा नाते संबंध काही प्रमाणात माहिती नाही. यामुळे २९% समाज राजकारणापासुन दुर राहीलेला दिसुन येतो. ही फार मोठी शोकांतिक पहावयास मिळते.

जरी परिस्थीती नाते संबंध दिसण्यास अनुकूल नसली तरी येणाऱ्या काळात ७५% रेड्डी समाज राजकारणात दिसून येईल. त्यातून नातेसंबध आणि एकगठ्ठा मतदान यामुळे भविष्यात राजकीय बाजू रेड्डी समाजातील नेत्यांची भक्कम झालेली निश्चित दिसेल.

## ५.६ रेड्डी समाज आणि नातेवाईकांना मिळालेली राजकीय पदे -

| अ.क्र. | पदावर कलेली कामे | व्यक्ती % |
|---|---|---|
| १. | पक्ष सदस्य | २२ |
| २. | सक्रिय सभासद | ०७ |
| ३. | ग्रामपंचायत सदस्य | २८ |
| ४. | पंचायत समिती सदस्य | ११ |
| ५. | जिल्हा परीषद सदस्य | ०२ |
| ६. | आमदार | ० |
| ७. | खासदार | ० |
| ८. | इतर | ३० |
| | **एकूण** | **१००** |

वरील तक्ता क्रं.५.६ मध्ये रेड्डी समाजाच्या नातेवाईकांनी राजकीय पदावर कार्य केलेले दिसते. त्यामध्ये प्रथम भागात २२% व्यक्तींनी पक्ष सदस्य म्हणून राजकीय कार्य केले आहे. तसेच सक्रीय सभासद म्हणून ७% व्यक्तींनी काम केले आहे. व ३ ऱ्या भागात २८% व्यक्तींनी ग्रामपंचायत सदस्य म्हणून काम केलेले आहे. तसेच २% व्यक्तींनी जिल्हा परिषद सदस्य म्हणुन काम केलेले आहे. आणि आमदार म्हणून काम केलेले एक ही व्यक्ती नाही. याशिवाय खासदार म्हणूनही कोणीही व्यक्तीने काम केलेले नाही. परंतू इतर पदांमध्ये ३०% व्यक्तींनी काम केलेले आहे. हे तक्त्याच्या ८ व्या भागावरून स्पष्ट होते.

वरील तक्ता क्रमांक ५.६ नुसार प्रथम भागामध्ये २२% नातेवाईक पक्षाचे सदस्य म्हणून नोंदणी झालेले आहे. त्यामुळे रेड्डी समाजाची पक्षीय (कोणताही) कार्य चांगल्या प्रकारचे आहे असे दिसून येते.

तक्त्या मधील २ ऱ्या भागात पक्षा मध्ये सक्रीय सभासद म्हणून ७% व्यक्तीं कार्य करतात. तसेच ४ थ्या भागा मध्ये ११ नातवाईकांनी पंचायत समिती सदस्य म्हणून काम केलेले आहे. त्यापैकी ४ व्यक्ती आजही पंचायत समिती मध्ये सदस्य म्हणून काम करीत आहे. तसेच ११% पैकी २ व्यक्ती महिला असून दोन्ही विद्यामान सदस्य आहेत. त्यात एक लातूर पंचायत समिती सभासद म्हणून काम बघत आहे. एक माजी सभापती म्हणून एक व्यक्तीने रेणापूर तालुक्यात काम पाहिले आहे. तसेच ५ भागा मध्ये २ व्यक्ती जिल्हा परीषद सदस्य म्हणून पद भूषविलेली आहेत. त्यातील एका व्यक्तीने जिल्हापरीषद उपाध्यक्ष म्हणून पद भूषविलेली आहे.

तक्त्याच्या ६ व्या भागा मध्ये एकाही व्यक्तीने विधान सभा सदस्य म्हणून काम केलेले नाही. टेबलच्या ७ व्या भागात रेड्डी समाजाचा कोणीही या दोन्ही तालुक्यातून खासदार झालेला नाही. मात्र मनोहर गोमारे यांनी यासाठी प्रयत्न काही प्रमाणात केला असल्याचे माहिती मिळाली आहे. मात्र जात विरहीत राजकारणा मूळे त्यांचे टिकीट कापले गेले अशी माहिती मिळाली आहे. तक्त्याच्या ७ व्या म्हणजेच शेवटच्या भागामध्ये इतर पदावर म्हणून रेड्डी समाजाचे नातेवाईक काम करीत होते किंवा कामे करीत आहे हे तक्त्याच्या इतर भागामध्ये दिलेल्या आकडेवरुन स्पष्ट होते. त्यामध्ये ३०% व्यक्ती (नातेवाईक) या लातूर बाजार समिती, रेणापूर बाजार समिती, तालुका खरेदी विक्री संघ, रेणा सहकारी साखर कारखानाचे संचालक पद विविध कार्यकारी सोसायटया मधील संचालक किंवा चेअरमन, व्हा.चेअरमन जिल्हा सहकारी बँक संचालक, विविध सहकारी पाणीपुरवठा सोसायटी विविध शैक्षणिक संस्था आदि विविध संस्थावर या ३०% व्यक्ती कामे करताना आढळतात. त्यातून सामाजिक प्रकारचे कार्य करताना या व्यक्ती दिसतात. सामाजिक कार्य केल्यामुळे आपोआप राजकारण करण्यास त्यांना पुढे चांगली परिस्थिती निर्माण झाली आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, रेड्डी समाजा मध्ये राजकीय, सामाजिक जाणीव जागृती मोठयाप्रमाणावर वाढली आहे.

## ५.७ रेड्डी समाज आणि आर्थिक स्थिती -

**५.७**

| शेतीमधून मिळणारे उत्पन्न | व्यक्ती |
|---|---|
| १. १० ते २५ हजार | ११ व्यक्ती |
| २. २५ ते ५० हजार | ३१ व्यक्ती |
| ३. ५० ते ७५ हजार | २० व्यक्ती |
| ४. ७५ ते १००००० | २६ व्यक्ती |

**५.८**

| व्यवसाय व नोकरी | व्यक्ती |
|---|---|
| १. २५००० ते ५०००० | ०६ व्यक्ती |
| २. ५० ते १ लाख | ०३ व्यक्ती |
| ३. १ लाख ते १२५००० | १ व्यक्ती |
| ४. १.२५ ते १.५० | ०२ व्यक्ती |

**एकूण ८८+१२ = १००**

### शेती -

वरील तक्ता क्रमांक ५.७ मधील १ ल्या भागामध्ये शेती पासून मिळणारे उत्पन्न त्या मध्ये गट पाडले आहेत त्यानुसार १० ते २५ हजार पर्यंत ११% व्यक्ती तक्त्यावरुन कमी उत्पन्न गटात दिसून येतात. २५ ते ५० हजारा पर्यंत ३१% व्यक्तींचा समावेश आहे या ठिकाणी रेड्डी समाजाची परिस्थिती चांगल्या प्रमाणात सुधारलेली दिसून येते. ५० ते ७५ हजार व्यक्तीचा समावेश आहे. १९९० नंतर मिळणाऱ्या सेवा सुविधा कमी दरात कर्ज यामुळे या ठिकाणी २०% व्यक्तीचे उत्पन्न वाढण्यात मदत झाली आहे. ७५ ते १ लाख यामध्ये २६% व्यक्तीचा समावेश या आर्थिक उत्पन्नात झालेला आहे असे दिसते. ओबीसीचे मिळालेले आरक्षण नोकरी व्यवसायात संधी यामुळे उत्पन्न मोठया प्रमाणावर वाढले आहे.

### व्यवसाय व नोकरी -

तक्ता ५.८ वरुन २५ ते ५० हजार आर्थिक उत्पन्न असणाऱ्या ६% व्यक्ती तक्त्यावरून स्पष्ट होते. दुसऱ्या भागामध्ये ५० ते १ लाख रुपये ३% व्यक्ती तक्त्यावरुन माहिती मिळते. १ लाख ते सव्वा लाख पर्यंत १% व्यक्ती आढळते. १.२५ ते १.५० लाखा पर्यंत २% व्यक्ती आढळतात. यावरुन रेड्डी समाज ९९.०१% आर्थिकदृष्टया सधन झालेला दिसून येतो. सन १९९० नंतर त्यांच्या मध्ये मोठा बदल झाला आहे हे वरील तक्त्यावरून सिध्द होते.

रेड्डी समाजाची या दोन्ही तालुक्यामधील आर्थिक स्थिती वरील तक्यातवरुन चांगली असल्याची दिसून येते. तक्ता क्रं. ५.७ आणि तक्ता क्रमांक ५.८ यामध्ये रेड्डी समाजाच्या नमुना निवडीतील आराखडा वरुन, या समाजातील व्यक्तीचे आर्थिक उत्पन्न वाढल्यामुळे या समाजाचे राहनीमान एकूण कौंटूबीक दर्जा उंचावलला आहे. त्यामुळे सामाजिक राजकीय अंगाने त्यांचे सशक्तीकरण होते आहे असे दिसते. रेड्डी समाजाचा व्यवसाय पारंपारीक शेती करण्याचा होता. मात्र परिस्थिती नुसार या धंदयामध्ये मोठया प्रमाणावर बदल होत गेले. कारण शैक्षणिक सामाजिक आणि राजकीय विकास झाल्याने या व्यवसायामधून रेड्डी समाज फार मागे पडला आहे.

मात्र इतर व्यवसायात शिरण्याचे रेड्डी समाजाचे प्रमाण फार कमी आहे शेती व नोकरी यांचे प्रमाण या समाजात जास्त दिसून येते. नोकऱ्याचे प्रमाण रेड्डी समाजामध्ये दिवसें दिवस वाढल चाललेले दिसत आहे. रेड्डी जात जास्त प्रमाणांवर विकसित होत आहे. कारण नोकरी, शेतीमुळे आर्थिक पाया या समाजाचा भक्कम होत चालला आहे. समाजामध्ये यामुळे सामाजिक जनजीवन सुरळीत झाले आहे. शेतीचे उत्पन्न वाढण्यास शासनाच्या अनेक योजना शेतीसाठी फायदेशीर ठरल्या आहेत. विविध सहकारी संस्था सहकारी कारखाने, जिल्हा सहकारी बँका, यामुळे रेड्डी समाजाच्या शेतीला इतर समाजाला मोठया प्रमाणावर कमी व्याज दराने कर्ज पुरवठा होतो. त्यामळे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत झाली आहे. शेतीला जोड म्हणून दुग्ध व्यवसाय रेड्डी समाजाकडे दिसून आला. वरील विश्लेषणावरुन रेड्डी समाजाचे आर्थिक स्थिती स्पष्ट होते.

## ५.९ रेड्डी समाज : राजकारणाची आवड -

| अ.क्र. | १९५० | १९६० | १९७० | १९८० | १९९० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ व्यक्ती | १२ व्यक्ती | १६ व्यक्ती | ३० व्यक्ती | ४० व्यक्ती | १००% |


वरील तक्ता क्रमांक ५.९ मधील अनुक्रमे १ मध्ये १९५० च्या दशकामध्ये २% व्यक्तींना राजकारणाची आवड वाटू लागली असे दिसते. अनुक्रमे २ मध्ये १९६० च्या दशकामध्ये १२% व्यक्तींना राजकारणाची आवड लागली असे दिसून येते. १९७० च्या दशका मध्ये १६% व्यक्तींना राजकारणाची आवड निर्माण झाली. १९८० च्या दशकात मंडल

आयोग आला, इतर मागासवर्गात जनजागृती होण्यास सुरुवात झाली शिक्षणाचा ग्रामीण भागात हळूहळू प्रारंभ सुरु झाला. त्यामुळे सुशिक्षीत समाजामध्ये राजकीय जागृती येवू लागली. त्यामुळे रेड्डी समाजामध्ये उत्तरोत्तर वाढ होत राहिली. समाजामध्ये एकात्मता निर्माण झाली. समाजाचे सामाजिक प्रश्न जस-जसे निर्माण होवू लागले. तसतसे त्यांना राजकीय जागृती येवू लागली. म्हणून १९८० च्या दशकामध्ये प्राथमिक पातळीवर रेड्डी समाजाच विकास होत असताना त्यांचा राजकीय सहभाग हळूहळू १९८० दशकात वाढत जावून तो २० टक्के पर्यंत वाढत गेला. म्हणजेच राजकारणा बद्दलची आवड याच दशकात मोठया प्रमाणांवर वाढत गेली. हे वरील तक्त्याच्या १९८० च्या आकडेवारी वरुन सिध्द झाले. १९९० मध्ये रेड्डी समाजाचा राजकारणात मोठया प्रमाणावर शिरकाव झाला. म्हणून तर १९९० ची आकडवारी तक्त्यावरुन ५०% व्यक्तींना राजकारणाची आवड निर्माण झालेली दिसते.

लातूर जिल्हयातील अनुक्रमे लातूर आणि रेणापुर तालुक्यामध्ये रेड्डी समाजाची स्वतंत्र्य पूर्व काळा पासून राजकारणाची आवड असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्याच्या कालखंडात काही व्यक्तींनी महत्वपूर्ण योगदान दिलेले आहेत. सामाजिक आणि राजकीय कार्यात रेड्डी समाजाने नेहमीच हिरारीने भाग घेतले. स्वतंत्र्यानंतर ही काँग्रेसच्या कालखंडा मध्ये रेड्डी समाजाने महत्वपूर्ण कामगिरी केलेली आहे. त्यामुळे राजकारणामध्ये रेड्डी समाजाला आवड मोठया प्रमाणात निर्माण झाल्याचे खालील आलेखावरून आणखी स्पष्ट होण्यास मदत होते.

आलेख तक्ता क्रं.१.४

**रेड्डी समाजाचा राजकीय आवड दाखविणारा आलेख**



## ५.१० रेड्डी समाज आणि पक्षीय वर्गीकरण -

| अ.क्र | सध्या निवडलेला पक्ष | व्यक्ती % |
|---|---|---|
| १. | कॉग्रेस | ५३% |
| २. | राष्ट्रवादी कॉग्रेस | ३१% |
| ३. | भाजप | १२% |
| ४. | शिवसेना | ०२% |
| ५. | इतर | २% |
| | **एकूण** | **१००%** |

वरील तक्ता क्रमांक ५.१० मध्ये १ ल्या भागामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला ३१% व्यक्तींनी प्राथमिक पसंती दिल्याचे दिसते. कारण काँग्रेस हा इतिहास असलेला पक्ष आहे. त्यामध्ये प्रभावी नेतृत्व दोन्ही तालुक्यात असल्यामुळे काँग्रेसला पसंती आहे. तसेच दुसऱ्या भागामध्ये काँग्रेसमध्ये ५३% व्यक्तींनी पसंती केलेली आहे. तसेच १२% व्यक्तींनी भाजपला पसंती दिली आहे. शिवसेना व इतर पक्षांना ४% व्यक्तींनी पसंती दिलेली आहे.

तक्त्याच्या २ ऱ्या भागामध्ये राष्ट्रवादी कॉग्रेस असून सर्वात जास्त पक्ष निवडलेल्या व्यक्ती रेड्डी समाजाच्या या राष्ट्रवादी कॉग्रेसच्या आहेत. कारण राज्यपातळी वरील राजकारणाचा ग्रामीण पातळीवर फार मोठा परिणाम झालेला आहे. समाजाचे एकगट्ठा स्वरुपाचे मतदान कॉग्रेसच्या पारडयात नेहमी पडल्याचे दिसून येते. कॉग्रेस पक्षाला पसंती संख्या जास्त प्रमाणात दिसून येते. त्याला कारण म्हणजे या दोन्ही तालुक्या मध्ये रेड्डी समाजाचे नेतेही प्रभावीरित्या कार्य करताना दिसतात.

भारतीय जनता पार्टीचा या दोन्ही तालुक्यामध्ये फारसा प्रभाव दिसून येत नाही. परंतू पक्ष म्हणून सर्व प्रकारची कार्य या तालुक्यामध्ये दिसतात. काही प्रमाणात ग्रामीण व शहरी भागात भाजप आणि शिवसेना युती केल्यास काही ठिकाणी भाजपला यश मिळालले दिसून येते वरील तक्त्यावरुन १२% व्यक्तीनी भाजप हा पक्ष निवडलेला आहे. याला अनेक मुख्य कारणापैकी भाजपचे हिंदूत्ववादी विचार दोन्ही काँग्रेसमधील नाराजांना भाजप हे पक्षीय पर्याय असल्यामुळे त्यांची संख्या वाढत असल्याचे दिसते.

वरील तक्त्याच्या ४ थ्या क्रमांकावर शिवसेना असून त्यामध्ये शिवसेना पक्ष निवडलेल्या ०२% व्यक्ती आहे. शिवसेनेचा तसा फारसा प्रभाव नेवासा आणि रेणापुर मध्ये

नाही. रेड्डी समाजातील फार व्यक्ती शिवसेनेत कधीत गेल्या नाहीत म्हणून वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट जाणवते की, शिवसेना पक्ष निवड फार या तालुक्यात फार कमी आहे.

वरील तक्त्याच्या शेवटच्या भागामध्ये २% व्यक्तीनी मुख्य पक्ष सोडून इतर पक्षाला पसंती दिलेली आहे. उदा. बहुजन समाज पार्टी भारतीय रिपब्लीकन पक्ष (आंबेडकर गट) इत्यादी पक्ष निवडलेला दिसून येतात. यावरुन असे ही स्पष्ट होते की, इतर पक्षांचा शिरकाव या तालुक्यामध्ये झाल्याचे दिसून येते.

लातूर जिल्हयामध्ये लातूर आणि रेणापुर तालुक्यामध्ये एकत्रीतरित्या विचार केल्यास वरील तक्त्यावरुन असे दिसते की, अनुक्रमे कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉग्रेस, भाजप, शिवसेना व इतर पक्षांचा प्रभाव दोन्ही तालुक्यामध्ये जाणवतो. तसे सत्ता मिळविण्याकरीता कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेसमध्ये नेहमीच राजकीय संघर्ष मोठया प्रमाणावर दिसून येते. सत्ता नेहमी या दोन पक्षाच्या गटाकडे बदलत राहते. म्हणून या दोन पक्षाचा फार मोठा प्रभाव या कार्यक्षेत्रामध्ये दिसून येतो.

## ५.११ रेड्डी समाज : निवडणुका -

| **निवडणूक** | **व्यक्ती** | **एकूण** |
|---|---|---|
| १. उभे राहाणाऱ्या व्यक्ती | ७४ | ७४ % |
| २. न उभे राहाणाऱ्या व्यक्ती | २६ | २६ % |
| | **एकूण** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की ७४% रेड्डी समाजाचे पंचायतराज किंवा ज्या ठिकाणी निवडणुकीत संधी मिळेल अशा ठिकाणी उभे राहिलेले आहे व २६% व्यक्ती निवडणूकीत न उभ्या राहणाऱ्या वरील तक्त्यावरून दिसुन येतात.

लातूर जिल्हा राजकीय दृष्टया लोकप्रिय असलेला जिल्हा आहे. त्यातच लातूर आणि रेणापूर तालुक्यामध्ये राजकारणाची आवड असलेला तालुके आहेत. हे मागील पानावर आपण पाहिलेले आहे. प्रामुख्याने लातूर आणि रेणापूर रेड्डी समाज विरुध्द मराठा समाज असा मोठया प्रमाणावर संघर्ष बघण्यास मिळतो. समाजाची राजकारणात चांगली

कामगिरी दिसते. पंचायतराजमध्ये आणि विविध ठिकाणी अनेक राजकीय निवडणूका रंगतदार स्वरुपाच्या लढती होतात. सत्ता मिळविण्यासाठी दोन्ही समाजामध्ये नेहमी संघर्ष होतो.

वरील तक्त्याच्या पाहणी वरुन असे विश्लेषन होते की ७४% लोक निवडणूकी मध्ये मग ती कोणत्याही प्रकारची असो त्या ठिकाणी मिळालेल्या संधीनुसार उभे राहणाचा प्रयत्न केलेला दिसून येतो. यावरुन असे स्पष्ट होते की, रेड्डी समाजात राजकीय जाणीव जागृती मोठया प्रमाणावर वरील तक्त्यातील माहितीनुसार वाढलेली दिसून येते.

तक्त्याच्या २ ऱ्या क्रमांकावर २६% रेड्डी समाजाचे निवडणूकीमध्ये उभे राहात नाही. असे दिसून येते. त्याला अनेक प्रकारची महत्वपूर्ण कारणे आहे त्यामध्ये आर्थिक हानीची भीती, जनतेबद्दलचा नकारार्थी दृष्टीकोन, स्वाभीमानी दृष्टीकोन, राजकारण आवडते पण निवडणूकीत उभे न राहणे अशा व्यक्ती २६% दिसतात प्रामुख्याने या तालुक्यात दिसून आल्या आहेत.

## ५.१२ रेड्डी समाज : राजकीय पार्श्वभूमी -

| अ.क्र | | टक्केवारी | स्त्री | पुरुष |
|---|---|---|---|---|
| १. | राजकीय पार्श्वभूमी आहे | ४५ | ११ | ३४ |
| २. | राजकीय पार्श्वभूमी नाही | ५५ | ०७ | ४८ |
| | **एकूण** | **१००** | **१८** | **८२** |

वरील तक्ता क्रमांक ५.१२ मधील अनुक्रमे १ मध्ये ४५% मत हे राजकीय पार्श्वभूमी आहे. व दुस-या भागामध्ये ५५% व्यक्तींना राजकीय पार्शवभूमी नाही हे वरील तक्त्यावरुन दिसते. कारण १९९१ च्या शतकामध्ये जरी रेड्डी समाजाने राजकारणात शिरकाव केला. आणि तेथून त्यांचे सक्रिय राजकारण सुरु झाले अशी वास्तविक परिस्थिती असली तरी १९९० च्या अगोदर ही रेड्डी समाज बहूतेक वेळेस काँग्रेसच्या पाठीशी राहीला. लातूर आणि रेणापूर तालुक्यात वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की ४५% मत राजकीय पार्श्वभूमी असताना त्यामध्ये प्रामुख्याने ११ महिला व ३४ पुरुष आहे असे दिसते. ११ महिलांनी राजकीय पार्श्वभूमी आहे. असे सांगताना विवाहा अगोदर आणि विवाहानंतरची

राजकीय पार्श्वभूमी सांगितली. उदा. विमलताई अकलगिरे (मा.सरपंच रेणापूर), जनता दल, इंदूताई इंगे,

संचालक, रेणा सहकारी साखर कारखाना यांनीही मोठया प्रमाणावर राजकीय पार्श्वभूमी मिळाली असे सांगितले. त्यांनतर ३४% तक्त्यावरुन स्पष्ट होण्याऱ्या मतामध्ये ३ व्यक्तीचे वंशज स्वातंत्र्य पूर्व काळातील राजकीय पार्श्वभूमी असल्याचे त्यांच्या मुलाखतीत मत दिले. म्हणजेच ४५% व्यक्तीचे वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, नेतृत्वहीन रेड्डी समाजाचे राजकीय घराणे नसले तरी सामाजिक आणि राजकीय नाती असलेली राजकीय पार्श्वभूमी रेड्डी समाजाला आहे असे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

वरील तक्ता क्रमांक ५.१२ मधील अनुक्रमे २ मध्ये एकूण ५५% व्यक्तीचे असे मत आहे की, त्यांना कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नव्हती. कारण १९९० पर्यंत या जातीच्या लोकांना सर्वसाधारण मध्ये समावेश होता. त्यामुळे १९४७ ते १९९० पर्यंत फारसे असे राजकीय नेतृत्व राज्य आणि केंद्र स्तरावर निर्माण झाले नाही. याशिवाय सामाजिक बांधिलकी जरी असली तरी राजकारणातील अगदी ग्रामपंचायत पासून ते केंद्र पातळी पर्यंतच्या राजकारणात १९९० पर्यंत त्यांचा समावेश दिसत नव्हता. पुढे १९९० नंतर वरील परिस्थिती मध्ये बदल झाला. त्यामुळे १९९० ते २००७ पर्यंत अनेक रेड्डी समाजाचे लोक स्थानिक स्वराज्य संस्था मधून पुढे आले. म्हणून २००० साला पासून या व्यक्तींनी १९९० पासून आम्हाला राजकीय पार्श्वभूमी आहे. असे वरील तक्ता विश्लेषण असे लक्षात येते की, रेड्डी समाज हा राजकीय पार्श्वभूमी नसतानाही स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये राजकीय सहभागी होतो. आणि त्यांना सत्तेच्या वर्तृळात सहभागी होण्यास परिस्थिती आपोआप निर्माण होत गेली. त्याचा त्यांना मोठया प्रमाणावर फायदा झाला.

लातूर आणि रेणापुर तालुक्याचा अभ्यास करताना असे दिसून येते की सामाजिक आणि राजकीय विकास साधारणतः चांगल्या प्रकारे झालेला आहे. परंतू या झालेल्या विकासाला पार्श्वभूमी काही लाभली किंवा नाही हे सिध्द करण्यासाठी प्रश्नावली द्वारे नमुना निवड व्यक्तींना राजकीय पार्श्वभूमी बाबत प्रश्न विचारण्यात आले. त्यामध्ये उपलब्ध आकडेवारी अशी दिसते की ४५% मते असे आहे की, रेड्डी समाजात राजकीय पार्श्वभूमी मिळालेली आहे. आणि ५५% मत असे मिळालेले आहे की रेड्डी समाजाच्या लोकांना कोणत्याही प्रकारची पार्श्वभूमी मिळालेली नाही हा प्रश्न किंवा तक्त्याचे विश्लेषण करण्याचा

हा हेतू की रेड्डी समाजातील व्यक्तींचे राजकीय अंग यामधून बाहेर येते. ते वर दिलेल्या तक्त्यावरुन स्पष्ट होईल.

## ५.१३ रेड्डी समाज : पक्ष बदल भूमिका -

| अ.क्रं | | % बदल किती |
|---|---|---|
| १. | रेड्डी समाज पक्ष बदल करणाऱ्या व्यक्ती | ७६ % |
| २. | रेड्डी समाज पक्ष न बदल करणाऱ्या व्यक्ती | २४ % |

वरील तक्त्यामध्ये विश्लेषण करताना असे दिसून येते की, पहिल्या भागामध्ये एकूण ७६% मत हे रेड्डी समाजाने पक्ष बदल केलेला आहे. आणि तक्त्याच्या २ऱ्या भागा मध्ये २४ टक्के व्यक्तींनी पक्ष बदल केलेला नाही हे दिसते.

हे वर्गीकरण घेण्यामागचा हाच उद्देश आहे की, रेड्डी समाजाचा सहभागाचा अभ्यास कोणत्या पातळीपर्यंत आहे हे सिध्द होते. तसेच लोक प्रतिनिधी रेड्डी समाजातील नेत्यांच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग यावरील तक्यावरुन सिध्द होते. तसेच रेड्डी समाज आणि पक्षीय राजकरण याचाही घनिष्ट संबंध जाणवतो कारण लातूर आणि रेणापूर तालुक्यामध्ये प्रामुख्याने कॉग्रेस आणि राष्ट्रवादी दोन प्रमुख पक्ष आहेत. इतर भाजप, शिवसेना, रिपब्लिकन परंतू या पक्षाचा फारसा प्रभाव हया तालुक्यामध्ये नाही. मात्र कॉग्रेस व राष्ट्रवादीचा फार मोठा प्रभाव या दोन्ही पक्षाच्या तालुकास्तरीय नेतृत्वाकडे आहे. म्हणून रेड्डी समाज या दोन्ही तालुक्यात विखरला आहे. लातूर जिल्हयामधील लातूर आणि रेणापूर मध्ये राजकीय वातावरणात मोठया प्रमाणावर बदल झाला. यावरुन असे स्पष्ट होते की, राज्यस्तरीय राजकीय हालचालीचा परिणाम ग्रामीण भागातील समाजावर जाणवतो.

तक्ता क्रमांक ५.१३ मधील १ ल्या भागामध्ये ७६% व्यक्तींनी पक्ष बदल केल्याचा तक्त्यावरुन दिसून येते. काही प्रमाणात नेत्याबद्दलची नाराजी निष्ठावंत लोकांना निवडणूकीत डावलणे, राजकीय कामात दिरंगाई, पक्षाकडून नेहमी अवमान यावरुन १० ते १५ % व्यक्तींनी पक्ष बदल केल्याचे सांगितले आहेत. पक्ष बदलण्याच्या कारणापैकी आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे अर्थकारण, समाजाच्या विकासाची सुत्रे ही अर्थकारणावर चालते यामध्ये दिरंगाई झाल्यास अनेक व्यक्तींनी म्हणून पक्ष बदल केलेला आहे. असे सर्वेक्षणातून आणि वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक ५.१३ च्या २ ऱ्या भागामध्ये २४% व्यक्तींनी पक्ष बदल केलेला नाही. राज्यस्तरीय राजकारणाचा त्यांच्यावर कोणताही परिणाम झालेला नाही. पक्षा बद्दलची निष्ठा त्यांच्या कडून बघण्यास मिळते. पक्षाने नेमून दिलेली कामे प्रामाणिकपणे करणे, कधी ही

नाराज न होता आणि पक्षामध्ये सक्रियरित्या काम करीत राहणे, पक्ष वाढविण्यासाठी समाजाच्या तसेच इतर समाजाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय अडचणी सोडविण्यास नेहमी रस घेणे, यामुळे निष्टावान कार्यकत्यांची फळी निर्माण होते. असे मत २४% व्यक्तीने मांडलेले हेच वरील तक्त्यावरुन सिध्द होते.

## ५.१४ रेड्डी समाज : महिला राजकारण -

| अ.क्र. | महिलांनी राजकारणात यावे वाटते काय | व्यक्ती % |
|---|---|---|
| १. | होय | ९७% |
| २. | नाही | ३% |
| | **एकूण** | **१०० %** |

वरील तक्ता क्रं. ५.१४ च्या पहिल्या भागामध्ये ९७% व्यक्तीने असे मत मांडलेले आहे की, महिलांनी राजकारणात यावे वाटते आणि २ ऱ्या भागात ३% व्यक्तींना यामध्ये असे वाटते की महिलांनी राजकारणात येवू नये असे वाटते. हे विश्लेषण वरील तक्त्यावरुन लक्षात येते.

शिक्षण, पुरेसी सोयी सुविधा यामुळे रेड्डी समाजाची महिलाकडे बघण्याचा दृष्टीकोणात बदल झाला आहे. मुळातच इतर जाती पेक्षा वकील, डॉक्टर, शिक्षक, सरकारी निमसरकारी क्षेत्रात रेड्डी समाजातील महिलांचे प्रमाण उच्च जाती पाठोपाठ दोन नंबर आहे. त्यांनी येथून राजकारणही करावे असे बहुतेक संपूर्ण रेड्डी समाजाला वाटते.

वरील तक्ता क्रमांक ५.१४ मधील १ ल्या भागामध्ये ९७ व्यक्ती महिलांनी राजकारणात यावे असे दिसते. यावरुन महिलांच्या विकांसाची जनजागृती चांगल्या प्रकारे रेड्डी समाजात झालेली आहे. 'चुल आणि मुल' या संकल्पनेतून रेड्डी समाजाने महिलेला दुर करण्यात यश मिळविले आहे. स्त्री बद्दलच्या नकारार्थी मानसिकता समाजातून हळूहळू

दूर होत आहे यातच ७३ व्या घटना दुरुस्तीनी स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये ३३% महिलांना आरक्षण मिळाले. त्यामुळे त्यांचा सर्वागिण विकास होण्यास मोठया प्रमाणावर संधी निर्माण झाल्या. स्त्री चांगल्या पध्दतीने राजकीय सत्तेमध्ये काम करु शकते. हे अनेक

कर्तृत्ववान स्त्रीयांतून सिध्द झाले आहे. इंदिरा गांधी, सोनिया गांधी, मार्गरेट आल्वा, विमल मुंदडा अशा अनेक स्त्रीयांनी कर्तृत्व राजकारणात नेतृत्व सिध्द केले आहे. त्यामुळे लातूर आणि रेणापूर तालुक्यामध्ये अनेक महिला ग्रामीण आणि पंचायत पातळीवर राजकारण करण्यात यशस्वी झाल्या आहेत. मागील विश्लेषणात सविस्तर आढावा ज्याचा घेतलेला आहे. त्यामुळे वरील तक्त्यावरुन हेच स्पष्ट होते. स्त्रीयांनी राजकारणात येण्यास रेड्डी समाजाने सकारात्मक सहानुभूती व्यक्त केली. हे या संशोधन अहवालात नोंदविलेले आहे हे स्पष्ट होण्यास मदत होते.

वरील तक्ता क्रमांक ५.१४ मधील दुसऱ्या भागामध्ये ३% व्यक्तींनी महिलांनी राजकारणात येवू नये असे मत नोंदविलेले आहे असे वरील तक्त्यावरुन दिसते. म्हणजेच या तक्त्यावरुन ही माहिती स्पष्ट होते. आजही ३% प्रमाणात रेड्डी समाजावर रितीरिवाज, संस्कृती यांचा पगडा आहे. त्यामुळे पंचायतराजमध्ये आरक्षण मिळालेले असूनही महिला बद्दलचा नकारार्थी दृष्टीकोन दिसून येतो. म्हणून अनेक महिला या राजकीय फायद्यापासून वंचित राहावे लागत आहे. कारण लातूर आणि रेणापूर तालुक्यातील ग्रामपंचायती कारभारात अनेक ठिकाणी महिला पदाधिकारी असताना सुध्दा तेथे अप्रत्यक्ष पुरुषच कारभार पाहतात. त्यामुळे ३% व्यक्तीच्या मते महिलांनी राजकारणात येवूच नये असे वरील तक्ता वरुन स्पष्ट होते.

## ५.१५ राजकीय सहभागाची पातळी : रेड्डी समाज -

| अ.क्र | रेड्डी समाजाची राजकीय पातळी | व्यक्ती % |
|---|---|---|
| १. | स्थानिक | ९७ |
| २. | राज्य | ३ |
| ३. | केंद्र | ० |
| | **एकूण** | **१००%** |

वरील तक्ता क्रमांक ५.१५ मध्ये ९७% रेड्डी समाजाच्या स्थानिक राजकीय सहभागाच्या पातळीत आहे अशी माहिती मिळते. रेड्डी समाजाला कोणत्या पातळीवर राजकरण करण्याची आवड आहे याची ही माहिती मिळते. तक्त्याच्या दुस-या भागात ३%

व्यक्ती राज्यपातळीवरील राजकारणामध्ये सहभाग आहे. व केंद्र पातळीमध्ये आतापर्यंत रेड्डी समाजाचा सहभाग आढळत नाही हे वरील तक्त्यामध्ये स्पष्ट होते.

लातूर जिल्हयामध्ये अनुक्रमे लातूर व रेणापूर तालुक्यामध्ये अशीच स्थिती आढळते. कारण येथील राजकीय पातळी हळूहळू वाढत चाललेली आहे. म्हणून वरील तक्त्यावरुन लातूर आणि रेणापूर तालुक्याचा राजकीय सहभाग कोणत्या पातळीवर वाढत आहे. याची माहिती पुढील विश्लेषणावरून अधिक स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक ५.१५ मधील १ मध्ये ९७% व्यक्तींनी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पातळी वरुन आवड असल्याचे दिसून येते. यामध्ये ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हापरिषद यामध्ये मिळेल त्या संधीला सामोरे जावुन निवडणूक लढवयाची आवड ९७% व्यक्तींनी दाखविलेली तक्त्यावरुन स्पष्ट होते. कारण खऱ्या अर्थाने १९९५ नंतर रेड्डी समाजाचा आर्थिक सामाजिक विकासास सुरवात झालेली दिसून येते. राजकीय जाणीव जागृती होण्यास रेड्डी समाजात सुरु झाली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाचे निवडणूकांचे सर्व ज्ञान रेड्डी समाजाला झालेले आहे. त्यामुळे वरील तक्त्यावरुन असे वाटते की स्थानिक स्वराज्य संस्था मधून ९७% व्यक्तींना आवड असल्याचे स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक ५.१५ मधील २ ऱ्या भागामध्ये राज्य पातळी वर ३% व्यक्तींनी राज्य पातळीवर काम करण्याची आवड असल्याचे मत नोंदविले. कारण या ३% मध्ये २ व्यक्तींनी जिल्हा परीषदेत सदस्य त्यापैकी एक उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. त्यामुळे व्यक्तीच्या मतानुसार यांना आजही राज्यपातळीवर राजकरण करण्याची आवड आहे. त्यादृष्टीने त्यांचे प्रयत्नही चालू आहे.

तसेच तक्त्याच्या ३ ऱ्या भागा मध्ये केंद्र पातळी राजकारणाची करण्यासाठी कुणीही आवड दाखविली नाही. कारण रेड्डी समाजाला आतापर्यंत केंद्राची संधी मिळालेली नाही हे एक वास्तव वरील तक्त्यावरुन लक्षात येते.

## ५.१६ रेड्डी समाज : प्रभावशील नेते -

| | **% व्यक्तीगत** |
|---|---|
| १. प्रभावशिल नेते आहेत | ९२% |
| २. प्रभावशिल नेते नाहीत | ८ % |
| **एकूण** | **१००%** |

वरील तक्ता क्रं.५.१६ मध्ये असे दिसते की, रेड्डी समाजा मध्ये तक्त्याच्या १ भागामध्ये ९२% लोकांच्या मतानुसार समाजामध्ये प्रभाव नेतृत्व आहे. हे तक्त्यावरुन दिसते आणि दुसऱ्या भागात ८% व्यक्तीच्या मता नुसार तालुक्यामध्ये प्रभावशील नेते नाहीत असे दिसून येते.

तक्ता क्रमांक ५.१६ च्या भागामध्ये ९२% व्यक्तीनी लातूर आणि रेणापूर तालुक्यामध्ये प्रभाव पाडणारे नेते आहेत. असे मत व्यक्त केलेले वरील तक्त्याच्या अनुक्रमावरून स्पष्ट होते. एकंदरीत परिस्थितीचा आढावा घेतल्यास असे दिसते की रेणापूर आणि लातूर तालुक्यात अनुक्रमे शिवाजीराव कव्हेकर (काँग्रेस), दिलीपराव देशमुख (काँग्रेस), विलासराव देखमुख (काँग्रेस), बब्रुवान काळे (काँग्रेस), एस.आर. देशमुख (काँग्रेस), मधूकरराव कोकाटे (काँग्रेस), मनोहर गोमारे (समाजवादी जनता दल), प्रकाश रेड्डी (धरती बचाव आंदोलन, प्रमुख) तसेच रेणापुरमध्ये वैद्यनाथ शिंदे (काँग्रेस), यशवंतराव पाटील (अध्यक्ष, रेणा सह. साखर कारखाना), व्यंकटराव भिसे, रजनीताई पाटील, आबासाहेब देशमुख, सुशिलकुमार पाटील, नवनाथ भोसले, व्यकंटराव चव्हाण इ. चा फार मोठा प्रभाव रेड्डी समाजावर पडलेला दिसून येतो. या नेत्यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय कामातून समाजामध्ये प्रभाव निर्माण केलेला आहे. म्हणूनच ९२% लोकांच्या मते तालुक्यात प्रभाव पाडणारे नेते आहेत. कारण तालुक्याचे नेतृत्व पार पाडण्याची कुवत यांच्या मध्ये आहे.

तक्ता क्रमांक ५.१६ या भागामध्ये ८% व्यक्तीच्या मते तालुक्यात प्रभाव पाडणारे नेते नाहीत असे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते कारण या ८% मधील राजकारणात जरी असल्या तरी राजकीय प्रवाहाची यांनी फारशी माहिती नसल्याचे या विश्लेषनातून पुढे आले आहे. स्वतःच्या सामाजिक, आर्थिक अडचणी स्वविवेक पध्दतीने मात करण्यात ८% व्यक्तींनी यश

मिळविले आहे. याच व्यक्तीमध्ये विरोधी पक्ष म्हणून ही भूमिका निभावलेली आहे असे दिसते. त्यामुळे वरील तक्त्यावरुन हे स्पष्ट होते.

### ५.१७ रेड्डी समाज : मतदान अधिकार -

| मतदानाचा अधिकार कोणाला द्यावे वाटते | व्यक्ती |
|---|---|
| १. सुशिक्षीत | ९८% |
| २. अशिक्षित | २% |
| **एकूण** | **१००%** |

वरील तक्ता क्रमांक ५.१७ मध्ये असे दिसते की, मतदानाचा अधिकार कोणाला द्यावा या विषयी मत घेतले असता (सर्व्हे मध्ये) असे दिसते की, वरील तक्त्यावरुन ९८% सुशिक्षीत व्यक्तींना मतदानाचा हक्क देण्यात यावा. आणि २% व्यक्तींनी असे मत मांडले की अशिक्षित व्यक्तींनाही मतदानाचा हक्क देण्यात यावा असे वरील तक्त्यावरुन एकदंरीत माहिती स्पष्ट होते.

सामाजिक आर्थिक प्रश्नाच्या जाणिव बरोबरच राजकीय जाणिव असलेल्या घटकाला संधी देण्यात सुशिक्षीत समाजाची गरज असते या तक्त्यावरुन हे ही स्पष्ट होते की ९८% रेड्डी समाज सुशिक्षीत आहेत त्यांच्या मध्ये शिक्षणाचे महत्व पटलले आहे हे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

वरील तक्त्याच्या अनुक्रमे १ ल्या भागातून असे स्पष्ट होते की, लातूर आणि रेणापूर तालुक्यातील ९८% लोकांनी असे मत मांडले की मतदानाचा अधिकार सुशिक्षित व्यक्तीला दिला जावा की जेणे करुन सामाजिक प्रश्नांची जाण असलेल्या व्यक्तीला भविष्यात निवडले जाईल. सुशिक्षित समाज कुणाच्या दबावाला बळी न पडता स्वविवेक बुध्दीने मतदानात भाग घेतो. रेड्डी समाजातील महिलांचे ही शिक्षणाचे प्रमाण जास्त दिसून आले आहे शिक्षित माणसांचे महत्व रेड्डी समाजाला पटले आहे. भविष्यात विकास करायचा असेल तर सुशिक्षित मतदार असले पाहिजे. कारण त्यामुळे जागृत मतदार तयार होतील. जातीयता, भ्रष्टाचार, दबाव यांची निवडणूक न बनता खुल्या वातावरणात आणि दबाव विरहीत

लोकशाही पध्दतीने निवडणूका लढविल्या जातील. म्हणून ९८% व्यक्ती मतदानाचा अधिकार सुशिक्षित समाजाला मिळावा असे तक्त्याच्या पहिल्या भागातून स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक ५.१७ मधील अनुक्रमे २ ऱ्या भागामध्ये २% व्यक्तींनी अशिक्षित समाजाला मतदानाचा अधिकार द्यावे असे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते. कारण ग्रामीण भाग, रुढी परंपरेचा पगडा याचा परिणाम या २% व्यक्तीवर झालेला दिसतो. त्यांच्या मते राजकारणात सर्वांना समान अधिकार असावे त्यामध्ये १८ वर्ष पूर्ण झालेल्या सुशिक्षित असो किंवा अशिक्षित त्याला मतदानाचा अधिकार असावा असे या तक्त्यावरुन स्पष्ट होते.

## ५.१८ रेड्डी समाज : पक्षीय कार्य -

| अ.क्र. | पक्षासाठी कार्य करणारे | व्यक्ती % |
|---|---|---|
| १. | सामाजिक | ४५% |
| २. | रचनात्मक | ११% |
| ३. | आंदोलनात्मक | ५ % |
| ४. | निवडणूका | ३९% |
| | **एकूण** | **१००%** |

वरील तक्त्या क्रं.५.१८ पहिल्या भागामध्ये रेड्डी समाज पक्षाच्या सामाजिक कामासाठी ४८% कार्य करतात. तर दुसऱ्या भागामध्ये रचनात्मक साठी ११% व्यक्ती कार्य करतात तर आंदोलनात्मक कार्यासाठी ५% लोक कार्य करतात. तसेच तक्त्याच्या शेवटच्या भागात निवडणुकांसाठी ३९% लोक चांगल्या प्रकारे काम करताना दिसतात.

लातूर जिल्हयातील लातूर आणि रेणापूर तालुक्यामध्ये सर्वच पक्षाचा कमी जास्त प्रमाणात प्रभाव आहे असे दिसून येते. त्यापैकी कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी यांचा जास्त प्रमाणात प्रभाव दिसून येतो. या दोन्ही पक्षाची ताकद दोन्ही तालुक्यामध्ये चांगल्या प्रकारची आहे सामाजिक बांधिलकी, जात विरहीत राजकारण यामुळे कॉग्रेस आणि राष्ट्रवादी मोठया प्रमाणावर आलटून पालटून सत्ता नेहमी या ठिकाणी मिळत असते. शिवसेना-भाजपा, रिपब्लीकन पार्टी यांचाही कमी प्रमाणात का होईना प्रभाव या दोन्ही तालुक्यात दिसतो. पक्ष कोणताही असे रेड्डी समाजातील व्यक्तीनी पक्षाचा प्रत्येक

कार्यामध्ये हिरारीने भाग घेऊन पक्षाची ताकद वाढविण्याचा नेहमी प्रयत्न केल्याचे दिसते. त्यामध्ये त्यांनी यशही मिळविल्याचे सिध्द अनेक वेळा झालेले आहे. मग ते सामाजिक, पक्षीय रचना किंवा पक्षांची आंदालने अन्य पक्षांच्या निवडणुकाचे कार्य असते. त्यामध्ये रेड्डी समाजातील व्यक्तीने सक्रियरित्या भाग घेऊन आप-आपला पक्ष वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. पक्षकार्य करण्यासाठी कितीही प्रकारच्या अडचणी आल्या तरी त्याबाजूला करून पक्ष वाढविण्यासाठी रेड्डी समाजाचे मतदान वाढविण्यासाठी हा समाज नेहमीच प्रयत्नशिल असतो. धार्मिक कार्यातून जनजागृती करुन समाजाच्या लोकांना अशा कार्यक्रमातून एकत्र आणून पक्षीय संच वाढविण्याचा प्रयत्न अनुक्रमे लातूर आणि रेणापूर मध्ये मोठया प्रमाणावर केला जातो.

इतर समाजामध्ये पक्षीय कार्य वेगळया पध्दतीने करताना लोक आढळतात. परंतू लातूर आणि रेणापूर या दोन्ही तालुक्यामध्ये रेड्डी समाज एकोप्याने पक्षीय कार्य करीत असतो. त्यामुळे त्या त्या भागात वाडया वस्त्यात सर्व्हे करीत असताना असे लक्षात आले की, संघठन कौशल्य रेड्डी समाजाचे चांगले आहे. वास्तविक परिस्थिती लक्षात घेता १९९० च्या अगोदर रेड्डी समाज फार पक्षीय कार्यात नव्हता. फार तर तो पक्षीय कार्यकर्ता मतदार यांची भूमिका पार पाडत होता परंतू १९९० पासून पुढे प्रत्येक जबाबदारीत तो विश्वासर्हता पूर्ण कामे करण्यास प्रयत्न करु लागला. वरील तक्तामधून ते स्पष्ट झाले आहे. या तक्ता विश्लेषणामध्ये आणखी माहिती जाणून घेण्यासाठी तक्यातील पक्षाचे कार्य लातूर आणि रेणापूर तालुक्यामध्ये कशा प्रकारे चालते ते वरील तक्यानुसार बघूया.

तक्ता क्रमांक ५.१९ मधिल अनुक्रमे १ मध्ये ४८% व्यक्ती पक्षाच्या सामाजिक प्रकारचे कार्य करुन पक्ष वाढविण्यासाठी मदत करतात. त्यामध्ये रेड्डी समाजासह इतर समाजाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वरुपाचे प्रश्न सोडविण्यासाठी मदत करणे, शैक्षणिक सेवा सुविधा समाजासाठी चालविणे, सरकारच्या चांगले प्रकारच्या योजना सेवा समाजासाठी राबविणे. त्यातून समाजकार्य उभे करणे, समाजातील अंधश्रध्दा दूर करण्यासाठी रेड्डी समाजाचे नेते अंधश्रध्दा निर्मुलनाचे कामे करताना दिसतात.

तक्ता क्रमांक ५.१९ मध्ये दुस-या भागात ११% व्यक्ती पक्षाच्या रचनात्मक कार्यासाठी कामे करतात असे दिसते. त्यामध्ये पक्षाची धोरण स्पष्ट करणे (तालुका/

जिल्हास्तरावर) पक्षातील विविध पदे देताना सर्व जातीधर्मांना स्थाने देणे. पक्ष सदस्याची नोंदणी करणे आदी कामे ही ११% लोक पक्षासाठी करताना वरील तक्त्या वरुन दिसते.

तसेच तक्ताच्या तिसऱ्या भागात ५% लोक पक्षाची आंदालने उभारण्यासाठी सामाजिक, न्याय, समता या कार्यासाठी प्रत्येक पक्ष आंदोलने उपोषने, घंटानाट, रास्ता रोको, घेराव एक दिवशीय उपोषन, मोर्चा इ. मार्गाचा न्याय मिळून देण्याचा प्रयत्न करतात. या ५% मध्ये रेड्डी समाजाचे प्रमुख नेते सक्रियरित्या भाग घेवून पक्ष्याच्या आंदोलनात्मक कार्यासाठी यशस्वीरित्या प्रयत्न करतात.

तक्त्याच्या चौथ्या भागात निवडणुका ३९% व्यक्ती काम करताना दिसून येतात. निवडणूक कालावधील पक्षाची जबाबदारी पार पाडणे तरुण उमेदवारांना तसेच महिलांना संधी देणे नाराज लोकांची नाराजी दूर करणे. निवडणुका दबाव, जातीविरहीत लढविणे इ. प्रकारात कामे, पक्षाने दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे इत्यादी कामे ३९% प्रकारची लोक करताना वरील तक्त्यावरुन दिसून येतात.

## ५.१९ रेड्डी समाज : राजकारण -

| **अ.क्र.** | **ओबीसी आरक्षण** | **व्यक्ती %** |
|---|---|---|
| १. | राजकारणाने फायदा मिळालेले | ८९% |
| २. | फायदा न मिळालेले | ११% |
| | **एकूण** | **१०० %** |

वरील तक्ता क्रं.५.१९ मधील पहिल्या भागात ८९% व्यक्तींना राजकारणाचा फायदा मिळालेला आहे. व तक्त्याच्या दुसऱ्या भागात ११% व्यक्तींना राजकारणाचा फायदा मिळालेला नाही हे वरील माहितीनुसार स्पष्ट होते.

राजकारणाचा फायदा सर्व जातींना हळूहळू होवू लागला. त्यामुळे रेड्डी जातीसह इतरही जातीतील समाजाची आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रगती दिसू लागली. जागतिकीकरणाचा भारताने १९९१ मध्ये स्विकार केला त्यातच स्पर्धच्या युगात त्यांना विकासाची संधी रेड्डी समाजासह इतर समाजाला निर्माण झाली. सरकारी, निमसरकारी यामध्ये अनेक योजना, सेवासुविधांचा फायदा उत्तरोत्तर रेड्डी समाजाला मिळत गेला. त्यामुळे रेड्डी समाजाचा सर्वांगिन विकास वृध्दीगत होत गेला. लातूर जिल्हयातील लातूर

आणि रेणापुर तालुक्यात परिस्थिती त्याला साजेशी अशी आहे. या ठिकाणी रेड्डी समाजाला राजकारणाचा सर्वात जास्त फायदा मिळालेला आहे. त्यांचे आर्थिक विकासासह सामाजिक, राजकीय विकासही मोठया प्रमाणांवर झाला आहे. शैक्षणिक बाबतीतही अनेक सवलती असल्यामुळे अनुक्रमे या दोन्ही तालुक्यात फार मोठया प्रमाणांवर राजनैतिक विकास झालेला दिसून येते. आज प्रत्येक कुटुंब चांगल्यापैकी सधन स्वरुपात दिसते. अर्थकारणाचा पाया चांगल्यापैकी पक्का झाल्यामुळे रेड्डी समाजाचा सर्वागिन विकास होत असताना दिसून येत आहे.

तक्त्यातील पहिल्या भागातील असे स्पष्ट होते की, सरकारच्या सर्व योजनेचा (उदा. शैक्षणिक, सामाजिक) योजनेचाही अन्य प्रकारचे फायदे मिळाल्या मुळे छोटे मोठे उद्योग धंदे रेड्डी समाजात निर्माण झाले आहे. त्यामधून त्यांच्यात आर्थिक सधनता निर्माण झालेली आहे. यामुळे नेवासा व रेणापुर मध्ये रेड्डी समाजाच्या पतसंस्था काही प्रमाणात सुरु झालेल्या आहेत हे रेड्डी समाजाच्या आर्थिकतेचे द्योतक आहे. मोठया लघू उद्योग धंदयात पण रेड्डी समाज शहरी भागात भागीदार बनला आहे वरील तक्त्यावरुन रेड्डी समाजाचा सामाजिक आणि आर्थिक निकष घेता रेड्डी समाजाच्या सर्वागिण विकासास कारणीभूत परिस्थितीत म्हणजे त्यांना मिळालेले राजकीय संधी होय. हे वरील तक्त्या वरुन स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक ५.२० मधील २ ऱ्या भागा मध्ये असे स्पष्ट होते की, या व्यक्तींना शासनाकडून नेहमी डावलण्यात आले आहे. काही प्रमाणात फायदे मिळाले असले तरी महत्वाचे फायदे या व्यक्तीला मिळालेले नाही. त्यामुळे व्यक्तीचा अर्थिक विकास फार कमी झालेला दिसून येतो आणखी एक माहिती स्पष्ट होते की रेड्डी समाजात ११% मध्ये राजकीय संधीचे अनुकूल फायदे न मिळाले मूळे त्यांचा सर्वागिन विकास फारसा न झाल्याचे दिसून आले आहे.

## ५.२० रेड्डी समाज : मतदान -

| स्वविवेक बुध्दीने | नेता सांगेल त्याला |
|---|---|
| २०% | ८०% |

तक्ता क्रमांक ५.२० मध्ये पहिल्या भागात नमुन्या साठी निवडलेल्या व्यक्ती मध्ये ८० व्यक्तींनी नेता सांगेल त्याला मतदान केलेले आहे असे प्रश्नावलीत मत नोदविले आहे. आणि

२० व्यक्तींनी स्वविवेक बुध्दीने मतदान केलेले आहे. म्हणजेच या ठिकाणी आज्ञांकीत राजकीय संस्कृतीचा प्रकार फार मोठया प्रमाणांवर दिसून येतो.

कारण जातीतील लोक आपल्या जातीच्या नेत्याची आज्ञा पाळताना दिसून येते. राजकीय स्वतंत्र्य या समाजाला इतरा सारखे आहे. परंतू इतर समाजामध्ये स्वविवेक बुध्दीने मतदान मोठया प्रमाणावर दिसून येते. परंतू रेड्डी समाजामध्ये मुख्य नेत्यांच्या धोरणांवर हि मतदान प्रक्रिया अवलंबून असते.

प्रामुख्याने वरील तक्त्यावरुन असेच दिसते रेड्डी समाज आपल्या विचाराच्या नेता सांगेल त्याला मतदान करतो. कारण याच नेत्याकडून हा समाज आर्थिक राजकीय, सामाजिक अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करीत असतो. लातूर आणि रेणापूर तालुक्यामध्ये अनुक्रमे मनोहर गोमारे, ओमप्रकाश गोडभरले, विक्रम गोजममुंडे हे आहेत. तर रेणापूर तालुक्यामध्ये इंदूताई इंगे, किसन भंडारी, दादाराव अलापूरे हे रेड्डी समाजाचे असल्याने अनुक्रमे रेड्डी समाजावर यांचा फार मोठा प्रभाव असल्याचे दिसून आले आहे. यांच्या व्यतीरिक्त इतरही काही नेते कार्यकर्ते, पदाधिकारी, तालुक्या मध्ये दिसुन आलेले आहेत. त्यामध्ये रेणापूर तालुक्यामध्ये वसंत कनामे, एकनाथ अकनगिरे इत्यादी आहेत. तसेच लातूरमध्ये किसन भंडारे, गोपाळ अकनगिरे यांचे ही नेतृत्व हळूहळू उभारत असताना दिसून येते.

कारण समाजाच्या सुख दु:खात तसेच त्यांच्या अनंत प्रकारच्या अडचणी सोडविण्यासाठी या व्यक्तीचा नेहमीच पुढाकार असल्याचे दिसुन आले आहे. म्हणून रेड्डी समाज नेता सांगेल त्याला जास्त प्रमाणात मतदानकरताना दिसून येते. राज्य पातळीवरील मनोहर गोमारे यांचे नेतृत्व या समाजाने एकमुखी मानलेले आहेत. त्यामुळे गोमारे साहेबांचा फार मोठा प्रभाव या समाजावर व त्यामधील नेत्यांवर पडलेला दिसून येतो. म्हणूनच समाजवादी जनता दल पक्षाला लातूर जिल्हयातील अनुक्रमे लातूर आणि रेणापूर तालुक्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका पासून ते केंद्र पातळीच्या निवडणुका मध्ये नेहमीच एकगठ्ठा स्वरुपाचे मतदान रेड्डी समाजाकडून मिळालेले आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा जातीयाता, भ्रष्टाचार दिसून आलेला नाही तर सामाजिक, खाजगी कामे न करणाऱ्या नेत्यांना नाकारलेले दिसून आलेले आहे.

यावरुन हेच स्पष्ट होते की, रेड्डी समाज जरी नेता सांगेल त्याला मतदान मोठया प्रमाणावर करीत असला तरी तो राजकीय दृष्टया प्रगत झालेला आहे. विकास करणाऱ्या पक्षांना व त्यांच्या नेत्यांना तो साथ देत आलेला आहे. म्हणून या समाजामध्ये आज्ञांकीत राजकीय संस्कृतीचा प्रकार दिसून येत असला तरी येणाऱ्या भविष्यात त्यांच्यामध्ये रेड्डी समाजामध्ये निश्चित राजकीय बदल हा स्वविवेक प्रकारचा झालेला दिसून येईल.

## ५.२१ रेड्डी समाज : राजकीय सहभाग -

| अ.क्रं. | रेड्डी समाजातील राजकीय सहभाग वाढविण्यासाठी कार्य | टक्के (व्यक्ती) |
|---|---|---|
| १. | रेड्डी समाजाच्या सुख दुखात सहभागी होतो. | ३८ % |
| २. | रेड्डी समाजाला शासकीय/बिगर शासकीय योजनेचा लाभ मिळवून देतो. | २० % |
| ३. | रेड्डी समाजाच्या सामाजिक अर्थिक अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करतो. | २६ % |
| ४. | इतर/पक्षाची ध्येये धोरणे पटवून देतो. समाजाच्या व्यक्तीला राजकीय संधी देतो. | १६ % |
| | **एकूण** | **१००%** |

वरील तक्ता क्रंमांक ५.२१ मधील पहिल्या भागामध्ये ३८% व्यक्तींनी असे मत नोंदविले आहे की, रेड्डी समाजाच्या सुख-दुखात सहभागी झाल्यामुळे समाजाचा राजकीय सहभाग वाढलेला आहे. दुसऱ्या भागामध्ये २०% व्यक्तींच्या मतानुसार रेड्डी समाजाला शासकीय किंवा बिगर शासकीय योजनेचा लाभ मिळवून देतो. म्हणून राजकीय सहभाग वाढलेला आहे. तक्त्याच्या तिसऱ्या भागात २६% व्यक्ती रेड्डी समाजाच्या सामाजिक, आर्थिक अडचणी दुर करण्याचा प्रयत्न करतात. आणि चौथ्या भागामध्ये १६% व्यक्ती पक्षाचे ध्येय धोरणे पटवून देणे, समाजातील व्यक्तींना राजकीय संधी उपलब्ध करून देणे इ. कामे रेड्डी समाजाचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी कार्य करतात हे वरील तक्त्यानुसार स्पष्ट होते.

लातूर जिल्हयातील अनुक्रमे लातूर आणि रेणापुर तालुक्या मध्ये केलेल्या १०० व्यक्तीच्या नमुना निवड मध्ये असे दिसून येत आहे. रेड्डी समाजाच्या १००% राजकीय सहभाग दिसून आला आहे. म्हणजेच रेड्डी समाजातील पुरुषांचा राजकीय सहभाग

स्त्रीयांपेक्षा चांगला आहे. त्यांच्या मध्ये राजकीय जागृती मोठया प्रमाणांवर निर्माण झालेली आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीचा फार मोठा फायदा रेड्डी समाजाला झालेला दिसून येतो.

## ५.२२ रेड्डी समाज : महिला विषयक धोरण -

| अ.क्र | महिला विषयक धोरण | व्यक्ती % |
|---|---|---|
| १. | ते व्हावे कारण महिलांचा सर्वांगीन विकास होण्यास मदत. | ७८% |
| २. | ते होवू नये त्यामूळे जातीयता निर्माण होईल श्रीमंत महिला पुढे जातील. | १३% |
| ३. | ते व्हावे मात्र रेड्डी समाजाच्या महिलांना त्यामध्ये लहान संधी मिळाली पाहिजे. | ९% |
| | **एकूण** | **१००%** |

तक्ता क्रमांक ५.२२ मधील अनुक्रमे १ मध्ये ७८% व्यक्तींनी ते व्हावे कारण त्यामुळे महिलांचा सर्वांगिन विकास होण्यास मदत होईल असे मत नोंदविले. व दुस-या भागात १३% व्यक्तींनी आरक्षण होऊ नये म्हणून मते नोंदविली आहे. तर ९% व्यक्तींनी ते महिला विषयक आरक्षण मंजूर व्हावे मात्र समाजातील सर्व स्तरातील महिलांना त्यामध्ये संधी मिळाली पाहिजे असे मत नोंदविले. त्यांच्या मते महिलांचा विकास झाल्यास समाजाचा विकास सर्वांगिन प्रकारचा होण्यास वेळ लागणार नाही वरील तक्त्या वरून हेच स्पष्ट होते की, महाराष्ट्र शासनाने महिलांच्या विकासाच्या धोरणा बद्दल जे काही निर्णय घेतले. त्याला ७८% व्यक्तींनी बिनशर्त पाठिंबा दिला या तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की ७३ व्या घटना दुरुस्तीचा फार मोठा प्रभाव या समाजावर पडलेला दिसतो.

तक्ता क्रमांक ५.२३ मधील दुसऱ्या भागावरून असे स्पष्ट होते की, त्यामुळे जातीयता निर्माण होईल त्यातून श्रीमंत घरण्यातील महिला पुढे येतील अशा प्रकारचे मते व्यक्त केली का? तर आज परिवर्तन अशी निर्माण झालेली आहे की, रेड्डी समाजामध्ये मोठया प्रकाणावर राजकीय जाणिव, जागृती झालेली आहे. त्यामुळे १३% व्यक्तींना असे वाटते की महाराष्ट्र शासनाचे महिला विषयी धोरण चांगले आहे. परंतू त्यांचा फायदा सर्व

जातीच्या महिलांना मिळत नाही. म्हणून महिला विषयक धोरण महाराष्ट्र सरकारने टाळावे आणि महिलांचा सार्वजनिक विकास मोठया प्रमाणांवर होईल. सर्व जाती धर्माच्या शासनाच्या योजनेचा फायदा मिळेल. अशा प्रकारच्या योजना स्त्री सबलीकरणासाठी व्हाव्यात आणि त्यानुसार महिलांचा विकास होण्यास मदत निर्माण होईल.

तक्ता क्रमांक ५.२३ मधील तिसऱ्या भागावरून असे स्पष्ट होते की, ९% व्यक्तींनी असे मते मांडले आहे की, ते महिला विषयक धोरण रहावे. मात्र त्यामध्ये रेड्डी समाजाच्या महिलांना त्यामध्ये समान संधी मिळाली पाहिजे. कारण रेड्डी समाजाच्या महिलांना शासनाच्या महिला विषय धोरणांचा फारसा असा फायदा मिळाला नाही. त्याचा फायदा शहरी भागामध्येच मोठया प्रमाणावर होतो. ग्रामीण भागांतील महिलांना शासनाच्या महिला विषयक धोरणांचा फारसा फायदा झाला नाही. त्यामुळे रेड्डी समाजातील महिला या पासून नेहमीच वंचित राहिल्या. महाराष्ट्र शासनाचे महिला सबलीकरणाचे धोरण चांगले परंतू रेड्डी समाजाचा महिलांना त्याचा लाभ मिळेल असे निर्णय त्यामध्ये घेतले जावे असे वाटते.

## ५.२३ रेड्डी समाज : निवडणूक -

| **अ.क्र** | **रेड्डी समाज निवडणुक अनुभव** | |
|---|---|---|
| १. | चांगला अनुभव | ७९% |
| २. | वाईट अनुभव | २१% |
| | **एकूण** | **१००%** |

वरील तक्ता क्रमांक ५.२३ मधील पहिल्या भागामध्ये ७९% व्यक्तींना निवडणूकीत चांगला अनुभव आलेला आहे. व तक्त्याच्या दुस-या भागात २१% व्यक्तींना अनेक निवडणूकीत वाईट अनुभव आलेला आहे. लातूर आणि रेणापुर तालुक्यातील शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये प्रत्येक निवडणुकीत मराठी आणि रेड्डी अशा दोन गटात निवडणूका होताना जवळजवळ ८०% दिसते. रेड्डी समाज आणि मराठा समाज यांच्या मध्ये सत्ता मिळविण्यासाठी नेहमीच रंगदार राजकीय लढती झाल्याचे दिसून आले आहे. या सर्वेक्षणातून आणखी एक माहिती मिळते.

तक्ता क्रमांक ५.२४ मधील पहिल्या भागामध्ये असे स्पष्ट होते की, रेड्डी समाजाला प्रत्येक निवडणूकी मध्ये चांगला अनुभव आलेला आहे. कोणत्याही प्रकारच्या दबावविरहीत, जात, धर्म विरहीत रेड्डी समाज निवडणूकीत सहभागी होतो. त्यामध्ये ते यशस्वी सुध्दा झालेले आहे. त्यामुळे असेही दिसते की, लोकशाहीची तत्वे रेड्डी समाजात चांगल्या प्रकारची रुजेलली दिसते असे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक ५.२४ मधील दुस-या भागात या व्यक्तींनी निवडणुकीत वाईट अनुभव आल्याचे दिसत आहे. कारण ग्रामीण समाज, काही प्रमाणात अशिक्षित आहे. रुढी, परंपरेचा पगडा ग्रामीण भागांवर असल्यामुळे २१% व्यक्तीना निवडणुकीत दबाव, जातीयता, भ्रष्टाचार इ. प्रकारचा अनुभव आला. मराठा वर्चस्वी समाज काही प्रमाणात रेड्डी समाजाकडे जातीय नजरेतून बघतो. त्यामूळे अनेक ठिकाणी अनुक्रमे लातूर आणि रेणापूर मध्ये सर्वांगिन विकास असूनही पक्षाच्या विचारावर निवडणूका लढविल्या जात नसून जातीयतेवर त्या लढविल्या जातात. रेड्डी समाजामध्ये लोकशाहीचे तत्वे समाजाच्या चांगली अंगी पडलेली आहे. त्यामुळे सामाजीक बांधिलकी त्यांच्यामध्ये मोठया प्रमाणांवर निर्माण झाली आहे. त्यामुळे गावपातळीवरच्या ग्रामपंचायत निवडणुकी पासून ते जिल्हा परिषद, विधानसभा या निवडणुकांमध्ये रेड्डी समाजाचे स्थान पक्के रोवलेले दिसून येत आहे. कोणत्याही निवडणुकीमध्ये इतर मागासवर्ग म्हणून या समाजाने या दोन्ही तालुक्यामध्ये राजकीय घडामोडीत किंवा राजकीय सत्तेमध्ये चांगले स्थान निर्माण केले आहे. प्राथमिकपणे काम करण्याची जिद्द आर्थिक पाया भक्कम यामुळे हळूहळू ग्राम पातळीला असलेला रेड्डी समाज आज राज्य आणि केंद्र पातळी वरच्या राजकारणात सुध्दा पाया रोवू पाहत आहे. १९४७ ते १९८० पर्यंत कोणत्याही प्रकारची पार्श्वभूमी नसताना हा समाज आज राज्याच्या जिल्हयाच्या राजकारणात महत्वाची भुमिका पार पाडत आहे.

## ५.२४ रेड्डी समाज : जातीय घटक -

| अ.क्र | मांडलेली मते | व्यक्तीचे मत% |
|---|---|---|
| १. | जातीय घटकाचे प्राबल्य वाढत | ४१% |
| २. | जातीय घटकाचे प्राबल्य वाढत नाही | ५०% |
| ३. | याबद्दल सांगता येत नाही | ०९% |
| | **एकूण** | **१००%** |

वरील तक्ता क्रमांक ५.२४ मधील पहिल्या भागात ४१% व्यक्तीनी असे मत मांडलेकी आजच्या राजकारणामध्ये जातीय घटकाचे प्राबल्य जरुर वाढत आहे. दुसऱ्या भागात ५०% व्यक्तींनी असे मत व्यक्त केले की, राजकारणात जातीय घटकाचे प्राबल्य वाढत नाही. व तक्त्याच्या तिसऱ्या भागामध्ये ९% व्यक्तींनी जातीय राजकारणाबद्दल माहिती नाही असे मत नोंदविले. रेड्डी समाज ग्रामीण भागात असल्यामुळे प्रत्येक व्यक्ती आर्थिक ताकदीवर निवडणुक लढवीत नाही. राजकारणात काही व्यक्ती जातीयतेचा मुद्दा पुढे घेऊन निवडणूक लढवितात. ग्रामीण भागात प्रामुख्याने लातूर आणि रेणापुर तालुक्यात काही प्रमाणात हिच परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसते. त्यामुळे रुढी, परंपरा, उच्च वर्ग, निच्च वर्ग हा असा भेदभाव सामाजिक अडचणी, धर्म प्रभाव यामुळे जातीयता वाढत आहे. मात्र त्याचा उपयोग राजकारणी लोक स्वत:च्या फायदयासाठी करतात. राजकारणात जात हा घटक आल्यामुळे समाजकारण त्यामुळे बिघडले. त्यामुळे कधी-कधी चांगले कार्य करणारे समाजात उमेदवार पडतात. हे तक्त्याच्या पहिल्या भागावरून स्पष्ट होते.

तक्ता क्रमांक ५.२४ मधील दुसऱ्या भागात असे स्पष्ट होते की, आजच्या काळातील राजकारण हे जातीयतेवर राहीलेले तर ते समाजकरण, ८०% अर्थकारण २०% यावर उभारलेले आहे. ज्यांच्या कडून समाजाचा विकास होतात आणि प्रलंबीत प्रश्न सुटतात त्यांना मतदार निवडणुकीत निवडून देतात. म्हणून त्यामुळे या व्यक्तीच्या मते जात घटक हा फक्त समाज चौकटीत बंदीस्त आहे. त्याने राजकारणात कधीत शिरकाव केला नाही असे ५०% व्यक्तीनी मत व्यक्त केले असे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते की, शिक्षण, जनजागृती, आरक्षण प्रभाव यामुळे हा समाज विकसित झालेला दिसून येतो.

तक्ता क्रमांक ५.२४ मधील तिसऱ्या भागामध्ये असे स्पष्ट होते की, राजकरण कोणत्या आधारावर चालते या विषयी ९% व्यक्तींना काहीच माहिती नाही. हेच वरील तक्त्यावरून तिसऱ्या भागामध्ये स्पष्ट होते. म्हणजेच अशिक्षीत प्रमाणही काही प्रमाणात आढळते. यावरुन हे ही स्पष्ट होते की, राजकीय जनजागृती फारशी इतकी झालेली नसावी. हे स्पष्ट होते. कारण ग्रामीण भाग असल्यामुळे विकासाच्या मार्गातीत अडचणी असतात.

कितीही सर्वांगिण विकास कोणत्याही भागाचा झाली तरी जातीचे राजकारण भारतभर बघण्यास मिळते. त्यातून लातूर जिल्हाही सुटलेला नाही. सामाजिक संशोधनात एक प्रबोधन घडावा हा या विचारण्या मागचा प्रामाणिक हेतू होता. महाराष्ट्रात ज्या प्रमाणे जातीची परंपरा मोठया प्रमाणांवर चालत आली आहे तशीच लातूर जिल्हयात रुजलेली आढळते प्रत्येकाच्या नावाला जन्मतः जात चिकटलेली असते. म्हणून धर्म बदलता पण जात बदलत नाही. 'जात नाही अशी ती जात' ***(सुहास पळशीकर महाराष्ट्राचे जात आणि राजकारण)*** अनुक्रमे लातूर आणि रेणापुर मध्ये रेड्डी समाजाला राजकारण करताना जातीयतेवरुन काही प्रमाणात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो ते विवेचन वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

## ५.२५ रेड्डी समाज : विकास -

| अ.क्र | विकास अशा प्रकारचा व्हावा | व्यक्ती % |
|---|---|---|
| १. | आर्थिक | १७% |
| २. | सामाजिक आणि राजकीय | २४% |
| ३. | सर्वागिन स्वरुपाचा | ५९% |
| | **एकूण** | **१००%** |

वरील तक्ता क्रमांक ५.२५ मधील पहिल्या भागात अनुक्रमे १७% व्यक्तींनी आर्थिक प्रकारचा समाजाचा विकास व्हावा असे मत नोंदविले. तर तक्त्याच्या दुसऱ्या भागामध्ये २४% व्यक्तींनी रेड्डी समाजाचा सामाजिक आणि राजकीय विकास व्हावा असे मत नोंदविले. आणि तक्त्याच्या तिसऱ्या भागामध्ये ५९% व्यक्तींनी रेड्डी समाजाचा सर्वांगिन स्वरुपाचा

विकास व्हावा अशा प्रकारे मत व्यक्त केले आहे. सामाजिक संशोधन म्हणून विश्लेषण अगत्याचे मानले जाते म्हणून वरील तक्त्याचे विश्लेषण बघूया.

वरील तक्ता क्रमांक ५.२५ मधील पहिल्या भागात असे स्पष्ट होते की, रेड्डी समाजाचा आर्थिक विकास झाल्या शिवाय इतर विकासास त्यांना वाव मिळणार नाही. त्यासाठी वेगवेगळया उद्योग-धंदयांची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामध्ये दुग्ध व्यवसाय, कुटी उद्योग, लघुउद्योग असल्यास अर्थिक पाया भक्कम होण्यास मदत होईल. त्यातून रेड्डी समाजाचा सर्वागिण विकास होण्यास मदत होईल असे तक्त्यावरुन स्पष्ट होते.

वरील तक्ता क्रमांक ५.२६ मधील दुसऱ्या भागावरून असे स्पष्ट होते की, सामाजिक आणि राजकीय प्रगती वरच समाजाची सर्वागिन प्रगती अवलंबून असते. म्हणून राजकीय निर्णय म्हणून २४ व्यक्ती (१०० पैकी) सामाजिक आणि राजकीय विकासास प्राथमिक स्थान देतात. तक्ता क्रमांक ५.२६ मधील तिसऱ्या भागामध्ये आधी परिस्थिती स्पष्ट होते की, रेड्डी समाजाचा जरी विकास काही प्रमाणत झालेला असला तरी सामाजिक व राजकीय विकास फार कमी झालेला आहे. असे दिसून येते की, तसेच या व्यतिरिक्त शैक्षणिक, आर्थिक अशा प्रकारच्या अडचणी मोठया प्रमाणावर निर्माण झालेल्या आहेत. त्यामध्ये शासकीय बिगर शासकीय अडचणी निर्माण झालेल्या असतात. म्हणून अशा प्रकारच्या अडथळे सोडविण्यासाठी शासन दरबारी अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या कडून रेड्डी समाजाचा सर्वांगिण विकास व्हावा असे तक्त्यावरुन वाटते.

रेड्डी जातीच्या लोकांना स्वतःच्या उन्नतीला वंचित राहावे लागत असे. मात्र १९८० नंतर परिस्थितीत बदल झाला. पुढे रेड्डी समाजाच्या विकासास प्रारंभ झाला. मात्र तरीही ग्रामीण भागामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी असतात. नुसत्या आर्थिक अडचणी सोडवून ग्रामीण भागाचा विकास होणार नाही. म्हणून त्यासाठी सर्वागिन स्वरुपाचा विकास होणे गरजेचे आहे. तरी त्याच स्वरुपात इतर प्रश्न निर्माण झालेले आहे. उदा. सेवाक्षेत्र, नोकरी, रोजगाराचा प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणून हे सोडविण्यासाठी नुसते राजकीय पटलावर निर्णय घेणे महत्वाचे नसतात. तर त्याची सर्वागिन अंगाने अंमलबजावणी होणे महत्वाचे असते. म्हणून वरील तक्त्यामधील तिसऱ्या भागावरून स्पष्ट होते की, आज सर्वांगिन स्वरुपाचा रेड्डी समाजाचा विकास झालेला नाही, ते होणे मात्र गरजेचे आहे हे स्पष्ट होते.

## ५.२६ रेड्डी समाज : महत्वकांक्षा -

| अ.क्र | महत्वकांक्षा | पुरूष पैकी | स्त्री |
|---|---|---|---|
| १. | सरपंच | २२% | ५% |
| २. | पंचायत समिती सदस्य | ३९% | ९% |
| ३. | जिल्हापरीषद अध्यक्ष/उपाध्यक्ष | १६% | १% |
| ४. | सोसायटी चेअरमन | १२% | ०% |
| ५. | विधान सभा | ६% | ०% |
| ६. | इतर | ५% | १% |
| | **एकुण** | **१००%** | |

तक्ता क्रमांक ५.२६ मधील पहिल्या भागामध्ये २२% रेड्डी समाजातील व्यक्तींना सरपंच या पदाची महत्वकांक्षा आहे. तक्त्याच्या दुसऱ्या भागामध्ये ३९% व्यक्तींना पंचायत समिती सदस्य होण्याची इच्छा आहे असे मत नोंदविले आहे. त्यामध्ये म्हणजेच ३९% पैकी ९% स्त्रियांनीही पंचायत समितीमध्ये नुसते सदस्य न होता सभापती होण्याची इच्छा व्यक्त केली. तक्त्याच्या तिसऱ्या भागामध्ये १६% व्यक्तींनी जिल्हा परिषद अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष होण्याची इच्छा प्रश्नावलीमधून व्यक्त केली. त्यामध्ये १% महिलांचाही समावेश आहे. तक्त्याच्या चौथ्या भागामध्ये १२% व्यक्तींना ग्रामपातळीवरील विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन होण्याची महत्वकांक्षा आहे असे मत मांडले आहे. तसेच तक्त्याच्या ५ व्या भागामध्ये ६% विधानसभा सदस्य होण्याची महत्वकांक्षा आहे. त्यात १% महिलेचा समावेश आहे. तसेच तक्ता क्रमांक ५.२७ च्या शेवटच्या भागामध्ये ७% व्यक्तींना याशिवाय इतर ही राजकीय क्षेत्रात सर्वोच्च पदे मिळविण्याची महत्वकांक्षा आहे असे वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते. ग्रामपंचायतच्या सत्तेच्या किंवा विरोधी वर्तूळात काम करुन आज या व्यक्तींना पंचायत मधील सत्ता राजकारणाची जाणीव आणि जागृती निर्माण झालेली दिसून येते. यावरुन त्यांचा राजकीय सहभाग चांगल्या प्रकार असलेला दिसून येते.

लातूर जिल्हयातील मौजे लातूर आणि रेणापुर तालुके हे राजकीय दृष्टया प्रगतीच्या दृष्टीने पाऊल टाकणारे दिसते. काही प्रमाणात ही प्रगती झालेली आहे. राजकीय पार्श्वभुमी फार नसताना या समाजाला १९९० दशकात सत्तेच्या अनेक वर्तुळात सहभागी होण्याची संधी मिळाली. त्यामध्ये महिलांना चांगल्या प्रकारची संधी मिळाली. म्हणजेच रेड्डी समाजातील व्यक्तींचे राजकीय सहभागाचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत चालल्याचे दिसून येते. या समाजाची

आज परिस्थती अशी आहे की, नुसते मतदान करण्यापूरता हा समाज मर्यादीत राहिलेला नसून प्रत्येक स्तरातल्या सत्तेत मुख्य पदापर्यंत हा समाज पोहचलेला आहे. अगदी ग्रामपंचायतपासून ते राज्य पातळी पर्यंत नेतृत्व करण्याची कुवत या समाजामध्ये निर्माण झालेली आहे.

## ५.२७ रेड्‌डी समाज : राजकीय पक्षातील पदे : -

| **अ.क्र.** | **निवडलेली पदे** | **स्त्री** | **पुरुष** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा अध्यक्ष/उपाध्यक्ष | ०० | ०१ | ०१% |
| २. | तालुका अध्यक्ष उपाध्यक्ष | ०२ | ३ | ०५% |
| ३. | जिल्हा सरचिटणीस | ०१ | ०५ | ०६% |
| ४. | तालुका सरचिटणीस | ०३ | ०६ | ०८% |
| ५. | जिल्हा संघटक | ०२ | ०४ | ०६% |
| ६. | तालुका संघटक | ०४ | १० | १४% |
| ७. | पक्षील खजिनदार | ०१ | ०५ | ०९% |
| ८. | इतर | १८ | ३३ | ५१% |
| ९. | नाही | | | |
| | | | **एकुण** | **१००%** |

वरील तक्ता क्रमांक ५.२७ वरुन असे दिसते की, पहिल्या भागामध्ये जिल्हाध्यक्ष/उपाध्यक्ष या पक्ष पातळीवर रेड्‌डी समाजाला एक पद मिळालेले दिसते. यावरुन जिल्हास्तरीय राजकारणात हळूहळू पक्षीय संधी निर्माण होत आहे असे दिसते. तालुकाध्यक्ष आणि उपाध्यक्ष २% स्त्री आणि ३% पुरुषांना रेड्‌डी समाजाच्या मिळाले आहे. असे वरील तक्त्यावरुन लक्षात येते. जिल्हा पातळीवर जिल्हा सरचिटणीस मध्ये १% महिला आणि ५% पुरुषांनी चांगल्या प्रकारे कामे केले असे तक्त्यावरुन स्पष्ट होते. लातूर आणि रेणापुर तालुक्यामध्ये सगळयाच पक्षामध्ये तालुका सरचिटणीस ८% व्यक्तिंना आतापर्यंत संधी मिळालेली आहे. ओबीसी समाजाला एकत्रित करुन त्यांची विविध कामे रेड्‌डी समाजासह इतर समजाचे निमसरकारी, सरकारी कामे करुन देणे. जिल्हा संघटक म्हणूल आता पर्यंत ६% व्यक्तींनी विविध पक्षातून काम पाहिलेले आहे. त्यामध्ये ४% पुरुष २% महिलांना संधी मिळालेली दिसून येते. पक्षीय कार्य करुन वाढविणे ही विविध पक्षात ४ ते ५ पदे अशा प्रकारची पदे दिली जातात या ठिकाणी रेड्‌डी समाजाचे कार्य चांगले आहे असे दिसून येते.

तालुका संघटक म्हणून रेड्डी समाजाच्या १९९० पासून संधी मिळत गेली आहे. १०% व्यक्तींनी आता पर्यंत तालुका संघटक म्हणून काम केलेले आहे तसेच ४ महिलांनी तालुका संघटक म्हणून काम केलेले आहे असे वरील तक्त्यावरुन दिसून येते. पक्षीय खजिनदार म्हणून तालुका पातळीवर ६ व्यक्तीनी कामे केलेली आहे असे वरील तक्त्यावरुन दिसून येते. इतर विविध पक्ष संघटना यामध्ये रेड्डी समाजाला ५१% पदे मिळालेली दिसून येते. त्यामध्ये स्त्रीयांना १८% आणि पुरुष ३३% अशा प्रकारचे वर्गीकरण पाहावयास मिळते.

वरील तक्त्यावरुन असे दिसून स्पष्ट होते की, विविध पक्षामध्ये रेड्डी समाजाला अनेक प्रकारची पदे मिळालेली दिसत आहे. जिल्हा पातळीवर रेड्डी समाजाच्या अनेक व्यक्तिनी कार्य केलेले दिसत आहे. म्हणजे वरील तक्त्यावरुन असे सिध्द होते की, रेड्डी समाजाचे पक्षीय कार्य चांगले असून भविष्यात त्यांना यापेक्षा चांगले पदे मिळतील असा अंदाज आहे. याशिवाय तालुक्यातील काही व्यक्ती राज्य पातळीवर राष्ट्रवादी कॉग्रेस वेगवेगळया पदावर काम करत आहे. यावरुन असे दिसते रेड्डी समाजाला राज्य पातळीवर पक्षीय कार्य करायला आवडते आणि त्याला तशी संधी निर्माण होत आहे.

# ***<u>प्रकरण-६</u>***

# ***निष्कर्ष***


| | पान नंबर |
|---|---|
| प्रस्तावना | १४८ |
| निष्कर्ष | १४९ |

<u>*प्रकरण-६*</u>

# *निष्कर्ष*

## प्रस्तावना -

लातूर मधील राजकीय क्षेत्रामध्ये या रेड्डी समाजातील लोकांना महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे अनेक राजकीय पक्ष या समाजाचा अनुनय करण्याचा प्रयत्न करतात. प्रत्यक्षात या रेड्डी समाजातील आजी-माजी नेते व राजकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांचे राजकीय विचार, भावना या अभ्यासाच्या निमित्ताने व्यक्त होतील. यादृष्टीकोनातुन रेड्डी समाज राजकारण हा अभ्यास विषयाचा महत्वाचा घटक ठरविण्यात आला. कारण प्रतिनिधी (आजी-माजी नेते कार्यकर्ते) हे प्रत्यक्ष राजकीय क्षेत्रामध्ये कार्यरत असतात. तसेच पदावर नसतानाही ते राजकीय पक्षांशी संबंधित असतात. आणि राजकीय पक्षाच्या विविध जबाबदाऱ्या पार पाडीत असतात. त्यामुळे या प्रतिनिधीमुळे रेड्डी समाजाचे प्रतिनिधी म्हणुन पाहण्यात येते. आणि समाजाचे प्रतिनिधत्व करणारे प्रतिनिधी म्हणुन राजकीय पक्ष त्यांना आपल्या कार्यकारणीमध्ये, पक्षातर्फे चालविण्यात येणाऱ्या अल्पसंख्य किंवा बहुसंख्य मोर्चामध्ये सहभागी करून घेतात.

यानुसार सदरील संशोधन अभ्यासासाठी रेड्डी समाजातील आजी-माजी प्रतिनिधीचे स्थान महत्वाचे होय. संशोधन अभ्यास विषयाच्या सुरूवातीला जिल्हयातील रेड्डी समाजातील ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक माहिती संकल्पित करण्यात आली. तिचे सविस्तर विश्लेषण करून या संशोधन अहवालात ती माहिती लिहण्यात आली.

वरीलप्रमाणे संशोधन विषयाचा उद्देश स्पष्ट करण्यात आला. आणि अभ्यास विषयांच्या गृहितकांमध्ये रेड्डी समाजाच्या राजकीय सहभाग वरील परिस्थितीनुसार गृहितके मांडण्यात आली. त्यानुसार रेड्डी समाजाचे राजकीय सहभागाचे प्रमाण चांगले आहे. रेड्डी समाजातील स्त्रीयांचे पुरूषांचा सहभाग जास्त आहे. पंचायत राज्याच्या निवडणुकीत इतर मागास वर्ग म्हणून रेड्डी जातीला महत्व आले आहे. विविध राजकीय संधीमुळे रेड्डी समाजाचा सहभाग वाढला आहे.

तसेच उद्देशमध्ये रेड्डी समाजाचा राजकीय व्यवस्था व त्यातील सहभाग प्रक्रियेबद्दल किती माहिती मिळाली आहे? रेड्डी समाजाचा राजकीय सहभाग कोणत्या पातळी पर्यंत

आहे? रेड्डी नेते व लोकप्रतिनिधी यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग अभ्यासणे, रेड्डी समाजातील महिलांचा राजकीय सहभागाचा अभ्यास करणे. याप्रमाणे संशोधन अभ्यास विषयासाठी उद्देश व गृहितके नुसार प्रश्नावली तयार करण्यात आली. सदरील अभ्यास विषयांसाठी लातूर जिल्हयातील लातूर व रेणापूर हे दोन तालुके विशेष संदर्भासाठी निवडण्यात आले. त्यामध्ये १०० व्यक्तीकडून प्रश्नावली भरून घेतल्या. त्यात रेड्डी समाजातील, पंचायतराज्यातील आजी-माजी पदाधिकारी, पक्षीय कार्यकर्ते, बाजार समिती सदस्य, महिला पदाधिकारी, जि.प. आजी-माजी सदस्य, माजी आमदार यांचा समावेश आहे.

तसेच अधिक माहिती मिळविण्यासाठी या दोन तालुक्यातील नेत्यांच्या व कार्यकर्त्यांच्या प्रातिनिधिक स्वरूपात २५ जणांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यामध्ये महिलांचाही समावेश आहे. याच बरोबर सामाजिक व धार्मिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व रेड्डी समाजाशी निगडीत संघटनेचीही माहिती संकलन म्हणून या संशोधनात मोठया प्रमाणावर उपयोग झाला. कारण या संघटनांचा या क्षेत्राशी अप्रत्यक्ष संबंध असतो आणि बाहेरून आपला प्रभाव व्यक्त करतात. आणि त्याप्रमाणे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यातुन रेड्डी समाजाला जागृती आणण्याचा यशस्वी प्रयत्न या संघटनांकडून होतो.

वरील संशोधन अभ्यास विषयाच्या उद्देश व गृहितकानुसार माहिती संकलित करून त्याचे सुत्रबद्धरित्या विश्लेषण करून त्यानुसार पुढील निष्कर्ष काढलेले आहेत.

## निष्कर्ष -

१) रेड्डी समाजाला राजकीय व्यवस्था व त्यातील राजकीय सहभाग प्रक्रियेबद्दल मोठया प्रमाणावर माहिती मिळालेली आहे. मुळतः आर्थिक, सामाजिक, प्रगती झालेली असल्यामुळे इतर मागासवर्गीयांचे नेतृत्व रेड्डी समाज करीत आहे. त्यामुळे सत्तेतील प्रत्यक्ष पदावर संधी मिळाल्याने सत्ता व लोकशाहीचा अनुभव रेड्डी समाजाला आलेला आहे. कोणत्याही निवडणुकीत उमेदवारी अर्जापासून ते मतदान प्रक्रियेपर्यंत राजकारण कसे करायचे? याबद्दल मोठया प्रमाणांवर रेड्डी समाजाला माहिती झालेली आहे. इतर मागासमधून रेड्डी समाजाला राजकीय सहभाग जास्त असल्यामुळे राजकीय प्रक्रियांचे संपूर्ण ज्ञान या समाजाला झालेले दिसते. राजकीय

संधीचे महत्व रेड्डी समाजाने ओळखल्यामुळे पंचायतराज मधील जागांवर हा समाज सहभागी झालेला आहे. त्यात पुरूषांसह महिलांमध्ये राजकीय जाणिव जागृतीचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे महिलांनाही राजकीय व्यवस्था व राजकीय सहभाग प्रक्रियेबद्दल मोठया प्रमाणांवर माहिती झालेली आहे.

राजकीय जागांवर निवडून आल्यावर पदाधिकाऱ्यापासून ते शासकीय उच्च अधिकाऱ्यापर्यंत कशाप्रकारे संवाद साधायच, जनतेची अनंत अडचणी कशा प्रकारे सोडायच्या, जनता व प्रशासन यांच्यामधील दुवा म्हणुन काम कशा प्रकारे करायचे या सर्व राजकीय व्यवस्थेबद्दल रेड्डी समाजाला माहिती मोठया प्रमाणावर झालेली दिसुन येते.

२) रूश व अल्शॉप यांनी केलेल्या राजकीय सहभाग पातळीच्या रचनेनुसार, माळी समाजाचा विश्लेषणात्मक अभ्यास केला. त्यानुसार असा निष्कर्ष निघतो की, निम्नस्तरापासून रेड्डी समाजाचा सहभाग उच्च राजकीय सहभाग पातळीपर्यंत वाढलेला आहे. प्रत्यक्ष सत्तेतील किंवा पक्षातील मुख्य पदापर्यंत रेड्डी समाज सहभागी झालेला आहे. जिल्हा स्तरातील 'पंचायत राज' मधील सर्वोच्च पद रेड्डी समाजाने धारण केलेले आहे. त्यामुळे या समाजाचा राजकीय सहभागाची पातळी दिवसे-दिवस वाढत आहे. जिल्हास्तरातील सर्व सत्ताकेंद्र तसेच राजकीय पक्षातील इतरही केंद्र स्थानिक रेड्डी समाजाला महत्वाची पदे मिळालेली आहे. पदांची खुप मोठी उत्तरंड रेड्डी समाजाच्या स्त्री पुरूषांमध्ये दिसून येते. युवक वर्गाचे प्रमाण यामध्ये जास्त प्रमाणात दिसते.

३) रेड्डी समाजातील नेते व लोक प्रतिनिधी यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभागाचा अभ्यास केला असता असा निष्कर्ष निघतो की, हे रेड्डी लोकप्रतिनिधी प्रत्यक्ष सत्तेमध्ये सहभागी दिसत असले तरी किंवा निर्णय प्रक्रियेत त्यांचे स्थान महत्वाचे दिसत असले तरी यांचे स्थान मात्र गौन स्वरूपाच आहे. कारण वरिष्ट नेतृत्वांचा त्यांच्यावर मोठया प्रमाणांवर दबाव दिसुन आला. वरिष्ठ नेतृत्वांच्या निर्णयाशिवाय रेड्डी नेते व लोक प्रतिनिधी यांचे निर्णय प्रक्रियेतील स्थान नियंत्रित स्वरूपाचे दिसुन आले. दोन्ही तालुक्यात वरिष्ठ राजकारणांवर घराणेशाहीचे वर्चस्व आहे. त्यामुळे

येथील वर्चस्वशाली नेत्यांकडून स्थानिक निर्णय प्रक्रिया नियंत्रित केलेली दिसते. वरिष्ठांना अपेक्षित निर्णय घेतलेले दिसते.

रेड्डी समाजातील लोकप्रतिनिधी मुख्य पदावर जरी असले तरी त्यांनी घेतलेल्या काही निर्णयाला मराठा पदाधिकारी मोठया प्रमाणांवर आक्षेप घेताना दिसुन येतात. वरीष्ठ नेत्यांचा त्यांना नेहमी धाक दाखवितात. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत रेड्डी समाजाच्या नेत्यांना, लोकप्रतिनिधींना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते. परंतू या निमित्ताने रेड्डी समाजाला मिळालेल्या निर्णय प्रक्रियेत स्थान ही एक भविष्यातील राजकीय पातळी वाढविण्यास संधी दिसते. असाही निष्कर्ष या अभ्यासातुन पुढे येतो.

४) रेड्डी समाजातील स्त्रियांच्या राजकीय सहभागाचा संशोधन अभ्यास केला असता असा निष्कर्ष पुढे येतो की, या समाजातील स्त्रियांच्या राजकीय सहभागात उत्तरोत्तर वाढ होत आहे. शैक्षणिक व सामाजिक दृष्टया अगोदरच पुढारलेल्या रेड्डी समाजाच्या महिलांमध्ये राजकीय जागृती मोठया प्रमाणांवर वाढीस लागलेली आहे. त्यातच राजकीय संधीमुळे रेड्डी जातीतील महिला कमी-जास्त प्रमाणात यशस्वी झालेल्या दिसतात. ‘पंचायतराज’ मधील मिळालेल्या संधीचा राजकारणामध्ये येथील महिलांनी पुरेपूर फायदा घेतलेला दिसतो.

काही भागातून मात्र आजही रेड्डी महिला राजकारणात आलेल्या दिसत नाही. म्हणजेच या ठिकाणी निरक्षरपणा, राजकारणाबद्दलची काही प्रमाणात उदासिनता दिसून येते. आणि याठिकाणी राजकारण आहे त्यावरही पुरूषप्रधान वर्चस्वाचा पगडा निर्माण झालेला आहे. आरक्षण म्हणून संधी मिळालेल्या ठिकाणी काही महिलांचा कारभार अप्रत्यक्षरित्या पुरूषच चालविताना दिसतात. मात्र समाजातील महिलांना आरक्षणाच्या संधीमुळे प्रथमच राजकारणात स्थान प्राप्त झाल्यामुळे भविष्यात राजकीय स्थर्य या महिलांना आल्याशिवाय राहणार नाही.

५) रेड्डी समाजाचे राजकीय सहभागाचे प्रमाण चांगले आहे. राजकारणातील सर्व सत्तेच्या केंद्रस्थानी या समाजातील व्यक्तींना सहभाग मिळालेला आहे. ‘पंचायतराज’ मधील मिळालेल्या आरक्षणाच्या फायद्यामुळे, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत मध्ये त्यांच्या राजकीय सहभाग मोठया प्रमाणावर दिसतो. याशिवाय

इतरही सहकारी क्षेत्रातील निवडणुकीत त्यांचा सहभाग काही प्रमाणात दिसतो. सत्तेतील मुख्यपदे तसेच काही प्रमाणात पक्षातील पदे मिळाल्याुळे रेड्डी समाजातील नेत्यांनी समाजात नेहमी भेडसावणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक केली. त्यामुळे उत्तरोत्तर रेड्डी समाजातील व्यक्तींचा राजकीय सहभाग वाढविण्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केलेले दिसते. त्याचा परिणाम आज रेड्डी समाज कोणत्याही राजकीय प्रक्रियेत सक्रियरित्या सहभागी झालेला दिसतो. पुरूषांसह महिलांचा सहभाग त्यामध्ये दिसुन येतो. यारून सिद्ध होते की, रेड्डी समाजाचे राजकीय सहभागाचे प्रमाण चांगले आहे.

६) रेड्डी समाजातील स्त्रियांपेक्षा पुरूषांचा सहभाग जास्त आहे. कारण आरक्षण धोरणामुळे जरी महिलांना राजकारणात येण्याची संधी मिळाली. तरी काही प्रमाणात, पारंपारिकता, शिक्षणाचा अभाव, पुरूष प्रधान संस्कृतीचा प्रभाव, राजकारणाबद्दलची उदासिनता यासर्व बाबींमुळे अजुनही बऱ्याच प्रमाणात रेड्डी समाजातील महिला राजकारणात सक्रिय झालेल्या दिसत नाही. ज्याठिकाणी राजकीय पार्श्वभूमी आहे. त्याच घराण्यातील महिला सद्यपरिस्थितीत राजकारणात कार्य करताना दिसून येतात. परंतु त्यांही फारसे सक्रियरित्या कार्य करताना दिसत नाही. त्यांच्या घरातील पुरूष मंडळी त्यांचा कारभार अप्रत्यक्ष चालविताना दिसतात. म्हणून सदरील संशोधन अभ्यासात रेड्डी समाजातील स्त्रियांपेक्षा पुरूषांचा राजकीय सहभाग जास्त आहे.

७) पंचायत राज्याच्या निवडणूकीत इतर मागास वर्ग म्हणून रेड्डी जातीला महत्व आले आहे. इतर समाजाचे नेतृत्वही रेड्डी समाज करतो. त्यांना संगठीत करून, त्यांच्या प्रश्नांची योग्य दखल घेणे इ. कार्यामुळे तसेच सामाजिक व शैक्षणिक प्रगती झाल्यामुळे रेड्डी समाजात राजकीय जाणीव जागृती मोठया प्रमाणावर वाढीस लागलेली आहे. तसेच मराठा वर्चस्वाला राजकीय शह देण्यासाठी रेड्डी समाज राजकीयदृष्टया पुढे झाल्याने पंचायत राज्याच्या निवडणूकीत इतर मागास वर्ग म्हणून रेड्डी जातीला महत्व आले आहे.

८) विविध राजकीय संधीमुळे रेड्डी समाजाचा राजकीय सहभाग वाढला आहे. कारण १९९० च्या अगोदर आरक्षणाची संधी नसल्यामुळे रेड्डी समाज राजकारणात सक्रिय नव्हता. संधी मिळाली तरच राजकारणात तो सक्रीय होत असे. रेड्डी समाजाला

'पंचायतराज' मध्ये राजकारण करण्याची नामी संधी मिळाली. यासर्व बाबीवरून रेड्डी समाजाने राजकीय नेतृत्व करून राजकारणातील सत्ता केंद्रस्थानी महत्वाचा सहभाग मिळविला. मुळतः सामाजिक आणि शैक्षणिक प्रगती झालेली असल्यामुळे १९९५ नंतर प्रत्येक राजकीय संधीचा फायदा रेड्डी समाजाने इतर मागासवर्गीयांच्या अगोदर घेतला. असा निष्कर्ष सदरील संशोधन अभ्यास विश्लेषणावरून निघण्यास मदत होते.

९) रेड्डी समाजाला राजकीय पार्श्वभूमी चांगली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून जरी रेड्डी समाजाला प्रत्यक्षरित्या सत्तेमध्ये सहभाग मिळाला नसला तरी अप्रत्यक्षरित्या त्यांचा मोठया प्रमाणावर सहभाग होता हे सिध्द होते. राजकीय सत्तेमध्ये रेड्डी समाजाला सहभाग मिळाला. त्यामुळे १९९३ पासून ते २००६ पर्यंत रेड्डी समाजाला चांगल्या प्रकारची राजकीय पार्श्वभूमी तयार झालेली दिसते. कारण ज्या कुटुंबामधून जे पुरूष राजकीय सत्तेवर होते किंवा आहेत पुढे त्याच कुटुंबातुन महिलाही राजकारणात सक्रिय झालेल्या आहेत. त्यामुळे १९९३ पूर्वी जरी रेड्डी समाजाला फारशी राजकीय पार्श्वभूमी नव्हती तरी पुढे १९९३ मध्ये मिळालेल्या संधीमुळे प्रत्यक्षरित्या राजकीय पार्श्वभूमी निर्माण झालेली आहे असे स्पष्ट होते.

१०) रेड्डी समाजाच्या आर्थिक परिस्थितीमुळे दिवसेंदिवस चांगल्या स्वरूपाचा बदल निर्माण होत आहे. मुळतः पूर्वीपासून हाल, अपेष्टा, दारिद्रयात रेड्डी समाज खितपत पडलेला होता. परंतू पुढे १९८० नंतर या समाजामध्ये राजकीय व सामाजिक जनजागृतीचे प्रमाण कमी जास्त प्रमाणात सुरू झाले. त्यातच पुढे राजकीय विकासासह आर्थिक प्रगती होण्यास इतर समाजासह रेड्डी समाजाला वाव मिळाला. १९९५ नंतर मोठया प्रमाणात उद्योग धंदे, नोकरी यामध्ये रेड्डी समाजाने यशस्वी वाटचाल केलेली आहे. आर्थिक प्रगती झाल्यामुळे राजकीय क्षेत्रांसह इतरही आर्थिक फायद्याच्या क्षेत्रात रेड्डी समाजाने प्रगती केली आहे.

# *संदर्भ सूची : -*


१) आगलावे प्रदिप, संशोधन पद्धती व तंत्रे, विद्या प्रकाशन, २००१, नागपूर, पान नं. ७३, ३७१.

२) आहुजा राम, सामाजिक सर्व्हेक्षण अनुसंधान, रावत पब्लिकेशन, २००३, नवी दिल्ली, पान नं.२२.

३) कर्वे चि. ग., जोगळेकर स. आ, जोशी या. गो., महाराष्ट्र परिचय (अर्थात संयुक्त महाराष्ट्र ज्ञानकोश), प्रसाद प्रकाशन, २००५, पुणे, पान नं.३५ व ३६.

४) कानिटकर वि.ग, फाळणी टाळणारा महापुरूष : अब्राहम लिंकन, रविराज प्रकाशन, १९९०, नागपूर, पान नं.११४.

५) डॉ.कांबळे बाळ, पॉलिटिकल सोशल ॲण्ड इकॉनॉमीक प्रोफाईल ऑफ ए कम्युनिटी : ए स्टडी ऑफ मारवाडी इन अहमदनगर सिटी, अप्रकाशित, युजीसी संशोधन प्रकल्प, २००३.

६) डॉ.कांबळे बाळ व कुलकर्णी गिरीश, अहमदनगर जिल्हयातील स्थानिक संस्था निवडणूका : २००२, महाराष्ट्राचे राजकारण व राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ (संपादित) सुहास पळशीकर व नितीन बिरमल, प्रतिभा प्रकाशन, पुणे. २००४ए प्रा.पृ.२२६.

७) केतकर ए., महाराष्ट्राच ज्ञानकोष, संपादक-महाराष्ट्रीयन ज्ञानकोष प्रकाशन मंडळ, प्रस्तावना खंड, वर्ष १९२३, नागपूर, पा नं.३४.

८) कुलकर्णी प. रा., भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक पब्लिशर्स, वर्ष १९९९, औरंगाबाद, पान २१५.

९) डॉ.कारलेकर श्रीकांत, प्रात्यक्षिक भुगोल, डायमंड पब्लिकेशन, २००१, पुणे, पान नं.२१.

१०) गर्गे स. मा., भारतीय समाज विज्ञानकोष, समाज विज्ञान प्रकाशन मंडळ, खंड-१, २००१, पुणे, पान नं.१३४.

११) डॉ.घारपुरे विठ्ठल, सामाजिक व सांस्कृतिक भूगोल, पिंपळपुरे आणि कंपनी प्रकाशन, २००३, नागपूर, पान नं.९३.

१२) चपळगांवकर नरेंद्र, समाज आणि संस्कृती, अप्रबंध प्रकाशन, २००३, पान नं.२३ ते ३०.

१३) जवळगेकर रत्नाराज, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (सामान्य अध्याय), व विजयकुमार ऱ्हासे, निकिता प्रकाशन, २००४, पुणे, पान नं.७६.

१४) जिल्हा सांख्यिकी कार्यालय, लातूर अर्थसांख्यिकी विभाग, लोकसंख्या वर्गीकरण, फेब्रु.२००८, पान नं.२२.

१५) जिल्हा उपप्रबंधक कार्यालय, लेखाविभाग, वि.का. सोसायटी, जिल्हा आकडेवारी विश्लेषण, फेब्रु.२००८.

१६) जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन विभाग, पंचायतराज जिल्हा नियोजन आणि ग्रामीण स्वराज्य मुल्यमापन समिती अहवाल, डिसें. २००७, पान नं.१२३.

१७) थोरात भाऊसाहेब, संघर्ष यात्रा आझादी के पथपर, कल्पना प्रकाशन, २००६, पुणे, पान नं.५१ ते ६६.

१८) डॉ.दास्ताने संतोष, महाराष्ट्र (वार्षिक), दास्ताने रामचंद्र आणि कंपनी प्रकाशन, २००५, पुणे, पान नं.१२० व १२२.

१९) दीक्षित ना. सी, मराठयांचा इतिहास, पिंपाळपुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, १९९७, पान नं.१४.

२०) धाटोळे रा. ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती, योगेश प्रकाशन, २००४, नागपूर, पान नं.७३ व ७४.
२१) लातूर चौफेर, लातूरची कारखानदारी, ११ डिसेंबर २००७, पान नं.२.
२२) पळशीकर सुहास, महाराष्ट्रातील जात आणि राजकारण, सुगावा प्रकाशन, २००३, पुणे, पान नं.१२ व १३.
२३) पाटील शरद,जाती व्यवस्था, संकल्प प्रकाशन, १९९८, धुळे.
२४) पाटील एम. के, महाराष्ट्राचा सामाजिक व राजकीय विकास, विद्या बुकस् पब्लिशर्स, २००२, औरंगाबाद, पान नं.११८ ते १२१.
२५) पंचायत समिती कार्यालय, ग्रामपंचायत विभाग, सरपंचपद विश्लेषण २००६-०७.
२६) प्राचीन भारत, सामाजिक और सांस्कृतिक विकास की पडताल, प्रीती प्रकाशन, उत्तरप्रदेश, २०००, पान नं.११५.
२७) प्रतियोगिता साहित्य, यु.जी.सी. नेट/सेट, साहित्य भवन पब्लिकेशन, २००७, दिल्ली, पान नं.२१, २०.
२८) फडके य. दि., पक्षांतराचे राजकारण, अक्षर प्रकाशन, २००७, मुंबई, पान नं.४२ व ४३.
२९) डॉ.बोरूडे, संशोधन पद्धती, विद्यार्थी गृहप्रकाशन, २००५, पुणे, पान नं.२२२.
३०) बेहरे सुमन, सामाजिक संशोधन पद्धती, विद्या प्रकाशन, २००३, नागपूर, पान नं.१३२ ते १३६
३१) डॉ.भांडारकर मु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, विद्या बुक पब्लिशर्स, १९८३, औरंगाबाद, पान नं.१९२, १९४.
३२) भागवत रा. स., जगाचा इतिहास व मर्म, मराठी थिऑसिफिक्ल फेडरेशन प्रकाशन, १९६४, अकोला.
३३) महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, लोक व भुमी, १९९६, पान नं.२ व ३.
३४) महाराष्ट्र शासन, युगपुरूष महात्मा फुले, शिक्षा विभाग मंत्रालय, महात्मा फुले चरित्र प्रकाशन समिती, १९३३, मुंबई.
३५) मालसे स. ग., महात्मा फुले समग्र वाड्मय, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती प्रकाशन मंडळ, २००२, मुंबई, पा नं.७३ व ७४.
३६) मंडल, नंतरच्या कालखंडातील जात व राजकारण, सुहास पळशीकर, सुगावा प्रकाशन, पुणे, २००४, पान नं.१२ व १३.
३७) मुंदडा संजय, संशोधक, समाज प्रबोधन पत्रिका, मुस्लिम परंपरा, डिसेंबर २००७, पुणे, पान नं.३४
३८) डॉ.टकसाळे प्रसक्ता, समाज कार्यकर्ता, मंगेश प्रकाशन, २००४, नागपूर, पान नं.१२.
३९) डांगे स. अ., हिंदु धर्म आणि तत्वज्ञान, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, १९७३, मुंबई, पान नं.४८ ते ६३.
४०) यातेहोतर रमेश, भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, संध्या बुक प्रकाशन, १९९९, पान नं.१८.
४१) रेगे मे. पु., आकारिक तर्कशास्त्र, कॉस्न्टिनेंटल प्रकाशन, १९७६, पान नं.१० ते २२.
४२) लिमये मधु, संक्रमण कालीन राजनिती, समता प्रकाशन, १९९१, पान नं.११४.
४३) लोकसत्ता वृत्तपत्र लेख, महाराष्ट्राच्या राजकारणातील जात, १३ ऑक्टो. २००७, पान नं.२.

४४) वझे सुधाकर, परिवर्तनशील भारत, अर्थात स्वातंत्र्य भारताचा राजकीय इतिहास (१९४७ ते १९९७), सुभदा सारस्वत प्रकाशन, १९९८, पुणे, पान नं.३३ व ३४.
४५) शास्त्री पंडीत महादेव, भारतीय संस्कृती कोष, भारतीय संस्कृती प्रकाशन मंडळ, खंड-१, १९६२, पुणे, पान नं.२१ व २२.
४६) सकाळ वृत्तपत्र लेख, ओ.बी.सी. राजकारण मर्यादा, ३ ऑक्टो.२००७, पान नं.२.
४७) सार्वमत वृत्तपत्र लेख, घराणेशाहीचे राजकारण, लातूर विशेष लेख, २८ ऑक्टो.२००८, पान नं.३.
४८) डॉ.सारंग सुभाषचंद्र, महाराष्ट्राचा भुगोल, विद्या प्रकाशन, नागपूर, वर्ष १९९७, पान नं.२४.
४९) सोमन भा. ए., सामाजिक संशोधनाचे तंत्रे, पुणे विद्यार्थी गृहप्रकाशन, २००४, पुणे, पान नं.२५.
५०) सोमण मा. हा, सामाजिक संशोधनाची तंत्रे, विद्यार्थी गृह प्रकाशन, २००२, नागपूर, पान नं.१२४.
५१) मनोहर गोमारे, रेड्डी समाज इतिहास, लातूर, मुलाखत ३० सप्टेंबर २००७.
५२) डॉ.डि.एम.चिटे, सदस्य काँग्रेस, लातूर, समाज आर्थिक विवेचन, मुलाखत १३ ऑक्टो.०७.
५३) प्रकाश रेड्डी, सदस्य शिवसेना, लातूर, समाज राजकीय पार्श्वभूमी, मुलाखत १४ ऑक्टो.०७.
५४) उमलताई अकलगिरे, माजी सरपंच, रेणापूर, समाज राजकीय पार्श्वभूमी, मुला. १५ ऑक्टो.०७.
५५) एकनाथ अकलगिरे, लातूर जिल्हा राजकारण, मुलाखत १९ डिसें.२००७.
५६) पोकळे साहेब, पुणे विद्यापीठ, रेड्डी समाजरचना, मुलाखत २१ डिसें.२००७.
५७) Latur District Gazetteer, Publish by Editor & Secretary Govt. of Maharashtra, Year 2008, Bombay.
५८) Desai I. P. & Punahakar S. P., Caste Conflit and Reservation, Ajanta Publication, 2001, New Delhi, P.P. 72.
५९) Dhal Robert A., Modern Political Analysis, Person Education Published 2003, P.P.85.
६०) Euloy Heiny & Samuel S, Political Behavioar, A Reder Theory & Reasearch, Amriud Publication, Year 1995, New Delhi, P.P.103.
६१) Field G. G., Political Theory, published by Methuel Co. Ltd., 1956, London, P.P.19.
६२) Lane Robert E., Political Life, Published by a Division of the Macmillan company, 1965, Londan, P.P.52 to 53.
६३) Pekor B. A., Field Experimention, Mir Publisher, 1984, Pune, P.P.32.
६४) Robbon Colin, Real World Research, Bhekweli Publisher, USA, P.P.430 to 432.
६५) Sharma R. L., Profile of Caste, Class, Social, Rawat Publication, 1999, Delhi, P.P.63 to 65.
६६) Singh S. P., Reasearch Method in Social Science, Kamksha Publication, 2001, New Delhi, P.P.212 to 230.
६७) Thakkar Usha, Kulkarni Mangesh, Politics in Maharashtra, Himalay Publication, Bombay, Delhi, Nagpur, P.P.78.
६८) Taivedi P. R., Reasearh Methodology, Radha Publication, 2002, New Delhi, P.P.56.
६९) www.yahoo.com, Social Structure.
७०) www.google.com, Ahmednagar Histroy.
७१) www.maharashtra.co.in.

७२) www.ahmednagarsocialprogram.com.
७३) www.indianpolity.com.
७४) www.answer.com.
७५) www.indiansocialresearch.com.
७६) www.loksatta.com.